
नवभारत

मे - जून २०१०

सुवर्ण महाराष्ट्र विशेषांक



अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

अनुक्रमणिका

आवाहन

'नवभारत' हे वैचारिक मासिक सुरू होऊन आता ६१ वर्षे झाली. साहजिकच मासिकाच्या मूळ कर्त्यांनी जे उद्देश डोळयांपुढे ठेवले होते, ते उद्देश स्वीकारून लिहिणारे लेखक व त्या उद्देशांविषयी आस्था बाळगणारे वाचक आता कमी होत चालले आहेत. तरीदेखील वैचारिक आदान-प्रदानाचे समर्थ व्यासपीठ म्हणूनच 'नवभारता' ने कार्य करीत राहावे असाच आमचा संकल्प आहे.

भारतीय परंपरेची ओळख व परिष्करण करून देणारे लेख येतच राहतील. परंतु, विज्ञान, अर्थकारण, तत्त्वज्ञानातील आधुनिक विचारप्रवाह, इतिहासलेखनाला आलेले नवे रूप इत्यादी विषयांची भाष्यरूपाने ओळख करून देणे, नवीन ग्रंथांची समीक्षा करणे, लोकसाहित्य, दलित-वाङ् मय यांना जी काळानुरूप वळणे मिळत आहेत त्यांचा मागोवा ठेवणे या विषयांवर भर देणे अगत्याचे झाले आहे. लघुकथा, ललित लेख व कविता या 'नवभारता' पूर्वीही कक्षेबाहेर ठेवल्या नव्हत्या व आताही त्या कक्षेबाहेर ठेवलेल्या नाहीत.

आज तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालये निघाली आहेत. येथील शिक्षण मराठी भाषेतून चालते व ते योग्यच आहे. तथापि, इंग्रजी वा अन्य भारतीय भाषांतील विचारप्रवाहांशी या शिक्षणाचा संबंध राहू नये, ही खेदाची गोष्ट आहे. या महाविद्यालयातील ग्रंथालयात अद्ययावत् पुस्तके येत नाहीत व आली तरी ती वाचून सकस चर्चा करतील असे अभ्यासूंचे गटही सहसा असत नाहीत. आमचे अनेक विद्यार्थी या महाविद्यालयातून प्राध्यापक व प्राचार्य आहेत. त्यांनी ही व्यथा आमच्यापाशी बोलून दाखविली व असेही सांगितले की, 'नवभारता'तील काही लेखांच्या छायांकित प्रती काढून त्यांनी विद्यार्थ्यांना आवर्जून वाटल्या.

आमची अशी खात्री आहे की, महाविद्यालये, तेथील प्राध्यापक व विद्यार्थी तसेच गावोगावी विखुरलेले अभ्यासू नागरिक यांना 'नवभारत' वाचण्याची व त्यातील लेखांवर चर्चा करण्याची सवय लागून जाईल. या सर्वांना आपले दर्जेदार लेख 'नवभारत' कडे अवश्य पाठवावेत.

यासाठी 'नवभारता'चा प्रसार झाला पाहिजे. आमची वाचकांना अशी विनंती आहे की, त्यांनी 'नवभारता'ला वर्गणीदार मिळवून देण्याची मोहीम चालवावी. जो वाचक पाच वर्गणीदार मिळवून देईल त्याने सहाव्या व्यक्तीचे नाव व पत्ता कळवावा. त्या सहाव्या व्यक्तीला 'नवभारता' चे अंक वर्षभर आमच्याकडून विनाशुल्क पाठवले जातील. वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येते.

वर्षाची वर्गणी रू. ३००/- असून वर्गणी, चेक/डी.डी./मनिऑर्डर यांच्याद्वारे 'नवभारता'च्या पत्त्यावर पाठवावी. चेक/डी.डी. 'नवभारत' मासिक, या नावाने ३१५, गंगापुरी, वाई ४१२८०३ या पत्त्यावर पाठवावे.

- संपादक मंडळ

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई संचालित मासिक

नवभारत

वर्ष ६३। अंक ८-९ । मे-जून २०१०
वैशाख-ज्येष्ठ शके १९३२
वार्षिक वर्गणी ३०० रूपये
या अंकाची किंमत रू. १५०/-

नवभारतची भूमिका*

मानवाच्या व मानवसंस्कृतीच्या विकासास व उन्नतीस पोषक होईल अशा प्रकारे महाराष्ट्रीय जीवनाचा व संस्कृतीचा विकास करणे, हे या मासिकाचे ध्येय व उद्दिष्ट आहे.

ध्येयप्रवण व्यक्तींनी स्वोन्नतीच्या हेतुपूर्तीसाठी जे आपले सांस्कृतिक मूल्यमापन ठरविलेले असेल, उच्च वातावरणातील जो अभिजात अनुभव स्वतःच्या साधनेने संगृहीत केलेला असेल, त्याचे दिग्दर्शन हेच संस्कृतिपोषक वाङ्मय होऊ शकते, असा संचालक व संपादक मंडळ यांचा विश्वास आहे.

या मासिकात येणाऱ्या लेखांत कोणत्याही विशिष्ट मताचा, वादाचा, पक्षाचा किंवा पंथाचा प्रचार करण्याचा हेतू नाही.

संचालक व संपादक-मंडळातील सर्व व्यक्ती यांचेही सर्व विषयांत मतैक्य आहे, असे नाही. मानवी जीवनविषयक व सांस्कृतिक मूल्यांसंबंधी सदृश अशा दृष्टिकोणानेच त्यांना एकत्र आणले आहे. तथापि प्रत्येकाचे व्यक्तिवैशिष्ट्य व विचारस्वातंत्र्य यांचा विनाश न होता विकास व्हावा या दृष्टीनेच त्यांचे सहकार्य राहील. प्रत्येक व्यक्ती आपल्या नावाने प्रसिद्ध होणाऱ्या लेखाबद्दलच जबाबदार राहील.

मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक लिखाणात सत्यनिष्ठा, संयम आणि सहिष्णुता असतील अशी काळजी घेतली जाईल.

*नवभारत, ऑक्टोबर १९४७, वर्ष १ ले, अंक १ मधील कै. शंकरराव देव यांच्या 'संचालकांचे मनोगत' मधून.

संपादकीय पत्रव्यवहार :
संपादक, *नवभारत* मासिक,
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा).

व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :
घ. वा. जोशी
व्यवस्थापक, नवभारत मासिक
द्वारा : प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी,
वाई - ४१२८०३ (जि. सातारा)

अनुक्रमणिका

नवभारत

मे – जून २०१०

अनुक्रमणिका

संपादकीय निवेदन

मराठी जनतेने निकराचा लढा देवून त्या वेळच्या केंद्रीय नेतृत्वाकडून मुंबईसकट संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला संमती मिळविली; एकाच राजसत्तेखाली संपूर्ण मराठी समाज नांदला असे इतिहासात कधी घडले नव्हते ते घडून आले; एक विस्तृत, प्रगतिशील आणि आर्थिक बाजूने बलशाली असे राज्य निर्माण झाले त्या भाग्यशाली घटनेला १ मे रोजी पन्नास वर्षे पूर्ण होऊन ५१ वे वर्ष सुरू झाले. त्या निमित्ताने मे-जून महिन्यांचा हा जोड अंक आम्ही 'सुवर्ण महाराष्ट्र विशेषांक' म्हणून प्रसिद्ध करीत आहोत. वाचकांना तो अंक आवडेल अशी बळकट आशा वाटते.

महाराष्ट्राच्या स्थापनेला पन्नास वर्षे होत आहेत हा मोका साधून महाराष्ट्रात निरनिराळ्या क्षेत्रात ज्या घडामोडी झाल्या त्यांचा आढावा घेणारे लेख असलेला एक संदर्भ-ग्रंथ काढावा असा विचार पुण्याच्या 'राजहंस प्रकाशना'ने केला व अनेक अभ्यासकांकडून लेख मागविले. तथापि, अनेक अडचणींमुळे तो प्रकल्प सोडून द्यावा लागला. 'राजहंस प्रकाशना'कडे गोळा झालेल्या लेखांपैकी काही लेख या अंकात आम्ही लेखकांच्या संमतीने घेतले आहेत. 'राजहंस प्रकाशनाचे' श्री. माजगावकर व डॉ. बोरसे यांनी उदारपणे 'नवभारता'ला हे सहकार्य दिले त्याबद्दल आम्ही त्यांचे फार फार ऋणी आहोत. लेखकांनीही कोणतेच आढेवेढे न घेता मनमोकळेपणाने त्यांचे लेख प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली यासाठी आम्ही कृतज्ञ आहोत. 'राजहंस प्रकाशन' व या अंकातील लेखक इथून पुढेही 'नवभारता'वर लोभ करीत राहतील असा भरंवसा वाटतो.

'नवभारता'चा जुलै २०१० चा अंक 'इतिहास-विशेषांक' म्हणून प्रसिद्ध होईल. प्राज्ञपाठशाळा, 'नवभारत' व 'भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे' यांच्यात अतिशय जिव्हाळ्याचे नाते आहे. जुलै महिन्यात 'भारत इतिहास संशोधक मंडळा'स शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्राला मोठा इतिहास आहे त्याप्रमाणे महाराष्ट्राचे इतिहासप्रेम व इतिहास-संशोधनाबद्दलची आस्था या गोष्टीही प्रसिद्ध आहेत. मंडळाच्या शताब्दीच्या निमित्ताने 'इतिहास-विशेषांक' काढणे औचित्यपूर्ण ठरेल असे आम्हाला वाटते.

महाराष्ट्राच्या सुवर्ण-महोत्सवाबद्दल समग्र मराठी जनतेला आमच्या शुभेच्छा.

— संपादक मंडळ

महाराष्ट्राचे राजकारण

– प्रा. डॉ. अशोक चौसाळकर

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली आणि इतिहासात कदाचित पहिल्यांदाच सर्व मराठी भाषिक लोकांचे राज्य स्थापन झाले. त्यांच्यामध्ये राजकीय ऐक्य प्रस्थापित झाले. यापूर्वी हे मराठी भाषिक प्रदेश मध्यप्रांत मराठवाडा व मुंबईराज्य या तीन भागात विभागलेले होते. हे संयुक्त भाषिक प्रदेश होते आणि आपणावर हिंदी भाषिकांचे उर्दू-तेलगू भाषिकांचे वा गुजराती भाषिकांचे प्रभुत्व आहे अशी मराठी लोकांची भावना होती. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करण्यासाठी लोकांनी जी चळवळ केली त्यामागे ही भावना प्रभावी होती.. या चळवळीस मोठा पाठिंबा पं. महाराष्ट्रातून मिळाला. मराठवाड्यात पण या चळवळीस चांगला पाठिंबा मिळाला कारण तेथील लोकांना हैद्राबाद राज्यात राहावयाचे नव्हते. विदर्भामध्ये त्यामानाने या चळवळीस कमी पाठिंबा मिळाला. पण शेवटी या चळवळीचा विजय झाला आणि केंद्र सरकारला संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करावी लागली.

द्वैभाषिकाची स्थापना –

१९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्याची मागणी पुढे आली आणि १९५६ साली बहुतेक सर्व राज्यांची स्थापना करण्यात आली. मुंबईचे भांडवलदार व गुजराती नेते यांच्या विरोधामुळे मुंबईसह महाराष्ट्र स्थापन करण्याची मागणी मान्य होत नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्यांनी गुजरात, मुंबई व महाराष्ट्र या त्रिराज्य योजनेऐवजी द्वैभाषिक नव्या मुंबई राज्याची योजना स्वीकारली कारण त्यातून काही वर्षानंतर महाराष्ट्राचे राज्य स्थापन करणे शक्य होते. १/११/५६ रोजी द्वैभाषिक स्थापन झाले. हा देशातील सर्वात मोठा व विकसित प्रांत होता. या प्रांतातून ७५ खासदार लोंकसभेवर निवडून जात होते. मोरारजी देसाईंनी आपणास विरोध होतो आहे हे लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण या तरुण मराठी नेत्याची मुख्यमंत्रीपदासाठी निवड केली.

पण मराठी लोकांचा द्वैभाषिकास विरोध होता. म्हणून १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत प. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचा मोठा विजय झाला. समितीला १३४ पैकी १०० जागा मिळाल्या. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते न. वि. गाडगीळ, देवकीनंदन, मालोजीराजे कातडे पाटील या निवडणुकीत पराभूत झाले आणि या निवडणुकीनंतर शंकरराव देव यांनी काँग्रेसचे जे नेते १९२० नंतर राजकारणात आणले होते त्यांचे राजकारण संपुष्टात आले. समितीला मराठवाड्यात व विदर्भात मोठे यश मिळाले नाही. पण हळूहळू समितीचा प्रभाव मराठवाड्यात पण पसरत होता. महाराष्ट्रातील ही अस्वस्थता लक्षात घेऊन काँग्रेस नेते स. का. पाटील, यशवंतराव चव्हाण यांनी त्यावेळच्या काँग्रेस अध्यक्ष श्रीमती इंदिरा गांधी यांना महाराष्ट्राची परिस्थिती समजावून सांगितली आणि त्यांनतर केंद्र सरकारने त्याबाबतचा निर्णय घेतला. आपणास न सांगता आपल्यापाठीमागे चव्हाणांनी हा निर्णय घेतला याचे मोरारजी देसाई यांना मोठे वैषम्य वाटले पण मग त्यांनीही आपला विरोध मागे घेतला. डांग हा आदिवासी बहुल जिल्हा गुजरातेत गेला दोन स्वतंत्र राज्ये निर्माण झाली.

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली त्यावेळी महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती कशी होती? तेथील पक्षीय बलाबल कशा प्रकारचे होते? १९५० ते १९६० या दशकांत राज्यात कोणत्या शक्ती कार्यरत झाल्या होत्या? याचा आपणास प्रथम वेध घ्यावा लागेल.

महाराष्ट्रातील राजकीय पक्ष :

१९५० ते १९६० या काळात महाराष्ट्रात काँग्रेस पक्ष हा प्रभावी पक्ष होता व १९५२ च्या निवडणुकीत या पक्षास चांगले यश मिळाले होते. या काळात पक्षावर अजूनही शंकरराव देव व मामा देवगिरीकर यांच्या गटाचा प्रभाव होता कारण केशवराव जेधे यांचा गट

बाहेर गेला होता. महाराष्ट्रातील दुसरा महत्त्वाचा पक्ष हा प्रजासमाजवादी पक्ष होता. काँग्रेसच्या तुलनेत या पक्षाची ताकद कमी असली तरी मुंबई, कोकण व पुणे या भागात पक्षाची प्रभाव क्षेत्रे होती. तिसरा पक्ष हा शेतकरी कामगार पक्ष. या पक्षाचा प्रभाव ग्रामीण भागात होता आणि त्यांच्याजवळ ब्राह्मणेतर व सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्त्यांचा चांगला संच होता. चौथा पक्ष हा भारतीय कम्युनिस्ट पक्ष होता. या पक्षाचा मुंबई, ठाणे, नगर, बीड, नागपूर या भागात प्रभाव होता. पाचवा पक्ष हा रिपब्लिकन पक्ष होता. या पक्षाची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी केली आणि या पक्षास दलितांतील एका मोठ्या गटाचा पाठिंबा होता. या चार विरोधी पक्षांबरोबरच भारतीय जनसंघ व हिंदु महासभा हे हिंदुत्ववादी पक्ष होते. या काळात त्यांचा प्रभाव मर्यादित होता. विदर्भातील हिंदुसभेचे नेते वि. घ. देशपांडे मध्यप्रांतातून लोकसभेवर निवडून आले होते.

महाराष्ट्रातील या पाच पक्षांमध्येच मुख्यतः चुरस होती आणि सामाजिक बदलाबरोबर या पक्षांचे स्वरूप पण बदलत होते. यातील प्रजासमाजवादी पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांचे नेते राष्ट्रीय पातळीवर कार्य करीत होते. अशोक मेहता, ना. ग. गोरे तसेच जोशी, श्री. अ. डांगे व बी. टी. रणदिवे हे राष्ट्रीय स्तरावरचे नेते होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात प्रसोपा, भाकप, शेकाप व रिपब्लिकन पक्ष हे पक्ष एकत्र आल्यामुळेच काँग्रेसचा मोठा पराभव झाला होता. पण या पक्षांत मोठे अंतर्विरोध होते. प्रजा समाजवादी पक्षास कम्युनिस्ट पक्षाशी आघाडी करावयाची नव्हती कारण अशा आघाडीस केंद्रीय नेतृत्त्वाचा विरोध होता. शेतकरी कामगार पक्षात सामील झालेला कामगार किसान पक्ष त्यातून बाहेर पडला होता आणि केशवराव जेधे, तुळशीदास जाधव व शंकरराव मोरे यांच्यासारखे पक्षाचे ज्येष्ठ नेते काँग्रेसमध्ये परत गेले होते. पक्षाच्या तरुण नेत्यांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा लाभ घेवून पक्षाचे सामर्थ्य टिकवणे शक्य झाले. या पक्षाचा मुख्य आधार शेती कसणारा मध्यम जातीतील मराठा समाज होता आणि १९५६ साली मुख्यमंत्री झाल्यानंतर शेकापचा सामाजिक पाया ताब्यात घेण्याचा यशवंतराव चव्हाण यांचा प्रयत्न होता. रिपब्लिकन पक्षाला १९५७ च्या निवडणुकीत चांगले यश मिळाले पण त्यांनतर पक्षात गटबाजी निर्माण झाली. अंतर्गत संघर्ष निर्माण झाले. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये ते कार्य करीत असले तरी त्यांच्यात एकवाक्यता नव्हती.

चव्हाणांचा नवा मार्ग :

१९५७ च्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसचा पराभव झाला आणि त्यात सर्व जुन्या काँग्रेसने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. यशवंतरावांनी त्यानंतर काँग्रेसची फेररचना करावयास सुरुवात केली. मामा देवगिरीकर यांच्या जागी मालोजीराजे निंबाळकर यांची नेमणूक करण्यात आली आणि त्यानंतर हळूहळू ग्रामीण भागातील नव्या पुढाऱ्यांना राजकारणात आणण्याचे काम सुरू झाले. याच काळात बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, राजारामबापू पाटील या नेत्यांना पुढे आणण्यात आले. सुरुवातीच्या काळात बलवंतराय मेहता, वैकुंठभाई मेहता, जोतराज मेहता व हितेंद्र देसाई या गुजराती नेत्यांच्या तुलनेत मराठी मंत्री सर्वच बाबतील दुय्यम दर्जाचे होते. मराठी नेत्यांच्या मंत्रिमंडळातील कामगिरीबद्दल बाबासाहेब आंबेडकरांनी नाराजी व्यक्त केली होती. पण हळूहळू मराठी मंत्र्यांच्या कामात सुधारणा झाली. यशवंतराव चव्हाणांच्या हे लक्षात आले की काँग्रेसचा पाया महाराष्ट्रात पुनः खोलवर रुजवायचा असेल तर मध्यम शेतकरी जातीत पक्षाचा पाया रुजवला पाहिजे आणि त्यासाठी काँग्रेसला मुख्यतः शेत-करी कामगार पक्षाशी स्पर्धा करावयाची होती कारण अजून शेती क्षेत्रात हरित क्रांती झालेली नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात डाव्या पक्षांबाबत आपुलकी होती. शेकापला सत्यशोधक आणि ब्राह्मणेत्तर चळवळीचा होता आणि या चळवळीचे उद्दिष्ट उच्चवर्णीयांचे वर्चस्व नष्ट करणे हे होते. १९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसचे उच्च-वर्णीय नेते पराभूत झाले. यशवंतरावांनी त्यांच्या जागी नवे नेते आणले. त्याचबरोबर शेकापची कार्यक्रमपत्रिका बेमालूमपणे काँग्रेसच्या कार्यक्रमात समाविष्ट केली.

यशवंतरावांनी सहकारी साखर कारखाने स्थापन करावयास सुरुवात केली. १९५८ साली त्यांनी वसंतदादा

पाटील यांच्या शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या उद्‌घाटनाच्या वेळी केलेल्या भाषणात कृषि औद्योगिक समाज स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्या दृष्टीने हे भाषण महत्त्वाचे आणि मूलगामी स्वरूपाचे होते. ग्रामीण नेतृत्त्वाच्या व ग्रामीण भागाच्या विकासास त्यामुळे चालना मिळणार होती. या नव्या विकासाच्या चळवळीत शेकाप व कम्युनिस्ट पक्षातील बहुजनसमाजातील पुढाऱ्यांनी सामील व्हावे यासाठी चव्हाणांनी प्रयत्न सुरू केले. त्यांतून त्यांना माळशिरसचे नेते शंकरराव मोहिते आणि कराडमधील नेते यशवंतराव मोहिते यांच्याकडून प्रतिसाद मिळाला. १९६० मध्ये ज्यावेळी सं. महाराष्ट्र स्थापन करण्याचा निर्णय झाला त्यावेळी २६५ सदस्यांच्या विधानसभेत काँग्रेस व समिती यांचे बलाबल जवळपास सारखेच होते. त्यामुळे काँग्रेसपुढे सरकार टिकविण्याचा व स्थिर सरकार देण्याचा मुद्दा होता. त्यावेळी चव्हाण यांनी काँग्रेस श्रेष्ठींना असे आश्वासन दिले की विरोधी पक्षातील ३० आमदार काँग्रेसला पाठिंबा देतील त्यांचा अंदाज बरोबर ठरला. शेकाप, भाकप व प्रसोपातील अनेक नेते काँग्रेसमध्ये परतले. महाराष्ट्राबाबत निर्णय घेण्यास त्यामुळे केंद्र सरकार मोकळे झाले.

संयुक्त महाराष्ट्रापुढचे प्रश्न :

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते झाली. चव्हाणांची मुख्यमंत्री म्हणून फेरनिवड झाली. त्यांना मुख्यमंत्रीपदाचा आता चार वर्षांचा अनुभव होता. त्यांनी काँग्रेसची राज्याच्या राजकारणाची व अर्थकारणाची फेररचना करण्याचा कार्यक्रम हाती घेतला. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या विघटनामुळे चव्हाणांचे काम सोपे झाले.

समितीने ५-६ वर्षे अत्यंत जिद्दीने चळवळ केल्यामुळे सं. महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले. त्यात १०५ जण हुतात्मे झाले. त्यामुळे समिती या भांडवलाच्या आधारावर १९६२ च्या निवडणुकीत जनतेचा कौल मागेल अशी अपेक्षा होती पण प्रजा समाजवादी पक्षास कम्युनिस्टांचा सहवास नको होता. त्यामुळे प्रसपचे नेते एस्. एम्. जोशी यांनी 'यशवंतरावांनी महाराष्ट्राचा मंगल कलश' आणला म्हणून त्यांचे कौतुक केले. त्यांचे अभिनंदन करावयास ते गेले आणि समिती बरखास्त करण्याचा निर्णय प्रसोपाने घेतला. आचार्य अत्रे व समितीच्या इतर नेत्यांना हा निर्णय अनपेक्षित होता. पण यावेळी व यानंतरही अनेकवेळा यशवंतरावांच्या हितास पूरक असे राजकारण करण्याचे एसेम व प्रसोपाचे धोरण राहिले. समिती बरखास्त झाली. प्रसोपाने माघार घेतली. भारतीय कम्युनिस्ट पक्ष व शेतकरी कामगार पक्षातील ग्रामीण भागात काम असणारे अनेक मातब्बर नेते काँग्रेस पक्षात सामील झाले. रिपब्लिकन पक्ष अंतर्गत फुटीमुळे त्रस्त होता. त्यामुळे महाराष्ट्रात विरोधी पक्षांचे राजकारण विस्कळीत झाले. यशवंतराव चव्हाण यांच्या बेरजेच्या राजकारणास प्रजा समाजवाद्यांचे वजाबाकीचे राजकारण हे उत्तर होते. त्यांच्याजवळ विकासाचा कोणताही आकृतीबंध तयार नव्हता.

सं. महाराष्ट्र स्थापन झाल्यानंतर नव्या सरकारपुढे अनेक प्रश्न होते. मुख्य प्रश्न हा महाराष्ट्रातील जनतेमध्ये नव्या परिस्थितीमध्ये ऐक्य भावना निर्माण करण्याचा होता. त्यावेळी तीन बाबतीत भावनात्मक ऐक्य स्थापन करणे गरजेचे होते.

१) प. महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा हे तीन भाग प्रथमच राजकीय दृष्ट्या एकत्र येत होते. त्यात मराठवाडा मागासलेला होता आणि विदर्भात स्वतंत्र विदर्भाची मागणी करणारा प्रभावी दबाव गट होता. या सर्वांच्या मनात भावनिक ऐक्य निर्माण करणे गरजेचे होते. ती प. महाराष्ट्रातील नेत्यांची जबाबदारी होती.

२) महाराष्ट्र ह्या प्रांताची मुंबई ही राजधानी. या शहरात मराठी भाषिकांची संख्या शेकडा ३५ च्या आसपास होती आणि हे बहुभाषिक शहर होते. ह्या शहरातील सर्व भाषिक अल्पसंख्यांकांना पूर्णतः संरक्षण मिळेल व त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही अशी हमी देणे गरजेचे होते कारण मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी होती. तिचे बहुभाषिक व बहुसांस्कृतिक स्वरूप कायम ठेवून तिला उत्तम प्रकारे प्रशासित करणे गरजेचे होते.

३) सामाजिक बाबतीत महाराष्ट्रात अनेक तणाव होते. विसाव्या शतकाच्या दोन तीन दशकांत येथे ब्राह्मण-ब्राह्मणेतर तणाव होता आणि ब्राह्मणांचे सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक वर्चस्व कमी करण्याचा ब्राह्मणेतरांचा

प्रयत्न होता. डॉ. आंबेडकरांनी त्यांची चळवळ वेगळ्या पक्षामार्फत चालवली. हिंदु धर्मात अपेक्षित सुधारणा होत नाही हे लक्षात आल्यानंतर १९५६ साली त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांच्याबरोबर लाखो लोकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. सुमारे वीस लाख लोकांनी धर्मांतर केले. त्यांनी धर्मांतर केलेले असले तरी त्यांना राखीव जागांची सुविधा मिळत राहील व त्यांना समाजात योग्य स्थान दिले जाईल हे पाहाणे गरजेचे होते. संयुक्त महाराष्ट्रातील तिन्ही भाग एकत्र आल्यामुळे मराठा जातीची वा जातीगटाची एकूण लोकसंख्या शे. ३३ टक्क्यांच्या आसपास होते. भारताच्या कोणत्याही एका राज्यात एकाच जातीच्या लोकांची संख्या एवढ्या मोठ्या प्रमाणात नाही. त्यामुळे संख्याबळ, शेती व गाव समुदायातील वर्चस्व व राजकारणातील सत्ता यामुळे मराठा जात ही वरचढ जात म्हणून निर्माण होणार होती. असे असेल तर महाराष्ट्र राज्य हे मराठी राज्य – मराठी लोकांचे राज्य असणार आहे, ते मराठा जातीचे राज्य असणार नाही असे आश्वासन देणे गरजेचे होते. या राज्यात सर्वच जातींना व भाषिक गटांना व धार्मिक गटांना विकास करण्याचा अधिकार आहे याची जाणीव राजकारणाऱ्यांना होणे गरजेचे होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना त्याची जाणीव होती आणि त्यांनी आपल्या विविध भाषणांतून त्याबाबतचे विवेचन केले.

भावनिक ऐक्य स्थापन करण्यासाठी आर्थिक विकास घडवून आणणे महत्त्वाचे असते. महाराष्ट्रापुढे याबाबत अनेक समस्या होत्या. येथे औद्योगिक विकासास सुरुवात झाली होती पण तो विकास मुंबई, पुणे व नागपूरच्या आसपास होत होता. वीजनिर्मिती कमी प्रमाणात होत होती. मुख्य प्रश्न महाराष्ट्राच्या शेतीचा होता. महाराष्ट्रात कूळ कायद्याची अंमलबजावणी झाली. ही अंमलबजावणी प. महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे झाली. विदर्भ व मराठवाड्यात तेवढ्या चांगल्या प्रमाणात झाली नाही. महाराष्ट्रात शेतीस पाणी मिळाले पाहिजे पण भौगोलिक परिस्थितीमुळे पुरेसे पाणी मिळत नाही. त्यामुळे पाणी पुरवठ्यासाठी धरणे बांधणे व शेतीची उत्पादकता वाढवणे आवश्यक होते कारण शेतीची दर एकरी उत्पादकता कमी होती. त्यामुळे शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणे अपेक्षित होते. शेतीत सुधारणा झाल्याशिवाय महाराष्ट्रातील गरिबी दूर होणे शक्य नव्हते.

यशवंतराव चव्हाण यांचे नवे राजकारण -

यशवंतरावांनी १ मे १९६० नंतर राजकारणाचा नवा आराखडा तयार केला व पं. नेहरु यांच्या विकासाच्या प्रतिमानात त्यांनी स्वतःचे असे विकासाचे प्रतिमान बसवले. विदर्भात भावनिक ऐक्य निर्माण व्हावे यासाठी त्यांनी तेथील नेत्यांशी जवळीक साधली आणि नोव्हेंबर १९६८ मध्ये ज्या वेळी त्यांना दिल्लीस जावे लागले त्यावेळी त्यांनी मुख्यमंत्री म्हणून विदर्भातील मारोतराव कन्नमवार आणि नंतर वसंतराव नाईक यांची निवड केली. मराठवाड्यात त्यांनी मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करून त्या विभागाच्या सांस्कृतिक व शैक्षणिक विकासास सुरुवात केली. दोन्ही भागातून नवे नेतृत्व पुढे आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

महाराष्ट्रात बिगर मराठी भाषिकांना आणि बिगर महाराष्ट्रीयांना कोणताही त्रास होणार नाही व त्यांचा व्यवस्थित विकास होईल हे पाहाण्याचे काम त्यांनी केले त्यामुळे मुंबईतील गुजराती भाषिक लोकांची नाराजी बऱ्याच प्रमाणात कमी झाली. या काळात मुंबई प्रदेश काँग्रेस समिती ही स्वतंत्र समिती होती व स. का. पाटील हे तिचे प्रमुख होते. मुंबईचे वेगळेपण जपण्याचे श्री. पाटील यांनी या काळात प्रयत्न केले.

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात निर्माण झालेले संघर्ष हळुवारपणे सोडवण्याचा चव्हाणांचा प्रयत्न होता. १९४८ साली प. महाराष्ट्रात ब्राह्मणविरोधी दंगली व जाळपोळ झाली. त्यावेळी घरदुरुस्तीसाठी लोकांना सरकारने जे कर्ज दिले होते ते चव्हाण सरकारने माफ केले. चव्हाण व्यवस्थेत बदल चाहत होते. त्यामुळे ब्राह्मण व उच्चवर्णीयांशी त्यांचा अवैमनस्यकारी अंतर्विरोध होता. त्यांचा प्रयत्न उच्चवर्णीयांचा प्रभाव कमी करण्याचा होता पण त्याचबरोबर त्यांच्या प्रगतीच्या मार्गात कोणतेही अडथळे त्यांनी आणले नाहीत. मुख्य प्रश्न दलित व ओ. बी. सी. जातींना मदत करण्याचा होता. त्यामुळे १९६१ सालीच त्यांनी शे. ३५ टक्के जागा मागास जातींसाठी राखीव ठेवल्या त्यात शे. ११ टक्के जागा इतर मागास जातीसाठी

राखीव ठेवण्यात आल्या. दलित जातीतील धर्मांतरित नवबौद्धांना पण राखीव जागांची सवलत देण्यात आली. त्यांनी बहुजन समाजाची कल्पना मांडून त्यात मराठा व ओ. बी. सी. जातींचा समावेश केला. सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळीची मुख्य कार्यक्रमपत्रिका ब्राह्मणांचे वर्चस्व नष्ट करणे आणि राजकीय सत्तेचे वेगवेगळ्या समाज घटकात न्याय्य वाटप करणे ही होती. चव्हाणांनी अत्यंत चलाखीने तिचा वापर केला आणि शेतकरी कामगार पक्षाचा कार्यक्रम आत्मसात केला. त्यामुळे शेकाप व भाकपचे अनेक कार्यकर्ते नेते व आमदार काँग्रेस पक्षात सामील झाले.

कृषि – औद्योगिक समाजाची संकल्पना :

पं. नेहरुंनी विकसित केलेल्या विकासाच्या प्रतिमानात चव्हाणांनी स्वतःचे असे कृषि औद्योगिक समाजाच्या विकासाचे प्रतिमान स्थापित केले. महाराष्ट्रात कूळ कायदा व 'कसेल त्याची जमीन' या धोरणांची अंमल-बजावणी झाली आणि रयतवादी व्यवस्थेतील शेतकऱ्यांना जमिनीची मालकी मिळाली. आता मुख्य प्रश्न शेतीच्या विकासाचा होता. त्यासाठी पाणी हवे होते. त्यांच्या मते शेतीच्या पाण्याचा प्रश्न हा महत्त्वाचा होता. 'महाराष्ट्राची अवस्था गळत्या मातीच्या घागरी सारखी आहे' असे यशवंतराव एका भाषणात म्हणाले होते. त्यामुळे महाराष्ट्रात पाटबंधारे व धरणे बांधण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरू झाले आणि नंतर शंकरराव चव्हाण यांनी याबाबतीत चांगले काम केले. शासनाने याबाबत पुढाकार घेतला. शेतीविकासाचा नवा कार्यक्रम सुरू केला. सामुदायिक विकास योजनेचे कार्यक्रम अयशस्वी झाल्यानंतर पंचायत राज्य संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला व महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायत राज्य व्यवस्था सुरू झाली. ग्रामीण भागातील नेत्यांच्या हातात सत्ता देण्यात आली. लोकशाही व विकास या दोन्हींसाठी या संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. शेती, शिक्षण, ग्रामविकास इत्यादी बाबतच्या अनेक योजना पंचायत राज्याकडे सोपवण्यात आल्या. जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी हा जिल्हाधि-काऱ्याच्या समकक्ष अधिकारी होता. १९६२ साली या संस्था स्थापन झाल्या आणि ग्रामीण विकासात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. पंचायत राज्य संस्थांत ग्रामीण भागातील राजकीय कार्यकर्त्यांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण मिळाले. त्यातून नवे नेतृत्व निर्माण झाले.

कृषि उत्पादनावर आधारित उद्योगधंदे ग्रामीण भागात सहकारी क्षेत्रात सुरू करण्याचा चव्हाणांनी निर्णय घेतला. सहकारी संस्थांचे जाळे निर्माण करून त्यांस आर्थिक ताकद देण्याचा त्यांचा विचार होता. त्यात सहकारी बँका, सेवा सहकारी सोसायट्या, खरेदी विक्री संघ आणि कृषिमालावर प्रक्रिया करणारे कारखाने यांचा समावेश होता. ऊस, कापूस व तेलबिया यांच्यावर प्रक्रिया करून साखर, कपडे व तेलनिर्मिती करण्याची कल्पना त्यामागे होती. त्याप्रमाणे विखे पाटलांनी पहिला साखर कारखाना काढला आणि इतरांनी पण त्यानंतर कारखाने काढावयास सुरुवात केली. त्यांत रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे, यशवंतराव मोहिते यांचा समावेश होता. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर १९६८ साली मोठ्या प्रमाणात नवे कारखाने स्थापन झाले. आज संपूर्ण महाराष्ट्रात १५० पेक्षा जास्त साखर कारखाने आहेत.

महाराष्ट्रात ऊस वगळता इतर क्षेत्रातील सहकारी प्रक्रिया उद्योग यशस्वी झाले नाहीत पण साखर कार-खान्यांनी ग्रामीण भागात ग्रामीण विकासाचा प्रयोग यशस्वी-रित्या केला व त्यांतून सहकारी बँका, दूध डेअऱ्या, शाळा, महाविद्यालये, इंजिनियरिंग कॉलेजेस व इतर अनेक प्रक्रिया करणारे उद्योग उभे राहिले. त्यातून साखर सम्राट निर्माण झाले. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या राज-कारणात दबाव गट म्हणून काम करणारी शुगरलॉबी निर्माण झाली. साखर कारखाने प. महाराष्ट्रात जास्त यशस्वी झाले. मराठवाड्यात बीड, उस्मानाबाद जिल्ह्यात कारखाने चांगले चालले. इतर मराठवाडा व विदर्भात ते तितकेच चांगल्या प्रकारे चालले नाहीत.

चव्हाणांनी पंचायतराज्य आणि सहकारी संस्था यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील राजकीय नेत्यांना विकासाच्या राजकारणाची दीक्षा दिली आणि या मार्गाबद्दल असे आकर्षण निर्माण केले की अनेक नेत्यांना काँग्रेसमध्ये जावे असे वाटू लागले. त्याचा परिणाम म्हणजे १९६२ च्या निवडणुकीत काँग्रेसचा मोठा विजय झाला व विरोधी पक्षांचा मोठा पराभव झाला. विधानसभेतील एकूण २६५ जागापैकी २१५ जागा काँग्रेसने जिंकल्या. प्रजासमाजवादी

पक्षास १५ तर शेकापस १४ जागा मिळाल्या. रिपब्लिकन पक्षास बऱ्यापैकी मते मिळाली पण जागा मिळाल्या नाहीत. काँग्रेसचे प्रचंड असे वर्चस्व येथे निर्माण झाले. लोकसभेच्या ४२ पैकी ४० जागा काँग्रेसने जिंकल्या. भाई डांगे, एसेम जोशी, ना. ग. गोरे, अत्रे यांच्यासारखे समितीचे नेते निवडणुकीत पराभूत झाले.

यशवंतरावांनी सहकारी संस्था व पंचायती राज्य यांच्या साह्याने महाराष्ट्रात एक प्रबळ अशी सामाजिक आघाडी निर्माण केली. या आघाडीचे नेतृत्व मराठा नेत्यांकडे होते पण त्यात इतरांचाही काही प्रमाणात समावेश होता. सुरुवातीच्या काळात राज्यमंत्रीमंडळ, विधानसभा, सहकारी चळवळ व पंचायत राज्य यांच्यातील सत्तास्थानावर शे. ७५-८० टक्के नेते हे मराठा जातीतून आलेले होते. त्यातील अनेकजण मराठा शेतकरी जातीतून आलेले होते. त्यात इतर मागास जातीतील नेत्यांचाही काही प्रमाणात समावेश होता. मराठा जातीचा पाठिंबा, पंचायत राज्य व सहकारी बँका व सहकारी संस्था यांच्या आधारे एक महाबळकट राजकीय पक्ष चव्हाणांनी तयार केला. त्यांना जनतेचा पण मोठा पाठिंबा त्या काळात मिळाला.

चव्हाणांनी तयार केलेला हा जो राजकीय आराखडा होता त्यात विकासाचे राजकारण महत्त्वाचे होते. जास्तीत जास्त लोकांना शिक्षण घेता यावे म्हणून ई. बी. सी. ची सवलत लागू करण्यात आली. शाळा महाविद्यालयांचा विस्तार करण्यात आला. १९६२ नंतर रिपब्लिकन पक्षाच्या गायकवाड गटाशी आघाडी करण्यात आली. पण चव्हाणांच्या या बांधणीत काही दोष होते. ग्रामीण भागात या संस्थांसाठी राजकीय भरती करीत असतांना त्यांनी योग्य ती काळजी न घेतल्यामुळे त्यात अनेक संधिसाधू लोक घुसले. त्यातील अनेकजणांनी स्वातंत्र्य चळवळीस विरोध केला होता त्यात समाजात सत्तामत्ता असणारे, गुंडगिरी करणारे लोक होते. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत त्याग केलेल्या जुन्या काँग्रेस कार्यकर्त्यांना अडगळीत टाकले आणि आपले वर्चस्व स्थापन केले. दुसरी गोष्ट म्हणजे सहकारी संस्था व साखर कारखाने या विकासासाठी स्थापन करण्यात आलेले आहेत. राजकीय नेत्यांच्या स्वार्थसिद्धीसाठी त्यांची स्थापना करण्यात आलेली नाही याचे भान या नेत्यांना राहिले नाही. या प्रवृत्तींवर योग्य असे नियंत्रण ठेवणे चव्हाणांना जमले नाही. तिसरी गोष्ट म्हणजे राजकारणात नैतिकता महत्त्वाची असते. राजकारण म्हणजे केवळ सत्ताकारण नव्हे. सहकारी संस्थात कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार चालता उपयोगाचा नाही हे याबाबातचे योग्य भान या नेत्यांना देण्यात आले नाही. सुरुवातीच्या काळात हे दोष दिसले नाहीत पण नंतर ते तीव्र झाले.

चव्हाण महाराष्ट्राचे १९६०-६२ या काळात मुख्यमंत्री होते आणि त्यांच्या कारभाराचे पं. नेहरु यांनी कौतुक केले. नेहरु असे म्हणाले की कामराज यांचे तमिळनाडू सरकार सर्वात चांगले आहे आणि त्यानंतर चव्हाणांचे महाराष्ट्र सरकार दुसऱ्या क्रमांकाचे आहे. पुढे ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर हल्ला केला आणि परिस्थिती सांभाळण्यासाठी यशवंतरावांना संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीस पाचारण करण्यात आले. यशवंतराव मुख्यमंत्री-पदाचा राजीनामा देऊन दिल्लीस गेले. त्यांच्या जागी प्रथम श्री. मारोतराव कन्नमवार यांची व नंतर वसंतराव नाईक यांची निवड करण्यात आली. दोन वर्षांच्या मुख्य-मंत्रीपदाच्या काळात चव्हाणांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. पण त्यांनी संयमाने त्यास तोंड दिले. चव्हाण जरी दिल्लीला गेले तरी महाराष्ट्राच्या राजकारणा-वर त्यांचा प्रभाव कायम राहिला. त्यामुळे वसंतराव नाईक यांनी सलग बारा वर्षे राज्याचे मुख्यमंत्रीपद सांभा-ळले. त्यांना चव्हाणांचा पाठिंबा होता. चव्हाणांना महा-राष्ट्रातील प्रादेशिक व सामाजिक समतोल कायम ठेवायचा होता. त्यामुळे त्यांनी नाईकांना पाठिंबा दिला आणि नाईकांनी पण चव्हाणांची बरीच धोरणे चांगल्याप्रकारे पुढे चालवली. पण त्यांना सातत्याने प्रस्थापित मराठा नेतृत्वाच्या विरोधास तोंड द्यावे लागले. सहकारातून निर्माण झालेली 'शुगर लॉबी' त्या काळात हळूहळू संघटित होत होती.

महाराष्ट्राच्या राजकारणाचे तीन टप्पे :

१९६० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करता आपणास असे म्हणता येईल की हे राजकारण तीन टप्प्यात विकसित झाले. ते तीन टप्पे खालीलप्रमाणे-

१) १९६० - १९७८ - काँग्रेस वर्चस्वाचा कालखंड,

२) १९७८ - १९९५ - काँग्रेसच्या ऱ्हासाचा कालखंड,

३) १९९५ – २००९ – आघाड्यांच्या राजकारणाचा कालखंड.

गेल्या ५० वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल झाले आणि संपूर्ण प्रांतावर एकछात्री राज्य करणाऱ्या काँग्रेसचे पतन झाले. गेल्या दोन्ही निवडणुकांत काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडीने कशीबशी सत्ता आपल्यात ठेवली कारण शिवसेना भाजप युतीचे सामर्थ्य तुल्यबळ होते. गेल्या ५० वर्षात हे मोठे बदल झाले. कारण महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती बदलली. जे वर्ग १९६०-६१ साली सत्ताधाऱ्यांनी जो काही वाटा दिलेला आहे त्यावर खूष होते त्यांना आता बदलत्या परिस्थितीत सत्ता वाटपाचे सूत्र बदलून जास्त सत्ता हवी होती. शिवाय महाराष्ट्राचे राजकारण देशाच्या राजकारणाचा एक भाग आहे. देशाच्या राजकारणात जे बदल होतात. त्याचा अपरिहार्य परिणाम येथील राजकारणावर होतो. आणीबाणीनंतरच्या राजकारणाचा व १९९० नंतरच्या हिंदुत्वाच्या राजकारणाच्या वाढत्या प्रभावाचा परिणाम महाराष्ट्राच्या राजकारणावर झाला. तिसरी गोष्ट म्हणजे यशवंतराव चव्हाण यांनी उभे केलेले काँग्रेसचे संघटन एवढे प्रबळ होते की १९७८ व १९९५ चा अपवाद वगळता काँग्रेसने स्वतंत्रपणे व राष्ट्रवादी काँग्रेसशी युती करून सत्ता आपल्या हातात ठेवली कारण प. महाराष्ट्रातील साखर कारखान्याचा पट्टा व मुंबईचा बहुभाषिक मतदार यांचा त्यांस पाठिंबा मिळाला. मात्र १९९०, ९९, २००४ व २००९ मधील काँग्रेसचे विजय हे काठावरचेच होते.

काँग्रेसवर्चस्वाचा कालखंड :

इ. स. १९६०–१९७८ हा कालखंड काँग्रेसवर्चस्वाचा आहे कारण या काळात काँग्रेसने जवळ जवळ सर्व निवडणुका जिंकल्या कारण चव्हाण यांनी जी सामाजिक आघाडी उभारली होती ती कायम होती आणि वसंतराव नाईक यांनी त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात संयम व मुत्सद्देगिरी यांचा आधार घेत राज्याचा कारभार हाकला. या काळात राज्याचे मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण झाले. मुंबई–पुणे, मुंबई – नाशिक, मुंबई – ठाणे – बेलापूर या पट्ट्यात उद्योगधंदे उभे राहिले. मुंबई शहराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आणि त्या शहरातील मराठी भाषिकांचा लोकसंख्येमधील टक्का कमी होऊ लागला. मुंबई महापालिका काही काळ समितीच्या व नंतर स. का. पाटील यांच्याच ताब्यात होती. मुंबई शहरातील उद्योगधंद्यात विशेषत: गिरणी कामगारांत डाव्या पक्षांच्या कामगार संघटना प्रभावी होत्या. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व प्रजा समाजवादी पक्ष यांच्या कामगार संघटना होत्या. त्यांचा प्रभाव कायम होता. गिरणी कामगारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी राष्ट्रीय मिल मजूर संघ या इंटकच्या संघटनेस अधिकृत संघटना म्हणून मान्यता दिली होती. मुंबईत देशातील विविध भागातून नोकऱ्या मिळविण्यासाठी लोक येत होते. त्यात दक्षिणेतील लोकांची संख्या मोठी होती.

१९६६ साली प्रख्यात समाजसुधारक व लेखक प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रेरणेने त्यांचे व्यंग्यचित्रकार चिरंजिव व मार्मिक साप्ताहिकाचे संपादक बाळ ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली. त्यांनी मराठी माणसास मुंबईत नोकऱ्या मिळाव्यात यासाठी हा पक्ष स्थापन केला. हिंसा, आक्रमकपणा आणि सामाजिक कार्य यांचा बेमालूम समन्वय सेनेच्या कार्यशैलीत करण्यात आला होता. सेनेला मुंबईत मराठी भाषिक तरुणांचा चांगल्या प्रकारे पाठिंबा मिळाला व मुंबईच्या कामगार चळवळीवर असणारा डाव्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी सेनेचा वापर करण्याचा डाव काँग्रेसने खेळला. सेनेच्या स्थापनेस बाळासाहेब देसाई, एस्. एम्. जोशी, वसंतराव नाईक यांची अनुकुलता होती. अर्थात् त्या काळात सेनेची पूर्ण विचारसरणी विकसित झालेली नव्हती.

१९६० नंतर महाराष्ट्रातील विरोधी पक्षांनी जनतेच्या हक्कांची पूर्ती करण्यासाठी अनेक आंदोलने हाती घेतली. त्या आंदोलनात रिपब्लिकन पक्षाचे नेते दादासाहेब गायकवाड व कॉ. नाना पाटील यांनी केलेले शेतजमिनीच्या वाटपाबाबतचे आंदोलन हे मोठे आंदोलन होते. या आंदोलनात सुमारे ५०,००० लोक तुरुंगात गेले. शेतकरी कामगार पक्षाची ताकद सर्व विरोधी पक्षात जास्त होती व १९६६-६७ साली पक्षाने महागाईविरोधी मोठी आंदोलने केली. कम्युनिस्ट पक्षाने शहरी व ग्रामीण भागात आंदोलने केली आणि कामगारांच्या अधिकारांचे संरक्षण केले. शेकापने शेतमालास किफायतशीर भाव मिळावा यासाठी आंदोलन केले. प्रजा समाजवादी पक्ष व सं. समाजवादी

पक्ष यांनीही या काळात चळवळी केल्या. १९६६ साली सीमालढा तीव्र झाला आणि बेळगाव-कारवार भाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र समिती स्थापन झाली. उद्धवराव पाटील त्याचे अध्यक्ष होते तर जयंतराव टिळक सरचिटणीस. १९६७ साली या आघाडीने अनेक मतदारसंघात काँग्रेसला आव्हान दिले. मुंबईत कॉ. डांगे, व्ही. के. कृष्णा मेनन, आचार्य अत्रे व जार्ज फर्नांडिस या समितीच्या मातब्बर उमेदवारांना पाडण्यासाठी काँग्रेसने शिवसेनेची मदत घेतली आणि त्या मदतीच्या जोरावर मेनन व अत्रे यांना पराभूत करण्यात आले. पराभवानंतर अत्रे यांची राजकीय कारकीर्द संपुष्टात आली. पण काँग्रेसने २७० पैकी २०४ जागा मिळविल्या. समितीस ४५ जागा मिळाल्या. त्यात शेकापस २२ जागा मिळाल्या. लोकसभेत काँग्रेसला ४५ पैकी ३७ जागा मिळाल्या.

१९६६-६७ या काळात देशात मोठे बदल झाले. दोनदा पंतप्रधान बदलावे लागले. १९६४ व ६५ साली चीन व पाकिस्तानविरुद्ध युद्धे झाली आणि १९६६-६७ साली दुष्काळ पडला. या काळात देशास सुमारे दीड कोटीटन गहू अमेरिकेतून आयात करावा लागला. याच काळात नव्या तंत्रज्ञानाचा व उत्पादन पद्धतीचा वापर करून शेतीत उत्पादन वाढीस प्रोत्साहन दिले जात होते. त्याचा परिणाम म्हणून आणि नवे पाटबंधारे व धरणे बांधल्याचा परिणाम म्हणून देशभर हरित क्रांतीस सुरुवात झाली. या क्रांतीस महाराष्ट्रात पण सुरुवात झाली आणि प. महाराष्ट्रात ज्या भागात साखर कारखानदारी आहे त्या भागात त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले. बागायतदार सधन शेतकऱ्यांचा नवा वर्ग समाजात निर्माण झाला. पंचायत राज्य संस्था व सहकारी संस्था यांच्यावर त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. हा वर्ग मराठा, लिंगायत, मा. लेवा पाटील, धनगर, वंजारी इत्यादी मराठा व तत्सम जातींतून आला होता. दलित जातीत अत्यंत छोटे शेतकरी व शेतमजूर असल्यामुळे त्यांना त्याचा अपेक्षित लाभ मिळाला नाही. बागायतदार सधन शेतकऱ्यांचा वर्ग काँग्रेसच्या पाठीमागे उभा राहिला. बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर बँकांचे कर्ज आपणास मिळेल अशी अपेक्षा त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यामुळे १९७२ च्या विधानसभा निवडणुकांत विरोधी पक्षांपुढे अवघड परिस्थिती होती.

मधील काळात १९६९ साली काँग्रेसपक्षात फूट पडली आणि इंदिराजींना विरोध करणाऱ्या संघटना काँग्रेसची स्थापना झाली. स. का. पाटील व मालोजीराजे यांचा पाठिंबा असूनही संघटना काँग्रेसला लोकांचा पाठिंबा मिळाला नाही. १९७१ साली लोकसभा निवडणुकीत इंदिरा गांधींना मोठा विजय मिळाला. महाराष्ट्रात ४४ पैकी फक्त १ जागा विरोधकांना मिळाली. या काळात मुंबई येथे इंदिरा काँग्रेसचे अधिवेशन झाले व स. का. पाटील यांच्या जागी श्री. रजनी पटेल यांची मुंबई प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली आणि नंतरचे सहा सात वर्षे रजनी पटेल यांचा मोठाच प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर होता. त्यावेळी महाराष्ट्रात व देशभर काँग्रेस आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष यांची आघाडी होती. पण महाराष्ट्रात ती झाली नाही.

१९७२ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. मराठवाड्यात त्याचा जास्त प्रभाव होता. या दुष्काळा विरोधात शेकापने मोठे मोर्चे काढले. इस्लामपूर व वैराग येथे गोळीबार झाले व त्यात अनेक तरुण कार्यकर्ते मारले गेले. या दुष्काळामुळे हजारो लोकांनी गाव सोडले व ते शहरांत पोट भरण्यासाठी गेले. या काळात विधानपरिषदेचे सभापती श्री. वि. स. पागे यांनी रोजगार हमी योजनेचा पुरस्कार केला आणि १९७३ पासून ही योजना लागू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले.

महाराष्ट्राच्या राजकारणात तीन नव्या चळवळी निर्माण झाल्या. भिवंडी येथे १९७० साली मोठी जातीय दंगल झाली आणि हिंदू व मुस्लिम जातीयशक्तींचा प्रभाव वाढावयास सुरुवात झाली. दंगे हे त्याचे साधन झाले. कृषिविद्यापीठाच्या निमित्ताने विदर्भ व मराठवाड्यात मोठी आंदोलने झाली. विदर्भातील लोकांत प. महाराष्ट्राबाबत असंतोष आहे तर मराठवाड्यात विदर्भाबद्दल अविश्वास आहे. महाराष्ट्राचे भावनिक ऐक्य झालेले नाही. मराठवाडा विकासासाठी चळवळी या काळात सुरू झाल्या. दलित चळवळीत दलित पँथर नावाची आक्रमक चळवळ सुरू झाली. रिपब्लिकन पक्षाबद्दलचा अविश्वास व सतत होणारा अन्याय व उपेक्षा या विरुद्धचा क्रोध त्यामागे होता. या

दलित पँथरच्या चळवळीने दलित साहित्यास मोठे योगदान दिले. महाराष्ट्रातील अनुदार समाजजीवनात बदल घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

१९७३-७४ पासून दुष्काळ, युद्ध आणि तेलसंकट यामुळे पुनः एकदा भारतीय अर्थव्यवस्था अडचणीत आली आणि भाववाढ मोठ्या प्रमाणात झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी व काँग्रेसपक्षाच्या विरोधात लोकांच्या चळवळी सुरू झाल्या. गुजरातचे मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांचे सरकार कोसळले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या नवनिर्माण चळवळीचे नेतृत्व सर्वोदय नेते जयप्रकाश नारायण यांनी स्वीकारले. या चळवळीस लोकांचा चांगला पाठिंबा मिळू लागला. समाजवादी व जनसंघ हे पक्ष त्यांत सामील झाले. १९७४ साली जॉर्ज फर्नांडिस यांनी देश-व्यापी रेल्वे संप आयोजित केला. या संपाला पण चांगला प्रतिसाद मिळाला पण इंदिरा गांधींनी तो मोडून काढला.

वसंतराव नाईक यांच्या जागी नवा मुख्यमंत्री आणण्याचा इंदिरा क्रॉंग्रेसचा प्रयत्न होता कारण नाईक हे चव्हाणांचे समर्थक होते व दीर्घकाळ त्यांच्या हातात सत्ता राहिल्यामुळे मराठा नेत्यांत त्यांच्याबद्दल नाराजी होती. रजनी पटेल यांनी पुढाकार घेऊन त्यावेळचे कृषिमंत्री शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्रीपदी बसवण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यास यश येऊन फेब्रुवारी ७५ मध्ये शंकरराव चव्हाण राज्याचे मुख्यमंत्री झाले. एक कार्यक्षम आणि शिस्तीचे नेते म्हणून ते ख्यातनाम होते. त्यांचे यशवंतरावांशी मतभेद होते. शंकरराव चव्हाणांना महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेसपक्षात बहुमताचा पाठिंबा नव्हता. साखरसम्राटांचे नेते श्री. वसंतदादा पाटील राज्यसरकारात मंत्री होते. त्यांचा प्रभाव मोठा होता.

शंकरराव सत्तेवर असतांनाच आणीबाणीची घोषणा झाली. या काळात त्यांनी प्रशासनास शिस्त लावली आणि कमाल जमीन धारणा कायद्याची कसोशीने अंमल-बजावणी केली, त्यामुळे विदर्भ मराठवाड्यातील जमीनदार वर्ग त्यांच्यावर नाराज झाला. महाराष्ट्रातील साखरसम्राट त्यांच्या विरोधात होते कारण ऊसशेतीने सर्व पाण्याचा वापर करू नये. अन्नधान्याच्या उत्पादनासाठी पण पाण्याचा वापर व्हावा असे शंकरराव चव्हाण यांना वाटत होते. त्यांचे प्रशासन दक्ष होते आणि भ्रष्टाचारावर त्यांनी नियंत्रण आणले होते. पक्षात शंकरराव व यशवंतराव यांचे गट तयार झाले. १९७७ च्या संसदीय निवडणुकीत दोन्ही गटांना लोकसभेच्या २४,२४ जागा मिळाल्या. शंकरराव विरोधी पक्षांचे टारगेट झाले. त्यांची काही भाषणे त्यास कारण ठरली.

१९७७ च्या निवडणुकीत १९५७ नंतर प्रथमच काँग्रेसचा पराभव झाला. ४८ पैकी २८ जागा विरोधकांनी जिंकल्या. २० जागा काँग्रेसला मिळाल्या. निवडून आलेले बहुसंख्य खासदार यशवंतराव चव्हाण यांना मानणारे होते. मराठवाड्यात ७ पैकी ६ खासदार विरोधी पक्षांचे होते. या निवडणुकीत इंदिरा गांधींचा पराभव झाला. यशवंतराव चव्हाण लोकसभेत काँग्रेस संसदीय पक्षाचे व विरोधी पक्षाचे नेते झाले. चव्हाण, वसंतराव नाईक व वसंतदादा पाटील यांनी फारसा विलंब न लावता शंकरराव चव्हाण यांची मुख्यमंत्रीपदावरून उचलबांगडी केली आणि मे महिन्यात १९७७ साली वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. शंकररावांनी काँग्रेसचा त्याग केला व स्वतःच महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस हा पक्ष स्थापन केला.

१९७७ च्या संसदीय निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला असला तरी त्या पक्षास शे.४८ टक्के मते मिळाली होती. नव्याने स्थापन झालेल्या जनता पक्षास शे. ३२ टक्के मते मिळाली होती व दिल्लीत त्यांचे वर्चस्व वाढत असल्यामुळे महाराष्ट्रात पण जनतापक्षाचा प्रभाव वाढत होता. १९७७ साली काँग्रेसचा प्रभाव ओसरावयास सुरुवात झाली. त्यात फूट पडावयास सुरुवात झाली. त्यानंतर बाळासाहेब देसाई व राजारामबापू पाटील या दोन नेत्यांनी पक्षाचा त्याग केला व ते जनतादलात सामील झाले.

इंदिरा गांधी यांच्या विरोधात काँग्रेस पक्षामध्ये वातावरण होते. यशवंतराव चव्हाण व काँग्रेस अध्यक्ष ब्रह्मानंद रेड्डी यांनी आघाडी करून इंदिरावादी काँग्रेस नेत्यांच्या विरोधात मोर्चे बांधणी केली. त्यामुळे आपणास जनतेचा कितपत पाठिंबा आहे याची चाचपणी करून जानेवारी १९७८ रोजी इंदिराजींनी इंदिरा काँग्रेस हा नवा पक्ष स्थापन केला व कर्नाटक, आंध्र, आसाम, महाराष्ट्र येथील विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाला आणि

रेड्डीकाँग्रेसला आव्हान दिले. यापैकी तीन प्रांतांत रेड्डी-काँग्रेसची सरकारे होती.

फेब्रुवारी १९७८ साली महाराष्ट्रात तिरंगी लढत विधानसभेसाठी झाली. जनतापक्ष व त्यांची आघाडी व रेड्डीकाँग्रेस व इंदिराकाँग्रेस अशा ह्या आघाड्या होत्या. जाने. ७८ साली महाराष्ट्र काँग्रेसमध्ये फूट पडली पण येथे चव्हाण लॉबी प्रबळ होती. त्यामुळे सर्व सत्तास्थाने त्यांच्याकडे होती. दादांच्या सरकारात ४० मंत्री होते. जिल्हापरिषदा व साखरकारखाने त्यांच्याकडे होते. इंदिरा-जींचा पक्ष कमजोर होता. विदर्भात वसंतराव नाईक यांचा गट त्यात गेला. स्वतः नाईक मात्र गेले नाहीत. स्वतः नाईक गेले असते तर रेड्डीकाँग्रेसला आणखी फटका बसला असता. शंकरराव चव्हाण यांनी स्वतःचा पक्ष स्थापन न करता वाट पाहाणे गरजेचे होते कारण इंदिरा काँग्रेसची धुरा त्यांनीच सांभाळावयास हवी होती. यशवंतराव मोहिते यांना एवढा मोठा निर्णय घेणे अवघड झाले. जनता आघाडीतून जागा वाटपातील मतभेदामुळे शेकाप बाहेर पडला. या निवडणुकीत जनता पक्षास सर्वात जास्त ९९ जागा मिळाल्या पण कर्नाटक व आंध्र व आसाम राज्याप्रमाणेच रेड्डी काँग्रेसचा लोकांनी पराभव केला. आंध्र व कर्नाटक प्रांतात इंदिरा काँग्रेचा विजय झाला आणि महाराष्ट्रातही विदर्भ भागात इंदिरा काँग्रेसने यश मिळवले व त्यांना ६२ जागा मिळाल्या. रेड्डी काँग्रेसला ६९ जागा मिळाल्या. यशवंतरावांचे इंदिरा गांधींना पर्यायी असा नेता म्हणून उभा राहण्याचे स्वप्न लयास गेले.

ही निवडणूक महत्त्वाची होती. तिने काही नवे प्रवाह राजकारणात आणले. या निकालाचे निष्कर्ष काढा-यचे झाले तर ते खालील प्रमाणे काढता येतील.

१) प्रथमच विदर्भ, प.महाराष्ट्र व मुंबई–कोकण या भागात मतदारांनी तीन वेगवेगळ्या पक्षांना मतदान केले.

२) दलित–आदिवासी व मुस्लिम यांनी इंदिरा काँग्रेसला मोठ्या प्रमाणात मतदान केले.

३) रेड्डी काँग्रेसकडे सर्व सत्तास्थाने होती, मराठा जाती-तील अभिजनांचा पाठिंबा होता. वसंतदादांसारखा वजनदार मुख्यमंत्री होता पण ती नेहरू घराण्याचा आशीर्वाद असणारी काँग्रेस नव्हती. त्यास काँग्रेसची अधिमान्यता नव्हती. त्यामुळे त्यांचा पराभव झाला. ही गोष्ट वसंतदादां व वसंतराव नाईक यांच्या लक्षात आली.

४) या निवडणुकीत १९६२ पासून राज्यावर जे काँग्रेस-पक्षाचे वर्चस्व होते ते नष्ट झाले. जनतापक्षास मुंबई–कोकण भागात मोठे यश मिळाले तर कोणत्याही पक्षाला आघाडी करून सत्तेस हात घालता येतो हे दिसून आले.

काँग्रेस पक्षाचे विघटन व इंदिरा काँग्रेसचे पुनरागमनः

महाराष्ट्रात दादा व नाईक यांनी पुढाकार घेऊन यशवंतरावांच्या नाराजीस न जुमानता रेड्डी काँग्रेस आणि इंदिरा काँग्रेस यांचे संयुक्त सरकार सत्तेवर आणले. हे महाराष्ट्रातील पहिले आघाडीचे सरकार. यावेळी इंदिरा काँग्रेसचे नाशिकराव तिरपुडे गृहमंत्री झाले. या दोन पक्षात संघर्ष झाले व जुलै १९७८ मध्ये ३४ आमदारांसह शरद पवार यांनी पक्षाचा त्याग करून समांतर काँग्रेसची स्थापना केली. जनता शेकाप व इतर पक्षांच्या मदतीने त्यांनी नवे सरकार स्थापन केले. त्यामुळे वसंतदादा पाटील व यशवंतराव यांच्यात वैर निर्माण झाले आणि त्यांच्यात संघर्ष सुरू झाला. पण दिल्लीतील जनता पक्षाचे मोरारजी देसाई सरकार कोसळले व जानेवारी १९८० मध्ये इंदिरा गांधी पुनः सत्तेवर आल्या. संसदीय निवडणुकी-पूर्वी शंकरराव चव्हाण व वसंतदादा पाटील इंदिरा काँग्रेस-मध्ये परतले आणि निवडणुकीत काँग्रेसने मोठा विजय मिळविला. शरद पवार व यशवंतराव यांचे पक्ष एकत्र आले. मार्च १९८० साली झालेल्या निवडणुकीत यशवंत-रावांनी शरद पवारांच्या समाजवादी काँग्रेस उमेदवारांसाठी सभा घेतल्या. पवारांच्या पक्षांस ४८ जागा मिळाल्या. पण इंदिरा काँग्रेसचा विजय झाला. नंतर यशवंतराव काँग्रेसमध्ये गेले. त्यांच्याबरोबर अनेक आमदार गेले.

काँग्रेसच्या ऱ्हासाची सुरुवात :

१९८० साली विरोधी पक्षात मोठी फूट होती. काँग्रेसला २८८ पैकी १८० जागा मिळाल्या आणि बॅ. अे. आर. अंतुले काँगेसचे मुख्यमंत्री झाले. शरद पवार यांनी समाजवादी काँग्रेस स्थापन करून विरोधी पक्षाचा झेंडा हाती घेतला. या काळात काँग्रेसने अंतुले, बाबासाहेब भोसले व वसंतदादा पाटील असे तीन मुख्यमंत्री बदलले. साखरसम्राट पुनः काँग्रेसमध्ये आले. १९८३ साली दादा पुनः मुख्यमंत्री झाले पण जुना जनाधार काँग्रेसला प्राप्त करता आला नाही. कारण समाजात वेगवेगळे अंतर्विरोध

निर्माण झाले होते. साखर कारखानदारांत पक्षीय भेद निर्माण झाले होते. सत्तेसाठी मराठा व ओ. बी. सी. अभिजन काँग्रेसऐवजी इतर पक्षांकडे जाऊ लागले.

१९८० ते ९० या दशकांत महाराष्ट्रात नव्या राजकीय चळवळींना सुरुवात झाली. त्यातील पहिली चळवळ ही शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेची चळवळ होती. ही चळवळ त्यांनी १९७८ पासून सुरू केली आणि त्यानंतरच्या दशकात ती राज्यातील सर्वात मोठी चळवळ ठरली. लाखो शेतकरी त्यांच्या हाकेला ओ देऊन रस्त्यावर उतरले. दुसरी चळवळ मुंबईच्या गिरणी कामगारांची मुंबईच्या गिरणी कामगारांनी मुंबई औद्योगिक संबंध कायद्याविरुद्ध लढा पुकारला व दीड लाख कामगारांनी डॉ. दत्ता सामंत व सर्व श्रमिक संघ यांच्या नेतृत्वाखाली गिरणी कामगारांचा संप केला. या संपास कामगारांचा पाठिंबा मिळाला. मुख्यमंत्री झाल्यावर वसंतदादांनी हा संप मोडून काढला. त्यानंतर गिरण्या बंद पडल्या. कामगार देशोधडीत लागले व गेली १०० वर्षे मुंबईच्या समाजजीवनात आणि राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणारे गिरणी कामगार पराभूत झाले. त्यास गिरणी मालक, राष्ट्रीय मिल मजूर संपाचे नेते, वसंतदादांचे सरकार व डॉ. दत्ता सामंत यांचे डावपेच बऱ्याच प्रमाणात जबाबदार आहेत. तिसरी चळवळ मेधा पाटकर यांच्या नर्मदा बचाव चळवळीने धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे व आदिवासींचे जंगल जमीन व पाणी याबाबतचे प्रश्न धसास लावले. त्यातूनच समन्यायी पाणी वाटपाचा प्रश्न पुढे आला.

१९८५ च्या निवडणुकीत शरद पवार यांनी पुरोगामी लोकशाही दलाची स्थापना करून काँग्रेसला आव्हान दिले. आव्हान तगडे होते पण वसंतदादांनी त्यास तोंड दिले व काँग्रेसला विजय मिळवून दिला. मुंबई शहराने काँग्रेसला हात दिला कारण त्या शहरात पुलोद कमजोर होते. या निवडणुकीत काँग्रेसला १६१ समाजवादी काँग्रेसला ५२, जनाता पक्षास २० तर, भाजपला १५ जागा मिळाल्या. पुलोद आघाडीने ११४–१५ पर्यंत जागा मिळविल्या. पण लौकरच दादांनी राजीनामा दिला. १९८६ साली शंकरराव पुनः राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि त्याच्या आसपास शरद पवार परत काँग्रेस पक्षात गेले.

१९८४ मध्ये मुंबईत जातीय दंगे झाले आणि महापालिकेवर शिवसेनेने आपले वर्चस्व स्थापन केले.

शरद जोशी यांच्या चळवळीने शेतमालास किफायतशीर दर मिळावे व सरकारने भाव बांधून द्यावेत यासाठी आंदोलन सुरू केली. कोरडवाहू शेती असणाऱ्या विदर्भ व मराठवाड्यात त्यांना चांगला पाठिंबा मिळाला. लाख लाख शेतकरी त्यांच्या सांगण्यावरून चटणी भाकर बांधून आंदोलन करावयास येत असत. त्यांच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांना फायदा झाला. त्यांच्यामध्ये आत्मभान जागृत झाले. स्त्रियांचे सबलीकरण व इतर समाजसुधारणा यांत त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. जमातवादास विरोध केला पण प्रत्यक्ष राजकारणात ते उतरले नाहीत. त्यांचे अनेक सहकारी काँग्रेसपक्षाचे नेते होते व जोशींचा वापर काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय नेत्यांना आव्हान देण्यासाठी केला. स्वतः त्यांनी या काळात निवडणूक लढवली असती तर कदाचित ते विजयी झाले असते. पण नंतर ते उभे राहिले पण त्यावेळी त्यांची लोकप्रियता कमी झाली होती.

शंकरराव चव्हाण यांनी आपल्या दुसऱ्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात सहकारी साखर कारखानदारांना शिस्त लावायचा प्रयत्न केला. सर्व पाणी ऊसालाच वापरले जाऊ नये व काही पाणी अन्न धान्याच्या उत्पादनासाठी वापरले जावे. ऊस शेतीमुळे जमीन खारपड बनत आहे त्याबाबत शेतकऱ्यांनी उपाययोजना करावी असे त्यांचे म्हणणे होते. याच काळात विदर्भ व मराठवाड्यात विकासाच्या अनुशेषाचा प्रश्न महत्त्वाचा बनला. कारण दांडेकर समितीने प. महाराष्ट्र व विदर्भ व मराठवाडा यांच्या विकासाची तुलना करून त्या भागात विकासाचा अनुशेष राहिला आहे असा मुद्दा मांडला. त्यामुळे मराठवाडा व विदर्भातील नेत्यांनी घटनेत कलम ३७७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे या भागांसाठी विकासमंडळे स्थापन करण्याची मागणी केली.

हिंदुत्वाचा वाढता प्रभाव :

१९८६ साली शरद पवार स्वगृही परतले पण त्यांच्याबरोबर असणारे सर्वच कार्यकर्ते काँग्रेस पक्षात गेले नाहीत कारण तेथे आपल्या विकासास वाव नाही असे त्यांना वाटले. याच काळात शिवसेनेने हिंदुत्वाचा

अनुक्रमणिका

पुरस्कार केला. हिंदुत्वाचा विचार शिवसेनेने प्रथमपासून मान्य केला होता पण जनसंघाचे व त्यांचे जमत नव्हते. १९७० साली कम्युनिस्ट नेते कृष्णा देसाई यांचा खून झाला. त्यांची रिकामी झालेली जागा सेनेने जिंकली. त्यानंतर १९७१, ७२, ७७ व ७८ या सर्व निवडणुकांत सेनेला मार खावा लागला. भारतीय जनता पक्ष व सेना यांच्यात मनोमीलन झालेले नव्हते. पुलोदच्या अपयशानंतर भाजप व शिवसेना यांची आघाडी तयार करण्याचा विचार भाजप नेते प्रमोद महाजन यांनी करावयास सुरुवात केली. १९८६ साली औरंगाबादेत जातीय दंगल झाली आणि शिवसेनेला महापालिकेच्या निवडणुकीत चांगले यश मिळाले. त्यानंतर मराठवाडा व विदर्भाच्या ग्रामीण भागात शिवसेनेचे आकर्षण निर्माण झाले. समाजवादी काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते शिवसेनेत सामील झाले. मराठा समाजातील नव्याने उदयास आलेला जो सत्तेपासून वंचित असा तरुण नेतृत्वाचा वर्ग होता त्या वर्गाने भाजपपेक्षा शिवसेनेस आपली पसंती दिली कारण शिवसेनेत त्यांना काम करण्यास जास्त वाव होता व भाजपचे संघाशी संबंध असल्यामुळे त्यांना त्याबाबत आपुलकी वाटत नव्हती. शरद पवारांच्या जाण्याने व जनता पक्षाच्या विघटनाने ग्रामीण महाराष्ट्राच्या राजकारणात जी पोकळी निर्माण झाली होती ती पोकळी शिवसेनेने बऱ्याच प्रमाणात भरून काढली आणि याबाबतीत शिवसेना नेते छगन भुजबळ यांचे योगदान मोठे होते.

महाराष्ट्रातील काँग्रेसच्या मराठा वर्चस्वास आव्हान देण्यासाठी भारतीय जनता पक्षाने इतर मागास जातींच्या नेत्यांना उभे करून त्या समाजाची मते प्राप्त करावयास सुरुवात केली. वंजारी समाजाचे नेते गोपीनाथ मुंडे ह्यांनी हे काम यशस्वीपणे केले. त्याचप्रमाणे अण्णासाहेब डांगे, फरांदे, एकनाथ खडसे यांच्यासारखे नवे नेते पक्षाने पुढे आणले आणि माळी, धनगर, वंजारी, लेवा पाटील यांसारख्या मध्यम जातीतील मतदारांना आकर्षित करावयास सुरुवात केली. त्यांनी इतर मागास जातींत हिंदुत्वाबाबतचे आकर्षण निर्माण केले. राजकारणात पुढे येऊन सत्ता काबीज करण्यासाठी व सत्तेच्या या राजकारणास अधिमान्यता देण्यासाठी हिंदुत्वाचा वापर त्यांना महत्त्वाचा वाटला. "ब्राह्मण, मराठ्यांनी जरी नव्या आक्रमणापासून हिंदुत्वाचे रक्षण केले नाही तरी त्यासाठी इतर मागास जातीय सज्ज आहेत." अशी त्यामागची भावना होती. महाराष्ट्रात शरद पवारांची पुन: मुख्यमंत्री म्हणून नेमणूक केल्याशिवाय काँग्रेसला सत्ता मिळणार नाही असे राजीव गांधींना सांगण्यात आले. त्यांना ते पटले व १० वर्षानंतर पुन: पवार राज्याचे मुख्यमंत्री झाले.

पवारांनी या काळात शेतीकडे जास्त लक्ष दिले. फलोत्पादनाच्या बाबतीत शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे सांगितले. साखर सम्राटांचा पाठिंबा मिळवून त्यांना एकत्र केले आणि शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेच्या विविध आंदोलनांना चांगल्या प्रकारे तोंड दिले. पण शेती व पाणीवाटप या क्षेत्रात शंकररावांनी सुरू केलेले उपक्रम त्यांनी बंद केले. शेतकऱ्यास अन्नधान्य पिकवण्यासाठी सहामाही पाणी वाटप करावे असे शंकररावांचे मत होते.

१९८९ च्या निवडणुकीत व्ही. पी. सिंग यांनी राजीव गांधी यांच्या विरोधात आघाडी उभी केली आणि भाजप, जनतादल, डावे पक्ष यांची आघाडी उभी राहिली. शिवसेना त्यात सामील झाली नाही पण या आघाडीने अनेक ठिकाणी काँग्रेसला आव्हान दिले. एकूण ४८ पैकी २८ जागा काँग्रेसला मिळाल्या. विरोधी पक्षांना २० जागा मिळाल्या. त्यात भाजप-शिवसेना युतीला १४ तर जनतादल-भाकप यांस ६ जागा मिळाल्या.

मार्च १९९० च्या विधानसभा निवडणुकांत भाजप व शिवसेना यांची आघाडी झाली. कारण त्यांना संसदीय निवडणुकीत शे. २८ टक्के मते मिळाली होती. जनतादल-शेतकरी संघटना, शेकाप व डावे पक्ष यांची तिसरी आघाडी होती. केंद्रात जनता दलाचे व्ही. पी. सिंग यांचे सरकार होते. त्यामुळे जनता दलास चांगले यश मिळण्याची आशा होती. भाजप व सेनेच्या जमातवादाविरोधात जोशींनी आवाज उठवला होता. यावेळी भाजप सेनेचे आव्हान होते. जनता आघाडीने काही ठिकाणी आव्हान दिले होते. पण काँग्रेसने १४१ जागा मिळवून बहुमताच्या जवळपास जागा प्राप्त केल्या. सेनेला ५४ तर भाजपला ४२ जागा मिळाल्या. जनता आघाडीस फक्त ३० जागा मिळाल्या आणि अपक्ष आमदारांच्या मदतीने पवारांनी सरकार स्थापन केले.

शरद पवारांचे जनता दलातील नेत्यांशी जवळचे संबंध होते. त्यांच्या स्वतंत्र वागणुकीचा संशय घेऊन राजीव गांधी यांच्या जवळच्या लोकांनी पवारांविरुद्ध सुशीलकुमार शिंदे विठ्ठलराव गाडगीळ यांना बंड पुकारावयास लावले. बंड अयशस्वी झाले. पण काँग्रेसच्या अंतर्गत दरबारी राजकारणाबद्दल पवारांच्या मनात अढी निर्माण झाली. १९९० साली व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारसी अंमलात आणल्या आणि इतर मागास जातीसाठी शे. २० टक्के जागा राखीव केल्या. त्यामुळे उत्तर भारतात जातीजातीत संघर्ष निर्माण झाला. अनेक उच्च जातीय तरुणांनी आत्मदहन केले. या रक्तरंजित संघर्षातून इतर मागासजातींच्या राजकारणास सुरुवात झाली. महाराष्ट्रात यापूर्वीच शे. १० टक्के जागा इतर मागास जातीयांसाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. पवारांनी या संघर्षाचे हे लोण महाराष्ट्रात येऊ दिले नाही आणि त्यांनी राखीव जागांची फेर आखणी केली. त्यांनी शे. १९ टक्के जागा इतर मागास जातीयांसाठी राखीव ठेवल्या. महाराष्ट्रात शे. ५० टक्के जागा त्यांनी मागास जातीयांसाठी राखीव केल्या.

१९९० मध्ये व्ही. पी. सिंग यांचे सरकार पडले. १९९१ साली चंद्रशेखर यांचे सरकार पडले. निवडणुका झाल्या. या निवडणुकीच्या काळात राजीव गांधी यांची हत्या झाली. महाराष्ट्रात काँग्रेसने ४८ पैकी ३७ जागा जिंकल्या. शरद पवारांनी पंतप्रधान बनण्याचा प्रयत्न केला पण त्यांना त्यात यश मिळाले नाही. त्यांनी केंद्रात संरक्षणमंत्री म्हणून जाण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या जागी सुधाकरराव नाईक यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली. पवार दिल्लीला गेले.

हिंदुत्वाची चढती कमान :

१९९१ पासून भारतीय जनता पक्षाच्या हिंदुत्त्वाच्या राजकारणाची चढती कमान सुरू झाली कारण अडवाणींच्या सोमनाथ ते अयोध्या रथयात्रेस मोठा प्रतिसाद मिळाला. १९९१ च्या लोकसभेच्या निवडणुकीत भाजपने जातीचे राजकारण करणाऱ्या जनता दलास मागे टाकले शे. वीस टक्के मते त्यांना मिळाली व ११९ जागा भाजपने जिंकल्या. आता अयोध्येच्या बाबरीमशिदीच्या जागी राममंदिर बांधण्यासाठी चळवळ सुरू झाली. त्या राजकारणाचे पर्यवसान शेवटी ६ डिसेंबर १९९६ रोजी बाबरी मशीद पाडण्यात झाले. ही अतिशय चिंताजनक कृती होती आणि काँग्रेसचे पंतप्रधान नरसिंहराव यांनी कल्याणसिंग व भाजप यांच्यावर विश्वास ठेवला आणि त्यांनी राव यांचा बकरा बनवला! या घटनेमुळे राव यांची प्रतिमा डागाळली गेली. बाबरी मशीद पाडल्यानंतर देशभर भयानक अशा दंगली झाल्या. मुंबईत १९९२ मध्ये आणि पुनः फेब्रुवारी १९९३ मध्ये भयानक जातीय दंगली झाल्या. त्यांत शेकडो लोकं [illegible] गेला १९९३ च्या भीषण दंगलींच्यावेळी सुधा[illegible]चे सरकार हतबल झाले. शेवटी नाईक यांना बदलण्यात आले आणि पवारांना पंतप्रधानांनी पुनः महाराष्ट्रात परत पाठवले.

या दोन वर्षांच्या काळात पवारांनी सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोणांतून अनेक नवे उपक्रम अंमलात आणले. त्यांत त्यांचे महिला धोरण, पंचायत राज्य संस्थात महिला व इतर मागास जातीयांना राखीव जागा, मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे, मुलीचा वडिलांच्या मालामत्तेमध्ये हिस्सा ठेवणे इत्यादी प्रागतिक धोरणांचा समावेश केला. पण ते हिंदु व मुस्लिम समाजातील तेढ मिटवू शकले नाहीत. त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केले. गोवारी लोकांच्या मोर्चावर केलेल्या गोळीबारात शेकडो लोक मारले गेले. त्यामुळे एकूण काँग्रेस पक्ष व पवार यांची लोकप्रियता कमी होत होती.

१८७८-९५ या काळात काँग्रेसचा सामाजिक पाया सातत्याने संकोच पावत होता. १९८०-८५ व ९० च्या विधानसभा निवडणुकांत त्यांच्या पक्षास १८०, १६१ व १४१ जागा मिळाल्या. शिवसेना व भाजप यांच्या युतीची ताकद वाढत होती. त्यांना शे. २८ टक्के मते आणि ९४ जागा मिळाल्या. या काळात महाराष्ट्रात उद्योगधंद्यांचा विकास झाला, अनेक नवी धरणे बांधण्यात आली पण मागास भागातील विकासाचा अनुशेष कायम राहिला व अविकसित भागातील मागासजातीय आणि आदिवासी जनता मुंबईच्या झोपडपट्ट्यांत राहाणारे लोक यांची परिस्थिती मोठ्या प्रमाणात सुधारली नाही.

आघाड्यांच्या राजकारणाची सुरुवात :

महाराष्ट्राच्या राजकारणातील तिसरा टप्पा १९९५

साली सुरू झाला. १९९३ च्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर सेना भाजपचा प्रभाव वाढत होता. त्यातच १९९५ साली काँग्रेस पक्षात मोठी बंडखोरी झाली आणि १९९५ च्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. त्यास फक्त ८१ जागा मिळाल्या. याउलट शिवसेना-भाजप युतीस १३८ जागा मिळाल्या आणि युती सत्तेवर आली. हे महाराष्ट्रातील पहिले खऱ्या अर्थाने बिगर काँग्रेसचे आणि आघाडीचे सरकार होते. हा बदल मूलभूत होता कारण पहिल्यांदाच सेना भाजपचे नेते राज्यात सत्तेवर आले. सेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. इतके दिवस राज्यात काँग्रेसचेच सरकार होते. सेना भाजपला यावेळी खरी साथ मुंबईने दिली. मुंबईतील ३४ पैकी ३१ जागा सेना भाजपला मिळाल्या. मनोहर जोशी सरकारने केलेल्या तीन महत्त्वाच्या कामात त्यांनी सुरू केलेले कृष्णा खोरे प्रकल्प पूर्ण करण्याचे काम. मुंबईत मोठ्या प्रमाणात पूल बांधून वहातूक सुकर करण्याचे काम महत्त्वाचे ठरले. साखर कारखानदारांच्या मुसक्या बांधावयास युतीने सुरुवात केली पण त्याबाबतीत युतीच्या धोरणात सातत्य नव्हते. साखर कारखानदारीची सर्व मर्मे त्यांच्या लक्षात न आल्यामुळे त्यांची उपाय योजना अर्धवट ठरली. पण सत्तेपासूनचा हा विरह काँग्रेस नेत्यांना असह्य वाटत होता.

१९९९ च्या निवडणुकीत युतीस निवडणूक जिंकणे सोपे होते कारण काँग्रेसमध्ये फूट पडली होती व शरद पवार यांनी स्वतःचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला होता. काँग्रेसची अवस्था दयनीय होती. राष्ट्रवादीत सर्व महत्त्वाचे नेते गेले होते. पण या फुटीचा म्हणावा तसा लाभ युतीला झाला नाही त्यांना १३४ जागा मिळाल्या. पण काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आणि डावी आघाडी व अपक्ष यांची संख्या जास्त भरत होती. २००४ साली काँग्रेस राष्ट्रवादी यांचे सरकार सत्तारूढ झाले.

१९९०, ९५, २००४ व २००९ या चारही निवडणुकांमध्ये राज्यातील सत्ता स्पर्धा काँग्रेस राष्टवादी यांची आघाडी व शिवसेना भाजप याच चार पक्षांत आणि दोन आघाड्यांत असून या दोन आघाड्या २८८ पैकी २५०-६० जागा जिंकत असलेल्या आपणास दिसतात. शरद पवारांनी काँग्रेस पक्ष सोडला पण त्यांना काँग्रेसशी साथ सोडता आली नाही. ही साथ गेली दहा वर्षे चालू असून ती आणखी ५ वर्षे चालण्याची शक्यता आहे. काँग्रेस पक्षाची ताकद पण मर्यादित असून ते स्वबळावर जिंकू शकत नाहीत सुद्धा तो पक्ष पवारांच्यामुळे अडचणीत आला तर त्यास दलित आदिवासी, मुस्लिम याचा हमखास पाठिंबा मिळतो. राज्याच्या सर्व भागात ताकद असणारे हे दोन पक्ष आहेत. साखरसम्राटांच्या पाठिंब्यामुळे त्यांची ताकद मोठी आहे. युतीने विरोधी पक्षाचा अवकाश व्यापला असून काँग्रेसला अत्यंत चुरशीची लढत दिली आहे. विधानसभेपेक्षा लोकसभेत त्यांची कामगिरी उजवी आहे पण प. महाराष्ट्रातील साखरपट्ट्यात त्यांस अजून पाय रोवता आलेले नाहीत. त्यामुळे निवडणुकीपुरते काही उमेदवार त्यांच्याकडे येतात व नंतर पुनः ते परत जातात. काँग्रेस आघाडीचा पाया साखरसम्राट, बागायतदार शेतकरी, व्यापारी, श्रीमंत व्यावसायिक व मराठा व तत्सम जातीवर आहे. दलित आदिवासी व मुस्लिम मते पण त्यांना मिळतात. युतीचा पाठिंबा उच्च जातीय, मराठा, इतर मागास जाती, महारेतर दलित जाती व काही प्रमाणात आदिवासीत आहे. मुंबई हा त्यांचा बालेकिल्ला होता पण उत्तर भारतीयांच्या वाढत्या संख्येमुळे व राज ठाकरे यांच्या राजकारणामुळे त्यांच्या बालेकिल्ल्यास हादरा बसला आहे.

काँग्रेस राष्ट्रवादी आघाडी १९९९ पासून राज्याच्या सत्तेवर आहे. आघाडी सरकारला विजेचा प्रश्न सोडवता आलेला नाही. त्याचप्रमाणे राज्याचे जास्त जलदगतीने औद्योगिकरण करता आले नाही. आय. टी. क्षेत्र वाढत असतांना पुणे, नाशिक, नागपूर येथे त्यास योग्य अवकाश उपलब्ध करून देता आला नाही. नोकरशाही अवजड झाली असून ती अकार्यक्षम व भ्रष्ट आहे. शहरी भागातील गरीब वस्त्यांत कोणत्याही सोयी सुविधा नसून शहरोशहरी नव्या धारावी निर्माण होत आहेत.

महाराष्ट्रापुढील महत्त्वाचे प्रश्न :

५ मे २०१० रोजी महाराष्ट्र ५० वर्षे पूर्ण करील. या ५० वर्षांच्या काळात राज्याने अनेक क्षेत्रात प्रगती केली. शिक्षण, शेती, उद्योगधंदे, वीज, रस्ते वहातूक, शहरीकरण, स्त्रीपुरुष समानता याबाबत राज्याने बरीच प्रगती केली पण ही प्रगती पुरेशी नव्हती कारण राज्याचा आकार मोठा असून येथे प्रादेशिक व सामाजिक विषमता

मोठ्या प्रमाणात आहे. छत्तीसगडला लागून असणाऱ्या आदिवासी बहुल जिल्ह्यात फार मागासलेपणा आहे. त्यामुळे भागात आज नक्षलवादी चळवळ फोफावते आहे. नागपूर वगळता विकासाचा अनुशेष मोठा आहे. शेती कोरडवाहू आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे तेथे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतीच्या बाबतीत विचार करता मराठवाड्या-तील शेतकऱ्यांची कामगिरी उजवी ठरली कारण जायक-वाडी, मांजरा, उजनी यांचा काही प्रमाणात त्यांना लाभ झाला. पण शेती फायदेशीर व किफायतशीर कशी करा-यची, शेतकऱ्यांना किफायतशीर भाव कसे बांधून द्यायचे हा मुद्दा महत्त्वाचा आहे. हा प्रश्न प्रथम शेकापने व नंतर शेतकरी संघटनेने उपस्थित केला. खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये हा प्रश्न सुटेल असे मत शरद जोशी यांनी व्यक्त केले होते. आता राजू शेट्टी यांच्या नेतृत्त्वाखाली स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलनाचे राजकारण जोमाने सुरू केले आहे. शेतीला पाणी पुरविणे, स्वस्तात धरणांचे बांधकाम करणे, पाण्याचे आठमाही व बारमाही वाटप करणे इत्यादी उपाय करता येतील. शेतीवरचे अतिरिक्त लोकसंख्येचे ओझे कसे दूर करायचे हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

प्रादेशिक असमतोलाचा व अनुशेषाचा प्रश्न घटना-त्मक तरतुदीप्रमाणे विभागीय विकास मंडळांची स्थापना करून पण सुटलेला नाही. कोकण विदर्भ व मराठवाडा हे भाग मागासलेले आहेत. विदर्भात याबाबत नाराजी आहे. आज वेगळ्या विदर्भाच्या राज्याच्या मागणीस मोठा पाठिंबा मिळत नसला तरी राष्ट्रीय स्तरावर जर याबाबत पुनर्विचार सुरू झाला व त्याबाबत नवा आयोग नेमण्यात आला तर वेगळ्या विदर्भाची मागणी पुनः जोर धरू शकते. कारण वेगवेगळ्या पक्षाचे राजकारणी त्यात सामील होतील.

महाराष्ट्रांच्या जातीच्या राजकारणात मराठा जातीचा प्रभाव मोठा होता कारण त्या जातीस वरचढ जात (dominant Community) म्हटले जाई. एकूण लोक-संख्येच्या शे. ३३ टक्के लोकसंख्या मराठा जातीगटाची आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर पहिली तीस वर्षे मंत्रिमंडळ, विधिमंडळ, जिल्हापरिषदा, सहकारी बँका व कारखाने यांच्यावर मराठा जातीतील अभिजनांचे वर्चस्व होते. सुरुवातीच्या काळात शे. ७० टक्क्यांपेक्षा जास्त अधिकारपदे त्यांच्याकडे होती. पण १९९० च्या मंडलोतर राजकारणाने त्यांस आव्हान मिळावयास सुरुवात झाली. महाराष्ट्रातील इतर मागास जाती संघटित होऊ लागल्या. त्यांनी भाजप सेनेस पाठिंबा द्यावयास सुरुवात केली. १९९१ पासून ओ. बी. सी. साठी शासकीय नोकऱ्यात शे. १९ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या. १९९२ साली पंचायत राज्यसंस्था व शहर स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामध्ये पण इतर मागास जातींना राखीव जागा ठेवण्यात आल्या. आज महाराष्ट्रात शे. ५२ टक्के जागा मागास वर्गांसाठी राखीव आहेत. या जागा नोकऱ्यात व शिक्षणसंस्थामध्ये प्रवेश घेण्यासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे पंचायत राज्य संस्थातील मराठा वर्चस्वास आव्हान मिळाले पण सहकारी संस्था व साखर कारखाने यांच्यामधील त्यांचे वर्चस्व कायम आहे. आता जाती जातीतील स्पर्धा वाढत आहे. जातवार संमेलन घेऊन आपल्या जातीतील लोकांना संघटित केले जात आहे. 'मराठा जातीतील लोकांना राखीव जागा द्या' ही मागणी जोर धरते आहे. त्यामुळे जातीच्या जातिद्वेषाच्या राजकारणास उधाण येईल पण त्यास जनतेचा मोठा पाठिंबा असणार नाही.

महाराष्ट्राचे शहरीकरण झपाट्याने होत आहे. २००१ च्या जनगणना अहवालानुसार शे. ४२ टक्के जनता शहरी भागात राहाते आणि महाराष्ट्राच्या विकासाची गती लक्षात घेता २०११ साली निम्मी जनता शहरी भागात राहाणार आहे. या शहरी भागात स्थलांतर करणारे बिगर महाराष्ट्रीय मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे महा-राष्ट्रात मराठी भाषिकांची संख्या शे. ६८ टक्क्यांच्या आसपास असणार आहे. खुद्द मुंबई शहरात मराठी भाषिकांची संख्या शे. ३०.३२ टक्क्यापर्यंत आहे. महा-राष्ट्राचा जसजसा विकास होत जाईल तसतसे हे स्थलांतर वाढत जाणार आहे कारण राज्यास सर्व प्रकारच्या काम-गारांची गरज भासणार आहे. पण याच विषयावर राज ठाकरे यांचा मनसे हा पक्ष राजकारण करीत असून त्यांना मराठी तरुणांचा पाठिंबा मिळतो आहे. शिवसेना पण पुढे हा प्रश्न हाती घेऊ शकते. राज्यविधानसभेच्या

२८८ मतदारसंघांचे परिसीमन झाल्यामुळे आता शहरी भागातील मतदारसंघांचे प्रमाण वाढले आहे. आता एकट्या मुंबई ठाणे परिसरांत ६० जागा आहेत तर पुणे परिसरात २४ जागा आहेत. राज्याच्या राजकारणावरील ग्रामीण नेतृत्वाचा प्रभाव आता कमी होतो आहे. त्यामुळे सत्तेच गुरूत्वमध्य शहरी व निमशहरी भागाकडे झुकत चाललेला आपणास दिसतो.

१३ ऑक्टोबर २००९ रोजी झालेल्या निवडणुकीत काँग्रेस आघाडीचा विजय झाला असून शिवसेना, भाजप युतीचा तिसऱ्यांदा पराभव झाला आहे. विधानसभा परिसीमनानंतर नागरी विभागातच युतीचा पराभव झाला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना या राज ठाकरे यांच्या पक्षास शे. ६ टक्के मते आणि १३ जागा मिळाल्या असून त्यांनी हे विजय सेनेच्या बालेकिल्ल्यात मिळवले आहेत. काही पुणे व नाशिक भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षास पण मनसेचा फटका बसला आहे. मराठी भाषिकांच्या अस्मितेस फुंकर घालीत मनसेने हा विजय मिळविला आहे. मनसेला तरुणांचा मोठा पाठिंबा असून राज यांनी शिवसेनेच्या विविध संघटनांत दीर्घकाळ काम केले होते त्याचा त्यांना लाभ झाला.

शहरी भागात जनतेस उत्तरदायी असे नेतृत्व लौकर तयार होणार नाही. कारण त्यावर पैसेवाल्या कंत्राटदारांचा बांधकाम व्यावसायिकांचा व कमिशन एजंटचा पगडा आहे. त्यांतील काहींना गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. त्यामानाने ग्रामीण भागातील नेतृत्व जनतेच्या जास्त जवळचे कसदार व विकासाची जाण असणारे आहे. त्यांची ही गेल्या ४०-५० वर्षांची कमाई आहे. शहरी भागात त्या तोडीचे नेतृत्व उभे राहाण्यास वेळ लागणार आहे.

गेल्या वीस वर्षांपासून महाराष्ट्राचे राजकारण एक पक्षीय प्रभुत्वाकडून द्विध्रुवीय बहुपक्ष आघाडीच्या राजकारणात परिवर्तित झाले आहे. या निवडणुकीत मनसेने ही पद्धत तोडण्याचा प्रयत्न केला पण त्यास तेवढे यश लाभलेले नाही. कारण महाराष्ट्रातील या चारही राजकीय पक्षांकडे स्वतःचे असे पाठीराखे वर्ग आहेत. त्यात फारसा बदल झालेला नाही. इतर पक्ष त्याभोवतीच आघाडी करतांना आपणास दिसतात. पुढील काही वर्षात महाराष्ट्राच्या विकासाचा प्रश्न महत्त्वाचा ठरणार आहे कारण पुढील काही वर्षे भारतीय अर्थव्यवस्था शे. ८-१० टक्के या दराने वाढणार आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात शहरीकरण होणार असून मध्यम वर्गाची संख्या वाढणार आहे. समाजात नवे अंतर्विरोध निर्माण होणार आहेत. हे अंतर्विरोध पाच प्रकारचे असणार आहेत.

अ) शहरी व ग्रामीण भागातीत अंतर्विरोध,

ब) शहरांत राहाणारे व असंघटित क्षेत्रात काम करणारे गरीब व श्रीमंत यांच्यातील अंतर्विरोध,

क) राज्यातील विकसित व अविकसित भागात प्रादेशिक असमतोलामुळे निर्माण झालेले अंतर्विरोध,

ड) शेती क्षेत्रात बागायतदार शेतकरी, सीमांत शेतकरी व शेतमजूर यांच्यातील अंतर्विरोध,

इ) मागासलेल्या जाती व सुधारलेल्या जाती यांच्यातील वाद, आरक्षणाच्या नव्या मागण्या, विविध जातिगटात निर्माण झालेली जातिनिहाय जागृती व जातिशः संघटन, यातील अंतर्विरोध.

महाराष्ट्राच्या पुढील १५-२०. वर्षांच्या राजकारणात हे पाचही अंतर्विरोध महत्त्वाच्या भूमिका बजावणार आहेत. या अंतर्विरोधांचे कशा प्रकारे निराकरण होते यावरच महाराष्ट्राचा विकास व सामाजिक स्वास्थ्य यांचे स्वरूप ठरणार आहे.

संदर्भ : मराठी

1. पळशीकर, सुहास, बीरमल नीतिन् (२००४) **महाराष्ट्राचे राजकारण – राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ**, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
2. पळशीकर, सुहास व कुलकर्णी सुहास (सं.) (२००७) **महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष – राजकीय पक्षांची वाटचाल** मनोविकास प्रकाशन, पुणे.
3. व्होरा राजेंद्र व पळशीकर सुहास, (१९९६) **महाराष्ट्रातील सत्तांतर**, ग्रंथाली, मुंबई.

इंग्रजी

4. Baviskar B. S. (1980) **Politics of development** Oxford University Press, Mumbai.
5. Chousalkar (2004) "Politics in Maharashtra Crisies of Legitimacy." P. 111-

16 in **Economy of Maharashtra** edited by Jugale and Dange, Shivaji University, Kolhapur.

6. Inamdar N. R. and others (Ed.) (1989) **Social economic and Political processes in Cotemporary India**. Felicitation Volume for Prof. V. M. Sirsikar, Continental Publication, Pune. (Please refer to articles written by Jayant Lele. Dr. Rosanthal and Dr. N. R. Inamdar.

7. Lele J. C. (1983) "Politics in Maharashtra", in Class Power and Dominance Decline of Social Order, ed. by M. S. A Rao, and Francis Frenkel, Oxford University Press, Delhi.

8. Palashikar S. and Yadav Y. (Ed. 2003) Special Issue on Patterns of States Politics **Journal of Indian School of Political Economy**.

9. Thakkar, V. and Kulkarni, M. (Ed.) (1995) **Politics in Maharashtra**. Himalaya Publications, Mumbai.

❖❖❖

'वेगळया विदर्भ राज्याची चळवळ दशा आणि दिशा'

– प्रा. डॉ. किशोर महाबळ

विसाव्या शतकात महाराष्ट्रात सुरू झालेल्या असंख्य आंदोलनातून सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्न मांडले गेले. प्रश्नांची सोडवणूक झाल्याने बरीचशी आंदोलने क्षीण झाली. आणि संपुष्टात आली. प्रदीर्घ काळ चालू राहिलेली आंदोलने फारच थोडी आहेत. विदर्भाचे आंदोलन हे त्यापैकी एक महत्त्वाचे आंदोलन आहे. आज हे आंदोलन क्षीण झालेले दिसत असले तरीही ज्या उद्दिष्टांसाठी, प्रश्नांसाठी हे आंदोलन सुरू झाले ती उद्दिष्टे आणि प्रश्न आजही सुटलेले नाहीत आणि सुटण्याची चिन्हेही दिसत नाहीत. मागासलेपणाचा मुद्दा घेऊन सुरू झालेले हे आंदोलन आज का क्षीण झाले, या प्रश्नाचा शोध घेतला पाहिजे. विदर्भातील काही गावांचा, जिल्ह्यांचा काही प्रमाणात विकास झालेला असला तरीही बहुतांश प्रदेश आजही अतिशय मागासलेला आहे. दारिद्र्य, कुपोषण, बेरोजगारी, आणि सामाजिक, आर्थिक मागासलेपण अजूनही तसेच आहे. तरीही आंदोलन मात्र क्षीण झाले आहे असे दिसते आहे. नैसर्गिक साधन संपत्तीने संपन्न असलेल्या या प्रदेशाची आजची स्थिती मात्र हलाखीची आहे. शासनाचा विकासप्रक्रियेतील सहभाग अत्यल्प राहिल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे. स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचा हा एक महत्त्वाचा पैलू आहे.

मध्यप्रांत व वऱ्हाड म्हणून हा प्रांत मुख्यत्वे ओळखला जाऊ लागला तो १९ व्या शतकात. Central Provinces & Berar या नावाने! अकरा मराठी भाषिकांचे जिल्हे व चौदा हिंदी भाषिकांचे जिल्हे असलेल्या या भागास विदर्भाचा भूप्रदेश मानला जातो. या भागात अन्य महाराष्ट्रापेक्षा वेगळी भासतील अशी अनेक सांस्कृतिक, भाषिक, वैशिष्ट्ये आढळतात. बहुधर्मिय, बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक असूनही या प्रदेशात या मुद्यांवरून कधी संघर्ष झालेला नाही. वऱ्हाडातील मागासलेपणाचा प्रश्न हा जवळजवळ शंभर वर्षांएवढा जुना आहे. तशी तक्रार १९०९–१० या काळात मॉंटेग्यूकडे वऱ्हाडातील नेत्यांनी आकडेवारी देऊन केली. वऱ्हाडातील शासनाला होणारे आर्थिक उत्पन्न वऱ्हाडाच्या विकासासाठी खर्च केले जात नाही ही ती तक्रार होती. ही वऱ्हाडातील नेत्यांनी 'वऱ्हाड सर्वपक्षीय समिती' स्थापन केली. लोकनायक बापूजी अणे यांना समितीचे अध्यक्षपद देण्यात आले. बुलढाण्याचे रामचंद्र कानिटकर आणि अकोल्याचे ब्रिजलाल बियाणी यांना सचिवपद देण्यात आले. वऱ्हाडची समस्या मांडण्यासाठी कानिटकर यांना गोलमेज परिषदेस पाठविण्यात आले. त्याप्रसंगी केलेल्या निवेदनात वऱ्हाडला घटकराज्य मानले जावे अशी मागणी केलेली होती. हा भाग इ. स. १८५३ ते १९०२ या काळात एक वेगळे घटकराज्य होते असा संदर्भही देण्यात आला. वऱ्हाडला मध्यप्रांतापासून वेगळा करण्याचा समितीच्या वतीने सातत्याने प्रयत्न करण्यात आला. तत्कालिन लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये या विषयावर चर्चाही झाली. १ ऑक्टोबर १९३८ रोजी मध्यप्रांत व वऱ्हाड असलेल्या मराठी भाषा बोलणाऱ्यांच्या प्रदेशाला – बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, भंडारा. ह्या आठ जिल्ह्यांचा विदर्भ हा वेगळा प्रांत बनविण्यात यावा असा ठरावही पारित झाला. त्यानंतरच्या काळात विदर्भालाच वऱ्हाडचा प्रदेश जोडून महाविदर्भ असा प्रदेश निर्माण करण्यात यावा अशी मागणी केली जाऊ लागली. हे एक स्वयंपूर्ण व सफल राज्य होईल असे प्रतिपादन करण्यात आले. १९३९–४० या काळात लोकनायक बापूजी अणे यांनी यादृष्टीने बरीच जनजागृती केली. बॅ. रामराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली १८ ऑगस्ट १९४० रोजी महाविदर्भ सभा नावाची संस्था स्थापन करण्यात आली. महाविदर्भ आंदोलनाने गती घेतली. महाविदर्भ हे एक स्वयंपूर्ण स्वयंशासित राज्य होऊ शकते असे प्रतिपादन लोकनायक बापूजी अणे यांनी फाजलअली कमिशनसमोर केले. फाजलअली कमिशनने विदर्भ हे स्वयंपूर्ण राज्य

होऊ शकते असा निर्वाळा दिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४७ मध्ये अकोला करार झाला व त्यात महाराष्ट्र आणि विदर्भ अशी दोन जुळी राज्य असावीत असे नमूद करण्यात आले. १९५३ मध्ये नागपूर करार करण्यात आला. त्यानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात निधीची समान वाटणी करावी, धंदेवाईक तांत्रिक शिक्षणाच्या सोयी करण्यात याव्यात आणि सरकारी नोकऱ्यांत आरक्षण असावे अशा तरतुदी होत्या. भाषावार प्रांतरचनेनुसार, स्वतंत्र विदर्भाच्या मागणीस डावलून, विदर्भाचा महाराष्ट्रात समावेश करण्यात आला. विदर्भातील ग. त्र्यं. माडखोलकर आणि अन्य नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सक्रिय भाग घेतला होता हेही नमूद करणे गरजेचे आहे. १९५६ पर्यंत नागपूर ही मध्यप्रदेशाची राजधानी होती. मात्र त्यानंतर विदर्भाचा समावेश प्रथम द्वैभाषिक मुंबई राज्यात आणि १९६० नंतर महाराष्ट्रात करण्यात आला.

१९६० साली यशवंतराव चव्हाणांनी विदर्भाचा विकास करण्याचे विधिमंडळात आश्वासन दिले आणि त्यानंतर वेळोवेळी अशी आश्वासने दिली गेली. मात्र प्रत्यक्षात विकासाच्या योजना राबविण्यात आल्या नाहीत. विदर्भाचे आंदोलनही सुरूच राहिले. विदर्भाचा अनुशेष वाढतच गेला होता. मागासलेल्या प्रदेशांसाठी वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्याची तरतूद संविधानात करण्यात आलेली असली तरी प्रत्यक्षात अशी मंडळे स्थापनच करण्यात आली नाहीत. अनुशेष, आर्थिक मागासलेपणाची चर्चा मोठ्या प्रमाणात होऊ लागल्यावर अखेर २९ जुलै १९८३ रोजी महाराष्ट्र शासनाच्यावतीने दांडेकर समितीची स्थापना करण्यात आली. विदर्भाचा अनुशेष शोधण्याबरोबरच प्रदेशाच्या विकासासाठी समितीने विविध सूचना केल्या. उत्पन्नाच्या ८५ टक्के रक्कम ही अनुशेष भरून काढण्यासाठी खर्च करावी ही समितीची एक मुख्य सूचना होती. या व अन्य सूचनांचे पालन करण्यात आले नाही. अनुशेषाची चर्चा मोठ्या प्रमाणात होऊ लागल्यावर अखेर १ मे १९९४ रोजी वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्याचा विधिमंडळाने निर्णय घेतला. अशा विकास मंडळांचे प्रमुख म्हणून राज्यपालांना विशेष अधिकार मिळतात. हे असंवैधानिक आहेत व ते रद्द करावेत म्हणूनही प्रयत्न करण्यात आले. मात्र ते यशस्वी झाले नाहीत. ही विकासमंडळे अस्तित्वात आली आणि कार्यरतही आहे. विदर्भातील मूळ प्रश्न मात्र जसेच्या तसेच आहेत.

उपरोक्त परिच्छेदात विदर्भाच्या चळवळीतील महत्त्वाचे टप्पे नोंदविले आहेत. ही चळवळ इतकी वर्षे सुरू राहूनही ती लोकचळवळ का झाली नाही? या चळवळीचा निवडणुकांवर का परिणाम झाला नाही? ही चळवळ दबावगट म्हणून का प्रभावी ठरू शकली नाही, या प्रश्नांची उत्तरे शोधणे गरजेचे आहे. विदर्भाचाच काय पण कोणत्याही प्रदेशाच्या विकासासाठी सुरू असलेली आंदोलने कशी असावीत, किंवा कशी नसावीत याचा धडा या आंदोलनाचा अभ्यास केल्यास घेता येईल.

चळवळीच्या यशासाठी सक्षम नेतृत्वाची नितांत गरज असते हे सर्वमान्य झालेले तत्त्व आहे. विदर्भाच्या चळवळीचे नेतृत्व लोकनायक अणे यांनी प्रारंभीच्या काळात केले मात्र त्यानंतर स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीला खंबीर नेतृत्वच मिळाले नाही. वेळोवेळी राजकीय पक्षांनी बंद आयोजित केले आंदोलनांत अटक करून घेतली. पण त्यातील लोकसहभाग हा मर्यादितच राहिला. याचीही कारणे शोधली पाहिजेत. स्वातंत्र्योत्तर काळात, भाजप शिवसेना युतीचा काळ वगळता काँग्रेसच सत्तेवर राहिली. विदर्भातही काँग्रेसला नेहमीच समर्थन मिळाले. विदर्भातील वसंतराव नाईक हे जवळजवळ दहा वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असले, आणि प्रत्येक मंत्रिमंडळात विदर्भातील कोणाना कोणा आमदाराला मंत्रीपद मिळाले असले तरीही प्रत्यक्षात हे सारे नामधारी सत्ताधारी असल्यासारखेच कृतिशून्य राहिले. पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांचे सत्तेवरील नियंत्रण कायम टिकून राहिले. त्या नियंत्रणास झुगारून देण्याचे कसब इथल्या मंत्र्यांना दाखविता आले नाही. विरोधात जाण्याचेही धाडस नासिकराव तिरपुडे यांच्यासारख्या एखाद्या काँग्रेस मंत्र्याशिवाय इतरांना झाले नाही. विदर्भात जनसंघटन करून इथल्या प्रश्नांसाठी महाराष्ट्रातील सत्तेवर नियंत्रण आणणे किंवा प्रभावी दबावगट तयार करणेही या नेत्यांना शक्य झाले नाही. विरोधी पक्षातील बी. टी. देशमुख, नितीन गडकरी, शोभा फडणवीस असे काही मोजके आमदार सोडले तर इतरांनीही संघर्ष करण्याचे व विदर्भाचे प्रश्न अभ्यासपूर्ण

पद्धतीने विधिमंडळात मांडण्याचे काम केले नाही. सत्तारूढ कॉंग्रेस पक्षातही विदर्भाच्या प्रश्नाबद्दल वेगवेगळ्या भूमिका घेण्यात आल्या. डॉ. श्रीकांत जिचकार यांनी स्वतंत्र विदर्भाला विरोध केला. त्यांच्या मते विदर्भ, व उर्वरित महाराष्ट्र हा आर्थिक सहाय्यासाठी मुंबईवर अवलंबून आहे. मुंबईत गोळा होणारा महसूल, कर यामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था मुख्यत: चालते. स्वतंत्र विदर्भाला अशी मदत मिळणार नाही. व त्यामुळे असे राज्य स्वयंपूर्ण होऊ शकणार नाही. विदर्भातील साधनसंपत्ती स्वावलंबी होण्यासाठी पुरेशी नव्हती. जिचकारांच्या विरोधी भूमिका घेणारे अनेक छोटे गट होते. वसंत साठे या केंद्रिय नेत्याने मात्र स्वतंत्र विदर्भाला सातत्याने पाठिंबा दिला. विदर्भातील खनिज संपत्तीचा उपयोग केल्यास हा प्रदेश स्वावलंबी, स्वयंपूर्ण होऊ शकतो असे त्यांचे सांगणे होते. कॉंग्रेसच्या अन्य नेत्यांनी मात्र कोणतीही भूमिका (विदर्भाच्या समर्थनार्थ किंवा विरोधात) घेतली नाही. केंद्रिय नेतृत्वानेही आजतागायत या प्रश्नावर स्पष्ट भूमिका न घेतल्याने स्थानिक कॉंग्रेस नेत्यांनी थांबा आणि वाट पहा अशी भूमिका घेतलेली दिसते. भारतीय जनता पक्षाने मात्र स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचे समर्थन केले आहे. विधिमंडळात विदर्भाचा प्रश्न सातत्याने मांडला आहे. शिवसेना या मित्रपक्षाने मात्र भाजपविरोधी भूमिका घेतली असून स्वतंत्र विदर्भाला विरोध केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विदर्भ राज्याचे समर्थन केले होते. त्यांचे आजचे अनुयायी मात्र कोणतीही स्पष्ट भूमिका घेतांना दिसत नाहीत.

विदर्भातील काही स्वयंसेवी संघटना मात्र स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी सातत्याने करीत आहेत. डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. श्री. आ. देशपांडे यांच्यासारखे अर्थतज्ज्ञ, विदर्भ राज्याची मागणी सातत्याने करीत आहेत. त्यासाठी सातत्याने संशोधन, अभ्यास करून विदर्भाच्या मागासलेपणाचे पुरावे मांडत आहेत. महाराष्ट्र शासनाने विदर्भावर कसा अन्याय केला हे आकडेवारीनिशी दाखवून देत आहे. विदर्भातील हिंदी भाषिकांच्या संस्थांचाही विदर्भ राज्याला पाठिंबा आहे. विदर्भातील अन्य भागात विदर्भाच्या वेगळ्या राज्यासाठी मोठ्या प्रमाणात आंदोलने चळवळी होतांना दिसत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

अनुशेषाचा प्रश्न :

विदर्भावरील अन्याय, विदर्भातील प्रश्नांकडे राज्य आणि केंद्र शासनाने केलेले दुर्लक्ष हा विदर्भ राज्याच्या मागणीचा मुख्य गाभा आहे. केंद्र आणि राज्य शासनाने विदर्भाला आर्थिक मदत करण्यात नेहमीच कुचराई केली, विदर्भातून निर्माण होणारी वीज, खनिज संपत्ती, शेतीतील उत्पन्नाचा रास्त वाटा विदर्भाच्याच विकासासाठी वापरला गेला नाही, हे मुख्य गाऱ्हाणे आहे. अनुशेषाच्या या प्रश्नाची थोडक्यात चर्चा करू.

विदर्भाचा अनुशेष नेमका किती याबद्दल आजतागायत विविध मते मांडली गेली. १९९४ मध्ये दांडेकर समितीने सादर केलेल्या अहवालात विदर्भाचा अनुशेष त्यावेळी १२४६ कोटी एवढा राज्यातील अनुशेषाच्या ४० टक्के एवढा होता असे प्रतिपादन केले. दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या विकासनिधीच्या ८५ टक्के रक्कम त्या त्या क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी आणि १५ टक्के रकमेचा उपयोग चालू कामे पूर्ण करण्यासाठी करावा असे सुचविले होते. हा बॅकलॉग १९८२-८३ च्या किंमतींवर आधारित होता. १९९४ साली हा अनुशेष ६६२४ कोटी एवढा झाला. तर २००१ साली हा अनुशेष ४२५३ कोटी रू. एवढा होता. सध्या हा अनुशेष नेमका किती यासंबंधी आकडेवारी उपलब्ध नाही. या अनुशेषात सिंचनाच्या अनुशेषाचा भाग पुढीलप्रमाणे आहे. २००५ अखेरपर्यंत विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष ३०१० कोटी म्हणजे राज्याच्या सिंचन अनुशेषापैकी ६४.२५ टक्के एवढा आहे. मार्च २००६ पर्यंत सिंचनाचा अनुशेष हा २१९३ कोटी रूपये आणि सिंचनेतर क्षेत्रांचा अनुशेष १३२७ कोटी रूपये एवढा होता. सिंचनेतर अनुशेषात, रस्ते, वीज, शिक्षण, आरोग्य असे विषय येतात. २००६ साली विदर्भाला ४७९ कोटी रूपये मिळणार होते. त्यामुळे तो अनुशेष ९४८ कोटी रूपये एवढा राहणार होता. हा अनुशेष भरून काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने मिळणारा निधी आणि प्रत्यक्षात आवश्यक निधी यात कधीच ताळमेळ न राहिल्याने अनुशेष वाढतच गेला आहे. विदर्भाला देण्याचा निधी प्रत्यक्षात कृष्णा खोरे विकासासाठी वळ-

विण्यात आला. असेच अनेकदा घडल्याने अनुशेष वाढत गेला आहे. विदर्भ वैधानिक मंडळांची स्थापना होऊनही म्हणावा तेवढा विकास निधी विदर्भात आलाच नाही. याची परिणाती म्हणजे या भागातील दारिद्र्य, कुपोषण व अन्य प्रश्न अधिकच बिकट होत आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील असंख्य शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे एक ताजे उदाहरण आहे.

महाराष्ट्राला विदर्भाकडून काय काय मिळाले आणि अजूनही मिळत आहे याचा थोडक्यात आढावा घेतला पाहिजे. विदर्भात खापरखेडा, कोराडी, पारस, चंद्रपूर येथील विद्युतनिर्मिती केंद्रातून भरपूर वीज निर्माण होते मात्र विदर्भात आठ आठ तास भारनियंत्रण असते. दुसऱ्या बाजूला मुंबई, पुणे व अन्य शहरांमध्ये मात्र अत्यल्प भारनियमन असते. मँगनीज, कोळसा, चुनखडी, डोलोमाईट ही खनिजे एकत्रितपणे मोठ्या प्रमाणात असलेला जगातील हा एकमेव प्रदेश होय. महाराष्ट्राच्या एकूण खनिजांपैकी ९३ टक्के खनिजे विदर्भात आहेत. इथे मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन हौते. वनसंपदाही मोठ्या प्रमाणात आहे. विदर्भातील कापसावर पश्चिम महाराष्ट्रातील कापड गिरण्या चालतात आणि वीजेमुळे संपूर्ण औद्योगिक क्षेत्र व अन्य व्यवहार चालतात. त्यातून अब्जावधी रूपये किमतीची संपत्ती निर्माण होते मात्र विदर्भाला त्याचा रास्त वाटाही मिळत नाही अशी विदर्भ राज्याची मागणी करणाऱ्यांचे म्हणणे आहे.

विदर्भाचे वेगळे राज्य हे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व सक्षम करण्यासाठी शासनाने तातडीने अनुशेष भरून काढला पाहिजे. १९९० सालापर्यंत उर्वरित महाराष्ट्रात ६५ टक्के उद्योग निर्माण करण्यात आले तर विदर्भात फक्त ६ टक्के उद्योगच सुरू होऊ शकले. सिंचनाचा अनुशेष कायम राहिल्याने कृषी उत्पादनही वाढू शकले नाही आणि कोरडवाहू शेतीच करावी लागली. आरोग्य आणि शिक्षणाच्या सोयींबद्दल तर परिस्थिती अधिकच बिकट राहिली. याच परिस्थितीमुळे डॉ. जिचकार यांना विदर्भ प्रांत हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे अशक्य आहे असे वाटत असे. ॲड. किंमतकर, डॉ. खांदेवाले, डॉ. श्री. आ. देशपांडे यांच्यासारखे अभ्यासक आणि स्वतंत्र विदर्भ राज्याचे समर्थक वेगळी माहिती देतात. त्यांच्यामते विदर्भात निर्माण होणारी अतिरिक्त वीज विकली तर किमान ४००० कोटी रू. मिळू शकतात. ही वीज विदर्भातच उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणात कारखानदारी वाढू शकते. आज भारनियमनामुळे विदर्भातील कारखानदारीवर वाईट परिणाम झाला आहे. नवीन कारखान्यांमुळे रोजगार मोठ्या प्रमाणात वाढू शकेल. विदर्भातील खनिजांचे उत्खनन केल्यास प्रचंड उत्पन्न होऊ शकेल. रोजगारही वाढेल. सिंचनाच्या सोयी केल्यास विदर्भातील ६० टक्के जमीन ओलिताखाली येऊ शकते. अशा सोयी नसल्याने विदर्भाला आंतरराज्य करारानुसार मिळणाऱ्या पाण्यापैकी ४३७ टीएमसी पाणी वापरताच येत नाही. वनकायद्यामुळे अनेक सिंचन प्रकल्प अर्धवट अवस्थेत राहिले आहेत. त्या कायद्यात योग्य त्या दुरुस्त्या केल्या तर सिंचनाचे उद्दिष्ट तातडीने साध्य करता येईल. यादृष्टीने विदर्भाचे वेगळे राज्य सहजच स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण करता येईल. त्याशिवाय केंद्र सरकारकडून येणारे अनुदान पूर्णतः विदर्भाच्याच उपयोगासाठी वापरता येईल. महाराष्ट्र सरकारने विदर्भाकडे कायम दुर्लक्ष केले त्यामुळे त्या सरकारकडून आशा करणे कुचकामाचे आहे. ज्या वैधानिक विकास मंडळांची स्थापना सरकारने केली त्यांना प्रत्यक्षात कोणतेच विशेष अधिकार किंवा स्वायत्तता मिळाली नाही. सरकारनेच या मंडळांची ही अवस्था केली असा स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी करणाऱ्यांचे सांगणे आहे.

अनुशेष भरून काढण्याचा प्रयत्न इतक्या वर्षात सरकारने केला नाहीच आणि आता खासगीकरणाला प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली आहे. कायम विनाअनुदान तत्त्वावर शासन हव्या तेवढ्या शाळा आणि महाविद्यालये काढण्याची एकमुक्त परवानगी देऊ लागले आहे. त्यामुळे शासनाच्या मदतीशिवाय गावोगावी शाळा आणि महाविद्यालये निघाली! आता शिक्षणावरचा खर्च करण्याच्या जबाबदारीतून बाहेर पडण्याची तयारी सुरू झाली आहे. खासगीकरणाच्या माध्यमातून ४३ औष्णिक वीज प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली आहे. खासगी इस्पितळांना प्रोत्साहन देण्याचे धोरण तर स्वीकारले आहेच. बांधा वापरा हस्तांतरित करा या माध्यमातून रस्त्यांचे काम सुरू केलेलेच आहे. टोल वसुली करण्याची

बांधकाम व्यावसायिकांना परवानगी आहेच. वीज, रस्ते, शिक्षण, आरोग्य विषयक सुधारणा अशा पद्धतीने वेगाने होणार आहेत! अनुशेष देण्याची गरजच पडू नये असा हा अभिनव मार्ग आहे!! खासगीकरणातून झालेल्या सोयी, आणि मिहान प्रकल्पांसारखे प्रकल्प आमच्याच धोरणामुळे आले असे म्हणण्यास आणि त्याचे श्रेय घेण्यास शासन आणि राजकारणी तयारच आहेत! या तथाकथित झगमगाटाने विकासाने सर्वसामान्य जनता सहजच प्रभावित होत असल्याने तिला विदर्भाच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्याची गरज वाटत नाही. त्यामुळे विदर्भाच्या अनुशेषाच्या प्रश्नावर लोकमत संघटित होत नाही, राजकीय पक्षही फक्त निवडणुकीच्या वेळेस हा मुद्दा मांडतात. नागपूर करारानुसार दरवर्षी नागपुरात होणारे अधिवेशन आले की विदर्भाच्या प्रश्नांवर काही प्रश्नोत्तर, चर्चा, आंदोलने होतात. पण नंतर पुन्हा जनतेच्या जीवनमरणाचे प्रश्न तसेच राहतात. विदर्भ राज्याची मागणी, विदर्भाचे मागासलेपण हे पुन्हा वर्तमानपत्रातील शुष्क चर्चेपुरतेच मर्यादित राहते हा अनुभव आहे. निवडक बुद्धिवंतांनी चिकाटीने चालविलेले वैचारिक आंदोलन, निवडणुकीपुरता उपयोगात आणण्याचा विषय म्हणून विदर्भाचा प्रश्न मांडणाऱ्या राजकारणी नेत्यांनी चालविलेले आंदोलन असे या आंदोलनाचे आजचे स्वरूप आहे. मेळघाट, गडचिरोली जिल्ह्यातील बालमृत्यू, यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि लक्षावधी बेरोजगार युवक असा विदर्भ अशी आजची परिस्थिती आहे. एका योग्य उद्दिष्टांसाठी सुरू झालेल्या आंदोलनाची ही आजची स्थिती आहे.

प्रभावी, निष्ठावान चारित्र्यसंपन्न आणि प्रश्नांची उत्तम जाण व अभ्यास असलेल्या नेतृत्वाचा अभाव आणि आर्थिक विपन्नतेने नैराश्याने ग्रासलेली जनता यामुळे स्वतंत्र विदर्भाची चळवळ आज असंगत झाल्यासारखी दिसते आहे. असे असले तरीही या चळवळीने उपस्थित केलेले प्रश्न अत्यंत महत्त्वाचे आहेत. मागासलेल्या प्रदेशांच्या विकासाची समस्या केंद्र सरकारांनीही आणि राज्य सरकारांनीही दुर्लक्षिलेली आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न प्रदेशांतून मिळालेला निधी त्या प्रदेशांसाठी उपयोगात आणला जाणार नसेल तर हे प्रदेश विकासाचा प्रयत्नच कशाला करतील? प्रत्येक प्रदेशाला, व त्यातही मागासलेल्या भागांना प्राधान्य क्रमाने आर्थिक मदत केली पाहिजे हे सैद्धांतिकदृष्ट्या मान्य करूनही केंद्र व राज्य सरकारे प्रत्यक्षात अशी मदत करतांना दिसत नाहीत. मागासलेपणातून नक्षलवादी चळवळीला खतपाणी घातले जाते. विदर्भाचा अनुशेषाचा प्रश्न सोडविण्याचा राज्य सरकारने कधीच गंभीरपणे प्रयत्न केलेला नाही. मागासलेल्या प्रदेशांनी केंद्र व राज्य सरकारांच्या मदतीविना विकास कसा साधायचा? या शासनांकडून मदत कशी मिळवायची? शासनाला मदत करण्यास कसे बाध्य करायचे? मोठी शहरे व राजधान्यांना अद्ययावत करण्यास प्राधान्य देणारे शासनाचे धोरण कसे बदलायचे? हे प्रश्न वैदर्भीय जनतेसमोर आहेत. विदर्भातील बहुसंख्य जनता अजूनही महाराष्ट्राबरोबरच राहण्याच्या मनःस्थितीत आहे असे विधान करता येईल. वेगळ्या विदर्भाच्या चळवळीला अजूनही अल्प प्रतिसाद मिळतो ही वस्तुस्थिती आहे. विदर्भाच्या विकासाकडे दुर्लक्ष झाल्यास हेच लोकमत कधी बदलेल ते सांगता येणार नाही हेही ध्यानात ठेवले पाहिजे.

मोठी राज्ये की छोटी राज्ये चांगली हा अजून एक वादाचा मुद्दा आहे. अनेक अभ्यासकांनी व वि. म. दांडेकरांनीही छोट्या राज्यांचे समर्थन केले होते. विकेंद्रीकरणाचे समर्थन करतांना छोट्या राज्यांच्या निर्मितीला का विरोध व्हावा? छोट्या राज्यांमुळे प्रशासकीय खर्च वाढेल हा आक्षेप घेतला जातो. मोठ्या राज्यांतील प्रशासन सक्षम, सजग, जबाबदार व उत्तरदायी करणे हे सोपे नाही. छोट्या राज्यांत प्रशासनाला अधिक सक्षम करणे सोयीचे होऊ शकेल. याचाही विचार व्हायला हवा. केंद्र सरकारने दिलेला निधी राज्यांनी सर्व जिल्ह्यांना व त्यातही मागासलेल्या प्रदेशांना दिला नाही तर काय करायचे हा प्रश्नही आता महत्त्वाचा मानला पाहिजे. वेगळ्या राज्यांची मागणी ही उपरोक्त प्रश्नांचे समाधानकारक उत्तरे न शोधण्याचा परिणाम आहे.

विदर्भाची चळवळ ही जनसामान्यांची चळवळ कशी करायची हे आजचे आव्हान आहे. या प्रदेशातील राजकीय नेतृत्वाला, विदर्भाचा विकास करण्यासाठी कसे प्रवृत्त करायचे हेही एक आव्हान आहे. महाराष्ट्राचे

मुंबई व पश्चिम महाराष्ट्रकेंद्री अर्थकारण हे आजचे चित्र कसे बदलायचे हेही एक आव्हान आहे. या आव्हानांचा विदर्भातील चळवळ पाठपुरावा करेल अशी अपेक्षा करणे एवढेच तूर्त आपल्या हाती आहे.

❖ ❖ ❖

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ

– प्रा. डॉ. मेधा दुभाषी

सहकारी चळवळीच्या प्रतीत महाराष्ट्र हे सर्व देशात अग्रगण्य राज्य समजले जाते. शेतकरी आणि तत्सम गरीब वर्गाला सावकरी पाशातून मुक्त करण्यासाठी प्रामुख्याने सहकारी चळवळीचा आश्रय या शतकाचे सुरुवातीपासून घेण्यात आला. निकोल्सन रिपोर्टच्या आधारावर देशात प्रथमच १९०५ साली शेतकी पतपेढ्यांचा कायदा मंजूर करण्यात आला. सहकारी पतपेढ्या स्थापन होण्यास मार्ग मोकळा झाला आणि त्यानंतरच शेती क्षेत्रात शेतकी पतपेढ्या स्थापन होण्यास सुरुवात झाली. अशी पहिली सोसायटी १९०५ साली धारवाड जिल्ह्यात कणगीहल येथे स्थापन झाली. ही शेती क्षेत्रातील पहिली सहकारी संस्था. नंतरच्या काळात हळूहळू या संस्थेच्या संख्येत, तिच्या रचनेत, तिच्या कार्यात आणि कार्यक्षेत्रात वेळोवेळी वाढ होऊन गावपातळीवर विविध कार्यकारी सोसायटी या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचली. या संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी राज्यात सहकारी संघाची स्थापना केली. या पतपेढ्यांची आर्थिक गरज भागविण्याच्या दृष्टीने सुरुवातीस मुंबई सेंट्रल को–ऑप. बँक स्थापन झाली आणि तिचेच रूपांतर पुढे १९२३ साली प्रांतिक सहकारी बँकेत झाले. सध्याची ही महाराष्ट्र राज्य सहकारी बँक आहे.

१९१५ च्या सुमारास नेमलेल्या मॅकलेगन समितीच्या शिफारशीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका स्थापन करण्यास सुरुवात झाली. हळूहळू अशा बँका स्थापन होऊ लागल्या आणि पतपुरवठ्यासाठी त्रिस्तरीय यंत्रणा अस्तित्वात आली. गावपातळीवर पतपेढी, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्रांतिक पातळीवर प्रांतिक बँक अशी अस्तित्वात आली होती. या यंत्रणेने शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज उपलब्ध करून दिले असले तरी त्यांचा विस्तार आणि व्याप्ती मर्यादितच राहिली आहे.

पतपुरवठा संस्थांबरोबरच दुसऱ्या महायुद्धाने निर्माण केलेल्या समस्यांचा मुकाबला करण्यासाठी शहरात ग्राहक भांडारे आणि शेतकी विभागात शेतमालाच्या खरेदी विक्रीसाठी खरेदी–विक्री संघ अस्तित्वात आले. या संघाने युद्धकाळात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याबरोबर शेतीला आवश्यक असणारी खते, बियाणे आदिंचाही मर्यादित पुरवठा केला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात वरील प्रकारच्या संस्थाखेरीज इतर प्रकारच्या संस्था तुरळक प्रमाणात अस्तित्वात आल्या होत्या. मात्र त्यांची संख्या आणि त्यांचे व्यवहार हे मर्यादितच राहिलेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळाचे सहकारी चळवळीला वरदान म्हणजे काही निवडक चांगल्या कार्यकर्त्यांचा संच आणि काही निवडक क्षेत्रात वाटाड्याच्या भूमिकेतून नवी संस्था स्थापन करणे इतकाच मर्यादित राहिला आहे. १९४७ साली महाराष्ट्रात सहकारी संस्था ८,९९० होत्या आणि त्यांची सभासद संख्या १४ लाख २१ हजार एवढी होती. तसेच खेळते भांडवल ४४ कोटी ९५ लाख एवढे होते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर :

स्वातंत्र्यानंतरच्या काळात सहकारी उद्योगांना सरकारचे पाठबळ मिळाले याचे कारण सरकारचे आर्थिक धोरण. भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांच्या नेतृत्वाखाली भारताने निर्णय घेतला की अमेरिका व पाश्चात्त्य देशांनी अनुसरलेली मुक्त भांडवली अर्थव्यवस्था किंवा सोविएट युनियन, पूर्व युरोपिय देश यांची साम्यवादी अर्थव्यवस्था या दोन्ही भारताला स्वीकार्य नाहीत. कारण भांडवली अर्थव्यवस्थेत विषमता वाढते तर साम्यवादी अर्थव्यवस्थेत स्वातंत्र्याची गळचेपी होते म्हणून मिश्र अर्थव्यवस्था व लोकशाही नियोजन यांचा मार्ग भारताने स्वीकारला. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खासगी उद्योगाबरोबर सहकारी उद्योगालाही स्थान मिळाले. त्यावेळी असा विचार होता की सहकारात सार्वजनिक क्षेत्राची सामाजिक बांधिलकी व खासगी क्षेत्राचे स्वातंत्र्य या दोघांचा उत्कृष्ट समन्वय आहे. त्यामुळे

अनुक्रमणिका

सहकार अर्थव्यवस्थेला योग्य दिशा देऊ शकेल. विशेषतः ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकाराला अनन्यसाधारण स्थान आहे. म्हणूनच १९५१ पासून सुरू झालेल्या पंचवार्षिक योजनेत सहकारी क्षेत्राला उत्तेजन देण्यासाठी अनेक कार्यक्रम सुरू करण्यात आले. रिझर्व्ह बँक, नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन इत्यादींच्या माध्यमातून सहकाराला भक्कम आर्थिक सहाय्य प्राप्त झाले. सरकारी धोरणानुसार शेती-प्रक्रिया उद्योग सहकारी क्षेत्रासाठी राखून ठेवले. त्यामुळे सहकारी उद्योगांचा जोमाने विकास झाला.

सहकारी उद्योगधंदे हे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील परिवर्तनाचे फार मोठे साधन ठरले. शेतात पिके पिकवणाऱ्या शेतकऱ्याला मालाच्या विक्रीसाठी व प्रक्रियेसाठी खासगी व्यापाऱ्याकडे व उद्योजकाकडे पाहावे लागत असे. तो देईल तो भाव स्वीकारावा लागे. परंतु आता प्रक्रिया करणाऱ्या कारखान्याच्या मालकीत तो सहभागी झाला. शेतकऱ्याला त्याच्या मालासाठी शक्य तेवढा चांगला भाव देणे हेच सहकारी कारखानदारीचे उद्दिष्ट होते. शेतमालाची प्रक्रिया झाल्यानंतर जे अधिक मूल्य अस्तित्वात येते (व्हॅल्यू ॲडेड) त्याचा तो वाटेकरी झाला. शेतकऱ्याला आर्थिक स्थैर्य व समृद्धी प्रदान करण्याची सहकारी कारखानदारीत फार मोठी शक्ती होती.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सहकारी चळवळीमध्ये खूपच वाढ झालेली दिसून येते. स्वराज्य मिळाले त्याचे सुराज्य करण्यासाठी देशाने पुढील काळात अनेक विविध उपाय योजले, योजना आखल्या आणि त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला.

सहकारी चळवळीचा मूळ हेतू शोषण मुक्त समाज निर्माण करणे हा आहे. समाजातील गरजू आणि दुर्बल घटकांना एकत्रित करून संघटनेच्या माध्यमातून आवश्यक सेवा उत्पादन हाती घेणे, ते "ना नफा ना तोटा" या तत्त्वावर चालविणे, सर्व गरजूंना मुक्त प्रवेश ठेवणे, संस्थेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविणे आणि वाढाव्याची न्याय्य वाटणी संबंधित घटकात करणे हा उद्देश आहे. मूळ सिद्धांतावर आधारित जेथे जेथे शोषण असेल ते दूर करण्यासाठी ती सेवा स्वतःकडे घेणे या मंत्राचा वापर सहकारी चळवळीने यशस्वीपणे केला. हा अनुभव जमेस धरून स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळीच्या पाहणीसाठी आणि त्यावर आधारित विकासासाठी ज्या उपाय योजना करण्यात आल्या. त्यामध्ये अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पहाणी समितीच्या गोरवाला समितीच्या शिफारशींचा व अंमलबजावणीचा उल्लेख करावा लागेल. या समितीच्या शिफारसीनुसार सहकारी चळवळीला ग्रामीण विकासाचे माध्यम म्हणून आपल्या पंचवार्षिक योजनात राजमान्यता मिळाली आणि ग्रामीण विकासासाठी आवश्यक असलेले कार्य या चळवळीद्वारा किंवा या चळवळीमार्फत करण्याचे निश्चित करण्यात आले. हे नवे धोरण पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून लागू करण्यात आले. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्वकाळात असलेली पतपेढी, विविध कार्यकारी सोसायटी ही स्वातंत्र्योत्तर काळात लहान, मोठ्या आकाराची सेवा सहकारी सोसायटी झाली आहे आणि तिने केवळ पतपुरवठ्यावर न थांबता शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या साधन सामुग्रीचा पुरवठा, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, शक्य असेल तेथे शेतीमालाच्या साठवणीचीही व्यवस्था केली आहे. या तिच्या नव्या धोरणामुळे शेतीतील मोठा गट या संस्थांचा सभासद झाला असून आपल्या लागवड विषयक खर्चासाठी पिक कर्ज, शक्य तेथे साधनसामुग्री आणि अन्य सेवा या संस्थांकडून घेत आहे.

त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळातील सहकारी चळवळ, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सहकारी चळवळीचे संदर्भात आखलेली धोरणे पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सहकारी चळवळीला दिलेले स्थान, महाराष्ट्र राज्याची झालेली निर्मिती, राज्याचे त्यावेळचे मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी कृषि उद्योग विकासाचे धोरण ठेवून सहकारी चळवळीला दिलेले उत्तेजन विशेषतः कृषी औद्योगिक संस्थांचा घातलेला पाया यामुळे राज्यातील सहकारी चळवळीची गेल्या ४०-४५ वर्षांत प्रचंड वाढ झाली आहे. पुढील आकडेवारीवरूनच ही गोष्ट स्पष्ट होईल.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती

अनु.	सहकारी संस्थांचा प्रकार	३० जून १९६१	३० जून १९८१	३१ मार्च १९८९	३१ मार्च १९९८
१.	शिखर व मध्य. कृषी व बिगर कृषी पतसंस्था	३९	३१	३४	३४
२.	प्राथमिक कृषी पतंसस्था	२१,४००	१८,५७७	१९,५६५	२०,७०९
३.	बिगर कृषी पतसंस्था	१,६३०	५,४७४	११,२९१	२३,५५७
४.	पणन संस्था	३४४	४२३	९३१	१,१४०
५.	उत्पादक संस्था साखर कारखाने भात गिरण्या इत्यादी	४,३०६	१४,३२७	२८,९५४	३९,५२१
६.	समाजसेवी, व इतर सहकारी संस्था (ग्राहक भांडारे, गृहनिर्माण इत्यादी)	३,८४६	२१,९१५	४३,८४५	८०,८६५
	एकूण संस्था	३१,५६५	६०,७४७	१,०४,६२०	१,६५,८६५

अनु.	सहकारी संस्थांचा प्रकार	३१ मार्च २००४	३१ मार्च २००७
१.	शिखर व मध्य कृषी व बिगर कृषी पतसंस्था	५३	५३
२.	प्राथमिक कृषी पतसंस्था	२१,०००	२१,२७१
३.	बिगर कृषी पतसंस्था	२५,६६४	२६,६३१
४.	पणन संस्था	१,२२०	१,४५१
५.	उत्पादक संस्था साखर कारखाने भात गिरण्या	४०,८८१	४४,४०१
६.	समाजसेवी, व इतर सहकारी संस्था (ग्राहक भांडारे, गृह निर्माण इ.)	९०,०३५	१,०६,९८६
	एकूण संस्था	१,७८,८५३	२,००,७९३

वरील आकडेवारीनुसार चळवळीचा विभागवार विचार करणे अधिक संयुक्तिक ठरेल. त्या दृष्टीने शेती पतपुरवठा, शेती मालाची खरेदी-विक्री, शेती मालावर प्रक्रिया यांचा स्वतंत्र उल्लेख करावा लागेल. सहकारी चळवळीची वाढ प्रामुख्याने पहिल्या काही दशकात शेती विभागात झाली असली तरी शहरातूनही तुरळक का होईना नागरी पतपेढ्या, नागरी सहकारी बँका, या सारख्या बिगर कृषि पतसंस्था स्थापन होत होत्या. स्वातंत्र्यानंतर विशेषतः राज्यनिर्मिती नंतर संस्थांची संख्या अधिक वेगाने वाढत आहे आणि शहरी भागातही या संस्थे-बरोबरच ग्राहक भांडारे, गृह निर्माण संस्था, लघु उद्योगां-साठी सहकारी वसाहती, औद्योगिक संस्था या सारख्या संस्था अधिक प्रमाणात स्थापन होण्यास सुरुवात झाली आहे आणि एकूणच गेल्या सहा दशकामध्ये चळवळीचा चेहरा-मोहरा बदलला आहे याची वाचकांना योग्य कल्पना यावी या हेतूने त्रोटक प्रमाणात प्रत्येक विभागाची माहिती बाजूला दिली आहे.

१९९१ सालापासून मात्र सरकाराच्या अर्थनीतीत फार मोठे स्थित्यंतर घडायला सुरुवात झाली. अर्थनीतीत का बदल घडून आला हे विस्ताराने या लेखात सांगता येणार नाही परंतु त्या बदलाचा सहकारी अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला त्याची दखल येथे घ्यावी लागेल. स्पर्धात्मक मुक्त बाजारी अर्थव्यवस्था प्रस्थापित करणे हा नव्या आर्थिक धोरणाचा उद्देश होता. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण हे नव्या अर्थनीतीचे परवलीचे शब्द होते. त्यात सहकारीकरणाला विशेष स्थान नव्हते. उलट इथून पुढे सहकारी संस्थांनी सरकारी मदतीवर विसंबून न राहता स्वतःच्या पायावर उभे रहावे व अनुदानांशिवाय बाजारी स्पर्धेत टिकून राहण्याची क्षमता आपल्यात निर्माण करावी अशी अपेक्षा होती. आर्थिक नीतीतील आमूलाग्र फेरबदलामुळे सहकारी उद्योगांपुढे फार मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. त्या आव्हानांना सहकारी उद्योग यशस्वीपणे सामोरी जाऊ शकतील काय हा आजच्या घडीचा महत्त्वाचा प्रश्न आहे.

शेती पुरवठा :

सहकारी चळवळीची सुरुवातच या विभागापासून झाली आहे. अनुभवानंतर या विभागात त्रिस्तरीय संस्थांची रचना कार्यरत असून राज्य पातळीवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सह. बँका आणि प्राथमिक पातळीवर २० हजारांचे वर शेती पुरवठा संस्था कार्यरत आहेत. या त्रिस्तरीय रचनेमार्फत शेतकऱ्यांना शेतीसाठी अल्प, मध्यम मुदतीचे कर्जे दिली जातात. या रचनेतील महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ही देशातील मोठी बँक असण्याबरोबरच आशिया खंडातील मोठी आणि अग्रगण्य बँक आहे आणि महाराष्ट्राचे ते भूषण आहे. शेतीच्या अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जाबरोबरच शेती मालाची खरेदी-विक्री प्रक्रिया आणि तदनुषंगिक बाबीसाठी कर्जपुरवठा करीत आहे. राज्य कृषि औद्योगिक विकासात या बँकेचा मोठा वाटा आहे.

जिल्हा स्तरावर ३९ जिल्हा मध्यवर्ती सह. बँका असून जिल्हा बँकांच्या कार्याची गेल्या ६० वर्षांतील ही चढती कमान असली तरी खुल्या आर्थिक धोरणांचा या बँकांवर विपरीत परिणाम होत असून अन्य काही कारणांमुळे या बँकांपैकी बऱ्याच बँका आर्थिक अडचणीत आल्या आहेत. शेती पतपुरवठ्याची वाढती गरज विचारात घेऊन अन्य पर्याय शोधण्यापेक्षा याच बँकांचे पुनरुज्जीवन करून या कार्यरत व कार्यक्षम करणे जास्त उपयुक्त ठरेल.

शेती पतपुरवठ्यासाठी प्राथमिक पातळीवर प्राथमिक शेती पतपुरवठा संस्था आहेत. त्यामध्ये लहान व मोठ्या आकाराच्या विविध कार्यकारी संस्था, कृषक सेवा संस्था, आदिवासी सहकारी संस्था या सर्वांचा समावेश होतो. शेती पतपुरवठ्यासाठी आपली ही यंत्रणा अनुभवी आहे. भविष्यकाळात शेती पतपुरवठ्यात येणारी विविधता व विस्तार विचारात घेता या रचनेतील/यंत्रणेतील समस्या दूर करून ती कार्यक्षम करणे ही काळाची गरज आहे.

शेतीचा कायमस्वरूपी विकास होण्यासाठी शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीची कर्जे देण्यासाठी राज्यात सुरुवातीस भूतारण बँका स्थापन झाल्या. त्या शेतकऱ्यांना जुनी कर्जफेड करण्यासाठी कर्ज देत होत्या. पुढे शेती विकासाची गरज लक्षात घेऊन त्यांचेच कार्यात आणि नावात बदल करण्यात आला आणि त्यांना भूविकास बँक असे त्यांचे नामकरण करण्यात आले. भूविकास आणि ग्रामीण विकास हे एकमेकांवर अवलंबून असल्याने त्या कार्यासाठी १९८२ साली राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची स्थापना करण्यात आली आणि राज्य पातळीवर असलेल्या भूविकास बँकेचे नाव बदलण्यात येऊन ती आता राज्य कृषी आणि ग्रामीण विकास बँक म्हणून कार्य करीत आहे. ही बँक कृषी आणि ग्रामीण विकासासाठी अर्थसहाय्य देत असली तरी काळाची गरज ओळखून या बँकेने १९९७ पासून स्वतंत्र महिला विकास विभाग कार्यान्वित केला आहे. महिलांची संख्या आणि कर्ज पुरवठ्याची रक्कम कमी असली तरी एक नवे दालन उघडले गेले ही बाब अधिक महत्त्वाची आहे. तसेच या बँकेने ग्रामीण विकासासाठी घर बांधणीसाठी कर्ज रोखे उभारले आहेत व त्याद्वारे ग्रामीण विभागातून घर बांधणी, नव्या सुविधा उपलब्ध होतात ही बाबही लक्षात घेण्यासारखी आहे. वरील दोन्ही घटना नाविन्यपूर्ण आहेत याची नोंद घेत असतानाच वसुलीमुळे ही बँक अडचणीत आली असून

अनुक्रमणिका

तिचे काम ठप्प झाले आहे.

शेतीमालाची खरेदी–विक्री :

शेतकऱ्यांचा विकास होण्यासाठी अशी अल्प, मध्यम व दीर्घ मुदत पतपुरवठ्याची आवश्यकता आहे. तद्वतच शेतकरी उत्पादन करत असलेल्या साधनसामुग्रीचा पुरवठा करणे आणि माल तयार झाल्यावर त्याची किफायतशीर विक्री होणे तेवढेच महत्त्वाचे आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात दुसऱ्या महायुद्धाच्या काळात यासाठी विशेषतः शेतकऱ्यांना शेती साधनांचा पुरवठा करण्यासाठी आणि त्यांच्या मालाची विक्री करून देण्यासाठी सहकारी खरेदी–विक्री संस्था स्थापन होण्यास सुरुवात झाली. अखिल ग्रामीण पतपुरवठा समितीच्या गोरवाला समितीच्या शिफारसीनंतर या कार्यात अधिक वेग आला. पतपुरवठ्याप्रमाणेच येथेही त्रिस्तर रचना दिसते. तालुका पातळीवर तालुका खरेदी–विक्री संघ, जिल्हा संघाचे पातळीवर जिल्हा खरेदी–विक्री संघ आणि राज्य पातळीवर महाराष्ट्र राज्य पणन संघ स्थापन झाले आहेत. दांतवाला समितीने जिल्ह्याचे महत्त्व कमी करून राज्य व तालुका अशीच रचना ठेवावी अशी शिफारस केली होती. प्रत्यक्षात जिल्हा संघाचे महत्त्व कमी होऊन कागदावर तिन्ही प्रकारच्या संस्था कार्यरत राहिल्या. या संस्थांनी शेती साधनांचा पुरवठा शेतकऱ्यांना करण्याबरोबरच प्रत्यक्ष शेती मालाची खरेदी–विक्री करावी अशा अपेक्षा होत्या. खरे तर गोरवाला समितीचे शिफारशीनुसार कर्ज आणि माल विक्री यांची सांगड प्रस्थापित व्हावी अशी योजना होती. प्रत्यक्षात मात्र या संस्थांनी प्रत्यक्ष शेती मालाची खरेदीही केली नाही. विक्री केली नाही, जे काही केले ते एजंट म्हणून केले, काही काळ संस्थांची चलती जरूर राहिली, प्रत्यक्षात मात्र हळूहळू त्यांच्या कार्याचा संकोचच होत आहे. अपवादात्मक संघ आपले हे अंगीकृत कार्य पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहेत पण त्यांचे स्वरूप आणि संख्या वाळवंटातील ओयासीस सारखीच आहे. खरेतर हे कार्य व या संस्था वाढायला हव्या होत्या. तसे झाले नाही. काही काळ आपल्या कार्याची झलक दाखवून यातील बहुसंख्य संस्था कशाबशा चालू आहेत असेच दिसून येते. शेतकऱ्यांच्या हितासाठी असलेल्या संस्थांचे असे का व्हावे याचा शोध आणि बोध घेणे गरजेचे आहे.

शेतीपूरक व्यवसाय :

शेती व्यवसाय किफायतशीर होण्यासाठी शेतीत आधुनिक तंत्राचा वापर करण्याबरोबर तिला पूरक व्यवसायाची जोड आवश्यक आहे. शेतीपूरक व्यवसायामध्ये दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, कुक्कुटपालन, वराहपालन, मेंढीपालन व जनावरे आदींचा समावेश होतो. त्यांना पूरक व्यवसाय या अर्थाने म्हटले जाते की यासाठी आवश्यक असणारी जमीन शेतकऱ्यांकडे कमी जास्त प्रमाणात उपलब्ध असते. शेतीतून मिळणाऱ्या वैरण आदींचा या व्यवसायासाठी खास म्हणून उपयोग होतो. तसेच त्यापासून मिळणारे खत शेतीला उत्पादन वाढीसाठी एक आवश्यक घटक मानले जाते. स्वतंत्रपणे व्यवसाय करावयाचा म्हटल्यास ते करता येतातच पण तरीही शेती आणि या व्यवसायाची जोड मिळाली तर ते अधिक उपयुक्त ठरते. ज्यांच्याकडे पुरेशी शेती नाही त्यांनाही ते करता येतात आणि आपली उपजीविका करता येते. या पार्श्वभूमीवर दुग्ध व्यवसायाचा विचार झाला आणि त्यासाठी स्वतंत्र संस्था स्थापन करण्यास सुरुवात झाली. आता या व्यवसायाने चांगलीच गती घेतली असून १९९५ अखेर या संस्थांची संख्या १९ हजारापर्यंत पोहोचली आहे आणि पुढील वर्षात जवळजवळ दरवर्षी १ हजार याप्रमाणे संस्था स्थापन होत आहेत. संस्थेच्या दृष्टीने सेवा सोसायट्यांशी या संस्था स्पर्धा करीत आहे. आणि त्यांनाही मागे टाकले आहे. या व्यवसायामुळे शेतकऱ्यांना कायम रोख शिल्लक उपलब्ध होऊ शकते तेवढ्याच प्रमाणात आर्थिक हातभारही लागतो आणि ज्यांच्याकडे पुरेशी शेती नाही त्यांना इच्छा असल्यास, माहिती असल्यास हा व्यवसाय करता येतो. शेतीपेक्षाही हा व्यवसाय अधिक लोकप्रिय होत आहे. केवळ दुधाचे उत्पादन ही एकच बाब महत्त्वाची नसून त्या अनुषंगाने अनेक इतरही फायदे मिळत आहेत. दुधाचे उत्पादनात २००० सालात जगात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. या यशाचे मानकारी सहकारी क्षेत्र खात्रीने आहे आणि त्याबाबत आपणा सर्वांना अभिमान वाटावा.

इतर पूरक व्यवसायामध्ये कुक्कुटपालन, वराहपालन, मेंढीपालन, मत्स्यपालन वगैरेचा उल्लेख करता

येईल. यापैकी कुक्कुटपालनांनीही बराच वेग घेतला आहे. अनेक साखर कारखान्यांनी त्यांच्या सभासदांकरिता पूरक व्यवसाय म्हणून यात पुढाकार घेतला असून आदर्श कुक्कुटपालन संस्था चालविण्याच्या दृष्टीने त्या प्रयत्नशील आहेत. या व्यवसायातील भांडवलाचे स्वरूप विचारात घेता खासगी व्यक्ती मोठ्या प्रमाणात पुढे येत आहेत हे मान्य करूनही व्यवसायाला गती देण्याचे काम सहकारी क्षेत्रांनी केले आहे एवढे येथे लक्षात घ्यावे. कुक्कुटपालनाप्रमाणेच मत्स्य व्यवसाय हा काही प्रमाणात सहकारी क्षेत्रात आणि पुष्कळ मोठ्या प्रमाणात तो खासगी क्षेत्रातही चालविला जातो. या व्यवसायाच्या निमित्ताने समाजातील दुर्बल घटकांना विकासाची संधी दिली गेली आणि हे याचे महत्त्व वादातीत आहे. मेंढीपालन व अन्य शेती पूरक व्यवसाय हे विकासाच्या टप्प्यावर उभे आहेत. त्यामुळे सहकारी क्षेत्रात त्यांचे आताचे योगदान कमी असले तरी सहकारी क्षेत्रात त्यांना वाव आहे हे निश्चित.

शेतीमाल प्रक्रिया

स्वातंत्र्योत्तरकाळात पतपुरवठ्या बरोबरच शेतीवर आधारित मालाची प्रक्रिया करण्याचा उद्योग सहकारी क्षेत्रात स्थापन होण्यास सुरुवात झाली. याचे मुख्य श्रेय कै. वैकुंठभाई मेहता, कै. धनंजयराव गाडगीळ आणि कै. विठ्ठलराव विखे पाटील यांना द्यावे लागेल. या धुरिणांनी त्यांच्या क्षेत्रात दिलेल्या पाठिंब्यामुळेच १९५१ साली प्रवरानगर सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर हा अस्तित्वात आला आणि सहकारी कारखानदारीचे नवे दालन सुरू झाले. हा कारखाना यशस्वी झाल्यानंतर महाराष्ट्रात स्वातंत्र्य चळवळीत काम केलेले अनेक दिग्गज पुढे आले आणि त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात असे साखर कारखाने स्थापन करण्यात मोलाचा पुढाकार घेतला. कै. भाऊसाहेब हिरे, कै. पद्मभूषण वसंतदादा पाटील, कै. शंकरराव मोहिते पाटील, कै. तात्यासाहेब कोरे, कै. रत्नाप्पा कुंभार, मा. यशवंतराव मोहिते या आणि अशा लोकनेत्यांचा उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्रात सहकारी कारखानदारी उभी राहिली, वाढली. ती यशस्वी झाली. या श्रेयाचे मानकरी अनेक आहेत. सहकारी साखर कारखानदारी हे महाराष्ट्राचे वैभव आहे. ग्रामीण विकासाचे माध्यम आहे. लोकसेवेचे आणि सर्वांगीण उन्नतीचे साधन आहे. याची प्रचीती आली आणि राज्यभर साखर कारखाने काढण्याची सुरू झालेली मोहिम अद्यापही चालूच आहे. सहकारी साखर कारखानदारीने महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या क्षेत्रात आलेल्या यशामुळे इतरही शेतीमाल प्रक्रियेत महाराष्ट्राने पुढाकार घेतला. त्यात सूतगिरण्या, तेलगिरण्या, भात गिरण्या, फळप्रक्रिया, कापूस जिनीग अँड प्रेसिंग वगैरेचा उल्लेख करावा लागेल. यापैकी काहींनी काही काळ वैभव संपादन केले. लोकांना आकर्षित केले पण सर्व काळ आपल्याकडे खेचून ठेवण्यात या संस्था कमी पडल्या याची कारणे अनेक आहेत आणि तरीही या संस्थां शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला प्रक्रियेद्वारा चांगली किंमत मिळू शकते हे पटवून देऊ शकल्या. या निमित्ताने त्यांनी शेतकऱ्याला उत्पादन खर्च आणि भावदला यांचा मेळ घालण्यासाठी जाणीव निर्माण केली ही बाब सर्वात महत्त्वाची वाटते.

इतर प्रक्रियामध्ये कापूस, तेलबिया, भातगिरण्या आणि अन्य फळप्रक्रिया यांचा उल्लेख करावा लागेल. यापैकी कापूस हे ऊसाप्रमाणेच महाराष्ट्राचे दुसरे नगदी पीक आहे. ऊस आणि कापूस या दोन्हीचे क्षेत्र, दोन्हीचे उत्पादक/संख्येने मोठे आहेत तरीही प्रक्रियेची पुष्कळ अशी विश्वासार्ह रचना आणि यंत्रणा निर्माण झाल्यामुळे ऊस उत्पादक हा कारखानदार होऊ शकला. कापूस उत्पादकाच्या बाबतीत ती अवस्था किंवा तसा अभिमानाने उल्लेख करता येईल अशी परिस्थिती एक अपवाद वगळता दिसून येत नाही. कापसावर प्रक्रिया करू लागल्यावर सर्व प्रक्रिया सहकारी क्षेत्रात आणण्यात यश आले नसले तरी एकाधिकार खरेदीच्या माध्यमातून काही पिकाला आपल्या राज्यात संरक्षण देण्याचा प्रयत्न झाला आहे. गेली अनेक वर्षे कापूस एकाधिकार खरेदीच्या माध्यमातून काही पिकाला आपल्या राज्यात संरक्षण देण्याचा प्रयत्न झाला आहे. सदरहू योजनेत कायम स्वरूपी मान्यता मिळाली नसली तरी प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव ती वाढविण्यात येत आहेत. यावरून शेतकऱ्यांच्या दृष्टीने या योजनेचे महत्त्व स्पष्ट होते. खुल्या आर्थिक धोरणात हे किती बसते, हा पुन्हा स्वतंत्र

वाद आहे. योजना शेतकऱ्यांसाठी शेतकऱ्यांचे हितासाठी असल्याने ती कायम स्वरूपी व्हावी अशीच अपेक्षा आहे आणि ऊस प्रक्रियेप्रमाणे याही क्षेत्रात कापसावरील सर्व प्रक्रिया सहकारी क्षेत्रता आणता आल्या तर ही योजना उत्पादकांचे अंतिम कल्याण केल्याशिवाय राहणार नाही. मात्र त्यासाठी उत्पादकांनी सध्यापेक्षा अधिक पुढाकार घेण्याची गरज आहे.

तेलबिया आणि इतर प्रक्रिया यांनी अद्याप स्वतंत्र असे स्थान मिळविले नाही. उलट दिवसेंदिवस त्यांची संख्या कमी होत आहे. अनेक बाबीत हे परिणाम आहेत. त्या तपशीलात न जाता शेतीमाल प्रक्रिया उद्योग हा ज्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या मालकीचा होईल त्या प्रमाणात त्याची फळे शेतकऱ्यापर्यंत पोहोचतील यासाठी उत्पादकांना प्रवृत्त करणे, त्यांचे प्रबोधन करणे, त्यांना यासाठी काही सवलती देणे गरजेचे आहे. सध्याच्या खुल्या आर्थिक धोरणात हे बसेल का हा पुन्हा वादाचा प्रश्न आहे.

शहरी भाग :

ग्रामीण भागाप्रमाणेच शहरांनीही आता सहकारी चळवळीबाबतच्या आपल्या पूर्वापार कल्पना बदलल्या असून सहकारी चळवळीच्या माध्यमातून आपणास आपला विकास करता येईल याची जाणीव या विभागातील सर्वसामान्य आणि मध्यम वर्गीयांना होऊ लागली आणि नागरी पतपेढ्या किंवा नागरी सहकारी बँकाचा अपवाद वगळता इतर प्रकारच्या संस्था प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळातच निघाल्या, वाढल्या आणि यशाकडे वाटचाल करीत आहेत. असे चित्र निर्माण होत आहे.

निदान आपले प्रश्न सोडविण्यासाठी सहकार एक उपयुक्त पर्याय आहे याची जाणीव तेथे होत आहे. अशा संस्थांमध्ये ग्राहक संस्था, उत्पादक संस्था यात लहान औद्योगिक वसाहती यांचा समावेश होऊ शकतो. विविध घटकांसाठी स्थापन होत असलेल्या नागरी पतपेढ्या आणि कारखाना किंवा कार्यालयानुसार स्थापन होणाऱ्या सेवक पतपेढ्या यांचा मुख्यत्वे उल्लेख करावा लागेल. नागरी सहकारी बँकांची राज्यातील संख्या ६१७ एवढी आहे. त्याची सभासद संख्या ४७ लाखावर आहे. नागरी सहकारी बँका सभासदांना बचतीचे अप्रत्यक्ष धडे देत असून त्यांनी ४२,०५,१३१ लाख रू. ची कर्जे दिली आहेत. ही आकडेवारी पाहिल्यावर या संस्था किती लोकप्रिय आहेत, हे ध्यानात आल्याशिवाय राहात नाही.

शहरातून आणि खेड्यातूनही निवासाचा प्रश्न आता गंभीर होत आहे. त्यासाठी व्यक्तिगत प्रयत्न कमी पडतात. शक्ती कमी पडते. यावर तोडगा म्हणून गृहनिर्माण, गृहरचना या संस्थांचा मोठ्या प्रमाणात आश्रय केला जातो. स्वातंत्र्याच्यावेळी नगण्य असलेल्या या संस्थांची संख्या ३१/३/९८ अखेर ४६ हजारांवर गेली होती. आज त्यांची संख्या ५५ हजाराचे वर आहे आणि राज्यात संस्था प्रकारात हा गट सर्वात मोठा आहे. याचीही नोंद घ्यावी.

महिला सहकारी बँका : काळाची गरज ओळखून, महिला सहकारी बँका कार्यान्वित केल्या आहेत. महिलांची संख्या आणि कर्ज पुरवठ्यामध्ये वाढ झाल्यामुळे ह्या बँका मोलाचे काम करतात. हे एक नवे दालन उघडले आहे.

इतर प्रकारच्या संस्था :

यामध्ये दुर्बल घटकांच्या सहकारी संस्थांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी या संस्था अस्तित्वात नव्हत्या. स्वातंत्र्यानंतर त्यांच्यासाठी सहकारी माध्यमाचा उपयोग करून विविध प्रकारच्या संस्थांना जन्म देण्यात आला. त्यामध्ये जंगल कामगार संस्था, मजूर संस्था, बलुतेदार संस्था, विणकर संस्था, कारागिरांच्या संस्था वगैरेचा उल्लेख करावा लागेल. या संस्थांची संख्या किती आहे, सभासद किती आहेत, उलाढाल किती आहे हे पाहण्यापेक्षाही अशा प्रकारच्या संस्था अस्तित्वात येणे, समान घटकांना त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्या आवश्यक वाटणे यातच सहकारी माध्यमाचे महत्त्व साठवले आहे. सहकारी माध्यमाचा हाही वर्ग वापर करू शकतो आणि आपली उन्नती करू शकतो ही जाणीव त्यांच्यात निर्माण होणे आणि अशा संस्था स्थापन करण्यासाठी पुढे येणे हे सर्वाधिक महत्त्वाचे आहे.

१९४७ च्या सुमारास आपल्याकडे सर्व प्रकारच्या मिळून ८९९० संस्था होत्या. त्या मार्च २००४ अखेर १,७८,८५३ झाल्या आहेत. म्हणजे एकही शहर, गाव, खेडे वस्ती सापडणार नाही की जेथे सहकारी संस्था

नाही. या संस्थांची सभासद संख्या ४ कोटींच्यावर आहे. म्हणजेच प्रत्येक घरातील किमान एक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या संस्थेची सभासद आहेच. सहकारी चळवळ किती खोलवर रुजली आहे. याची ही प्रचीती आहे.

सहकरी साखर कारखाने :

१९५० साली विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुढाकाराने व अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या प्रेरणेने आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे महाराष्ट्रातील पहिला साखर कारखाना सुरू झाला. ब्रिटिशांच्या काळात दुष्काळी भागात लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून प्रवरा नदीपासून कालवे खोदण्यात आले. त्यामुळे ऊस शेती शक्य झाली. परंतु तयार झालेल्या ऊसाचे काय करायचे? त्यातूनच सहकारी तत्त्वावर शेतकऱ्यांच्या मालकीचा साखर कारखाना प्रस्थापित करण्याची कल्पना पुढे आली. त्या काळात या कल्पनेला मूर्त स्वरूप देणे सोपे नव्हते. मोठ्या प्रयत्नाने शेतकऱ्यांच्या अनेक सभांतून शेतकऱ्यांना भागभांडवल देण्यासाठी उद्युक्त करण्यात विखे पाटलांना यश मिळाले. वैकुंठ मेहता त्यावेळी राज्य सहकारी बँकेचे व्यवस्थापक होते. नंतर हे पहिल्या मुंबई प्रांताच्या लोकप्रतिनिधीच्या सरकारात अर्थमंत्री झाले. गाडगीळांच्या प्रस्तावावर विश्वास ठेवून कारखान्याला त्यांनी सरकारी भाग भांडवल दिले व इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनकडून कर्ज उपलब्ध करून दिले. कारखाना उभा राहिला. त्यावेळी खासगी क्षेत्राबाहेर, सहकारी क्षेत्रात शेतकरी अशा तऱ्हेचा कारखाना उभारू शकतील व चालवू शकतील यावर कोणाचा विश्वास बसत नव्हता. परंतु अशक्य ते शक्य झाले. प्रवरेच्या यशानंतर एकामागून एक असे अनेक सहकारी कारखाने पश्चिम महाराष्ट्रात विशेषतः कोल्हापूर, सांगली परिसरात उभे राहिले. आज महाराष्ट्रात अहमदनगर, सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे, सोलापूर, जळगाव, नाशिक, धुळे, औरंगाबाद, जालना या जिल्ह्यात सहकारी साखर कारखाने उभे राहिले आहेत. आज देशातील एकूण ५२७ साखर कारखान्यांपैकी, १५८ कारखाने एकट्या महाराष्ट्रात आहेत. ह्याचे १६,००० सदस्य आहेत. त्यातले ९३ टक्के लहान शेतकरी आहेत. त्यातले १४४ सहकारी क्षेत्रात आहेत. एकूण देशात २९५ सहकारी साखर कारखाने आहेत. भारतातील ३५ टक्के साखर उत्पादन महाराष्ट्रात होते. देशातील ५० लाख शेतकऱ्यांनी साखर कारखान्यात १,३५० कोटी भाग-भांडवल गुंतवले आहे. एकंदर २४,००० कोटीची गुंतवणूक आहे. १७,००० कोटीची उलाढाल आहे. एकूण लोकसंख्येपैकी दहा कोटी लोक या ना त्या स्वरूपात साखर कारखानदारीवर अवलंबून आहेत.

महाराष्ट्रातील अनेक साखर कारखान्यांनी स्वतःच्या पैशातून कोट्यांवधी रुपयांच्या उपसा जलसिंचन योजना राबविलेल्या आहेत. नद्यावरील बंधारे, पाझर तलाव, रस्ते यांवर खर्च केला आहे. त्यामुळे हजारो एकर शेती पाण्याखाली आली आहे. उत्कृष्ट बियाण्यासाठी प्लॉट तयार करणे, कंपोस्ट खत तयार करणे, गोबर गॅस प्लँट तयार करणे, माती प्रशिक्षण प्रयोगशाळा काढून मोफत माती परीक्षण करणे, खते, कीटकनाशके पुरविणे, शास्त्रीय शेतीसाठी व जमीन-सुधारणेसाठी साहाय्य करणे इत्यादी विविध योजना राबवून सहकारी साखर कारखान्यांनी ऊस-शेतीच्या प्रगतीला महत्त्वाचे योगदान दिले आहे. अनेक साखर कारखान्यांनी टाकाऊपासून टिकाऊ पदार्थांची निर्मिती केली आहे जसे प्रेसमडपासून पेक्स, मद्यार्क निर्मिती, स्पेट वॉशपासून पोटॅश, स्पिरिट, ग्लिसरीन, ॲसिड, कागद, पार्टिकल बोर्ड, मिथेनॉल प्रकल्प, जनावरांचे खाद्य, वीजनिर्मिती इत्यादी. शेतकऱ्यांनी शेतीबरोबर जोडव्यवसाय करावे म्हणून दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, वराहपालन, शेळीमेंढीपालन यासाठी जागा, कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले आहे. शिवाय, वहातूक व्यवसाय, शेतीसाठी यंत्रसामग्री, रसायनउद्योग, सहकारी बँका इत्यादी अनेक व्यवसायांना सहकारी साखर कारखान्यांनी आधार दिला आहे. त्यांनी उत्कृष्ट गृहवस्तू भांडार चालविलेले आहे. साखर कारखान्यांनी आपल्या क्षेत्रात प्राथमिक व उच्चशिक्षण संस्था, महाविद्यालये, पॉलीटेक्निक, मेडिसिन, इंजिनियरिंग, फार्मसी इत्यादी शैक्षणिक संकुले निर्माण केली आहेत. ग्रामीण क्षेत्रातील नेतृत्वाने आर्थिक व सामाजिक विकासासाठी केलेले हे कार्य स्पृहणीय आहे.

तरीपण सहकार शताब्दीच्या वर्षात सहकारी साखर कारखाने अडचणीत सापडल्याचे दिसत आहे. कित्येक

सहकारी कारखाने आजारी पडले आहेत. या उद्योगांवर ९,००० कोटी रुपयांचे कर्ज आहे. २००४–२००५ या वर्षी अवर्षणामुळे पाण्याची कमतरता होती. ऊसाअभावी गळिताचा हंगाम जानेवारीतच आवरता घ्यावा लागला. या वर्षी हंगाम सुरू करण्यासाठी ८९० कोटी रुपयाचे भांडवल आवश्यक होते. पण त्यासाठी राज्य सरकारने हमी देणे आवश्यक आहे. ती मिळत नसल्याने आजारी कारखान्यांना खेळते भांडवल उपलब्ध होऊ शकत नाही. अनेक साखर कारखान्यांना शेतकऱ्यांचे देणे आहे. सहकारी साखर कारखान्यांना या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी केंद्र सरकारने नाबार्डच्या माध्यमातून मदतीचे पॅकेज जाहीर केले आहे. २००३–०४ या वर्षी ज्या साखर कारखान्यांना अवर्षणाचा फटका बसला अशांना या पॅकेजचा लाभ मिळेल. या पॅकेज अंतर्गत कर्ज व त्यावरील व्याज यासाठी दोन वर्षांची सूट मिळेल परंतु याचा लाभ मिळण्यासाठी कारखाना नीट चालेल याची खात्री नाबार्डला पटवून द्यावी लागेल. अशा कारखान्यांना एन. सी. डी. सी. माध्यमातून खेळते भांडवल उपलब्ध करून दिले जाईल.

परंतु या पॅकेजमुळे सहकारी साखर कारखानदारी आजारपणातून उठेल याची खात्री नाही. गैरव्यवहारामुळे आजारी पडणाऱ्या कारखान्यांना पॅकेजच्या कुबड्या सक्षम करू शकणार नाहीत कारण आजाराने दुर्धर स्वरूप प्राप्त केले आहे. अलीकडे सोलापूर जिल्ह्यातील कळंब सहकारी साखर कारखाना दिवाळखोरीत गेल्यानंतर राज्यातील दिवाळखोरीत गेलेल्या सहकारी साखर कारखान्यांची संख्या आता २३ वर पोचली आहे. कारखाना चालविण्यासाठी निधी नसल्याने गेली ४ वर्षे कारखाना गाळप हंगाम घेऊ शकलेला नाही. शेतकऱ्यांची देणी (३५ कोटी), कामगारांची देणी, विविध कर्जांचा डोंगर यामुळे कारखान्याचा संचित तोटा ७२ कोटींपर्यंत पोहोचला आहे. भागभांडवल शिल्लक राहिलेले नाही. (लोकसत्ता – ८ फेब्रुवारी २००६) २५ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या एकेका कारखान्याच्या डोक्यावर आज २०० कोटी रुपये कर्ज आहे. एकेकाळी महाराष्ट्राचे मानदंड असलेल्या सहकारी साखर कारखान्यांची अशी दुरवस्था का झाली? केवळ २००३–०४ वर्षातील अवर्षणालाच सारा दोष देता येणार नाही. अधिक खोलात जाऊन विचार केला पाहिजे.

सहकारी साखर कारखाना हा एक आर्थिक व्यवसाय आहे. तो त्या निकषावरच चालला पाहिजे. परंतु सहकारी साखर कारखान्यांचे राजकीयीकरण झाले. सहकारी साखर कारखान्याकडे राजकीय प्रभुत्वाचे साधन म्हणून पाहिले जाऊ लागले. प्रवरा कारखाना सुरू झाला तो ऊस पिकविण्यासाठी पाणी उपलब्ध होते म्हणून. परंतु नंतर राजकीय नेते आपला प्रभाव पाडण्यासाठी पाणी उपलब्ध असो वा नसो आपल्या प्रदेशात आपल्या अध्यक्षतेखाली साखर कारखाना सुरू केलाच पाहिजे म्हणून प्रयत्नशील झाले. सरकारवर राजकीय दबाव आणून लायसेन्स व आर्थिक साहाय्य मिळविण्यात यशस्वी झाले. खरे तर पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भाग दुष्काळी म्हणून ओळखले जातात. तेथे पर्जन्याची व भूगर्भजल स्त्रोताची कमतरता आहे. ऊस हे फार पाणी खाणारे पीक आहे त्यामुळे इतक्या मोठ्या संख्येने साखर कारखाने सुरू करणे मुळातच चुकीचे होते. पण निसर्गापेक्षा व अर्थकारणापेक्षा राजकारण वरचढ ठरले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. पाणी अपुरे पडले; ऊस उत्पादन अपुरे पडले व ऊसासाठी पळवापळवी सुरू झाली. ती रोखण्यासाठी सरकारने प्रत्येक कारखान्यासाठी "झोन" घालून दिले. त्या झोनच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांनी तेथील कारखान्यालाच ऊस पुरविला पाहिजे अशी सक्ती झाली. तसेच राज्य सरकारच ऊसाचे भाव ठरवू लागले. खरे तर अशा तऱ्हेचा सरकारी हस्तक्षेप सहकारी स्वायत्ततेला मारक आहे. प्रत्येक सहकारी संस्थेने आपापले आर्थिक निर्णय घेतले पाहिजेत. संस्थेच्या सदस्य शेतकऱ्यांनाही निर्णय स्वातंत्र्य हवे. ते हिरावल्यामुळे सहकारी संस्थेचे सरकारीकरण झाले. सरकारही राजकीय कारणासाठी सहकारी साखर कारखान्याच्या कारभारात ढवळाढवळ करू लागले. याच्या जोडीला सहकारी साखर कारखान्यात घराणेशाही माजली. एक एक घराणे आपापल्या साखर कारखान्याचे स्वतःला मालक समजू लागले. साखर सुभेदार (शुगर बॅरन्स) म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. वारसाहक्काने त्या घराण्यात मालकी टिकून राहू लागली. यामुळे जे खरे मालक लहान–लहान शेतकरी,

त्यांना साखर कारखान्याबद्दल कोणतीच आपुलकी राहिली नाही. त्यामुळेच आपल्या कारखान्याविरुद्ध आमदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली योग्य भाव मिळण्यासाठी व वेळेवर पेमेंट मिळविणेसाठी शेतकरी सदस्य आंदोलन करू लागले. त्यांच्यावर लाठीमार झाला. सहकाराचे हे विडंबन होते.

राजकारण, सरकारी हस्तक्षेप आणि घराणेशाही याचा सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापनावर अनिष्ट परिणाम झाला. कशीही नोकरभरती करणे, आपल्या मर्जीतल्या व्यक्तींना व्यवस्थापनांसाठी निवडणे यामुळे व्यवस्थापनाचा दर्जा खालावला. खालील वृत्त बोलके आहे – "अकुशल व्यवस्थापनामुळे सहकारी साखर कारखाने तोट्यात गेल्याचा अहवाल वेगवेगळ्या समित्यांनी दिला आहे. तरीही साखर आयुक्तांनी "अणंद मार्फत" निवडलेल्या कार्यकारी संचालकांना नियुक्त्या देण्याचे पत्र देऊनही कारखान्यांनी डोळेझाक चालवली. राज्यशासनाकडूनही दुर्लक्ष केले गेले. ७० कारखान्यांमधील कार्यकारी संचालक पदे रिक्त आहेत. या रिक्त जागांवर सगेसोयऱ्यांना प्रभारी पदे देऊन संचालकांनी एकहाती कारभार चालवला आहे. अकुशलन व्यवस्थापनामुळे कारखाने डबघाईस आले आहेत." (लोकसत्ता, नोव्हेंबर १८, २००५). भ्रष्टाचार माजला आहे. अलीकडे दिलेल्या आपल्या मुलाखतीत खासदार बाळासाहेब विखे पाटील यांनी हे स्पष्टपणे मांडले आहे – "साखर कारखान्यांच्या निवडणुका धोरणाच्या प्रश्नावर होत नाहीत तर भ्रष्टाचाराच्या मुद्यांवर होतात. भ्रष्टाचाराच्या मुद्यावर सत्ता मिळवून कारखाने कसे सुधारतील? साखर कारखान्याचा परवाना म्हणजे जहांगीर मिळाली अशा थाटात वागणाऱ्यांचे बहुमत सध्या साखर कारखानदारीत दिसत आहे." (चंद्रहास मिरासदार – साखरसम्राटांना कानपिचक्या – लोकसत्ता, ३.१.२००६).

यापुढे परवानाधिष्ठित मक्तेदारी चालू राहणार नाही. भारत सरकारने ३१ ऑगस्ट १९९८ रोजी साखर-उद्योग परवानामुक्त केला आहे. जागतिक व्यापार संघटनेने २००५ पासून साखर-उद्योग पूर्णपणे मुक्त करण्याचा ठराव केला आहे. त्यामुळे यापुढे जागतिक स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. साखरेवरील निर्बंध उठल्यामुळे प्रथमच साखरविक्रीची जबाबदारी कारखान्यावर येऊन पडली आहे. यापुढे परंपरागत पद्धतीने उत्पादन न करता दर्जा उंचवावा लागणार आहे. शेतकऱ्यांनाही ऊसाचे एकरी उत्पादन व ऊसाचा साखर उतारा वाढवावा लागेल. कारखान्यांना उत्पादनखर्चात बचत करून उपवस्तुंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावे लागेल.

या परिस्थितीत कार्यक्षम व्यवस्थापन असेल तरच सहकारी साखर कारखाने टिकून राहतील. अन्यथा सहकारी साखर कारखान्यांचे खासगीकरण होईल. आजारी सहकारी साखर कारखाने खासगी साखर कारखानदार चालवायला घेत आहेत. तासगाव सहकारी साखर कारखाना यंदा उगार शुगर या खासगी कंपनीला चालविण्यास देण्यात आला आहे. कर्नाटकातील रेणुका शुगर या खासगी कंपनीनेही आजारी सहकारी साखर कारखाने चालविण्यास घेतले व त्रेपन्न कोटींपेक्षा जास्त निव्वळ नफा मिळविला. परंतु आजच्या उदारीकरणाच्या युगात केवळ खासगीकरणाचे गुणगान गावे असे नाही. सहकारी साखर कारखानेसुद्धा व्यवस्थापन सुधारल्यास स्पर्धात्मक युगात तगू शकतील. "राजारामबापू" कारखान्याची शेतकऱ्यांना सर्वाधिक दर देण्याची ख्याती आहे. पंढरपूरच्या पांडुरंग सहकारी कारखान्याने पूर्वी तोट्यात चाललेल्या खासगी कारखान्याची मशिनरी विकत घेऊन चांगला कारखाना चालवून दाखवला. हा कारखाना शेतकऱ्यांना रू. १,४००/– दर टनामागे देतो. इचलकरंजी जवळचा जवाहर साखर कारखाना वीज विकून दरमहा २ कोटी उत्पन्न कमावतो. वारणा सहकारी साखर कारखान्याने ऊस-उत्पादकांना १,३०० रुपयाचा पहिला हप्ता देण्याची घोषणा केली. या कारखान्याने कोरेगाव येथील जरंडेश्वर हा आजारी साखर कारखाना चालविण्यास घेतला आहे.

सहकारी साखर कारखाना तत्त्वानुसार चालला तर तो यशस्वी होईल. ऊस उत्पादक हा दुसरा कोणी नसून कारखान्याचा मालक आहे हे संचालकांनी क्षणभरही विसरू नये. सदस्य शेतकऱ्यांना सर्वसाधारण सभेत आपले विचार मांडता आले पाहिजेत. संचालकांची त्यांच्याशी बांधिलकी असली पाहिजे. सर्व व्यवहार उघड केले तर भ्रष्टाचाराला व गैरव्यवहाराला जागा मिळणार नाही. हाच तर सहकाराचा आशय आहे.

सहकारी सूत गिरण्या :

कापूस हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे पीक आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे सहकारी साखर कारखाने ऊस शेतकऱ्याचे हित साधू शकले त्याचप्रमाणे सहकारी सूत गिरण्या कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना लाभदायक ठरू शकतात अशा कल्पनेतून महाराष्ट्रात सहकारी सूतगिरण्या सुरू झाल्या. त्यातल्या बहुसंख्य कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या आहेत. काही थोड्या हातमाग विणकरांच्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात आयको, नवमहाराष्ट्र, डेक्कन अशा नामवंत सहकारी सूतगिरण्यांच्या पाठोपाठ गणेश, दत्त, गडहिंग्लज, इंदिरा महिला अशा अनेक सहकारी सूत गिरण्या अस्तित्वात आल्या. इचलकरंजीला महाराष्ट्रातले मँचेस्टर म्हणून ओळखले जाऊ लागले. सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या सूतगिरण्यांना मदत करावयाच्या सरकारी धोरणामुळे आणि एनसीडीसीच्या मदतीमुळे सहकारी सूत गिरण्यांच्या स्थापनेला उत्तेजन मिळाले.

सहकारी सूतगिरण्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. पहिली समस्या कापसाच्या उपलब्धीची. खरे तर सहकारी सूत गिरण्यांना लागणारा कापूस गरजेनुसार सभासद असलेल्या शेतकऱ्यांनी पिकवावा हे सहकारी व्यवस्थेनुसार योग्य व्यवस्थापन आहे. परंतु सरकारच्या "मोनोपोली प्रोक्युरमेंट" योजनेनुसार कापूस पणन महासंघाकडून कापूस खरेदी करावी असे बंधन घालण्यात आले. पणन संघाने बाजारभावापेक्षा अधिक दराने कापूस उपलब्ध केल्याने सूत गिरण्यांच्या अर्थशास्त्रावर प्रतिकूल परिणाम झाला. कारण सूत उत्पादनाच्या खर्चात कापसाचे मूल्य ५०-५५% असे. अन्य पुरवठाधारकापासून कापूस खरेदी करण्यास सरकारची परवानगी आवश्यक होती. सरकारचे विशिष्ट प्रकारचे लडीसूत सहकारी गिरण्यांनी तयार करावे हे बंधनही अडचणीचे ठरले. बाजारात होणारे सूतभावातील चढउतारही अस्थितरता निर्माण करत होते. सहकारी सूतगिरण्यांना खेळते भांडवल उभारण्यातही सरकारने मर्यादा घातल्या. वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानानुसार कारखान्यांचे आधुनिकीकरण आवश्यक होते. तेही सहकारी सूत गिरण्यांना कठीण जात होते. विद्युत सेवेचा खर्च, विक्रीकर यांचाही बोजा पडत होता. या सर्व कारणामुळे नफ्यात चाललेल्या कारखान्यात घट झाली.

तरीसुद्धा सहकारी साखर कारखान्यांप्रमाणे सहकारी सूत गिरण्यांनीही ग्रामीण अर्थ व सामाजिक व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यात हातभार लावला.

पण सहकाराच्या शताब्दी वर्षात आज सहकारी सूतगिरण्या रखडत चालल्यासारख्या दिसतात. याचे मुख्य कारण म्हणजे प्रभावी व्यवस्थापनाचा अभाव.

इचलकरंजीला "मँचेस्टर"चा दर्जा मिळवून देणारी, दोन हजार कामगारांना रोजीरोटी देणारी, ८५ हजार चाहत्यांची महाकाय डेक्कन सहकारी सूतगिरणी ही भारतातील सहकारी तत्त्वानुसार चालणारी पहिली सूतगिरणी. या गिरणीच्या गौरवशाली इतिहासाला आता पूर्णविराम मिळाला आहे. १७.१.२००६ ही या गिरणीच्या आयुष्यातील शेवटची तारीख ठरली कारण त्या दिवशी पुणे येथे ही सहकारी गिरणी लिलावात मुंबईच्या के. एस. एल. इंडस्ट्रीज या खासगी कंपनीला ३६ कोटी रुपयाला विकली गेली. काँग्रेसचे खासदार आबासाहेब खेबूडकर यांनी १९६४ मध्ये या गिरणीचा पाया घातला. देश, विदेशात दर्जेदार सूत निर्यात करणारी ती प्रमुख गिरणी होती. मग तिचा ऱ्हास का झाला? ऋणवसूली प्राधिकरणापुढे या लिलावर शिक्कामोर्तब झाले. स्वातंत्र्यानंतर पहिली २५ वर्षे ग्रामीण भागात सहकारी चळवळीने नवचैतन्य निर्माण केले परंतु ८० च्या दशकात राजकारणाची दुसरी पिढी अवतरली आणि सहकाराचे स्वाहाकारात रूपांतर होण्याची प्रक्रिया सुरू झाली. राज्यकर्त्यांमध्ये दूरदृष्टीचा अभाव, नेतयांची खाबूगिरी आणि लेखापरीक्षकांची उदासीनता, यामुळे ग्रामीण प्रदेशाचा कायापालट करण्याचे सामर्थ्य असलेल्या सहकारी चळवळीच्या शताब्दी वर्षात तिचे श्राद्ध करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. इचलकरंजीच्या डेक्कमचा लिलाव हे त्याचे नमुनेदार उदाहरण म्हणावे लागेल. (राजेंद्र जोशी - सहकाराचे श्राद्ध - लोकसत्ता २०.१.२००६)

विदर्भ हा महाराष्ट्रातील कापूस पैदाशीसाठी प्रमुख प्रदेश मानला जातो. आज येथील कापूस पिकविणारा शेतकरी आत्महत्या करत आहे. एका बाजूने उत्पादनावरचा वाढता खर्च आणि दुसऱ्या बाजूने कापसाला

मिळणारे अपुरे भाव यामुळे कर्जाची परतफेड करणे अशक्य झाल्यामुळे निराशेच्या पोटी शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सहकारी तत्त्वावर समर्थपणे चालणाऱ्या सूतगिरण्या चांगला भाव देऊन शेतकऱ्यांचे प्राण वाचवू शकल्या असत्या. परंतु एका वृत्तांत सांगितल्याप्रमाणे गेली १५ वर्षे ज्या गिरणीवर अमरावती येथे काम चालू आहे ती पुरी होऊ शकली नाही. सहकारी चळवळीची ही शोकांतिका आहे.

सहकारी दुग्धव्यवसाय :

दुग्धव्यवसाय हा शेतकरी कुटुंबाचा एक महत्त्वाचा जोडव्यवसाय आहे. विशेषतः त्यात स्त्रियांचा सहभाग विशेष आहे. भूमिहीनही हा व्यवसाय उपजिविकेचे साधन म्हणून करू शकतात.

सहकारी तत्त्वावर दुग्धव्यवसाय यशस्वीपणे करण्यात आणंदच्या अमुल या सहकारी संस्थेने उत्कृष्ट कामगिरी करून दाखविली. खेडोपाड्यात दुग्धपुरवठा सहकारी संस्थांचे जाळे निर्माण करणे, त्या यंत्रणेतून दूध गोळा करणे, त्याचे पाश्चरायझेशन करून टेट्रापॅक पिशव्यातून दूध शहरात विकणे, दुधाचे लोणी, तूप चीज, पावडर इत्यादीत रूपांतर करणे आणि या सर्वांचा लाभ दूध पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना देणे असा अमूलचा व्यापक कार्यक्रम होता. अमुलचे हे उदाहरण पुढे ठेवून गुजरातेत अन्यत्र सुरत, मेहेसाणा इत्यादी ठिकाणी सहकारी दुग्धव्यवसाय यशस्वी रीतीने सुरू झाला. आणंदचे शिल्प-कार वर्गीस कुरियन यांच्या निमंत्रणावरून तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री आणंद येथे मुक्काम केला. ते इतके प्रभावित झाले की त्यांनी श्री. कुरियन यांना आणंदच्या धर्तीवर सर्व भारतात असा कार्यक्रम राबविण्याची विनंती केली. यातूनच "ऑपरेशन फ्लड" दुधाचा पूर हा कार्यक्रम उदयास आला. १९७० साली सुरू झालेल्या पहिल्या टप्प्यात मुंबई, दिल्ली आणि चेन्नई या महानगरांच्या आसमंतातील दुग्धक्षेत्राचा समावेश होता. २७ जिल्ह्यातील १४ लाख दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला. १९८७ साली सुरू झालेल्या दुसऱ्या टप्प्यात १४७ महत्त्वाच्या शहराच्या असमंतातील १६० जिल्ह्यातील १ कोटी दुग्धव्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश झाला. १९८९ साली दुग्धव्यवसायाच्या तांत्रिक विकासासाठी टेक्नॉलॉजी मिशनचा प्रारंभ झाला. आय. आर. डी. पी., एस. एफ. डी. ए., ट्रॉयसम इत्यादी कार्यक्रमांतर्गत दुग्ध व्यवसायाला ग्रामीण विकासात महत्त्वाचे स्थान मिळाले.

महाराष्ट्राने या सर्व कार्यक्रमाचा लाभ घेतला परंतु हे कार्यक्रम सर्व जिल्ह्यात सारखेच यशस्वी झाले असे म्हणता येणार नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी दुग्धव्यवसाय यशस्वी झाला. परंतु जळगाव जिल्ह्यात अडचणी निर्माण झाल्या. त्या अशा (१) दूध पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना वेळीच पेमेंट होत नाही. (२) सदस्य आपले दूध सहकारी संस्थेस न देता खासगी व्यापाऱ्यांना विकतात. (३) सोसायटीचे सेवक गैरव्यवहार करतात. (४) सहकारी संस्था जनावरांसाठी वैद्यकीय सेवा पुरवीत नाहीत. (५) शेतकरी कर्जाची परतफेड करीत नाहीत. (६) भ्रष्ट राजकारणामुळे सहकारी संस्थाच्या कारभारावर अनिष्ट परिणाम झाला आहे.

सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्या यांच्याप्रमाणे सहकारी दुग्ध संस्था सुद्धा शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान सुधारून ग्रामीण प्रदेशाचा सर्वांगीण विकास घडवू शकतात. परंतु त्यासाठी गैरकारभार, अकुशल व्यवस्थापन व भ्रष्ट राजकारण यास वाव देता कामा नये.

सहकाराच्या शताब्दीवर्षात सहकारी उद्योग धोक्यात आले आहेत. नव्या खासगीकरणाच्या लाटेत सहकारी उद्योग वाहून जाण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा वेळी दोष व त्रुटी काढून टाकून सहकाराचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे.

गेल्या १०० वर्षांतील सहकारी चळवळीतील वाटचाल वरील परिच्छेदातून केवळ स्पर्शात्मक घेण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही एका विभागाचा आढावा घेण्यासाठी स्वतंत्र लेखाची आवश्यकता आहे. एकूण चळवळीचा विचार करता असा उल्लेखच शक्य आहे. सहकारी चळवळ गेल्या १०० वर्षात राज्यात विविध क्षेत्रात सुरू झाली, वाढली काही ठिकाणी स्थिरावली तर काही ठिकाणी ती अस्थिर होत आहे आणि याची कारणे जशी चळवळीत आहेत तशीच चळवळीवर होणाऱ्या

आक्रमणातही आहेत. स्वातंत्र्याच्या वेळी सहकारी चळवळ म्हणजे शेतकऱ्यांची चळवळ असे जे तिचे स्वरूप होते ते आता पालटले असून साखर कारखाने वा दुग्ध संस्था यांचा अपवाद वगळता ग्रामीण भागातून पीछेहाट घेते की काय आणि तिने तिचा मोर्चा शहरी भागाकडे वळविला किंवा काय हेही जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल. सहकारी चळवळीचा केंद्र बिंदू पूर्वी ग्रामीण भाग होता तो आता ढळला असून तिचा कल शहरी भागाकडेच अधिक वळत आहे. असेही चित्रसमोर येत आहे. शहरी भागात तिचे स्वागत व्हावेच. मात्र ग्रामीण भागात तिची पीछेहाट होऊ नये एवढीच या निमित्ताने अपेक्षा.

❖❖❖

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास ग्रंथरूपात

संयुक्त महाराष्ट्राची १ मे १९६० रोजी झालेली स्थापना ही प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी मराठी माणसाने आपले रक्त सांडले आहे. अशा या संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा दैदिप्यमान व प्रेरणादायी इतिहास सांगणारा ग्रंथ चळवळीतील एक महत्वाचे नेते लालजी पेंडसे यांनी १९६५ साली लिहिला होता : 'महाराष्ट्राचे महामंथन'. हा ग्रंथ गेली अनेक वर्षे अनुपलब्ध असल्याने दुर्मिळ ठरला होता. २०१० या महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात लालजी पेंडसे लिखित 'महाराष्ट्राचे महामंथन' या इतिहासग्रंथाची नवी देखणी आवृत्ती लोकवाङ्मय गृहातर्फे येत्या ८ मे २०१०रोजी प्रकाशित होणार असून, या ग्रंथाची प्रकाशनपूर्व सवलत योजना जाहीर करण्यात आली आहे.

मूळ पुस्तकाला ज्येष्ठ नेते एन्. डी. पाटील यांच्या प्रस्तावनेची जोड देण्यात आली आहे. त्याचबरोबर संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सुमारे ५० महत्त्वाच्या नेत्यांची चित्रकार विजय मोहिते यांनी काढलेली रेखाचित्रेही पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहेत. मोठया आकाराची (डबल क्राऊन ७" x ९ १/२") ६३० पाने असलेले पुठ्ठा बांधणीतील ते पुस्तक ६०० रूपये किंमतीचे असले, तरी प्रकाशनपूर्व सवलत योजनेत नावनोंदणी करणाऱ्या वाचकांना ते अवघ्या ४५० रुपयांत मिळणार आहे. नोंदणी करू इच्छिणाऱ्या वाचकांनी ४५० रुपयांचा धनादेश (मुंबईबाहेरील वाचकांनी तेवढया रकमेचा डिमांड ड्राफ्ट) 'लोकवाङ्मय गृह' या नावाने भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ या पत्त्यावर २५ एप्रिल २०१० पर्यंत पोहचेल अशा बेताने पाठवावा, असे आवाहन प्रकाशकांनी केले आहे.

मराठी भावसंगीताची गेल्या अर्धशतकाची वाटचाल

– श्री. सुधीर मोघे

आपण मला दिलेला मूळचा विषय, मराठी भावसंगीत आणि चित्रपटसंगीत ह्यांच्या गेल्या अर्धशतकाच्या वाटचालीचा मागोवा असा आहे. मी ह्या लेखाच्या अग्रभागी दिलेल्या शीर्षकात केलेल्या किंचित बदलाचा खुलासा आधी करतो, त्यामुळं लेखनामागची बैठक स्पष्ट व्हावी असा प्रामणिक हेतू आहे. चित्रपटसंगीत हे मराठी भावसंगीताच्या पोटातच येतं, कारण मराठी भावसंगीत ही मुळांतच एक व्यापक संकल्पना आहे असं मला वाटतं. ज़े भाव व्यक्त करतं किंबहुना तोच ज्याचा प्रधान आणि अंतिम हेतू असतो, ते भावसंगीत. भारतीय शुद्ध शास्त्रीय रागसंगीत हेदेखील एकप्रकारे भावप्रकटीकरण करीतच असतं, पण तो मूलतः स्वरभाव असतो. त्यामुळं तिथंही जरी चिजा आणि बंदिशींच्या रूपानं शब्द प्रवेशले तरी त्यांचा हेतू त्या स्वरमेळात सुप्त रूपांत असलेली भावस्थिती अधोरेखित करणं इतकाच मर्यादित असतो. त्यामुळं त्या स्वर–मेळांत गुंफून मांडले जातात तेव्हा ते शब्द, स्वरांबरोबरीनं आपल्या भाववृत्तींना जागवत असले आणि ऐकतांनाही ते अर्थसघन आणि नादमय असले, तरी त्या स्वरमेळाशिवाय या शब्दांना स्वतंत्र अस्तित्व नसतं. आणि म्हणूनच अभिजात रागसंगीतामध्ये शब्दांचा आधार घेतला जात असला, तरी ते मुळातच स्वरवेधी संगीत आहे.

ह्या उलट भावसंगीत हा निखालस शब्दवेधी कलाविष्कार आहे. शब्दांच्या अनुरोधानं इथं स्वर येतात आणि ते शब्द पोचवणं, त्यांच्यातील प्रकट आणि सुप्त भावार्थाच्या सगळ्या छटा अधिक उत्कटपणे प्रवाहित करणं हाच इथं संगीताचा आद्य व अंतिम हेतू असतो, निदान असायला हवा. त्यामुळं ज्या गीतांतून शब्दभाव प्रामुख्यानं प्रवाहित होत असतो ती सगळी गीतं निःसंशयपणे भावसंगीत ह्या संज्ञेखाली येतात. मग ती खासगीध्वनिमुद्रिकांतून किंवा सी. डीतून येवोत, मंचावरून गायली जावोत, आकाशवाणी–दूरदर्शन–नाटक–चित्रपटांतून येवोत किंवा भविष्यातील एखाद्या अनाकलनीय ताज्या माध्यमांतून प्रकट होवोत. त्यामुळं मराठी भावसंगीताचा गेल्या अर्ध शतकाचा प्रवास असं म्हणतांना भावसंगीत ह्या संकल्पनेचं हे व्यापक स्वरूप गृहीत धरून मी हे लेखन करतो आहे.

साठच्या दशकापासून ते आजतागायतचा मराठी भावसंगीताचा प्रवास आपण इथं पहातो आहोत तर, तेव्हां, म्हणजे १९६० च्या आसपास त्याचं चित्र काय होतं हे पहाणं अगत्याचं ठरेल. अस ध्यानात येतं की तेव्हा एच. एम. व्हीचं ध्वनिमुद्रिका विश्व, आकाशवाणी, संगीत रंगभूमी आणि चित्रपट ही प्रामुख्यानं चार माध्यमं मराठी भावसंगीताची निर्मिती, प्रसार आणि प्रचार करीत होती. ही सर्व माध्यम परस्परपूरक आणि त्यामुळे परस्परांशी संलग्न होती. एच. एम. व्हीसारख्या ख़ासगी ध्वनिमुद्रिका कंपन्या स्वतंत्रपणे मराठी भावसंगीताची निर्मिती आणि प्रसार करीत होत्या. मराठी चित्रपट आणि नाटक ह्यातूनही नवे नवे गायक, कवी, संगीतकार आपली निर्मिती करवून ध्वनिमुद्रिका कंपन्यांना पुरवीत होते. आणि ही नवनिर्मितीची गंगोत्री आकाशवाणी ह्या माध्यमांतून सर्वसामान्य रसिकांपर्यंत घरबसल्या पोचत होती. त्यातून केवळ रसिकच घडत होते असं नाही, तर नवीन कवी, गायक, संगीतकार ह्यांनाही प्रेरणेची फार सशक्त ऊर्जा त्यांतूनच मिळत होती. ह्याखेरीज आकाशवाणीची पुणे–मुंबई–नागपूर ही महत्त्वाची केंद्रं नवी नवी भावगीत स्वतःही साकार करून रसिकांना आपली खास भेट म्हणून ऐकवीत होती. ५० च्या दशकमध्यावर मराठी भावसंगीताचा एक सतेज गीतसमूह गीतरामायणाच्या निमित्तानं आकाशवाणी पुणे केंद्रानं साकार केला होता, हे एक उदाहरणही ह्यासाठी पुरेसं ठरावं. विशेष म्हणजे ही नवी ताजी भावगीतं रसिकमान्य होताहेत हे दिसतांच ध्वनिमुद्रिका कंपन्या त्या गीतांची पुनर्निमिती करून पुन्हा त्यांना नवं खुल आकाश मिळवून देण्याच मोलाच कार्य

अनुक्रमणिका

करीत होत्या. चित्रपट हे दृश्य माध्यम असल्यानं तिथं होणारी निर्मिती रूप-परिमाणातून भावगीतांच्या लोकप्रियतेला अधिक झळाळी मिळवून देत होती. त्यांच्याही अर्थातच ध्वनिमुद्रिका निघतच होत्या. आकाशवाणीद्वारे तीही गीतं दूरवर रसिकांपर्यंत पोचत होती. आणि एकंदरीतच, माध्यमांची आजच्यासारखी भाऊगर्दी नसल्यामुळं आबालवृद्ध मराठी रसिकही बहुसंख्येनं निवांतपणे आणि अवधानपूर्वक (हे सर्वांत महत्त्वाच) श्रवण करून ह्या सर्व गीतांचं एकप्रकारे चीज करीत होते. ह्या दृष्टीने तो काळ आजच्या तुलनेत अधिक भाग्यवान म्हणावा लागेल. त्यामुळंच, अगदी आजमितीलाही रंगमंच आणि दूरदर्शन-वाहिन्यासारख्या नवीन माध्यमांवरसुद्धा त्या काळातील ही गीतं आपला पगडा ठेवून आहेत, हे दररोज आपण पहातो – अनुभवतो आहोत.

भावसंगीताच्या सर्व पातळ्यांवरचा एकमेकांशी असलेला हा सुसंवाद मागच्या अर्धशतकांतही सत्तर ते ऐंशी दशकांपर्यंत खूप अंशी तसाच चालू राहिला असं म्हणता येईल. नव्वदच्या दशकांनंतर मात्र सर्वच क्षेत्रांप्रमाणे मराठी भावसंगीताच्या क्षेत्रांतही खूप वेगवान बदल घडत चालले आहेत. अर्थात ते एकाअर्थी अपरिहार्य आणि म्हणून स्वागतार्हही मानायला हवेत. तर अशा ह्या १९६० पासूनच्या पन्नास वर्षांच्या ह्या वाटचालीचा एक प्रवाही संक्षिप्त मागोवा काही मोजक्या प्रातिनिधिक उदाहरणांसहित इथं साकार करण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

मराठी भावसंगीताचा मुख्य प्रवाह मानला जातो तो म्हणजे खासगी, माध्यमनिरपेक्ष आणि केवळ श्राव्य माध्यमांतून भेटणारी भावगीतं. १९३०–३५ च्या सुमारास हा प्रवाह सुरू झाला आणि त्याचे अधिकृत मानकरी प्रामुख्यानं मानले जातात ते जे. एल. रानडे, जी. एन. जोशी आणि श्री. गजानन वाटवे. हे तिघेही प्रामुख्यानं ध्वनिमुद्रिका आणि सजीव स्वरमंच ह्या दोनच माध्यमांतून रसिकांना भेटत राहिले आणि मराठी भावगीत ह्या नव्या कलाविष्काराची वाटचाल सुरू झाली. आरंभीच्या एका छोट्या वाटेचा श्री. गजानन वाटव्यांनी लांबरूंद हमरस्ता केला, तर त्यांच्या पाठोपाठ आलेल्या श्री. सुधीर फडक्यांनी त्या अंगणाचं जणू आकाशच केलं. ह्या प्रवासांत गीतकार ह्या अधिकृत भूमिका स्वीकारून जे कवी ह्या भावगीतयुगाचे कर्ते होते, त्यातली महत्त्वाची नावं म्हणजे मनमोहन, राजा बढे, पी. सावळाराम आणि ग. दि. माडगूळकर. ह्यापैकी कविवर्य माडगूळकरांनी तर आपलं एक स्वतंत्र समृद्ध गीतदालनच उभ केल ही आता सर्वमान्य वस्तुस्थिती आहे. १९६० च्या दशकांत वाटवे–युग ओसरल्याप्रमाणं झालं होतं. परंतु श्री. वाटव्यांची भावगीतावरची अविचल निष्ठा प्रकाशाचा झोत दूर असूनही व्रतस्थपणे कार्यरत होती. सुधीर फडके मात्र कविवर्य गदिमांसह अजून निर्मितीच्या ऐन जोषात होते. माणिक वर्मा, मालती पांडे ह्या ५० च्या दशकांत उदयाला आलेल्या रसिकप्रिय भावगीत–गायिकांचा कलाबहार अजून ओसरला नव्हता. आणि लता मंगेशकर आणि आशा भोसले ह्या दिग्विजयी गायिका त्यांच्या विक्रमी व्यस्ततेतूनही मराठी भावगीताशी नात राखून होत्या. त्यांच हे संजीवक आश्वासन आजमितीलाही सुदैवानं तितकंच अतूटपणे मराठी भावगीताची पाठराखण करीत आहे. अशा ह्या १९६० ह्या दशकाच्या आरंभीच ह्या भावगीत–परंपरेला एक नव वळण लाभून एका नव्या युगाचा उदय झाला. त्याचे प्रमुख मानकरी होते तीन संगीतकार, श्री. यशवंत देव, श्री. श्रीनिवास खळे आणि अर्थात, श्री. हृदयनाथ मंगेशकर.

ह्या तीन संगीतकारांचं पहिलं महत्त्वाचं श्रेय म्हणजे मराठी साहित्यविश्वातून आलेल्या कवितांशी असलेलं, पण मध्यंतरीच्या काळात काहीसं अंधुक झालेलं मराठी भावगीताचं नात ह्या तिघांनी पुन्हा जोडून घेतलं. 'विसरशील खास मला'सारख्या गीतामुळं कवि ज. के. उपाध्ये, 'गेले ते दिन गेले', ह्या गीतातून भवानीशंकर पंडित, 'केळीचे सुकले बाग' – मधून कवि अनिल, 'त्या तरुतळी विसरले गीत'–मधून कवि वा. रा. कान्त ही केवळ वानगीदाखल काही उदाहरणं. हृदयनाथ मंगेशकरांनी तर ज्ञानेश्वरांपासून ते थेट कविवर्य आरती प्रभू, सुरेश भट, ग्रेस पर्यंतची सशक्त कवि – परंपरा मराठी भावगीत-विश्वांत पुन्हा प्रस्थापित केली. एक सुखद योगायोग असा की ५० च्या दशकांत लता मंगेशकर ह्यांनी वसंत प्रभू ह्या विलक्षण श्रवणमधुर स्वररचना करणाऱ्या संगीतकाराच्या सहाय्यानं आधुनिक मराठी काव्यप्रवाहातले आद्य कवि–गीतकार श्री. भा. रा. तांबे ह्यांची कविता

आपल्या स्वरांतून वाहती केली होती. तर ६० नंतरच्या ह्या नव्या भावगीतपर्वात ह्या नव्या भावगीत–युगाचे अध्वर्यु असलेल्या हृदयनाथ मंगेशकरांनीही प्रथम कविवर्य तांब्यांच्याच काव्यविश्वाचा धांडोळा घेतला. 'मावळत्या दिनकरा', 'तिन्हीसांजा सखे मिळाल्या', 'कशि काळनागिणी'. ह्यासारख्या तांब्यांच्या कवितांना हृदयनाथ मंगेशकरांनी, एक वेगळंच परिमाण देणाऱ्या ताज्या टवटवीत स्वररचनांनी नटवून मांडलं आणि ते काव्यविश्व जणूं पुन्हा नव्या तेजानं झळाळून उठलं.

यशवंत देव–श्रीनिवास खळे–हृदयनाथ मंगेशकर ह्या त्रयीचा दुसरा फार महत्त्वाचा वाटा म्हणजे मराठी भावगीताच्या स्वर–रचनेत त्यांनी केलेला वेगळा विचार आणि आविष्कार. ह्या आधीच्या युगांत गजानन वाटवे, सुधीर फडके, दत्ता डावजेकर–वसंत प्रभू–वसंत पवार ह्या सर्वांची सांगीतिक व्यक्तिमत्व वेगळी आणि स्वयंभू असली तरी त्यांच्या स्वर–विचाराचा मूलधर्म एक होता असं जाणवतं. प्रत्येकाचा अंदाज भिन्न असला तरी त्यांची मूळ भूमिका कवितेचे शब्द आणि स्वरमाधुर्य ह्याचा सहज वेध घेत राहणे हीच होती. वास्तविक विचार केला तर देव किंवा खळे हे दोघेही ह्या ५० च्या दशकांतच कार्यरत झाले होते. आणि ह्या सर्व प्रतिभावान संगीतकारांचे संस्कार घेतच त्यांनी आपली वाटचाल सुरू केली होती. त्या काळांतील ह्या दोघांच्या चाली पाहिल्या तर त्यांची पठडी ही त्या काळाशी जुळत घेणारी अशीच होती असं दिसत. 'दूर आर्त सांग कुणि छेडिली आसावरी' ही देवांची चाल किंवा 'कळिदार कपूरी पान' किंवा 'गोरी गोरी पान फुलासारखी छान' ह्या खळ्यांच्या चाली, मी काय म्हणतोय त्याची साक्ष देतील. परंतु १९६० नंतरच्या दशकांत मात्र त्यांना आपला सूर वेगान सापडत गेला, अस दिसतं. आकाशवाणी आणि एच. एम. व्ही ह्या दोन महत्त्वाच्या माध्यमांची त्यांना चांगली साथ लाभल्यामुळं त्यांच्या स्वररचनांना मुक्तआभाळही मिळत गेलं. ह्याच काळात शांता शेळके आणि मंगेश पाडगावकर हे कविद्वय गीतलेखनांत पूर्ण अवधानानिशी उतरले आणि त्यामुळं नव्या ताज्या भावगीतांचा एक ओघच जणू वाहता झाला. 'डोळ्यामधले आंसू पुसती ओठावरले गाणे', 'अशी पाखरे येती' ही त्यांची दोन सलामीची गाणी म्हणता येतील. गंमत म्हणजे मागील पर्वातील नायक असलेला स्वरच ह्या नव्या पर्वामध्ये सहभागी झाला होता. सुधीर फडके. आणि नंतर पाठोपाठ ह्या जोडीला आला तो एक वेगळाच बाज असलेला, थोडा अमराठी वळणाचा तरल, मधुर स्वर. अरुण दाते. हा स्वर मराठी भावगीतविश्वात आणण्याचं श्रेय जातं ते श्रीनिवास खळे ह्यांच्याकडे. 'शुक्रतारा मंद वारा' ह्या द्वंदगीतानं मराठी भावगीतामध्ये जणूं एक नवं दालनचं खुलं केलं. 'दिवस तुझे हे फुलायचे', 'अखेरचे येतिल माझ्या हेच शब्द ओठी', 'भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी', 'भेट तुझी–माझी स्मरते'. अशी कितीतरी भावगीत यशवंत देवांच्या चाली ह्या प्रामुख्यानं शब्दवेधी आणि प्रयोगशील, पण तरीही मराठी भावगीतशैलीच्या परंपरेची मूळ नाळ न तोडलेल्या. तर श्रीनिवास खळ्यांची मूळची सांगीतिक प्रकृतीच अनवट. त्यांचा वेगळा स्वरविचार; पण त्याहीपेक्षा वेगळा लयविचार ही त्यांची खासियत. त्यामुळं त्यांच्या स्वररचना ह्या केवळ आस्वादापुरत्या नाहीत तर अभ्यासालाही खाद्य पुरवणाऱ्या ठरतात. तरीही एक नक्की की मराठी भावगीतपरंपरेची मूळ संस्कार घेतच खळेसाहेब वाढले आणि मग हळूहळू आपला स्वर सापडावा तसे वेगळे होत गेले. त्यांचा तो प्रवास ह्या क्षणापर्यंत चालूच आहे.

हृदयनाथ मंगेशकरांच्या स्वररचनांची जातकुळी मात्र मुळांतच वेगळी दिसते. एक तर त्यांच्या स्वरप्रतिभेचं भरणपोषण हे प्रामुख्यानं अभिजात रागसंगीत आणि तेव्हाचं विविध उन्मेषांनी नटलेल हिंदी चित्रपटसंगीत ह्यातून होत गेलं होतं. मा. दीनानाथांचा जन्मसिद्ध दिव्य वारसा, अमीरखाँसाहेबांसारख्या बुजुर्गांचा निकटचा सहवास आणि चौफेर श्रवणातून नेमकं टिपण्याची क्षमता ही त्यांची शक्तिस्थानं होती. शिवाय आधुनिक साहित्याचं, विशेषत: काव्याचं त्यांचं वाचन हे स्वयंसिद्ध होत. ह्या सर्वातून त्यांचा घडत गेलेला सांगीतिक पिंड इतका वेगळा होता की त्यामुळे त्यांनी मराठी भावगीतांच्या तोंवरच्या स्वरविचाराची परिभाषाच पार बदलून टाकली आणि मराठी भावगीताची संकल्पनाही कात गळून जावी, तशी नवी झाली. 'चांदणे शिंपीत जाशी चालता तूं चंचले', 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे', 'ही वाट दूर जाते',

'ये रे घना ये रे घना', 'समईच्या शुभ्र कळ्या', 'मेंदीच्या पानावर मन अजून झुलतंय ग', 'मालवून टाक दीप'. शिवाय मंगेशकरांच्या हाताशी एक हुकमी पान होतं, कवयित्री शांता शेळके. गीतमाध्यमावर जिवापाड प्रेम करणाऱ्या आणि त्यामुळे विविध प्रयोगांसाठी गीतकार म्हणून सदैव सन्मुख असलेल्या ह्या अभिजात गीतकार. त्यामुळं हृदयनाथांची कोळीगीत किंवा 'गणराज रंगी नाचतो'सारखी वेगळ्या वळणाची गणपति-स्तवनं शब्दबद्ध होऊ शकली. हृदयनाथांच्या प्रयोगशीलतेतून केवळ छोटी छोटी भावगीत निर्माण झाली असं नाही तर अनोखे गीतसमूह साकार झाले. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरांच्या अवीट विराण्या. 'घणु वाजे घुणघुणा', 'पैल तो गे काऊ कोकताहे', 'मोगरा फुलला', 'अवचिता परिमळु, झुळकला अळुमाळु.'

१९६० च्या दशकांत सुरू झालेलं मराठी भावगीत-युगाचं हे दुसरं पर्व जवळ जवळ पुढची दोन-अडीच दशकं निर्मितीच्या ऐन भरांत चाललं. एक सुखद योगायोग असा की नेमकं तेव्हाच आकाशवाणी मुंबई केंद्र आणि पाठोपाठ पुणे केंद्र ह्यांनी आपली आवड हा खास श्रोत्यांच्या पसंतीची गाणी ऐकवण्याचा कार्यक्रम सुरू केला. ह्यापूर्वी रेडिओ सीलोन, विविध भारतीवर हिंदी गाण्यांचे फर्माईशी कार्यक्रम ऐकायची रसिकांना सवय होती. पण मराठी आकाशवाणी केंद्रांनी मराठी गाण्यांचा फर्माईशी कार्यक्रम सुरू करावा ही भलतीच अपूर्वाई होती. त्यामुळं त्या ठरलेल्या दिवशी त्या ठरलेल्या वेळेला ते ठरलेलं टायटल म्युझिक आणि पाठोपाठ 'कमलिनी विजयकर सादर करीत आहे, आपली आवड' ही घोषणा अक्षरशः घरोघरी पोचायची आणि ही ताजी टवटवीत भावगीत हवेत निनादत असायची. (आज आयडिया सारेगमची मराठी रसिकांत जी क्रेझ आहे, त्याचीच ही जुनी आवृत्ती म्हणता येईल). ह्या कार्यक्रमांचा ह्या नव्या भावगीतांना प्रचंड फायदा झाला आणि अर्थात गायकांनाही. पुढे अरुण दात्यांचे जे तडाखेबंद कार्यक्रम महाराष्ट्राभर सुरू झाले आणि आजही होताहेत त्यांच्यामागे ही पुण्याई नक्कीच आहे. ह्याच ओघांत एक नोंद करावीशी वाटते. ध्वनिमुद्रिका आणि आकाशवाणी ह्यांचा पुरता फायदा मिळालेले अरुण दाते हे गायक ह्या नात्याने त्या भाग्यवान शेवटच्या पिढीचे प्रतिनिधी. पुढे सत्तरी ऐंशीमध्ये आलेल्या सुरेश वाडकर, रवींद्र साठे, श्रीकांत पारगांवकर ह्यांच्यासारख्या गुणी गायकांनाही हा लाभ त्याप्रमाणांत झाला नाही. कारण तोंवर ध्वनिमुद्रिका आणि आकाशवाणी ह्यांच रसिक विश्वातलं स्थानच ढळलं होतं.

ह्या भावगीतांच्या जोडीला मराठी भावसंगीतामध्ये अपरिहार्यपणे ज्यांचा समावेश होतोच होतो, ती म्हणजे मराठी नाट्यगीतं. तसं पाहिलं तर मराठी भावसंगीतात नाट्यसंगीताची वडिलकी निर्विवाद आहे. कारण मराठी भावगीत आणि मराठी चित्रपटसंगीत ह्या दोन्हींचा उगम १९३०-३५ च्या सुमाराचा पण मराठी नाट्यसंगीताचा उगम मात्र थेट १८८० च्या अण्णासाहेब किर्लोस्करकृत संगीत शाकुंतल आणि त्यापाठोपाठ १८८४ मध्ये आलेल्या संगीत सौभद्रपर्यंत जातो. 'अरे वेड्या मना तळमळसी' 'बलसागर तुम्ही वीर शिरोमणि', 'किती किती सांगू तुला', 'वद जाऊ कुणाला शरण ग', 'पावना वामना या मना', 'प्रिये पहा'. आजही रसिकांच्या भावविश्वांत रेंगाळलेली ही गाणी तब्बल शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीची आहेत हे सांगूनही खरं वाटत नाही, इतकी त्यांची ताजगी अद्‌भुत आहे. आणि त्या जोडीला पाठोपाठ आलेल्या गंधर्वयुगातील 'स्वयंवर', 'शारदा', 'संशयकल्लोळ', 'एकच प्याला' मधील 'नवनवलनयनोत्सवा', 'मूर्तिमंत भीति उभी', 'प्रथम करा हा विचार पुरता' आणि 'प्रभु अजि गमला' ह्यांसारखी अवीट गीतं आणि त्यासोबतचीच मा. दीनानाथांच्या गायकीचे उन्मेष दाखवणारी तेजाळ गीतं. 'रवि मी', 'भाली चंद्र असे धरिला', 'परवशता पाश दैवे ज्याच्या गळां लागला', 'शतजन्म शोधताना शत आर्ति व्यर्थ झाल्या', 'सुहास्य तुझे मनास मोही'. त्यानंतर मध्यंतरी संगीत नाटकांत आलेला नवा आणि तेव्हांचा प्रयोगशील प्रवाह म्हणजे 'आंधळ्यांची शाळा', 'कुलवधू', 'एक होता म्हातारा'सारखी नाटक, ज्यातून नखशिखान्त भावगीत म्हणावी अशी नाट्यपद आली. ती साकार करणाऱ्या कलावती गायिका होत्या, ज्योत्सा भोळे. 'रुसली राधा, रुसला माधव, रुसले गोकुळ सारे' 'मनरमणा मधुसुदना', 'क्षण आला भाग्याचा', 'कां रे ऐसी माया कान्हा लाविली मला?' 'बोला अमृत बोला' आणि ह्या गीतांची भावमधुर स्वररचना करणारे संगीतकार होते, गंधर्वयुगाचे सांगाती-साक्षीदार मा. कृष्णराव.

अनुक्रमणिका

पण खरं म्हणजे चित्रपट आले आणि बोलू लागल्यावर मराठी संगीत नाटकांच्या व्यवसायाला उतरण लागली होती. छोटा गंधर्व, शिलेदार कुटुंबीय ह्यासारखे निष्ठावंत ती ज्योत तेवती ठेवीत होते. तेव्हाच भालचंद्र पेंढारकरांनी पन्नासच्या दशकांत ललितकलादर्श ह्या संस्थेचा पुनर्जन्म घडवला आणि नाट्यभावसंगीताचा ओघ पुन्हा वाहता केला. 'दुरितांचे तिमिर जावो', 'पंडित राज जगन्नाथ' अशी एकामागून एक संगीत नाटकं त्यांनी जिद्दीनं आणि मेहनतीन सादर केली. मराठी नाट्यसंगीताला मिळालेल हे एक नव वळणच होत. तेव्हांचे, हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतले यशस्वी संगीतकार वसंत देसाई तेव्हा ह्या मंडळींच्या मागे उभे राहिले. बाळ कोल्हटकर, विद्याधर गोखले असे नाटककार लिहिते झाले, राम मराठेंसारखे व्यासंगी संगीतकार जोडीला आले आणि नाट्यसंगीताचा प्रवाह पुन्हा वाहता झाला. 'जपुन टाक पाऊल जरा', 'आई तुझी आठवण येते', 'जय गंगे भागीरथी', 'नयन तुझे जादुगार', 'रमारमणा मधुसूदना', 'जय शंकरा गंगाधरा', 'सोऽहं हर डमरु वाजे'.

पण तरीही साठोत्तर आधुनिक मराठी नाट्यभावसंगीताचं एक नवं समृद्ध पर्व सुरू करण्याच श्रेय निर्विवादपणे जात ते पं. जितेंद्र अभिषेकींकडे. वसंत कानेटकरांच्या 'मत्स्यगंधा' नाटकातून त्यांची ही वाटचाल सुरू झाली ती 'ययाति-देवायानी', 'लेकुरे उदंड जाली', 'कट्यार काळजात घुसली' असे दिमाखदार मुक्काम घेत पोचली, 'महानंदा'पर्यंत. 'देवाघरचे ज्ञात कुणाला', 'नको विसरू संकेत मीलनाचा', 'गुंतता हृदय हे', 'अर्थशून्य भासे मज हा', 'तव भास अंतरा झाला', 'घेई छंद मकरंद, 'हे स्वरांनो चंद्र व्हा', आणि 'सर्वात्मका सर्वेश्वरा' 'लेकुरे उदंड झाली मधून त्यांनी एक वेगळाच बोलगाण्यांचा प्रयोग तब्बल चाळीस वर्षांपूर्वी संकल्पिला आणि त्याच नाटकात अखेरीस एक नितांत मधुर भावगीत ही दिलं. 'किती गोड गोड बाळ जसे कमल उमलले'. 'लेकुरे उदंड झाली' ह्या नाटकानिमित्तानं अभिषेकींनी मराठी नाट्यभाव-संगीताला दिलेलं हे वेगळं वळण पुढे 'घाशीराम कोतवाल', 'तीन पैशाचा तमाशा,' 'पडघम' असे वेगळे नाट्यभाव-संगीताचे ताजे प्रयोग घेऊन पुढे चाललं. भास्कर चंदावरकर, आनंद मोडक ह्या प्रयोगशील अभ्यासू संगीतकारांच्या मेहेनतीतून आणि प्रतिभेतून.

१९५० चं दशक आपल्या कर्तृत्वानं गाजवणारी मराठी चित्रपट विश्वातली प्रतिभावान त्रयी, ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके आणि राजा परांजपे ही १९६०च्या आरंभी एका मध्यंतरानंतर पुन्हा एकत्र आली त्यांनी एक अभिजात नजराणा चित्रपटरसिकांना सादर केला, 'जगाच्या पाठीवर.' कथा-पटकथा-दिग्दर्शन-अभिनय ह्या सर्वांगानीच तो चित्रपट संस्मरणीय होताच. पण त्या चित्रपटाची त्याहूनही अधिक मौल्यवान देणगी म्हणजे त्यातली नितांत-मधुर अर्थसघन भावगीतं. 'एक धागा सुखाचा..शंभर धागे दुःखाचे', 'जग हे बंदिशाला', 'उद्धवा अजब तुझे सरकार', 'कां हो धरिला मजवर राग', 'थकले रे नंदलाला', 'बाई मी विकत घेतला श्याम', 'तुला पाहते रे तुला पाहतेः'. 'चित्रपटातील एकूण एक गाणी गाजण्याचे आपणच केलेले पहिले विक्रम पुन्हा करून मोडण्याची गदिमा-सुधीर फडक्यांची जुनीच प्रथा इथून पुढे जणू पुन्हा सुरू झाली'. 'उमज पडेल तर', 'प्रपंच', 'सुवासिनी', 'गुरुकिल्ली', 'मुंबईचा जावई' ते 'या सुखानो या' पर्यंत आणि चित्रभावगीतांची एक सुवर्णमाळ उलगडतच राहिली.

'घननीळा लडिवाळा रे झुलवू नको हिंदोळा', 'पोटापुरता पसा पाहिजे नको पिकाया गोणी','विठ्ठला तू वेडा कुंभार', 'मी तर प्रेमदिवाणी', 'सासुऱ्यास चालली लाडकी शकुंतला', 'हृदयि प्रीत जागते जाणता-अजाणता', 'जिवलगा कधि रे येशिल तू', 'येणार नाथ आता', 'गुरुविण कोण दाखविल वाट', 'तंबाखूची रसाळ पोथी गातो ऐकावी', 'आज कुणीतरी यावे', 'कारे दुरावा.का रे अबोला', आणि 'या सुखानो या'.

ह्याच काळात संगीतकार अनंत माने आणि वसंत पवारांचा 'अवघाचि संसार' हा चित्रपट आला,'जे वेड मजला लागले', 'रूपास भाळलो मी', 'बहरुनि ये अणुअणु' ही मधुर चित्रभावगीतं घेऊन. ह्या पाठोपाठ त्यांचे 'मानिनी' 'सांगत्ये ऐका'प्रकाशित झाले. 'मानिनी' ह्या चित्रपटामुळं कवयित्री बहिणाबाई चौधरी जनसामान्यांपर्यंत पोचल्या, सुमन कल्याणपुरांच्या स्वरांतील त्या गाण्यांनी चित्रपटातील भावगीतांना जणू रानांतील मातीचा अनोखा पाऊसओला गंध दिला.

'अरे सौंसार सौंसार जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताला चटके तेव्हां मिळते भाकर,'

'धरित्रीच्या कुशीमधे बीयबियाणं निजली
वर पसरली माती जशी शाल पांघरली'

'अरे खोप्यामध्य खोपा सुगरणीचा चांगला
पहा पिलासाठी तिनं झोका झाडाला टांगला'

'मन वढाळ वढाळ उभ्या पिकातलं ढोरं
किती हांकला हांकला फिरुनी येतं पिकांवर'...

अनंत मान्यांचा 'सांगत्ये ऐका' हाही एक असाच रसरशीत ग्रामीण तमाशापट. तमाशा संगीत हा तर संगीत-कार वसंत पवारांचा बहिश्चर प्राणच होता. पण ह्या चित्रपटातील एका लावणीमुळं वसंत पवारांचा सहाय्यक असलेल्या एका छुपा रुस्तुम संगीतदिग्दर्शकाचा शोध लागला, राम कदम; आणि ती लावणी म्हणजे अर्थातच गदिमांच्या गांवरान अभिजात प्रतिभेतून आलेली, 'बुगडी माझी सांडली गऽऽ.'

१९६० च्या आरंभीला आलेल्या 'अंतरीचा दिवा' ह्या चित्रपटातून हृदयनाथ मंगेशकर प्रथमच संगीतकार आणि गायक म्हणूनही प्रकट झाले. त्या चित्रपटाची गीतं वि. स. खांडेकरांची होती. त्यातलं संत सोयरोबांचं 'हरि-भजनाविण काळ घालवू नाको रे' हे ऐन विशी-तेविशीच्या स्वरातलं हृदयनाथांनी गायलेलं गीत मराठी भावसंगीतातील एक मोलाची भर मानली जाते. ह्याच वर्षांत आलेला 'कन्यादान' हा चित्रपट वसंत प्रभू आणि पी. सावळाराम ह्यांच्या शब्दस्वरांनी नटला होता. साह-जिकच 'लेक लाडकी ह्या घरची', 'कोकिळ कुहू कुहू बोले', 'माझिया नयनांच्या कोंदणी' ह्यासारखी आजही आपल्या मनात गुंजणारी भावगीतं आपल्याला मिळाली. आणि पुन्हा एकदा हृदयनाथांच्या कोवळया तरुण स्वरांतलं, 'मानसीचा चित्रकार तो' हे भावगीतही. ह्यानंतर पुढच्याच वर्षी म्हणजे १९६१ मधे हृदयनाथ मंगेशकर निर्माते असलेला 'भाव तेथे देव' हा चित्रपट आला. प्रभाकर पेंढारकर दिग्दर्शक म्हणून आणि चित्रपटाचे संगीतकार म्हणून जितेंद्र अभिषेकी प्रथमच प्रकट झाले. त्यातली गाणी मात्र बाहेर आली नसावीत. ह्याच वर्षी 'बोलकी बाहुली' ह्या चित्रपटात एकाच चित्रपटाला चार संगीत-दिग्दर्शक हा प्रयोग बहुधा प्रथमच झाला असावा. श्रीनिवास खळे, यशवंत देव, दशरथ पुजारी आणि अविनाश व्यास हे चार संगीतकार. त्यातली, 'देवा, दया तुझी रे' आणि 'आठवे अजुनी यमुनातीर, ही सुमन कल्याणपुरनी गायिलेली दोन भावगीतं आजही ऐकायला मिळतात. त्याच वर्षी आलेल्या 'माणसाला पंख असतात' ह्या चित्रपटातून मीना मंगेशकर (खडीकर) हे नांव संगीत-दिग्दर्शक म्हणून प्रथम झळकलं. वि. स. खांडेकरांच्या लेखणीतून उतरलेलं 'ये जवळि प्रिय सखया भगवंता' हे त्या चित्रपटांतलं लता मंगेशकरांच्या स्वरांतल अभिजात अवीट गीत आजही रसिकांच्या स्मरणांत आहे.

१९६२ च्या सलामीला आलेल्या 'रंगल्या रात्री अशा' 'ह्या संगीतमय चित्रपटातून, 'नांव-गांव कशाला पुसता? अहो मी आहे कोल्हापूरची, मला हो म्हनत्यात लवंगी मिरची' ही फर्मास लावणी घेऊन श्री. जगदीश खेबुडकर चित्रपटगीत लेखनाच्या प्रांतात प्रविष्ट झाले. 'हा माझा मार्ग एकला' आणि 'मोहित्यांची मंजुळा' हे १९६३ ह्या वर्षांतले गीत-संगीताच्या दृष्टीनं दोन लक्ष्यवेधी चित्रपट. कुंदनलाल सहगलांच्या 'दुखके अब दिन बीतत नाही'ची आठवण करून देणारं शांता शेळक्यांनी लिहिलेलं आणि बाबूजींची स्वरबध्द करून गायिलेलं 'हा माझा मार्ग एकला' हे गाणं आजही रसिकांच्या हृदयाचा ठाव घेतं. 'मोहित्यांची मंजुळा' हा लता मंगेशकरांनी आनंद घन हे नांव घेऊन संगीत दिलेला पहिला चित्रपट. शांता शेळके आणि जगदीश खेबुडकर ह्यांनी गीतलेखन केलं होतं. 'सोनसकाळी सर्जा सजला', 'निळया आभाळी कातरवेळी' आणि 'बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला' ही गाणी आजच्या तरुण पिढीचीही लाडकी आहेत. त्यातही 'बाई बाई मनमोराचा' ह्या गाण्याचा नव्या व्हर्शनयुगांत झालेला पुनर्जन्मही सर्वांच्याच परिचयाचा आहे. ह्याच वर्षांत आलेल्या भटबंधूंच्या 'ते माझे घर' ह्या चित्रपटातील कवी रवींद्र भटांनी लिहिलेल्या आणि आजही लोकप्रिय असलेल्या 'श्रमिकहो, घ्या इथे विश्रांति', 'दिव्यादिव्यांची ज्योत सांगते तुझी नि माझी प्रीति' ह्या भावमधुर गीतांचा उल्लेख करायलाच हवा. दुर्दैवानं कवि रवींद्र भट आज आपल्यामध्ये नाहीत.

१९६४ मधे आलेले 'मराठा तितुका मेळवावा', 'पाठलाग'आणि 'संत निवृत्ती-ज्ञानदेव' हे तीन चित्रपट गीतसंगीताच्या दृष्टीनं महत्त्वाचे ठरतात. आनंद घन, दत्ता डावजेकर आणि सी. रामचंद्र हे अनुक्रमे तीन संगीतकार ह्या चित्रपटाचे मानकरी आहेत. 'नांव सांग सांग गांव सांग', 'हात नका लाऊ माज्या साडीला', 'अखेरचा हा तुला दंडवत' आाणि 'मराठा तितुका मेळवावा' मधली गाणी आजही भावसंगीताच्या अग्रभागी दिसतात. 'पाठलाग' मधले संगीतकार दत्ता डावजेकरांनी केवळ पांच वाद्यांचा वृंद वापरून ध्वनिमुद्रित केलेलं आणि आशा भोसलेंनी गाईलेलं 'ह्या डोळयांची दोन पांखरे' हे गूढरम्य हे गीत हे मराठी भावसंगीतातील एक अनमोल दागिना आहे. हिंदी चित्रसंगीतातले एकेकाळचे अनभिषिक्त सम्राट सी. रामचंद्रांनी मराठी संतपटाला संगीत देणं हीच 'संत निवृत्ती-ज्ञानदेव' ह्या चित्रपटाची अपूर्वाई होती. 'नीज वो श्रीहरी', 'नवल वर्तले गे माये' आणि 'मुंगी उडाली आकाशी तिने गिळिले सूर्यासी'. ही त्यातली गीतं आाजही संस्मरणीय वाटतात. ह्याच वर्षांत 'तुका झालासे कळस' हा आणखी एक संतपट प्रकाशित झाला. हिंदी चित्रसंगीतात मोजकंच काम करून आपला सुस्पष्ट ठसा उमटवणारे स्नेहल भाटकर ह्या चित्रपटाचे संगीतकार होते ही एक आवर्जून सांगावी अशी अपूर्वाई. १९६५ मधे आलेला भालजी पेंढारकरांचा 'साधी माणसं' हा चित्रपट संगीतकार आनंद घन ह्यांच्या गाण्यांच्या दृष्टीनं आजही संस्मरणीय ठरतो. खास लोकसंगीताचा बाज असलेली 'माळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं पानी जातं गुलाब – जाईजुईमोगरा फुलवीत', 'राजाच्या रंगम्हाली रानीचा बाई पलंग' ही गाणी काय, किंवा खेबुडकरांनी लिहिलेलं लाजवाब, 'ऐरणीच्या देवा तुला ठिनगी ठिनगी वाहु दे' काय त्यातलंच हृदयनाथांनी गाईलेलं 'नको देवराया अंत आता पाहू' हा संत कान्होपात्रेचा व्याकूळ अभंग केवळ अविस्मरणीयच आहे. ह्याच साठच्या दशकांत प्रकाशित झालेल्या ह्या पुढच्या चित्रपटांतील ही कांहीं मोजकी, लक्षणीय नांव. हृदयनाथांच संगीत असलेला पवनाकाठचा धोंडी, हिंदीतील नामवंत एन. दत्ता ह्यांनी संगीतबद्ध केलेला 'मधुचंद्र', दत्ता डावजेकरांचा 'संथ वाहते कृष्णामाई' आणि श्रीनिवास खळ्यांचा 'जिव्हाळा' ह्या चित्रपटातली सर्वच गाणी लोकप्रिय आहेत. पण जिव्हाळामधील 'लळाजिव्हाळा शब्दच खोटे' आणि 'या चिमण्यांनो'. ह्या दोन अभिजात गाण्यांचा रसिकमनांवरचा ठसा आजदेखील किंचितही पुसटलेला नाही.

इथंवर भावगीत, नाट्यगीत आणि चित्रपटसंगीतातील मागचे संदर्भ जुळवून घेत घेतलेला धावता मागोवा हा १९७० च्या अखेरीपर्यंतचा आहे. कारण तोंवर माझी लेखनाची भूमिका ही केवळ आस्वादक आणि अभ्यासकाचीच होती. पण १९७० च्या दशकाच्या मध्यावर मी स्वतःच ह्या शब्द आणि स्वरांच्या यात्रेत कवी-गीतकार-संगीतकार म्हणून प्रत्यक्ष सहभागी झालो. साहजिकच इथून पुढचा धावता परामर्श घेतांना माझी भूमिका त्रयस्थ आस्वादक-अभ्यासक इतकीच न राहता त्यांच्या जोडीला थेट साक्षीदार ही नवी भूमिका त्याजोडीला येणं अपरिहार्य ठरतं. हा १९७० च्या पुढचा काळ हा तसा जवळचाच काळ आहे. त्यात घडलेला मराठी भावसंगीताचा प्रवास तसा अजूनही आपल्या नजरेसमोर तरळणारा असाच आहे. त्यामुळं खूप सांगोपांग विवेचन न करता ह्या काळांतले काही मोजके टप्पे अधोरेखित करीत पुढे जावं असा मानस आहे. आणि आता माध्यमांचे कप्पे न पाडता एकूणच भावसंगीताची वाटचाल सांगण्याचा प्रयत्न करावा अशी भूमिका आहे.

तसे गजानन वाटवे-सुधीर फडके ह्यांचेच समकालीन असलेले संगीतकार श्री. राम फाटक ह्यांची ओळख जागरूक डोळस रसिकांना वेगळी करून द्यायला नको. पं. भीमसेन जोशींची विख्यात 'संतवाणी', आणि 'डाव मांडून भांडून मोडू नको', 'अंतरीच्या गूढ गर्भी एकदा जे वाटले, ते प्रेम आता आटले' ह्यासारख्या अनेक मधुर भावगीतांचे संगीतकार म्हणून ते आपल्याला सुपरिचित आहेत. त्यांची सगळी कारकीर्द घडली ती आकाशवाणीचे संगीत विभागाचे अधिकारी म्हणून. १९७२ च्या मे महिन्यात भावसंगीताचा विशेष कार्यक्रम 'स्वरचित्रासाठी' त्यांनी एक अभिनव कल्पना काढली. पंडित भीमसेनजींकडून एक नवं मराठी भावगीत गाऊन घ्यायचं. आणि त्यातूनच, 'सखि मंद झाल्या तारका' ह्या रसिकप्रिय भावगीताचा जन्म झाला. पाठोपाठ 'दिसलीस तू फुलले ऋतु' हे

भावगीत राम फाटकांनी पुणे आकाशवाणीकरिता श्रीकांत पारगांवकरांकडून गाऊन घेतलं. पुढे ही दोन्ही भावगीत एच. एम. व्हीनं सुधीर फडके ह्यांच्या स्वरांत काढलेल्या ध्वनिमुद्रिकेमुळे थेट मराठी भावसंगीताच्या इतिहासात जाऊन दृढ झाली. तोच, सुधीर मोघे नामक गीतकाराचा जन्म. पाठोपाठ चित्रपटसृष्टीचेही दरवाजे खुले झाले आणि मराठी भावगीत आणि चित्रपटगीत विश्वांत लक्षणीय भर घालणं शक्य झालं. संगीतकार सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर, पं. जितेंद्र अभिषेकी, भास्कर चंदावरकर, प्रभाकर जोग, अनिल-अरुण, अशोक पत्की ते थेट श्रीधर फडके – आनंद मोडक आणि सलील कुलकर्णी पर्यंत प्रवास झाल्यामुळे गाण्यांची माळच्या माळ उलगडत गेली. 'दिस जातील दिस येतील', 'एकाच ह्या जन्मी जणू फिरूनी नवी जन्मेन मी', 'गुरु एक जगीं त्राता', 'सांग तू माझाच नां', 'आला आला वारा', 'काजळरातीन ओढून नेला', 'गोमू संगतीनं', 'विसरू नको श्रीरामा मला', 'घुंगरु तुटले रे', 'झुलतो बाई रासझुला', 'दयाघना, मना तुझे मनोगत', 'मी असा कसा वेगळा', 'एक झोका', 'फिटे अंधाराचे जाळे', 'मन मनास उमगत नाही', 'सांज ये गोकुळी', 'नादब्रह्म परमेश्वर सगुण रूप साकार', आणि 'तरिही वसंत फुलता'.

हा प्रवास चालू असतांनाच जुन्यानव्या कवीसंगीतकारांचे उन्मेष भोवताली बहरतांना पहायला मिळत होते. नवनिर्मितीचं हे सुरेल विश्व आतून-बाहेरून अनुभवायला मिळत होतं. १९७० च्या पुढच्या काळांत मी वर उल्लेखिलेले सर्व संगीतकार त्यांच्या ऐनबहरांत होते. सुधीर फडके, हृदयनाथ मंगेशकर, प्रभाकर जोग, अनिल-अरुण, अशोक पत्की, भास्कर चंदावरकर, श्रीधर फडके आणि आनंद मोडक. जोडीला कवी-गीतकारांची जुनी-नवी मालिका होतीच. १९७४ मधे गदिमा 'या सुखांनो या' म्हणत पुढे चालत होतेच. शांता शेळकेंचा भावगीत चित्रगीतांचा ऐन बहर चालू होता. पी. सावळाराम, जगदीश खेबुडकरही जोमात होते. मधुसूदन कालेलकर, वंदना विटणकर आणि शांताराम नांदगांवकर आपल्या बाजानं व्यक्त होत होते. आणि त्याचवेळी आरती प्रभू, सुरेश भट, ग्रेस, महानोरही आपले वेगळे रंग भरत होते. १९७० च्या दशकाच्या मध्यावर जब्बार पटेलांचा 'सामना' आला आणि त्यानं नव्या अनोख्या चित्रगीतांचा नजराणा आणला भास्कर चंदावरकरांनी स्वरबध्द केलेली, 'सख्या रे घायाळ मी हरिणी' आणि 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे'. आरती प्रभूंच्या ह्या कवितेतून एका नव्या पुरुषस्वराची ओळख झाली, रवींद्र साठे. ह्याच सुमाराला एक नवा सर्वांगसुंदर पुरुषस्वर पार्श्वगायनाच्या क्षेत्रांत आला, सुरेश वाडकर. जोडीला एक नवा स्त्रीस्वर होता, अनुराधा पौडवाल. ह्याच काळांत प्रामुख्यानं पार्श्वगायनांत आणखीही एक नांव दिसतं, उत्तरा केळकर. एरवी मराठी पार्श्वगायनक्षेत्रात आशा भोसले हा बुलंद स्वर आपलं साम्राज्य स्थापून होताच किंबहुना आजमितीलाही तो आपला प्रभाव ठेवून आहे. त्यामुळं ह्या काळातले मराठी भावसंगीतात मोलाची भर घालणारे प्रमुख चित्रपट म्हणून पुढील चित्रपटांचा उल्लेख करता येईल. त्यांतली रसिकसिद्ध गीतं इतकी सर्वपरिचित आहेत की त्यांचा वेगळा उल्लेख न करतांही ती आपल्या मनांत आपसूक जागी होतील. संगीतकार अनिल-अरुणचा 'अष्टविनायक', मंगेशकरांचे 'जैत रे जैत', 'सिंहासन', 'उंबरठा', 'निवडुंग', सुधीर फडक्यांचे 'शापित', 'पुढचं पाऊल', 'धाकटी सून', आणि 'रेशीमगांठी', श्रीधर फडक्यांचे 'लक्ष्मीची पाऊले', 'लक्ष्मीबाई भ्रतार वासुदेव', आनंद मोडकांचे 'कळत नकळत', 'चौकटराजा' आणि 'एक होता विदूषक'. लोकप्रियतेचा निकष लावायचा तर संगीतकार श्रीधर फडक्यांचे 'ओंकार स्वरूपा' आणि 'ऋतु हिरवा' ह्या दोन अल्बमचं श्रेयही आनंदानं मान्य करायला हवं. ह्याखेरीज, कवि सौमित्र आणि संगीतकार-गायक मिलिंद इंगळे हयांच्या 'सर्वमान्य गारवा', संगीतकार रवी दात्यांनी केलेल्या कविवर्य सुरेश भटांच्या गझला आणखी असेच कितीतरी.

ह्याच काळांत दादा कोंडके ह्या स्वयंसिध्द कलाकारानं आपला 'सोंगाड्या' हा चित्रपट आणून मराठी चित्रपटांवर आणि पर्यायानं मराठी भावसंगीतावरही आपला असा खास ठसा उमटवला. खरंखुरं मराठी पॉप संगीत त्यांनी वाजवलं आणि गाजवलंही. आरंभी राम कदम आणि जगदीश खेबुडकरांचा त्यात सहभाग होता. नंतर मग प्रभाकर जोग आणि पाठोपाठ संगीतकार राम-लक्ष्मण ह्यांची त्यांना साथ मिळाली. पण राज कपूरच्या

चित्रपटसंगीतांवर जसं राज कपूरचं वर्चस्व असायचं, तीच गोष्ट दादा कोडक्यांचीही होती.

१९७० च्या दशकापासून तंत्रदृष्टीनंही खूप फरक पडत चालले. भावसंगीताच्या पहिल्या पर्वापेक्षा आतां गीताच्या पार्श्वभूमीवरील वाद्यवृंदही अधिक समृद्ध होत चालला. पूर्वी संगीतकार आणि त्यांचे सहाय्यक मिळून हे काम करीत होते. आता ती व्यक्ती केवळ सहाय्यक न राहता, वाद्यवृंदसंयोजक किंवा म्युझिक अरेंजर ही स्वतंत्र विशेष गुणवत्तेची जागा झाली. गाण्याच्या मधले म्युझिक पीसेस म्हणजे केवळ दोन कडव्यांना जोडणारे पूल न राहतां दोन कडव्याच्या मधील आणि प्रत्यक्ष गायनाच्या मागीलही अवकाश भरून टाकणारा तो एक स्वतंत्र प्रतिभाविषयच बनला. हिंदी आणि मराठी ह्या दोन्हीही भावसंगीताचं ध्वनिमुद्रण मुंबईतच होत असल्यानं हिंदीतील व्यापक संकल्पनात्मक समृद्धी मराठी चित्रपट-संगीतामधे आणि पर्यायान समग्र भावसंगीतातच येऊ लागली. गायक कलाकार-वादक कलाकार-ध्वनिमुद्रण-कक्ष आणि ध्वनिमुद्रक हे देखील दोन्हीकडे समानच असायचे आणि आजही असतात. दरम्यान इलेक्ट्रॉनिक वाद्यांचा प्रवेश वाद्यवृंदात होऊ लागला. अनेक वाद्यांचा आभास कौशल्यानं निर्माण करणारे इले. सिंथेसायझर, इले. तालवाद्यप्रकार येऊ लागले. पूर्वीचं चार ट्रॅक्सचंध्वनि-मुद्रण मागे पडून अनेक ट्रॅक्सची नवी यंत्रणा येऊ लागली. ही एक सर्वांगीण क्रांतीचं म्हणावी लागेल. त्याचे भले आणि बुरेही परिणाम दिसू-जाणवू लागले आणि ८०-९० च्या दशकांत ही बदल होण्याची प्रक्रिया अधिकाधिक वेगवान होत चालली.

१९७० च्या मध्यावर ह्या क्षेत्रांत आलेल्या कवी-गायक-संगीतकारांना ह्या दोन्ही अवस्था साक्षात अनुभवा-यला मिळाल्या, ज्यामधे व्यक्तिशः माझाही समावेश आहे. भव्य स्टुडियो, प्रथम प्रतीच्या वादककलाकारांचा मेळावा, समूहगायकांचा जथा, एक किंवा अधिक वाद्यवृंद संचालक, स्वतः संगीत दिग्दर्शक, नामवंत गायक-गायिका, कुशल ध्वनिमुद्रक आणि त्यांचे सहाय्यक, ह्या सर्वांच्या जोडीला स्टुडियोमधे निर्माता-दिग्दर्शक-अभिनेते-आणि त्यांचे पाहुणे ह्यांचाही प्रेक्षणीय मेळावा असा तो सगळा उत्सवही आम्ही पाहिला. आणि आता छोट्याशा स्टुडियोत एकेक कलाकार आपापल्या सवडीप्रमाणे येऊन आपापला सहभाग करून जात असल्याची आणि अशाप्रकारे दिवसदिवस एकाच गाण्याचं ध्वनिमुद्रण आकाराला येण्याची प्रक्रियाही आम्ही पाहतो आहोत. इथ कुठल्याही प्रकारे, गेलेऽऽ ते दिवसऽऽ असा सूर लावण्याचा माझा मुळीच हेतू नाही आहे. कारण ह्या नव्या तंत्रज्ञानानं होणारे अनेक सृजनात्मक लाभही मी पहातोच आहे. मात्र ह्या चकाचक सफाईत मूळ निर्मितीप्रक्रियेतील थरार आणि चैतन्य हर-पण्याचा मुद्दाही डोळ्याआड करता येत नाही.

१९७० च्या आरंभी मुंबई दूरदर्शन सुरू झालं. आणि मराठी भावसंगीताला आणखी एक एक सशक्त माध्यम मिळालं. सुहासिनी मुळगांवकर, अरुण काकतकर, विजया जोगळेकर, विनायक चासकर असे आरंभीचे निर्मातेही प्रयोगशील होते. त्यामुळं 'शब्दांच्या पलिकडले, सारख्या कार्यक्रमांतून भावसंगीताच्या नवनिर्मितीला चांगली साथ मिळाली. पण मराठी भावसंगीताच्या मुख्य प्रवाहात त्याची रुजवणी झाली असं दिसत नाही. १९८६-८७ च्या सुमाराला दूरदर्शन-मालिका सुरू झाल्या. आणि मालिकेचं शीर्षकगीत ही एक नवी शाखा मराठी भावसंगीताला फुटली. अनेक कवी-संगीतकार-गायकांचा त्यांत मनोज्ञ सहभाग सुरू झाला. मी स्वतःही 'स्वामी', 'अधां-तरी', 'नाजुका', 'हसरतें' ह्या मालिकांच्या गीतसंगीताची जबाबदारी घेऊन हा नवा प्रकार जवळून अनुभवला. ह्या मालिकांत तर मालिकेमधेही छोट्या छोट्या गीतांचाही सहभाग होता, नाटक-चित्रपटांत असतो, तसा. तिथली आव्हानं पुन्हा वेगळी होती. महत्त्वाचं आव्हान असायचं वेळेची मर्यादा. ह्यापूर्वी साडेतीन मिनिटं, नंतरच्या काळांत सहा-साडेसहा मिनिटं असा गीतांचा कालावधी असायचा. ह्या मालिका विश्वात त्यांची मर्यादा दीड ते दोन मिनिटांवर आली. आज तर वाहिन्यांच्या विश्वात मालिकांचा प्रवाहच अखंड वाहता असतो. त्यातून कितीतरी नवे कवी, संगीत-कार, गायक प्रकाशांत येत आहेत. ह्या शीर्षक गीताचं व्यक्तिमत्व काहीसं पूर्वीच्या रेडियोजिंगल्ससारखं असतं. त्यामुळंच कदाचित पूर्वी मराठी जिंगल्सविश्वाचे अनभिषिक्त सम्राट असलेले संगीतकार अशोक पत्की हे आज ह्या क्षेत्रांतही आघाडीवर दिसतात. माधुर्य, थेटपणा आणि

तरीही मोजक्या शब्दस्वरांची योजना ह्यातलं त्यांचं कसब खरोखर निर्विवाद आहे. मात्र तरीही ही वेळेची मर्यादा ही निर्मितीला घातकच असते. एखादें रोप लावून ते निसर्गतः वाढू न देता, त्याला बाटलीत कोंबण्याचाच तो प्रकार आहे हे मात्र नक्कीच म्हणावंसं वाटतं.

शास्त्रीय रागसंगीतामधे नामवंत असलेल्या गान-श्रेष्ठींनी ह्या अर्धशतकांत मराठी भावसंगीतात दिलेला सहभाग हाही एक अधोरेखित करावा असा प्रकार आहे. पं. भीमसेनजींची 'संतवाणी', कुमारजींचे 'तांब्यांच्या कविता', 'मला उमजलेले बालगंधर्व' सारखे प्रयोग, किशोरी अमोणकरांनी संगीत देऊन गाईलेला अल्बम, 'रंगीं रंगला श्रीरंग'. ही केवळ वानगीची उदाहरणं. चोख भावगीतं म्हणता येतील अशाही रचना ह्या श्रेष्ठींनी गाईल्या आहेत. कुमारजींनी बाळ कोल्हटकरांच्या नाटकासाठी संगीत वसंत देसाईंनी स्वरबद्ध केलेली 'उठि उठि गोपाला' आणि 'ऋणानुबंधाच्या इथून पडल्या गांठी' ही गीतं गायली होतीच. शिवाय कवि अनिलांची दोन काव्यं स्वतः स्वरबद्ध करूनही त्यांनी गाऊन रसिकांच्या मनांत ती चिरस्थायी केलेली आहेत. 'अजुनी रुसून आहे' आणि 'आज अचानक गांठ पडे'. वसंतराव देशपांड्यांची श्रीनिवास खळ्यांनी स्वरबद्ध केलेली दोन भावगीतं ही देखील रसिकांची लाडकी आहेत. 'बगळ्यांची माळ फुले' आणि 'वाटेवर कांटे वेचीत चाललो'.

मराठी भावसंगीताच्या इतिहासांतील आणखी एक महत्त्वाचं दालन म्हणजे, भावसंगीताचे मंचीय आविष्कार. आधुनिक मराठी भावसंगीतापुरतचं बोलायचं तर ही मंच-गायनाची सुरुवात करून, ती प्रचंड लोकप्रिय करण्याचं प्रथम श्रेय निर्विवादपणे श्री. गजानन वाटवे ह्यांच्याकडेच जातं. मंचमध्यावर स्वतः गायक हातात हार्मोनियम घेऊन आणि सोबत तबला आणि एक किंवा दोन साथीची व्हायोलीन्स एवढ्याच सामुग्रीवर वाटव्यांनी मंचगायनाचा एक इतिहासच घडवला. त्याचंच अधिक विकसित रूप म्हणजे सुधीर फडक्यांचे गीतरामायण-गायनाचे विक्रमी प्रयोग. १९६० नंतरच्या मराठी भावसंगीताच्या दुसऱ्या पर्वात हृदयनाथ मंगेशकर, अरुण दाते आणि सोबत एक गायिका अशा स्वरूपांत भावसरगमचे प्रयोग सुरू झाले. परंतु ह्या प्रवासांतली एक महत्त्वपूर्ण घटना म्हणजे, १९७१ मध्ये पुण्यांतील काही तरुण गायक-गायिका आणि वादक ह्यांनी एकत्र येऊन 'स्वरानंद' ही संस्था स्थापन केली आणि लोकप्रिय मराठी गीतांच्या ध्वनिमुद्रिकांचा सर्वार्थानं पुनः प्रत्यय देणारा एक कार्यक्रम आपली आवड ह्या शीर्षकाखाली सुरू केला. त्याचे संयोजक होते, श्री. विश्वनाथ ओक. हे एक ऐतिहासिक वळण होतं. कारण इथूनच मराठी वाद्यवृंद ही आजची सर्वव्यापी झालेली चळवळ उभी राहिली. १९७५ मधे 'स्वरानंदने' साकार केलेल्या 'मंतरलेल्या चैत्रबनांत' ह्या गदिमागीतांच्या प्रयोगानं प्रचंड व्यावसायिक यश मिळवलं. पाठोपाठ १९८९ मधे पहिल्या जागतिक मराठी परिषदेत मुंबईत ६० वर्षांच्या मराठी चित्रसंगीताची वाटचाल मांडणारा 'स्मरणयात्रा' हा अभूतपूर्व पहिला दृक्-श्राव्य प्रयोग साजरा झाला आणि मग महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर, इतकंच नव्हे तर परदेशस्थ मराठी माणसांचे असंख्य मराठी वाद्यवृंद उभे राहिले. आणि आता त्याचं लोण नव्या सर्वव्यापी माध्यमावर म्हणजे दूरदर्शन-वाहिन्यांवरही पोचलं आहे. त्यातूनच 'आयडिया सारेगम' सारख्या भावसंगीताच्या विश्वव्यापी मालिका गाजत आहेत. नव्या स्वरांचा शोध आणि संधी हा अत्यंत अनमोल लाभ त्यातून होतोय हे निःसंशय. मात्र ह्या सगळ्या गदारोळांत नवनिर्मितीचा सगळीकडून कोंडमारा होतो आहे ही वस्तुस्थिती सहजासहजी नाकारता येणारी नाही.

श्री. गजानन वाटवे असं सांगायचे की त्यांच्या ऐन जमान्यातही प्रत्येक कार्यक्रमांत एक तरी नवं गाणं सादर करायचंच, असा त्यांचा स्वतःचाच एक दंडक होता. आणि पुढचे श्रोतेही नेहमीचे आवडती गाणी ऐकतानाच नव गाणं कुठलं येतय ह्यासाठी वह्या सरसावून बसलेले असायचे. (कहाँ गये वो लोग?) आज मात्र सर्वत्र त्याच त्या नोस्टाल्जिक गाण्याचं निर्जीव दळण घालण्याची प्रवृत्ती सरसकट दिसते आहे. कारण आजच्या श्रोत्यांची मागणीही ती आणि तेवढीच आहे. एखाद दुसरा अपवाद वगळतां, नवी गीतं, नव्या स्वररचना, नवे स्वर ह्यांना कसलंही पोषण मिळत नाही आहे. ना रंगमंदिरातील रसिकांकडून, ना नवे अल्बम करणाऱ्या कंपन्यांकडून, ना लोकप्रिय मराठी भावगीतांचा व्यापार करणाऱ्या वाहिन्यांकडून.

त्यामानानं मागील वीस बावीस वर्षांत रंगभूमीवर जे काव्यप्रयोग होत आहेत, ते उल्लेखनीय आहेत. पण ते मराठी भावसंगीताचेच प्रयोग आहेत हे भान आपल्या मराठी जनतेला नीटसं झालं आहे असं म्हणवत नाही. चंद्रकांत काळेंनी त्यांच्या 'शब्दवेध' तर्फे सातत्यानं केलेल्या काव्यप्रयोगांचा विशेष उल्लेख करायला हवा. प्रयोगशील संगीतकार आनंद मोडकनं ह्या प्रयोगांतून स्वरबद्ध केलेल्या कविता ही खरं म्हणजे ह्या गेल्या अर्धशतकांतली अभिजात भावगीतचं आहेत. पण ती पाहिजे त्या प्रमाणात सर्वसामान्य रसिकांपर्यंत पोचली आहेत असे दिसत नाही. ह्याशिवायही छोटेमोठे लक्षणीय काव्यप्रयोग होताहेत, पण त्यांनाही तेवढा प्रतिसाद दिसत नाही. संदीप खरे आणि सलील कुलकर्णी ह्यांचा 'आयुष्यावर बोलू काही' हा एकमेव निर्विवाद अपवाद निःसंशय आहे. संगीतकार-गायक श्रीधर फडक्यांचे धडाकून चाललेले कार्यक्रम हेही असंच एक अपवादात्मक उदाहरण. पण असे दुर्मिळ अपवाद हे पुन्हा मूळ तत्त्वच सिद्ध करतात.

ह्याखेरीज चित्रपट, अल्बम्स ह्यातून जी काही तथाकथित नवनिर्मिती होते आहे तिच्यात, एखाद दुसरा सन्मान्य अपवाद वगळता. काव्याच्या किंवा संगीताच्या अंगानं अभिजाततेचा कस फार अभावानं जाणवतो आहे. कारण, त्यावरदेखील व्यापारी (खरं तर बाजारू) दृष्टी-कोणाचंच नको इतकं वर्चस्व आहे. भावसंगीत असं ज्याला नांव आहे त्यांतील भावाचंच उच्चाटण होऊन, नुसते आवाज करण्याकडे कल होतांना दिसतो आहे. चांगले कवि-गीतकार, गायक-गायिका, वादक हा कुठल्याही काळाचा मक्ता कधीच नसतो. त्यामुळं आजही त्यांच अस्तित्व निःसंशय असणार, किंबहुना आहेच. पण त्यांना आपला अंतःस्वर मुक्त करण्याची मुभा आणि संधी कितपत मिळते आहे किंवा कशी मिळणार आहे, हा खरा प्रश्न आहे. आणि त्या प्रश्नाच्या उत्तरातच मराठी भावसंगीताचं वर्तमान आणि भविष्यही दडलेलं आहे, इतकंच तूर्त म्हणता येईल.

❖❖❖

अनुक्रमणिका

गेल्या पन्नास वर्षातील नाट्यक्षेत्राची वाटचाल

- डॉ. विश्वास सहस्रबुद्धे

पन्नास वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र आजच्यापेक्षा फार वेगळा होता.

केंद्रात पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे सरकार स्थिर होते. नेहरूंच्या समाजवादी धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार देशाचा कारभार चालू होता. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचे सरकार अस्तित्वात होते. रस्ते, दळणवळण, तंत्रज्ञान आदी क्षेत्रांमध्ये धीमी वाटचाल सुरू होती. शिक्षण आणि आरोग्य या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्येही थोड्याफार फरकाने अशीच परिस्थिती होती. महाराष्ट्राची लोकसंख्या अवघी तीन कोटी शहाण्णव लाख होती. खेड्यांकडून शहरांकडे लोंढे येण्याची प्रक्रिया सुरू होत होती. अजून एड्स सारख्या महाव्याधीचे संकट आलेले नव्हते. एकूणच राज्यपातळीवर (देशपातळीवरही) नागरी आणि ग्रामीण असे दोन सुस्पष्ट वर्ग दिसून येत असत. पश्चिम महाराष्ट्रात वाहणारे सुधारणांचे वारे अन्य भागांमध्ये क्षीण होते. समाजात आर्थिक विषमता आढळून येत असे. दिवसभर जीवनसंघर्ष केल्यावर सामान्य माणसाला करमणुकीसाठी रेडियो किंवा चित्रपट हे पर्याय उपलब्ध होते. एका जागेवरून दुसऱ्याजागी नेण्याजोगे ट्रॅन्झिस्टर्स नुकतेच आल्यामुळे लोकांची मोठीच सोय झाली होती. जनमानसावर हिंदी चित्रपटगीते आणि महाराष्ट्रीय लोकांपुरते बोलायचे तर मराठी भावगीते यांचा मोठा प्रभाव होता.

१९३० पासून नाट्यक्षेत्राला उतरती कळा लागलेली होती. गंधर्वयुगाचा अस्त झालेला होता. नव्यानेच मूळ धरलेल्या चित्रपट या कलेने नाटकाचा प्रेक्षक आपल्याकडे ओढून घेतला होता. या काळात प्र. के. अत्रे, मो. ग. रांगणेकर, भार्गवराम वरेरकर यांनी लिहिलेल्या नाटकांमुळे मराठी रंगभूमी तग धरून होती. परंतु, १९५० च्या आगेमागे नाटककारांची एक नवी पिढी उदयाला येत होती. वि. वा. शिरवाडकर, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, गो. नी. दांडेकर, बाळ कोल्हटकर, वसंत कानेटकर, बबन प्रभू, व्यंकटेश माडगूळकर अशा लेखकांनी लिहिलेल्या नाटकांमधून वेगवेगळ्या प्रकृतीचे आशयद्रव्य आढळून येते. शिरवाडकरांच्या 'दूरचे दिवे' (१९४६) या नाटकाचा पार्श्वपट स्वातंत्र्यपूर्व काळाचा आहे. ऑस्कर वाईल्ड या पाश्चात्त्य नाटककाराच्या 'द आयडियल हजबंड'वर आधारित असलेले हे नाटक माणसांमधील नातेसंबंधाचे चित्रण करते. गो. नी. दांडेकरांचे पहिले नाटक 'जगन्नाथाचा रथ' (१९५५) हे मावळ प्रांतातल्या एका खेड्यात घडते. (दांडेकरांचे वास्तव्य मावळ प्रांतातल्या तळेगाव येथे असे ही गोष्ट ध्यानात घेण्याजोगी आहे. सुमारे वीस बावीस पात्रे असलेल्या या नाटकात बहुविध व्यक्तिरेखांचा आढळ होतो. पु. ल. देशपांडे यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' (१९५७) या 'सदाबहार' नाटकामुळे हास्य आणि करुण या रसांचा रंजक परिपोष एकाच नाट्यकृतीतून प्रेक्षकांना अनुभवावयास मिळाला. विजय तेंडुलकरांचे नाट्यलेखन याच सुमारास सुरू झाले. 'गृहस्थ' हे तेंडुलकारांचे पहिले नाटक. माणूस नावाचे बेट (१९५६), मधल्या भिंती (१९५८), चिमणीचं घर होतं मेणाचं (१९५९) या तेंडुलकरांच्या नाटकांची शीर्षकेही त्यांतील वेगळ्या आशयाचे सूचन करणारी आहेत. माणसाच्या भोवतालच्या परिस्थितीचे थेट चित्रण करण्यापेक्षा त्या परिस्थितीचा माणसाच्या मनावर काय व कसा परिणाम होतो याचे चित्रण करणे हा तेंडुलकरांचा विशेष. माणसाच्या मनोव्यापारांचा मागोवा घेणे ही मराठी साहित्यासाठी नवी गोष्ट नक्कीच नाही. परंतु, नाट्यलेखनाच्या माध्यमातून माणसाच्या आंतरिक घडामोडींचा धांडोळा घेणाऱ्या नाटककारांमध्ये तेंडुलकरांचे नाव अग्रभागी येते. वसंत कानेटकरांचे पहिले नाटक 'वेड्याचं घर उन्हात' (१९५७) हे सुद्धा माणसाच्या मनातील व्यामिश्र व गुंतागुंतीच्या व्यापारांचे दर्शन घडविते. यातील 'दादासाहेब' ही व्यक्तिरेखा डॉ. श्रीराम लागू यांनी रंगविली होती.

डॉक्टरांनी या व्यक्तिरेखेचे 'प्रत्यक्ष अनुभूतीच्या झपाट्यात माझा संपूर्ण कब्जा घेणारी' असे वर्णन केलेले आहे. इतकेच नव्हे तर 'पुढील आयुष्यातही मोजक्याच व्यक्तिरेखांनी इतका पिळवटून आणि झपाटून टाकणारा अनुभव मला दिला' अशी पुस्ती त्यांनी जोडली आहे. व्यंकटेश माडगूळकरांचे 'जाणार कुठे?' (१९६०) हे नाटक बदलत्या काळाच्या पाऊलखुणांचे दर्शन घडविणारे होते. इतके दिवस दळणवळणाची साधने उपलब्ध नसल्याने ग्रामीण संस्कृती बाह्यजगाच्या प्रभावापासून अलिप्त राहिली होती. परंतु, स्वयंचलित वाहनांचा शिरकाव झाला आणि 'जग लहान होण्याची' प्रक्रिया सुरू झाली. आजवर जी भौतिक अंतरे दिवसांच्या भाषेत मोजली जात तीच आता काही तासांएवढी लहान झाली. आजवर परिचित नसलेल्या जीवनमूल्यांचा शिरकाव होणे अपरिहार्य झाले. हे बदल काहींना स्वीकारार्ह वाटले तर काहींना मुळीच पटले नाहीत. अशा परिस्थितीतून उद्‌भवणाऱ्या संघर्षाचे चित्रण 'जाणार कुठे'ने घडविले. या नाटकातील 'इजाप्पा' या व्यक्तिरेखेचे माडगूळकरांनी प्रभावी चित्रण केले आहे.

याच काळात निखळ मनोरंजनाचा आनंद देणाऱ्या नाटककारांमध्ये बबन प्रभूंचा उल्लेख करावयास हवा. 'फार्स' या वरवर सोप्या वाटणाऱ्या पण भल्याभल्यांनाही न जमलेल्या नाट्यप्रकारावर बबन प्रभूंची उत्तम हुकुमत होती. 'झोपी गेलेला जागा झाला' (१९५८) आणि 'दिनूच्या सासूबाई राधाबाई' (१९६०) हे फार्स आजही लोकांची पसंती मिळवतात. प्रस्तुत नाटकांचे दिग्दर्शक आत्माराम भेंडे हे होते. भेंडे यांनी नाट्यक्षेत्रात पुढे दीर्घकालापर्यंत योगदान दिले. 'विनोदी' या वर्गीकरणात मोडणारा 'बटाट्याची चाळ' (१९६०) हा एक पु. ल. देशपांड्यांचा एकपात्री प्रयोग याच काळात अतिशय लोकप्रिय झाला होता.

१९५५ साली मुंबई राज्य शासनाने राज्य नाट्यस्पर्धा (तत्कालीन रंगकर्मींच्या भाषेत-सरकारी स्पर्धा) सुरू केल्या. या स्पर्धेची प्राथमिक फेरी महाराष्ट्रभर मुंबई, पुणे, कोल्हापूर, रत्नागिरी, औरंगाबाद, नागपूर अशा विविध केंद्रांवर होत असे. प्रत्येक केंद्रातून यशस्वी ठरलेल्या पहिल्या दोन किंवा तीन संघांना अंतिम फेरीत स्थान मिळे आणि अंतिम फेरीत गुणवत्तेनुसार क्रमांक लावले जात. राज्य नाट्यस्पर्धेने नाट्यप्रेमींना एक हक्काचे व्यासपीठ पुरविले. या स्पर्धेने प्रेक्षकांना ही एकाच रंगमंचावर चांगली नाटके पाहण्याची संधी पुरविली. नाट्यक्षेत्रात नाव मिळविलेल्या लेखक, दिग्दर्शक, अभिनेते, नेपथ्यकार आदी रंगकर्मींचे पाय 'राज्य नाट्यस्पर्धे'च्या पाळण्यात दिसले आहेत.

या काळात नाटक ही कला प्रामुख्याने मुंबई आणि पुणे या दोन शहरात बहरलेली दिसते. पण म्हणजे अन्य शहरात नाटके होतच नसत असे मुळीच नाही. प्रस्तुत लेखकाचे बालपण नांदेड या मराठवाड्यातील शहरात गेले. नांदेडमध्ये सुमारे १९६५ ते १९७० च्या सुमारास 'संगीत शारदा', 'दोन धृवावर दोघे आपण', 'प्रेमा तुझा रंग कसा', 'तुझे आहे तुजपाशी' या सारख्या नाटकांचे स्थानिक कलावंतांनी केलेले प्रयोग प्रस्तुत लेखकाच्या स्मृतीत ताजे आहेत. विशेषतः, प्रत्येक पात्रासाठी संहितेची प्रत तयार करण्याची त्यावेळची पद्धत मोठी नमुनेदार असे. नाटकाची एखादीच संहिता उपलब्ध असे. (झेरॉक्स किंवा चक्रमुद्रणाची सोय तेव्हा उपलब्ध नव्हती. त्यामुळे प्रत्येक जण आपापले संवाद वहीमध्ये हाताने उतरवून काढत असे.) छापील संहितेतील एकेका पात्राचा एकेक संवाद कापून वहीत डकवायवा. त्याच्या आधीचे आणि नंतरचे इतर पात्रांचे संवाद संक्षिप्त रूपात हाताने लिहायचे. मग परत त्या पात्राचा पुढचा संवाद छापील संहितेतून कापून वहीत डकवायचा. अशा रीतीने प्रत्येक पात्राची एक वही तयार व्हायची. एकदा 'सं. शारदा'ची तालीम बघत असताना शारदेची संवादांची वही हाती लागली. रंगमंचावरील शारदा बोलत असलेले संवाद आणि हातातल्या वहीतले संवाद अगदी एकासारखे एक आहेत हे जाणवून प्रस्तुत लेखकाला महद्‌आश्चर्य वाटले होते.

१९६० च्या आधीच्या दशकात झालेली बहुतेक नाटके सामाजिक आहेत असे आढळून येते. अन्य विधांमधील नाटकांमध्ये विष्णुपंत औंधकर लिखित 'बेबंदशाही', वि. वा. शिरवाडकर लिखित दुसरा पेशवा (१९४७) या ऐतिहासिक, शिरवाडकरांचेच कौंतेय (१९५३) आणि भार्गवराम वरेरकर लिखित 'भूमिकन्या सीता' (१९५८) या पौराणिक नाटकांचा उल्लेख करता येईल. थोर इंग्रजी नाटककार विल्यम शेक्सपीयर याच्या नाटकांचे अनुवाद/

संस्करणे मराठी रंगभूमीवर झालेली आहेत. वि. वा. शिरवाडकरांचे राजमुकुट ('मॅक्बेथ'वर आधारित, १९५४), ऑथेल्लो (१९६०) आणि नाना जोग यांचे 'हॅम्लेट' (१९५७) या नाटकांचा निर्देश करता येईल.

या काळात नाट्यप्रयोगाचे स्वरूप कसे होते हे पाहणे योग्य ठरेल. वास्तवतावादी आशयाच्या नाटकांचे प्रयोग फ्लॅट्सीन्स वापरून केले जात. सहसा नाटक घडण्याचे स्थळ हे एखादी खोली, घरातील दिवाणखाना असे असे. दृश्य 'हुबेहुब' उभे करण्याच्या दृष्टीने नेपथ्याची संरचना असे. डिमर (मंदक) या विद्युत उपकरणाचा वापर सुरू झाला असल्याने हळुहळू उजेड करणे किंवा अंधार करणे (फेड इन किंवा फेड आऊट) शक्य झाले होते. त्यामुळे एक दृश्य संपल्यावर, पडदा न पाडता, अंधार करून (ब्लॅक आऊट) दुसरे दृश्य सुरू करता येऊ लागले. नाटकांची रचना तीन अंकी असे. नाट्यप्रयोगाचा अवधी सुमारे तीन ते साडे तीन तासांचा असे. पुणे, मुंबई व अन्य काही शहरे वगळता पक्की नाट्यगृहे उपलब्ध नव्हती. तात्पुरता रंगमंच उभारून, ओपन एअर किंवा तात्पुरत्या बंदिस्त केलेल्या नाट्यगृहांमध्ये नाटक केले जात असे. व्यावसायिक नाटककंपन्यांचे स्वरूप आजच्यापेक्षा खूपच वेगळे होते. नटवर्गाने नाटककंपन्यांचे पगारी नोकर असण्याची पद्धत मागे पडून 'नाईट'ची प्रथा रूढ होऊ लागली होती. तिकीटांचे दर सात, पाच, तीन, दोन (रूपये) असे असत.

१९६० साल उजाडले आणि मराठी रंगभूमीचे दुसरे सुवर्णयुग सुरू झाले असे म्हणणे योग्य ठरेल. व्यावसायिक आणि प्रायोगिक (किंवा समांतर असे म्हणू) अशा दोन्ही स्तरांवर खूप काही घडू लागले. सुमारे १९८५ पर्यंत ही उर्जितावस्था टिकून राहिली. नाटकाचा आजवरचा मराठी रंगभूमीचा इतिहास बघता असे दिसून आले आहे की जेव्हा जेव्हा चांगल्या संहिता उपलब्ध झाल्या तेव्हा तेव्हा रंगभूमीवर उल्लेखनीय असे काही घडले. १९६० ते १९८५ ह्या काळात उत्तमोत्तम संहिता लिहिल्या गेल्या. आणि त्यांचे संस्मरणीय प्रयोगही करण्यात आले.

नाट्यक्षेत्रात व्यावसायिक आणि प्रायोगिक अशा दोन धारा आढळून येतात. मुळात दोहोत कार्यरत असणाऱ्या व्यक्ती कलासक्त, सौंदर्योपासक आणि अभिव्यक्तीची आस लागलेल्या असतात. त्यातून अर्थार्जन होणे हा व्यावसायिक रंगकर्मीसाठी अटळ ('मस्ट') असा मुद्दा असतो. व्यावसायिक आणि प्रायोगिक या दोन वर्गांचा व्यवच्छेद याच एका घटकामुळे होतो. अर्थार्जन होण्यात ज्यामुळे बाधा येऊ शकेल असे पाऊल न उचलणे आणि ज्यामुळे अर्थार्जन नक्की होईल असे सर्व काही करणे ही कुठल्याही व्यावसायिकाची सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्वे असतात. अर्थात काय करावे आणि काय करू नये हा निर्णय केवळ 'अर्थार्जनाची खात्री' या एकाच कलमानुसार होतो असे म्हणणे म्हणजे व्यावसायिकता या संज्ञेचे अतिसुलभीकरण होईल. आणि तसे कोणीही करता कामा नये. पण वरील विचाराचा व्यत्यास असा मांडता येईल की प्रायोगिक धारेतील रंगकर्मीस तोट्याची फारशी पर्वा नसते. त्याच्या नाटकाचे खूप जास्त संख्येने प्रयोग झालेच पाहिजेत अशी त्याची धारणा नसते. त्याची अभिव्यक्ती संख्येने अल्प पण जाणकार रसिकांपर्यंत पोचली आणि त्यांची दाद मिळाली तर तो समाधान पावतो. त्यामुळे त्याला जे व्यक्त करायचे आहे ते व्यक्त करण्याची जोखीम तो घेऊ शकतो. त्यात जोखीम असलीच तर रसिकांची दाद न मिळण्याची. पण रसिकांची दाद मिळणे याचे खऱ्या रंगकर्मीला एवढे अप्रूप असते की तो ही जोखीम घ्यायला घाबरत नाही. शिवाय, एक नाटक हा काही शेवट नव्हे. पुढचे नाटक करण्याची संधी असतेच. यामुळे रंगभूमी जर घडत असेल तर त्यातील सिंहाचा वाटा प्रायोगिक/समांतर धारेचा असतो. यापुढील विवेचनात प्रायोगिक/समांतर धारेतील नाटकांचे उल्लेख प्रकर्षाने येणे क्रमप्राप्त आहे.

१९६० नंतरच्या दशकात व्यावसायिक रंगभूमीवर आलेल्या नाटकांमध्ये सामाजिक नाटकांची संख्या खूप मोठी आहे. प्र. के. अत्रे यांचे 'तो मी नव्हेच' (१९६२), बाळ कोल्हटकर यांचे 'वाहतो ही दुर्वांची जुडी' (१९६४), वसंत कानेटकर यांची 'प्रेमा तुझा रंग कसा?' (१९६१) व 'अश्रूंची झाली फुले' (१९६६) ही काही लोकप्रिय झालेली नाटके. प्रभाकर पणशीकर यांची पंचरंगी भूमिका असलेले आणि फिरत्या रंगमंचाचा वापर केलेले 'तो मी नव्हेच' बघण्यास आजही प्रेक्षक गर्दी करतात. 'दुर्वांच्या

जुडी' मधील स्खलनशील भाऊ, प्रेमळ ताई, करारी पिता आणि बावळट पण प्रामाणिक मित्र हे रसायन व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी ठरले. 'प्रेमा तुझा' मधील मध्यमवर्गीय वातावरण, नर्म विनोद, 'प्रेम' यासारखा हवाहवासा वाटणारा पण सर्वसामान्य माणसाच्या आयुष्यात अभावानेच येणारा अनुभव तर 'अश्रू'मधील पूर्वार्धात अँटि-हीरो वाटणारा आणि उत्तरार्धात हीरो होणारा लाल्या ही सारी रंजकतत्त्वे दोन घटका करमणुकीसाठी येणाऱ्या प्रेक्षकांना धरून ठेवतात. या नाटकांमधून दुष्ट-सुष्ट, स्वार्थी-परोपकारी, शूर-भित्रा, चांगला-वाईट अशा दोन टोकांच्याच वृत्तींचे दर्शन घडे. किंबहुना अशी दोन टोकेच असतात अशा गृहीत तत्वावर ही नाटके आधारित असत. परंतु ही दोन टोके म्हणजे केवळ संकल्पनात्मक अशा ध्रुवीय संकल्पना असतात आणि वास्तवात केवळ 'काळे' आणि केवळ 'पांढरे' असे काही नसून यांच्यामध्ये पसरलेला 'करड्या'चा विस्तीर्ण प्रदेश म्हणजे माणसाचे आयुष्य ही जाणीव अशा नाटकांतून अभावानेच आढळे. रंजकतेबरोबरच सामान्य माणसाच्या अंतरातल्या आशा, निराशा, महत्त्वाकांक्षा, भ्रमनिरास यांचे चित्रण करण्यास तेंडुलकरांसारखे नाटककार प्राधान्य देऊ लागले. त्यांच्या 'मी जिंकलो, मी हरलो' (१९६३) या नाटकाचे नाव या संदर्भात नमूद करता येईल. त्यांचेच 'शांतता! कोर्ट चालू आहे' (१९६७) सारखे नाटक माणसातील स्खलनशीलता, मध्यमवर्गीय अभिज्ञता आणि वरकरणी निरुपद्रवी भासणाऱ्यांच्या अंतरात दडलेली हिंसा यांचे चित्रण करते. ते वाचकाला/प्रेक्षकाला नुसते धरूनच ठेवत नाही तर अस्वस्थ करते. उपरोक्त नाटके विजया मेहता आणि अरविंद देशपांडे यांनी दिग्दर्शित केली होती. हे दोघेही समांतर धारेतून पुढे आलेले रंगकर्मी होते हे वेगळे नमूद करण्याची गरज नाही. चिं. त्र्यं. खानोलकरांनी 'अवध्य' (१९७२) या नाटकातून गंगाधर या मुख्य पात्राच्या माध्यमातून माणसाच्या मनातील आदिम प्रेरणा आणि जीवनमूल्ये यांतील संघर्ष रंगविला आहे. जयवंत दळवींची बॅरिस्टर (१९७७), महासागर (१९७९) ही नाटके माणसाच्या मनातील अगम्य व्यापारांचा शोध घेणारी म्हणून संस्मरणीय आहेत. 'बॅरिस्टर'मधील बॅरिस्टर, मावशीबाई व राधाक्का, 'महासागर' मधील दिगंबर, चंपू, सुमी व घनश्याम या व्यक्तिरेखांचे लेखकाने केलेले रेखाटन आणि विक्रम गोखले, विजया मेहता, सुहास जोशी या 'बॅरिस्टर' मधील आणि नाना पाटेकर, नीना कुलकर्णी, भारती आचरेकर या 'महासागर'मधील रंगकर्मींचा अभिनय दीर्घकाळ स्मरणात राहतील. 'वार्धक्य' हा विषय तसा ग्लॅमर नसलेला. परंतु, या विषयावर दळवींनी लिहिलेले 'संध्याछाया' (१९८३) हे नाटक नाना आणि नानी या वृद्ध जोडप्याच्या वृद्धापकाळातील आयुष्यावर आधारित आहे. सशक्त आशय, माधव वाटवे व विजया मेहता यांचा अभिनय आणि करुण रसाचा परिपोष यामुळे ह्या नाटकाचा प्रयोग उत्तम वठत असे. 'नातीगोती' (१९९०) हे दळवींचे एक असे नाटक की ज्यात माणसाच्या टिकून राहण्याच्या धडपडीचे शोकात्म दर्शन घडते. मतिमंद मुलगा, त्याचे आईवडील, आणि आईचा बापाचा साहेब अशा मोजक्याच पात्रयोजनेतून हे नाट्य दळवी उभे करतात. रत्नाकर मतकरी यांच्या अश्वमेध (१९७९) या नाटकातून एका खासगी कंपनीत उच्चपदावर काम करणाऱ्या महत्त्वाकांक्षी अधिकाऱ्याचे चित्रण केले आहे. महेश एलकुंचवार यांनी माणसाचे मनोव्यापार आणि त्यांचे नातेसंबंध यांचे वैविध्यपूर्ण अंगांनी दर्शन घडविले. तेंडुलकरांच्या 'मी जिंकलो मी हरलो' या नाटकाचा प्रयोग बघितल्यामुळे नाटक या प्रकाराकडे आकृष्ट झालेल्या एलकुंचवारांनी 'होळी' आणि 'सुलतान' या आपल्या पहिल्यावहिल्या एकांकिकातूनच आपली क्षमता दाखवून दिली. त्यांची 'पार्टी' (१९८४; दिग्दर्शक अमोल पालेकर) आणि 'वाडा चिरेबंदी (१९८५; दिग्द. विजया मेहता)' ही नाटके म्हणजे मानवी संबंधाच्या चित्रणाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. याच संदर्भात श्याम मनोहर यांची हृदय (१९८४), यकृत (१९८८), यळकोट (१९९३) आणि प्रेमाची गोष्ट (१९९७) या नाटकांचाही उल्लेख करणे योग्य राहील.

समांतर रंगभूमीवर सादर झालेले चिं. त्र्यं. खानोलकर या प्रतिभावान नाटककाराचे 'एक शून्य बाजीराव' (१९६६) हे एक या दशकातील महत्त्वाचे नाटक होय. विजया मेहता यांनी दिग्दर्शित केलेले हे नाटक 'रंगायन' या मुंबईस्थित नाट्यसंघाने सादर केले होते. यातील 'बाजीराव' ही प्रमुख भूमिका माधव वाटवे यांनी साकार केली

होती. या नाटकाचे वर्गीकरण 'असंगताचे नाटक' या विधेमध्ये करणे योग्य होईल. दुसऱ्या महायुद्धाच्या सुमारास युरोपमध्ये 'असंगताचे नाटक' (अब्सर्ड थिएटर) हा प्रकार उदयास आला होता. दुसऱ्या महायुद्धादरम्यान अनुभवाव्या लागलेल्या संहार, अनिश्चितता आणि संदिग्धता यामुळे जीवनात साकळलेपणाची गर्द छाया दाटली होती. 'असंगताचे नाटक' हे त्याच्या नावाप्रमाणे आयुष्यातील असंगतीचे (विसंगतीचे नव्हे) चित्रण करते. लुई जी पिरँदेलो, ज्याँ पॉल सार्त्र, आल्बेर कामू, युजिन आयनेस्को, सॅम्युएल बेकेट, ज्याँ जने, हॅरॉल्ड पिंटर ही असंगताचे नाटक लिहिणाऱ्या काही पाश्चात्त्य लेखकांची नावे होत. पिरँदेलोचे 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे', आयनेस्कोचे 'खुर्च्या' व 'गेंडा' आणि सार्त्रचे 'नो एक्झिट' ही असंगताची नाटके समांतर रंगभूमीवर सादर झाली आहेत. असे म्हटले जाते की ज्या उपरोक्त अवस्थेतून युरोपियन समाज गेला तशा किंवा त्याच्याशी तुलना होऊ शकेल अशा अवस्थेतून भारतीय समाजाला जाण्याची पाळीच आली नाही. सबब, संपूर्णपणे एतद्देशीय असे असंगताचे नाटक घडण्यास वाव नाही. मात्र 'एक शून्य बाजीराव' हे अस्सल मराठी वातावरणातले असंगताचे नाटक म्हणून ओळखले जाते. १९७० च्या सुमारास व त्यानंतर मराठी रंगभूमीवर आलेली काही नाटके असंगताचे नाटक या विधेतील होती. उदा. चल रे भोपळ्या टुणुकटुणुक, साय साखर (ले. अच्युत वझे), खोटं नाटक, राजाचा खेळ, बूटपॉलिश, (ले. वृंदावन दंडवते), काहूर (ले. शफाअत खान) आणि महापूर (ले. सतीश आळेकर).

'महानिर्वाण' (१९७४) लिहिणाऱ्या सतीश आळेकरांचे मराठी नाटककारांमध्ये एक वेगळेच स्थान आहे. 'मृत्यू' आणि 'अंत्यसंस्कार' या सारख्या विषयावर नाच व गाणी असलेले आणि नाट्यगृहाचे छप्पर खाली येईल असा हंशा उसळवणारे नाटक असू शकेल हे 'महानिर्वाण'चा प्रयोग बघितल्याशिवाय पटणार नाही. आपल्यावर 'कोणत्याही प्रकारचे वाङ्मयीन संस्कार कधीही जाणीवपूर्वक झाले नाहीत' असे स्पष्टपणे सांगणाऱ्या आळेकरांनी 'बेगम बर्वे' (१९७९) हे एक विलक्षण नाटक लिहिले. संगीत नाटकांत दुय्यम भूमिका करणारा स्त्रीपार्टी 'बर्वे' आणि जावडेकर व बावडेकर या पुरुष व्यक्तिरेखा यांचे एकमेकांशी असलेले वास्तव आणि स्वप्न अशा सरमिसळ पातळीवरील संबंध यावर हे नाटक आधारित आहे. आळेकरांच्या उपरोक्त नाटकांचे प्रयोग पाहण्यास प्रेक्षक आजही गर्दी करतात. तिरकस शैली, उपहासाच्या आणि उपरोधाच्या अंगाने जाणारा बुद्धिनिष्ठ विनोद आणि अद्भुताच्या आवरणाआडून जीवनातील विसंगती आणि असंगतता यांचे चित्रण ही आळेकरांची नाटककार म्हणून वैशिष्ट्ये आहेत.

'चरित्र नाटक' या प्रकारच्या काही नाटकांचा निर्देश करणे योग्य राहील. १९७० साली मंचित झालेले शिरवाडकरांचे 'नटसम्राट' (१९७०) हे नाटक बहुचर्चित ठरले. मुळात शेक्सपीयरच्या 'किंग लियर'चे रूपांतर शिरवाडकरांनी करावे आणि नटवर्य नानासाहेब फाटकांनी त्यात लियरची भूमिका करावी असा विचार होता. परंतु, शिरवाडकरांच्या हातून लियरचे रूपांतर होईना. 'लियरच्या तीरावर रेंगाळत असताना केव्हातरी एक वेगळा विचार मनात आला. नानासाहेब फाटकांसारखा रंगभूमीचा एक राजा घेऊनच आपण एका नाटकाची उभारणी का करू नये?' असा विचार त्यांच्या मनात घोळू लागला आणि त्यातूनच 'नटसम्राट' लिहिले गेले. मात्र, नानासाहेब फाटकांचा आणि या नाटकातील केंद्रवर्ती व्यक्तिरेखा गणपतराव बेलवलकर यांचा संबंध एवढाच. बालगंधर्व, गणपतराव जोशी, गणपतराव बोडस, केशवराव दाते आदी नटश्रेष्ठांच्या रंगरेषा त्यात मिसळल्या आहेत असे शिरवाडकरांनीच म्हटलेले आहे सामान्य प्रेक्षकांच्या आणि अभ्यासकांच्या व समीक्षकांच्या सारख्याच पसंतीस उतरलेल्या या नाटकाने श्रीराम लागू यांचे नाव अभिनयनैपुण्याचा मानदंड म्हणून घेतले जाऊ लागले. त्याचप्रमाणे शांता जोग यांनी साकारलेली 'कावेरी'ची (गणपतराव बेलवलकरांची बायको) भूमिकाही रसिकांनी नावाजली. या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे या नाटकातील गणपतराव बेलवलकर ही भूमिका दत्ता भट, सतीश दुभाषी, चंद्रकांत गोखले, यशवंत दत्त, राजा गोसावी, प्रभाकर पणशीकर आणि लक्ष्मण देशपांडे या अभिनेत्यांनी केली. 'नटसम्राट'-नंतर उण्यापुऱ्या दोन वर्षांच्या कालावधीत वसंत कानेटकर लिखित 'हिमालयाची सावली' हे नाटक रंगमंचावर आले. यातील प्रमुख भूमिका श्रीराम लागू व शांता जोग यांनीच

केल्या होत्या. 'सावली'लाही प्रेक्षकांची भरघोस पसंती लाभली. गुंडो गोविंद उर्फ नाना भानू ही यातील प्रमुख व्यक्तिरेखा महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्यावर आधारलेली आहे असे म्हणण्यास वाव आहे. डॉ. इरावती कर्व्यांनी अण्णासाहेब कर्व्यांवर एक लेख लिहिला होता. त्यातील, 'माझे भाग्य किती थोर, की मी या महान पुरुषाची सून झाले – पण त्याहीपेक्षा माझे थोर भाग्य हे की मी त्यांची बायको झाले नाही!' या उद्‌गारांनी वसंतराव कानेटकरांना गदगदून हलविले होते. हिमालयाएवढ्या उंचीच्या व्यक्तींच्या सहवासात येणाऱ्यांना त्याचे शिखर (त्यांचा मोठेपणा) दिसू शकत नाही. त्याच्या सावलीतच आयुष्य घालवावे लागणाऱ्या माणसांना याची झळ लागणे अपरिहार्य असते. मात्र या आशयद्रव्यापलिकडे अण्णासाहेब कर्व्यांचे आयुष्य आणि या नाटकाचे कथानक यात साम्य नाही. कानेटकरांनी नाटककाराचे कलात्मक स्वातंत्र्य वापरून कथानकामध्ये अनेक घटनांची जुळणी केली होती. भानूंना एक मुलगी असणे, भानूंना पक्षाघाताचा झटका येणे ही दोहोतील भेदाची काही ठळक उदाहरणे म्हणून सांगता येतील. या नाटकाचे वैशिष्ट्य असे की यातील शांता जोग यांनी साकारलेली 'बयो' हे भूमिका अतिशय नावाजली गेली. खरे तर असे घडणे क्रमप्राप्तच होते. अखेर ही 'शीर्षक–भूमिका (टायटल रोल)' होती. 'या नाटकात शांताबाई लागूंना खाऊन टाकतात' अशी टिप्पणी कुणा समीक्षकाने केली असता त्याला श्रीराम लागूंनी अतिशय समर्पक उत्तर दिले होते. ते म्हणाले, 'नाटकाच्या प्रांतात कुणी कुणाला खाऊन टाकणे ही प्राणीसृष्टीतली भाषा वापरणे मला मान्य नाही. पण शांताबाईंचे काम माझ्यापेक्षा जास्त परिणामकारक होत असेल तर तर या नाटकात ते तसेच व्हायला हवे आहे. संहितेची मागणी आहे. माझे काम जास्त परिणामकारक झाले तर नाटकाचा तोल जाईल – हवा तो परिणाम साधणार नाही. हे नाटक हिमालयाचे नाही, सावलीचे आहे हे ध्यानात ठेवले पाहिजे. शांताबाईंचे काम माझ्यापेक्षा जास्त परिणामकारक होते हा माझ्या दिग्दर्शनाचा विजय नाही काय? ...'. 'नटसम्राट' आणि 'सावली'नंतर कानेटकरांचेच 'कस्तुरीमृग' (१९७६) आणि रत्नाकर मतकरीकृत 'दुभंग' (१९८१) ही अनुक्रमे हिराबाई पेडणेकर आणि आचार्य अत्रे यांच्यावर आधारित नाटके सादर झाली. 'कस्तुरीमृग'च्या निमित्ताने रोहिणी ओक (हत्तंगडी) या अभिनेत्रीने व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केले.

उपरोक्त चरित्र नाटकांच्या मुळाशी एखाद्या व्यक्तीचे चरित्र होते, पण ती नाटके आत्मचरित्रात्मक नव्हती हे या आधी स्पष्ट केले आहे. मात्र विश्राम बेडेकरांचे 'टिळक आगरकर' (१९८०) हे नाटक बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांच्या प्रत्यक्ष जीवनावर आधारित आहे. ही दोन्ही नावे सुशिक्षित महाराष्ट्रीय लोकांना सुपरिचित आहेत. 'आधी स्वातंत्र्य का आधी समाजसुधारणा' हा त्यांच्यामधील वादही आम्हांस ठाऊक आहे. मात्र, त्यांच्यामधील वैचारिक मतभेदाचे पर्यवसान त्यांच्यामधील वैयक्तिक संबंध पराकोटीचे दुरावण्यात झाले होते हा तपशील जनसामान्यांना माहिती नसतो. बेडेकरांनी टिळक आणि आगरकरांच्या वैयक्तिक नातेसंबंधांचे चित्रण या नाटकात केलेले आहे. 'संध्येतील नावांबरोबर ज्यांची नावे घ्यावीत' अशा योग्यतेचे ज्यांना आपण समजतो, किंवा ज्यांचे वैचारिक वाद म्हणजे 'आकाशातील नक्षत्रांच्या शर्यती' – अशा आयकॉनिक पातळीवर ज्यांना आपण नेऊन ठेवलेले आहे अशांनी एकमेकांवर केलेले व्यक्तिगत पातळीवरचे आरोप आणि प्रत्यारोप अस्वस्थ करून सोडतात. 'संमतीवयाचा कायदा व्हावा की नाही?' या प्रश्नावरून दोघांमध्ये मतभेदाची ठिणगी उडते. बारा वर्षांच्या मुलीचा मध्यमवयीन पुरुषाशी विवाह होणे आणि गर्भादान विधीच्या नावाखाली त्या अल्पवयीन मुलीला लैंगिक संबंधाला सामोरे जावे लागणे अशी अंगावर शहारे आणणारी घटना (अर्थातच अप्रत्यक्षरीत्या. संवादांच्या माध्यमातून. रंगमंचावरून, दृश्यरूपाने नव्हे) बेडेकरांनी नाटकात योजिली आहे. या घटनेने टिळकही अतिशय व्यथित होतात. पण 'कायदे करून अशा समस्या सुटत नाहीत' अशा तत्त्वदृष्टीतून संमतीवयाचा कायदा होऊ नये या आपल्या मताचा पाठपुरावा करतात. शब्दाने शब्द वाढत जातो आणि एका क्षणी टिळकांचा उल्लेख 'महारोगी' म्हणून करण्यापर्यंत आगरकरांची मजल जाते. अर्थात झाल्या चुकीबद्दल त्यांना पश्चात्ताप होतो आणि अखेरीस टिळकांच्या मुलीच्या लग्नाचे आमंत्रण देण्याच्या

प्रसंगाने त्यांच्यातील दुरावा दूर होतो. पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या या नाटकाच्या आवृत्तीत बेडेकरांनी दीर्घ प्रस्तावना लिहिलेली आहे आणि या नाटकात योजिलेल्या घटनाक्रमांमागील आधार स्पष्ट केला आहे. प्रेमानंद गज्वी यांनी लिहिलेले 'गांधी–आंबेडकर' (१९९७) हे आणखी एक उल्लेखनीय चरित्र नाटक आहे. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर या दोन महनीय व्यक्ती या नाटकात नाट्यगत व्यक्तिरेखा म्हणून त्यांच्या वास्तविक ओळखीनिशी येतात. या दोन्ही महामानवांची प्रत्यक्ष भेट चारपाच वेळाच झाली होती. तरीही त्यांना केंद्रवर्ती कल्पून दोन अंकी नाटक लिहिणे ही अवघड कामगिरी गज्वींनी पार पाडली आहे. कस्तुरबा, नेहरू, पटेल आदी गांधींबरोबर असलेल्या आणि रमाबाई, भाऊराव गायकवाड, चित्रे, टिपणीस आदी आंबेडकरांबरोबर असलेल्या व्यक्तींचा नाटकातील व्यक्तिरेखा म्हणून समावेश करणे लेखकाने हेतुतः टाळले. 'अभ्यासाअंती जे लिहायचं होतं ते व्यक्त होण्यासाठी ही गर्दी उपयुक्त नव्हती' असे गज्वी यांनी नाटकाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. विदूषक या तिसऱ्या पात्राची त्यांनी केलेली योजना तंत्र म्हणून अभ्यासण्याजोगी आहे. पुनर्लेखन, काटछाट आदी प्रक्रियेतून पार पडत गज्वींनी नाटकाची दोन अंकी संहिता सिद्ध केली. विविध रंगकर्मी आणि रसिक व अभ्यासू श्रोत्यांसमोर त्यांनी या नाटकांची जवळजवळ पन्नास वाचने केली. त्यात गांधीवादी आणि आंबेडकरवादी दोहोंचा समावेश असे. नाट्यवाचन ऐकून गांधीवाद्यांना वाटे की गज्वींनी आंबेडकरांची बाजू घेतलेली आहे तर आंबेडकरवाद्यांना वाटे की गांधींची. (नाटकात दोहोंचे समतोल चित्रण झाले आहे असा निष्कर्ष यातून काढता येतो.) मॅजेस्टिक प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या नाटकाच्या संहितेच्या शेवटी दिलेली संदर्भग्रंथांची दीर्घ तालिका गज्वींनी नाटक लिहिताना घेतलेल्या प्रयासाची जाणीव करून देते. क्लिष्ट चर्चानाट्याचा पोत असणाऱ्या या नाटकाचे मंचन करण्यास कोणीही पुढे येणार नाही अशी भीती तेंडुलकरांसह अनेकांनी व्यक्त केली. परंतु, नाट्यनिर्माती लता नार्वेकर यांची श्री चिंतामणी ही संस्था पुढे आली. चेतन दातार यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले. भक्ती बर्वे–इनामदार, किशोर कदम आणि मंगेश भिडे या कलावंताच्या संचात या नाटकाचे प्रयोग झाले. 'घोटभर पाणी' (१९८०), 'देवनवरी' (१९८०) आणि 'तन माजोरी' (१९८०) या आधीच्या नाटकांतून गज्वींनी दलितांच्या अवस्थेचे प्रभावी चित्रण घडविले होते. या नाटकांनी गज्वींना दलित नाटककार ही ओळख प्राप्त झाली होती. जरी 'गांधी - आंबेडकर'च्या केंद्रस्थानी दलितांचे उत्थान कसे होईल हा विचार असला तरी त्यातील वैचारिकतेमुळे ते उल्लेखनीय ठरते. त्या अर्थाने 'एक चांगले चर्चानाट्य'– अशी या नाटकाची गणना करावी लागेल आणि नंतर 'दलितांच्या उत्थापनाविषयी मौलिक चर्चा करणारे' अशी पुस्ती जोडावी लागेल. गज्वींच्या 'जय जय रघुवीर समर्थ' (१९८८) या नाटकात तर दलित समाज किंवा तत्सम कुठलीच पार्श्वभूमी नाही. रामदासी पीठाच्या वातावरणातील सत्तेचे राजकारण करणारे स्वार्थी, त्यांना या मार्गापासून परावृत्त करू पाहणारे पण अंतिमतः त्यांच्याशी नाईलाजाने संघर्षाची भूमिका घेणारे आणि या संघर्षात प्राणांची आहुती देणारे सच्छील जन – अशी या नाटकाची कथावस्तु आहे. पीडितांनी आणि शोषितांनी केलेल्या असफल संघर्षाचे चित्रण करताना गज्वींनी एका अर्थाने 'दलित' या संज्ञेला व्यापक अर्थ दिला असेही म्हणता येईल. त्यांचे किरवंत (१९९१) हे नाटक ब्राह्मण जातीतल्याच पण अंत्यसंस्कार करणाऱ्या वर्गावर आधारित होते.

दलित समस्यांवरील पहिले नाटक म्हणून किसन फागू बनसोडे यांचे 'संत चोखा मेळा (१९४२) या नाटकाचा उल्लेख करता येईल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉ. आंबेडकरांच्या समर्थ नेतृत्वाखाली दलित चळवळ विविध वाटांनी जोर धरू लागली. रंगभूमी हे माध्यमही याला अपवाद नव्हते. डॉ. आंबेडकर यांच्या उपस्थितील आणि दि. १४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी झालेल्या दीक्षा संमारंभानंतर प्राचार्य म. भि. चिटणीस लिखित 'युगयात्रा' या नाटकाचा प्रयोग करण्यात आला. या प्रयोगास डॉ. आंबेडकर व त्यांचे सहा लाख अनुयायी उपस्थित होते. रामायणापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत अस्पृश्यांवर झालेल्या अन्यायाचे दर्शन घडवणाऱ्या प्रसंगाच्या मालिका–असा या नाटकाचा घाट होता. नाटकातील पहिल्या दृश्यात तपश्चर्या करणाऱ्या शंबुकाला दोषी ठरवून त्याला शिरच्छेदाची शिक्षा फर्माविणारा राम दिसतो. दुसऱ्या दृश्यात 'करुणे'च्या प्रवाहात

शोषितांना पावन करणारा बौद्ध भिख्खूचा प्रसंग दाखविला जातो. त्यानंतर मनूच्या धर्मसभेचे दृश्य दिसते. 'सेवा हीच वृत्ती शूद्रास विहित असल्याने त्याने धनसंचय करता कामा नये. तसेच त्रैवर्णिकांच्या आसनावर त्याने बसता कामा नये. बसल्यास त्याच्या पृष्ठभागी लाथ दिली जावी.' असे सांगणारा मनू या दृश्यात दिसतो. पुढील दृश्य पंढरीच्या भेटीसाठी तळमळणाऱ्या चोखा मेळ्याचे आहे. दामाजीच्या सुटकेसाठी महाराच्या वेषात धावून आलेल्या देवाच्या दृश्यानंतर नभोवक्ता म्हणतो, 'देव क्षणभर महाराचं सोंग घेईल पण महारात माणुसकीचा प्रकर्ष कल्पान्तीही घडणार नाही.' या नंतर चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे दृश्य येते. अशा मर्मभेदी आशयाच्या नाट्यप्रयोगामुळे जनमानसांवर त्याचा मोठाच दूरगामी परिणाम झाला.

दलित नाटके एकोणीसशे सत्तर पासूनच मंचित होत होती. या नाटकांची रचना 'दलितांच्या स्थितीचे दर्शन' या उद्देशाने झाली असली तरी त्यांत विविध आशयांचा आढळ होतो. यात एकांकिका व दोन/तीन अंकी नाटकांचाही समावेश आहे. अभिनव कल्पनेवर आधारित म्हणून गंगाधर पानतावणे यांच्या 'मृत्युशाला' या एकांकिकेचा उल्लेख करता येईल. मरण पावलेली माणसे मृत्यूच्या दरबारात जिवंतपणी आपण कायकाय केले याचे निवेदन करतात अशी कल्पना नाटककाराने केली आहे. आपण शिवाशिवीचे सोवळे कसे कसोशीने पाळले हे एक उच्चवर्णीय स्त्री सांगते आणि आपला नवरा त्याचे पालन करत नसे, उलट एका महाराच्या पोराला त्याने संस्कृत शिकविले अशी तक्रार करते. 'सायनाक' नामक पात्राच्या तोंडून अवघ्या दलितांची वेदना व्यक्त होते. आपल्या जमातीने या देशावर प्रेम केले, त्याला कधीही परके मानले नाही पण या देशाने मात्र आम्हाला कायम हीन मानले असे सांगून 'ह्या देशाला आमच्याबद्दल प्रेम आणि आपलेपणा केव्हा आणि कसा वाटेल?' असा सवाल हे पात्र करते. त्यावर मृत्यूदेव उत्तर देतो की माया आणि ममता अशी मागून मिळत नसते तर ती अंतःकरणात असावी लागते. मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रकरणी उसळलेल्या दंगलीने अस्वस्थ झालेल्या भि. शि. शिंद्यांनी 'काळोखाच्या गर्भात' या नाटकात सिद्राम ही व्यक्तिरेखा रेखाटली. 'दलितांना स्वाभिमानाने जगू द्या, अन्यथा तो आपल्या हातात शस्त्र घेण्यासाठी प्रवृत्त होईल. साऱ्या जगाला प्रकाश देणाऱ्या या आपल्या देशात असा काळोख जपू नका. या काळोखात दडपल्या गेलेल्या हजारो सिद्रामांना बाहेर येऊ द्या. त्यांच्या हातात शास्त्र द्या, विज्ञान द्या तरच या काळोखाच्या गर्भातून दिव्य प्रकाश पडू शकेल.' असा विचार या नाटकातून शिंद्यांनी मांडला आहे. दत्ता भगत यांची खेळिया (१९८६), वाटा पळवाटा (१९८८) तसेच रामनाथ चव्हाण यांची बामनवाडा आणि साक्षीपुरम, ही नाटके वैविध्यपूर्ण आशयांची मांडणी करणारी आहेत. या संदर्भात प्रेमानंद गज्व्वींचा उल्लेख यापूर्वी आला आहे.

सवर्ण नाटककारांनीही दलितांशी संबंधित आशय असलेल्या नाटकांची निर्मिती केलेली आढळते. दलितांच्या चळवळींबद्दल सहानुभूती व्यक्त करण्याच्या उद्देशाने अशी नाटके लिहिली गेली आहेत. डॉ. आंबेडकरांनी जेव्हा धर्मांतराचा प्रस्ताव मांडला त्यावेळी वि. दा. सावरकर यांनी 'उःशाप' हे नाटक लिहिले. यातील चोखामेळा हे पात्र धर्मांतराऐवजी मृत्यू पत्करते असे दाखविले आहे. मामा वरेरकर यांच्या 'पतितपावन' तसेच सानेगुरुजींनी लिहिलेल्या 'अस्पृश्योद्धार' या नाटकांची शीर्षकेच त्यांतील सहानुभूतीकारक आशयाचे सूचन करणारी आहेत. तेंडुलकरांच्या 'कमला'मधील शीर्षकव्यक्तिरेखा दलित आहे. त्यांच्याच 'कन्यादान' या नाटकात सवर्ण समाजातील नायिका दलित मुलाबरोबर विवाह करते असे दाखविले आहे. जयवंत दळवींच्या 'पुरुष'मधील नायिकेचा प्रियकर दलित दाखविलेला आहे. मात्र दलित नाटककारांना आणि दलित अभ्यासकांना या नाटकांचे प्रयोजन समाजप्रबोधन असे नसून दलित समाजातील दुष्ट प्रवृत्ती चित्रित करणे असे आहे असे वाटते. 'लोककथा ७८' या रत्नाकर मतकरी लिखित नाटकाचा आशय दलितांवर होणाऱ्या अत्याचारांचे चित्रण करणे हा होता. परंतु, डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या मते, 'सादरीकरणामुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचे कसब 'लोककथा ७८' मध्ये असले तरी... हे मध्यमवर्गीय दृष्टिकोणातून लिहिलेले दलितांविषयीचे नाटक होय.' प्रस्थापित आणि विषमतेवर आधारित अशा समाजरचनेशी संघर्ष आणि विद्रोह ही कुणाही पीडित आणि शोषित असणाऱ्याची मानसिकता असणे

स्वाभाविक आहे. अशा नाटककाराच्या नाटकांतून आक्रमक भूमिकेचे मंडन होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे दलित नाटकांवर भडक आणि अतिरंजित असल्याचे निरीक्षण करणाऱ्यांनी याचे भान ठेवले पाहिजे.

राजकीय जागरुकता ही कुठल्याही सक्षम आणि निरोगी समाजाची एक कसोटी असते. शेक्सपीयर म्हणतो त्यानुसार नाटक जर सृष्टीपुढे धरलेला आरसा असेल तर नाटकात या राजकीय जागरुकतेचेही दर्शन घडायला हवे. अशा नाटकांची 'राजकीय नाटक' (पोलिटिकल थिएटर) अशी वर्गवारी करता येते. राजकारण म्हणजे नुसतेच डावपेच आणि जोराजोरीचा खेळ नव्हे. राजकारण हे राज्ययंत्राशी निगडित असते. राज्ययंत्र एका मानव समूहावर शासन करत असते. त्या शासनाची एक पद्धत असते. मानवसमूहाचे कल्याण हा त्या शासन पद्धतीचा गाभा असावा लागतो, निदान तसे अपेक्षित तरी असते. आदर्श व्यवस्थेत हे सारे जुळून येते. खरे म्हणजे हे सारे जुळून आले तर तक्रारीचे (आणि राजकीय नाटक लिहिण्याचे) प्रयोजन असणार नाही. पण सारे नीट जुळून येत नाही हेच तर आपल्या भोवतालचे वास्तव आहे. म्हणूनच राजकीय नाटक लिहिले जाण्यासाठी हे वातावरण पोषक नव्हे काय? पण मराठी रंगभूमीवर अशा नाटकांची उदाहरणे अभावानेच सापडतात. गो. पु. देशपांडे यांच्या 'उद्ध्वस्त धर्मशाळा' (१९७४) 'अंधारयात्रा' (१९८८) या नाटकांचा उल्लेख करावा लागेल. सत्यदेव दुबे यांनी पुढाकार घेऊन १९७३ साली पुण्यात नाटककारांची एक कार्यशाळा आयोजिली होती. त्या कार्यशाळेला दुब्यांनी श्रीराम लागूंना आमंत्रित केले होते. लागूंच्याच शब्दात सांगायचे तर, 'या कार्यशाळेत एक रत्नच हाती लागले! गो. पु. देशपांडे या दिल्लीच्या तरुण प्राध्यापकांचे 'उद्ध्वस्त धर्मशाळा' नावाचे ते नाटक होते....'. यातील श्रीधर विश्वनाथ कुलकर्णी ही खूपच बारकावे असलेली आणि गुंतागुंतीची प्रमुख व्यक्तिरेखा श्रीराम लागूंनीच साकार केली. हे नाटक सुरुवातीला छबिलदास शाळेतील एका हॉलमध्ये करत असत. चर्चानाट्याचा बाज असणारे हे नाटक खूपच लोकप्रिय झाले. 'एक झुंज वाऱ्याशी' (१९८९) हे नाटकही राजकीय नाट्याचा एक उत्कृष्ट नमुना आहे. व्हलादलेन दोझोर्तस्येव या रशियन नाटककाराच्या 'द लास्ट अपॉईंटमेंट' या मूळ संहितेवरून पु. ल. देशपांडे यांनी रूपांतर केलेले हे नाटक 'नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स' या संस्थेसाठी वामन केंद्रे यांनी दिग्दर्शित केले होते. समर्पक शीर्षक असलेल्या या नाटकात एक सामान्य माणूस आणि राज्ययंत्र यांच्यातील निष्फळ लढतीचे चित्रण आढळते.

स्त्री समस्यांवर आधारित नाटकांची निर्मिती स्वातंत्र्यपूर्व कालापासून झालेली आढळते. मात्र त्या नाटकांमधून स्त्रीची भूमिका नेहमीच तडजोड करणारी आणि कुणासाठी तरी माघार घेणारी अशीच दिसून येते. मात्र, आपली अवस्था बदलावी म्हणून प्रस्थापित मूल्यांना आव्हान देणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा साठोत्तर कालात दिसून येतात ही नमूद करण्याजोगी गोष्ट आहे. व्यंकटेश माडगूळकरांचे 'सती' (१९६७) हे नाटक एकोणिसाव्या शतकात घडलेल्या घटनेवर आधारित आहे. लग्न झाल्यावर अगदी थोड्याच दिवसात पतीचे निधन झाल्याने नायिकेवर सती जाण्याची पाळी येते. परंतु ज्या लग्नाला केवळ एक विधी आणि उपचार यापलिकडे अर्थ प्राप्त झालेला नाही किंवा ज्या नवऱ्याबरोबर काही भावबंध निर्माण झालेले नाहीत, त्याच्यासाठी मी स्वतःचे आयुष्य संपवणार नाही अशी भूमिका घेऊन नायिका स्वतःची सुटका करून घेते आणि आपल्या गावापासून दूर परदेशात पळून जाते. त्या देशातील एक सैनिक तिला आसरा देतो. त्याच्या आधाराने ती आपले नवीन आयुष्य सुरू करते. हा सैनिक परधर्मीय असतो. कालांतराने त्याला आघाडीवर युद्धात भाग घेण्यास जावे लागते आणि त्यात त्याचा मृत्यू होतो. सैनिकाच्या मृत्यूमुळे दुःखी होऊन नायिका त्याच्या मागे सती जाते. तिसऱ्या जगातील देशांच्या (थर्ड वर्ल्ड नेशन्स) एका आंतरराष्ट्रीय समारोहात भारताच्या वतीने 'सती'चा प्रयोग करण्याचे आमंत्रण मिळाले. तत्पूर्वी नाटकाचा गोषवारा आयोजकांनी मागविला होता. तो वाचून त्यांनी अशी सूचना केली की नाटकातील सैनिक परदेशातील आणि परधर्मीय न दाखवता तुमच्याच देशातील (म्हणजे भारतीय) दाखवावा जेणेकरून त्या स्त्रीचे समर्पण (?) अधिक उदात्त वाटेल. आश्चर्याची गोष्ट अशी की असा बदल लेखकाने व दिग्दर्शकाने

स्वीकारून त्याबरहुकूम नाटकाचा प्रयोग झाला. यामुळे नाटकाशी संबंधित व अन्य काही जण अस्वस्थ झाले. त्यांच्या मते असा बदल करणे मूळ आशयाला धक्का लावणारे होते. (?) मुळातच 'सती' ही संकल्पना माणुसकीला काळिमा फासणारी असल्याने तिचे कुठल्याही कारणासाठी प्रयोजन उचित नव्हे. जरी ती आपल्या संस्कृतीचा एक हिस्सा असली तरीही. मग सती लग्नाच्या नवऱ्यासाठी असो की कुणा उपकारकर्त्यासाठी असो. उपरोक्त नायिकेचे लग्नाच्या नवऱ्याबरोबर सती जाण्यासाठी नकार देणे आणि त्यामुळे होणाऱ्या लोकक्षोभाचा सामना करणे हे जेवढे श्रेयस्कर आणि नवीन वाट फोडणारे वाटते तितकेच सैनिकाबरोबर सती जाणे प्रतिगामी वाटते. 'स्वतःच्या भावभावना आणि स्वतःचे शरीर माझे आहे' असे म्हणणारी 'शांतता कोर्ट चालू आहे' (१९६७) मधील लीला बेणारे ही एक उल्लेखनीय स्त्री व्यक्तिरेखा आहे. आपल्या भूमिकेचे समर्थन करण्यासाठी ती सकृतदर्शनी लुटुपुटीचा भासणाऱ्या पण प्रत्यक्षात खऱ्या इतक्याच हिंस्र खटल्याला सामोरी जाते. सुरेश खरे यांच्या 'संकेत मीलनाचा' (१९८०) या नाटकाची कथावस्तु विवाहबाह्य संबंधावर आधारित होती. अशा कथावस्तु मराठी नाटकांस अपरिचित नाहीत. परंतु, या नाटकातील नायिका कुठलाही गंड न ठेवता अशा संबंधांना सामोरी जाते हे या कथानकाचे वेगळेपण त्या काळात जाणवले होते. 'मित्राची गोष्ट' (१९८१) या नाटकातील सुमित्रा ही नायिका जरी स्त्री म्हणून जन्माला आली असली तरी तिच्या मनात पुरुषांबद्दल स्त्रीसुलभ असे आकर्षण जागे होऊ शकत नाही. उलट एक स्त्री तिला हवीहवीशी वाटू लागते. समलिंगी आकर्षणासारख्या वादग्रस्त विषयावरील हे नाटक तेंडुलकरांनी अतिशय संयमित शैलीमध्ये लिहिले आहे. विनय आपटे यांनी दिग्दर्शित केलेल्या प्रयोगात रोहिणी हत्तंगडी यांनी सुमित्राची भूमिका केली होती.

'मुलगी झाली हो' (१९८३) या ज्योती म्हापसेकर लिखित पथनाट्यामुळे स्त्रीजातीची कैफियत खऱ्या अर्थाने संपूर्ण महाराष्ट्रभर मांडली गेली. प्रबोधन आणि जनजागृतीचे कार्य नाटकाच्या माध्यमातून परिणामंकारकपणे कसे होते याचे या निमित्ताने प्रत्यंतर आले. ऐंशी आणि नव्वदच्या दशकात मंचित झालेल्या नाटकांतून स्त्रीच्या बदलत्या प्रतिमेचे दर्शन घडते. स्त्रीच्या शोषणाच्या विरुद्ध पद्धतशीर भूमिका घेणाऱ्या अशा या स्त्री व्यक्तिरेखा आहेत. 'सावर रे' (१९९८) हे भारत सासणे यांच्या 'एका प्रेमाची दास्तान' या कथेचे शेखर ढवळीकर यांनी केलेले नाट्यरूपांतर आहे. यातील इंदू ही एक उच्चशिक्षित आणि बुद्धिमान स्त्री आहे. ती अविवाहित आहे. तिचे एका डॉक्टरबरोबर संबंध जुळतात. त्यांच्यातील नाते शरीरसंबंधाच्या सीमा ओलांडून पुढे जाते. या गोष्टीचा इंदू जितक्या सहजतेने स्वीकार करते तितक्या सहजतेने डॉक्टर करू शकत नाही. तत्क्षणी तिच्या मनात त्याचे मूल्यमापन होऊन जाते आणि तिच्या ठायी उद्भवलेल्या टीनएज सदृश अपरिपक्व भावनांचा निरास होऊन जातो. इंदूचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे अगदी कॉलेज-जीवनापासून तिचा एक व्यंकटेश नामक मित्र असतो. त्यांची मैत्री ही खऱ्या अर्थाने अ-लैंगिक असते असे दिसते. स्त्री-पुरुष संबंधांना असे अलैंगिक रूप येणे हा मानवाच्या उत्क्रांतीमधील संभाव्य टप्पा आहे. 'झाले मोकळे आभाळ' (१९९९) या प्रदीप दळवीलिखित नाटकातील 'तपती' या नायिकेवर लग्नाआधी बलात्कार झालेला असतो. त्यातून तिला मूल झालेले असते. पण ही गोष्ट ती आपल्या पतीपासून लपवून ठेवते. याचे समर्थन, ती 'कौमार्याची व्याख्या शारीरिकच काय म्हणून? अशी व्याख्या मानसिक हवी. माझे लग्न झाले तेव्हा मी मानसिकदृष्ट्या कुंवारीच होते.' असे करते. 'माझं घर' (१९९८) या जयंत पवारांच्या नाटकातील 'विभा' ही व्यक्तिरेखा प्रेमविवाहातही कालांतराने अंतराय निर्माण होऊ शकतो ही शक्यता स्वीकारते आणि नवऱ्याने घटस्फोटाची मागणी केल्यावर त्याला होकार देते. मात्र घटस्फोटानंतर आपले घर सोडण्यास ती ठामपणे नकार देते. हे घर 'माझं घर' आहे असे ती त्याला सुनावते. काही काळानंतर तिचा भाऊ तिच्यासाठी एक स्थळ आणतो. त्या स्थळाला ती होकार देते, पण एका अटीवर. त्याने त्याचे घर सोडून तिच्या घरी रहायला आले पाहिजे. पहिल्या पतीपासून विभक्त होताना आणि पुनर्लग्न करताना विभाने घेतलेली भूमिका क्रांतिकारी आहे. विवाहानंतर स्त्रीने पतीच्या घरी रहायला जायचे हा पुरुषप्रधान

आणि पितृसत्ताक संस्कृतीमध्ये शतकानुशतके चालत आलेला पायंडा तिने मोडला आहे. जयवंत दळवी यांच्या 'लग्न' (१९९०) असेच शीर्षक असलेल्या नाटकातील अचला आणि रिंकी या मायलेकी आहेत. आपल्या विफल प्रेमविवाहाच्या अनुभवामुळे अचलामधील आई आपल्या मुलीच्या प्रियकराबद्दल अढी बाळगून बसलेली आहे. एका बाजूला ती आपल्या मुलीला स्वातंत्र्यही देते आहे पण दुसरीकडे तिच्या पर्समध्ये संततीप्रतिबंधक गोळ्यांचे पाकीटही गुपचूप ठेवून देते आहे. मुलीच्या प्रियकराबद्दल शंकित असणारी अचला त्याच प्रियकराकडून आपला 'अंत्यसंस्कार आणि अंतिमविधी' करण्याचे वचनही घेते. प्रशांत दळवींच्या 'चारचौघी' (१९९१) या नाटकातील आई, विद्या, वैजू आणि विनिता अशा चार वैशिष्ट्यपूर्ण स्त्री व्यक्तिरेखा आहेत. 'आई'ने विवाहसंस्थेची चौकट मोडून आपल्या आवडत्या पुरुषाबरोबर संबंध ठेवले आहेत आणि त्यापासून अपत्यप्राप्तीही संभवू दिली आहे. 'विद्या'चे लग्न झालेले आहे पण नवरेशाही सहन न झाल्यामुळे ती विभक्त झाली आहे. पण आपल्या मुलीच्या प्रतिपाळात नवऱ्याचा सहभाग हवा याबद्दल ती आग्रही आहे. 'वैजू'चा नवरा दिसायला चांगला आहे, माणूस म्हणूनही वाईट नाही. पण तो खुशालचेंडू आहे. स्वयंनिर्भर नाही. पण वैजूने असा निर्णय घेतला आहे की एखादा नवरा सुंदर मठ्ठ बाईला बायको म्हणून जसा मिरवतो तसा आपण या मठ्ठ देखण्या नवऱ्याला मिरवायचा. 'विनिता'ला तर दोन पुरुषांच्याबद्दल आसक्ती आहे. पण ते घडू शकत नाही म्हणून ती एकटीच राहते आहे. दळवींच्याच 'चाहूल' (१९९८) मधील 'माधवी' ही व्यक्तिरेखा वरकरणी चंगळवादी असावी असे वाटते. कारण आपल्या पतीच्या बॉसने त्याच्याबरोबर एक रात्र खंडाळ्याला घालवण्यासाठी दिलेला प्रस्ताव ती स्वीकारते. खरे म्हणजे 'कंन्झुमरिझम'साठी योजलेला 'चंगळवाद' हा प्रतिशब्द अप्रतिष्ठाकारक आहे. त्याला 'ग्राहकवाद' म्हणणे संयुक्तिक होईल. आपले जीवनमान उंचावणे ही प्रत्येक माणसाची इच्छा असते. आणि त्यात गैर ते काय? खरे तर 'चंगळवाद' का 'ग्राहकवाद' आणि त्याचे समर्थन हा मुद्दाच या नाटकाच्या संदर्भात अप्रस्तुत आहे. परंतु माधवीच्या निर्णयाकडे पाहताना दृष्टी साफ असावी एवढेच. स्त्री नासवली जाऊ शकते, पुरुष नाही. स्त्रीची अब्रू लुटली जाऊ शकते, पुरुषाची त्या अर्थाने नाही. असे का? याच तत्त्वापायी स्त्री भेद्य (व्हल्न-रेबल) झाली आहे. ही भेद्यता एकदिश आहे. न सुलट-वण्याजोगी आहे. माधवीचा निर्णय ही भेद्यता मुळापासून उखडून टाकण्याच्या दिशेने उचललेले पाऊल आहे. ती आपल्या कृत्याचे समर्थन करीत नाही आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. तिथे काय घडू शकेल याचे तिला पूर्ण भान आहे. पण त्यामुळे आता ती लज्जित वा गर्भगळित होत नाही. कारण आता ती अभेद्य आहे. जयवंत दळवींच्या 'पुरुष' (१९८२) या नाटकातील नायिका अंबिका ही एका मस्तवाल पुढाऱ्याच्या बलात्काराची शिकार होते. पण आपल्या 'बंडा' नामक मित्राच्या मदतीने ती त्या पुढाऱ्याला एकटा कोंडीत गाठून त्याचे लिंग कापून टाकते आणि आपल्यावर झालेल्या अत्याचाराचा बदला घेते. स्त्रीची अस्मिता जपणे, तिने आर्थिकदृष्ट्या स्वयंनिर्भर असणे, शरीरसंबंध व नैतिकता, कौमार्य व योनिशुचिता या संकल्पनांची पुनर्व्याख्या, स्त्रीवरील बलात्कार हा नीचतम कोटिचा गुन्हा समजून त्याला कठोरतम शिक्षा, स्त्री–पुरुषांमधील अलैंगिक संबंधांची शक्यता, मातृत्व हे अपरिहार्य न मानता ऐच्छिक मानणे आणि अपत्यसंगोपन ही स्त्रीची वैयक्तिक जबाबदारी न मानता सामाजिक जबाबदारी मानणे अशा अनेक रास्त आणि व्यावहारिक गोष्टींचे मंडन उपरोक्त नाटकांमधून होते. म्हणून मराठी रंगभूमीच्या घडणीमध्ये या नाटकांचे स्थान महत्त्वाचे आहे.

सत्तरीच्या दशकात सत्यदेव दुबे आणि अन्य रंग-कर्मींच्या प्रयत्नांमुळे अन्य भारतीय भाषांमधील संहिता मराठीमध्ये भाषांतरित झाल्या आणि त्यांचे मराठी भाषेतून प्रयोग झाले. या नाटकांपैकी गिरीश कार्नाड यांच्या 'ययाती – (भाषांतर – श्री. र. भिडे)', 'हयवदन' – (भाषांतर – चिं. त्र्यं. खानोलकर), 'नागमण्डल – (भाषांतर – उमा कुलकर्णी)' आणि 'बळी – (भाषांतर – सरोज देशपांडे)' या नाटकांचा उल्लेख सशक्त स्त्रीव्यक्तिरेखांचे चित्रण करणारी नाटके म्हणून केला पाहिजे. कार्नाडांच्या बहुसंख्य नाटकातील कथानके मिथकांवर आणि लोक-कथांवर आधारित आहेत. भारतीय संस्कृतीमधील स्त्री-

व्यक्तिरेखाप्रधान मिथकांचे आणि लोककथांचे वैशिष्ट्य हे की त्यात 'पितृसत्ताक मूल्यांचा प्रतिसंहार' होताना दिसून येतो. कार्नाडांच्या नाटकांतील नायिका पुरुषवर्चस्व नाकारणाऱ्या आहेत. 'ययाती' हे नाटक महाभारतातील राजा ययातीच्या वार्धक्य आणि तारुण्याची अदलाबदल करण्याच्या मिथ्यकथेवर आधारित आहे. ययातीपुत्र पुरुची नवपरिणीत वधू 'चित्रलेखा' हिचे पात्र कार्नाडांनी आपल्या कल्पनेतून चितारले आहे. आपल्या पतीचे तारुण्य घेऊन त्याला आपले वार्धक्य देणाऱ्या आपल्या सासऱ्याची चित्रलेखा निर्भत्सना करते. पतीच्या 'तारुण्या'वर पत्नीचा अधिकार असतो असा युक्तिवाद ती करते. वृद्ध झालेला आपला पती वैवाहिक सौख्य देण्यास असमर्थ असल्याने, आपल्या सासऱ्याने ते काम करावे अशी मागणी करण्यास ती कचरत नाही. 'स्त्री असण्याआधी मी माणूस आहे' ही चित्रलेखेच्या बाह्यात्कारी बंडखोर व्यक्तिरेखेतील अंतःस्थ चेतना आहे. 'हयवदन'मधील पद्मिनी म्हणजे सळसळते आणि उत्फुल्ल व्यक्तिमत्व असलेली बुद्धिमती स्त्री आहे. पतीच्या मित्राची ओढ लागलेली पद्मिनी आपल्या मनात उद्‌भवणाऱ्या भावनांचे दमन न करता त्या सहजपणे स्वीकारते आणि कुठल्याही गंडाने ग्रस्त न होता आपल्या मनात उत्पन्न होणाऱ्या इच्छाआकांक्षांची पूर्ती करण्यासाठी धडपडते. अंतिमतः तिच्या नशिबी लिहिलेल्या शोकात्म अंताला ती सामोरी जाते. दोन पुरुषांबरोबर राहण्याची इच्छा असणाऱ्या, 'चारचौघी' या नाटकातील 'विनिता'ने 'हयवदन'मधील 'पद्मिनी'-कडूनच स्फूर्ती घेतलेली आहे ही बाब नोंद घेण्याजोगी आहे. 'नागमण्डल'मधील राणी ही स्त्री व्यक्तिरेखा अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. मूळ लोककथेत राणी आणि तिचा नागलोकातील प्रियकर संगनमताने राणीची व्यभिचाराच्या आरोपातून सुटका करून घेतात. तिचा प्रियकर आत्महत्या करतो. परंतु, राणी आपल्या प्रियकरापासून झालेल्या मुलाहाती आपल्या प्रियकराचा अग्निसंस्कार व्हावा आणि दरवर्षी त्याचे पिंडदानही करावे असा आग्रह धरते. पिंडदान आदी गोष्टींच्या औचित्यपूर्णतेबद्दल विवाद होऊ शकतील. पण कथानकाच्या संदर्भात प्रियकर आणि त्याचा मुलगा यांच्या नात्याचे राणीने केलेले उन्नयन उल्लेखनीय आहे. या नाटकाच्या संदर्भात सत्यदेव दुबे कार्नाडासंबंधाने म्हणतात, '(हा) भारतीय रंगभूमीच्या इतिहासातला एकमेव नाटककार आहे ज्याने व्यभिचार हा सामान्य प्रकार म्हणून रंगविला आहे आणि व्यभिचारी स्त्रियांचं चित्रण सहानुभूतीने केले आहे.' 'बळी'मधील नायिका तिच्या हातून घडलेल्या विवाहबाह्य संबंधामुळे लज्जित होण्याचे नाकारते. उलट 'जे घडलं ते सुंदर होतं' अशी टिप्पणी करते.

समाजातील बदलत्या परिस्थितीनुसार असाधारण असे नैतिकतेशी निगडित प्रश्न निर्माण होतात. अशा काही प्रश्नांवर आधारित नाटके लिहिली गेली. अजित दळवी यांचे 'डॉक्टर तुम्हीसुद्धा' (१९९४) हे नाटक डॉक्टर पेशंट नातेसंबंधावर आधारित आहे. अभिराम भडकमकर यांचे 'देहभान' हे नाटक मानवी आयुष्यातील स्त्रीपुरुषांमधील शारीरिक पातळीवरील संबंधावर टिप्पणी करते. अशोक समेळ यांनी 'कुसुम मनोहर लेले' या नाटकाचे कथानक 'गर्भाशय भाड्याने देणे' या कल्पनेभोवती गुंफले आहे. अलिकडच्या काळात गणेशोत्सवाला आलेले रूप, या आशयावर आधारित असलेले चं. प्र. देशपांडे यांचे 'ढोलताशे' (२००३) हे नाटक म्हणजे – भोवतालच्या परिस्थितीला कलावंताने कलाकृतीच्या माध्यमातून दिलेली प्रतिक्रिया – याचे उल्लेखनीय उदाहरण आहे.

आतापर्यंतच्या विवेचनात उल्लेख झालेल्या नाटकांमध्ये असे काही तरी होते की ज्यामुळे त्यांनी वाचकांचे/प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. मात्र अशी सर्वच लक्षवेधी नाटके लोकप्रिय होतात असे नाही. प्रसंगी त्यांतील आशय आणि/किंवा अभिव्यक्ती ही समाजातील काही जणांना धक्कादायक अशी वाटू शकते. त्यांच्या मते अशा नाटकांचे प्रदर्शन करणे हे समाजाच्या हितास बाधा आणणारे असू शकते. 'त्रैलोक्यस्य सर्वस्य नाट्यं भावानुकीर्तनम्।' (त्रैलोक्याच्या सर्व भावभावनांचे अनुकीर्तन–अनुकरणात्मक प्रकटीकरण म्हणजे नाटक) असे भरतमुनीनेच म्हटले आहे. या न्यायाने माणसाच्या स्वभावातील अशिव अशा भावभावनांचे अनुकरणात्मक प्रकटीकरण करण्यास खरे म्हणजे प्रत्यवाय नसावा. पण आपल्या शासनास तसे वाटत नाही. म्हणूनच आपल्याकडे परिनिरीक्षण मंडळाची (सेन्सॉर बोर्ड) स्थापना करण्यात

आली आहे. यामुळे प्रसंगी कलावंताचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा विवादाचा विषय होतो. विजय तेंडुलकरांचे 'गिधाडे' ह्या नाटकाच्या संदर्भात असेच काही घडले. एकमेकांशी बोलताना सर्रास शिवीगाळ करणे, साक्षात सख्ख्या बहिणीच्या संबंधाने निषिद्ध अशा काही व्यापारांसंबंधाने अर्वाच्य शब्दात टिप्पणी करणे यासारखे अश्लाघ्य वर्तन करणारी माणसे या जगात असू शकतात – नव्हे असतातच. तेंडुलकरांनी या नाटकात अशाच माणसांचे चित्रण केले आहे. १९७१ साली 'थिएटर युनिट' या संस्थेने सादर केलेल्या 'गिधाडे'च्या प्रयोगाने मोठेच वादळ उठले. तेंडुलकरांच्याच 'सखाराम बाईंडर' (१९७२) या नाटकाच्या बाबतीत हाच प्रकार घडला. 'थिएटर युनिट'चे सत्यदेव दुबे, श्रीराम लागू तसेच 'सखाराम'चे निर्माते आणि दिग्दर्शक कमलाकर सारंग यांनी सेन्सॉर बोर्ड आणि नाटकाच्या प्रयोगास विरोध करणारे समाजातील विविध घटक यांच्याशी प्रदीर्घ लढा दिला. अंतिमतः न्यायालयाने कलावंताच्या बाजूने निकाल दिला. यानंतर 'गिधाडे'चे फारसे प्रयोग अन्य काही अडचणींमुळे होऊ शकले नाहीत. पण 'सखाराम'चे मोठ्या संख्येने प्रयोग झाले. तेंडुलकरांच्याच 'घाशीराम कोतवाल' या नाटकानेही समाजातील काही घटकांमध्ये असंतोष फैलावला. ज्या 'पी. डी. ए.' या संस्थेची 'घाशीराम' ही निर्मिती होती त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीच या नाटकाचे प्रयोग करण्यास विरोध केला. यामुळे 'घाशीराम'चे दिग्दर्शक जब्बार पटेल, त्यातील 'नाना' ही भूमिका करणारे मोहन आगाशे, सतीश आळेकर आणि अन्य अनेक संबंधित कलावंतांनी 'पी. डी. ए.'तून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी 'थिएटर ॲकेडमी' या नावाची नवीन संस्था स्थापन करून त्या संस्थेमार्फत देशात व परदेशातही 'घाशीराम'चे अनेक प्रयोग केले. 'मी नथुराम गोडसे बोलतोय' (लेखक – प्रदीप दळवी) वादग्रस्त ठरलेले अजून एक नाटक. हे नाटक सादर करणाऱ्या संस्थेची बस जाळण्यात आली होती. या नाटकातील नथुराम ही व्यक्तिरेखा विविध प्रकारे गांधीहत्येमागील तर्कशास्त्र सांगते. नाटकात योजलेल्या प्रसंगांच्या माध्यमातून लेखकाने नथुराम गोडसे याचे सहानुभूतीपूर्ण चित्रण करण्याचा प्रयास केला आहे. नाटकाच्या प्रयोगात नथुरामाच्या संवादांना काही प्रेक्षकांची खुली आणि उत्स्फूर्त दाद मिळताना दिसून येते. 'सेन्सॉर बोर्ड' असावे की नाही?, कलाकृतींचे सादरीकरण करण्यास प्रतिबंध करणाऱ्यांपासून सादरकर्त्यांना संरक्षण मिळावे का?, कलाकृतीच्या माध्यमातून काय व्यक्त व्हावे आणि काय व्यक्त होऊ नये याचे काही निकष असू शकतील का? – असे अनेक प्रश्न अशा वादग्रस्त कलाकृतींचा प्रवास बघताना उभे राहतात. अशा प्रश्नांची 'हो' किंवा 'नाही' अशी अतिसुलभ उत्तरे संभवत नाहीत. पण असे प्रश्न अशा कलाकृतींच्या निमित्ताने ऐरणीवर येतात हे ही नाकारता येत नाही.

गेल्या पन्नास वर्षांत आलेल्या नाटकांत सामाजिक विषयावर आधारित नाटकांची संख्या खूपच जास्त आहे हे आतापर्यंतच्या विवेचनातून दिसून येते. ऐतिहासिक कथावस्तुवर आधारित नाटकांमध्ये वसंत कानेटकरांचे 'रायगडाला जेव्हा जाग येते' (१९६२) हे एक महत्त्वाचे नाटक होय. ऐतिहासिक नाटक म्हणजे भूतकाळातील घटनांचे उदात्तीकरण, या साचेबंद परंपरेला छेद देणारे असे या नाटकाचे काही समीक्षकांनी गौरवपूर्ण वर्णन केले. काही समीक्षकांना यातील शिवाजी महाराज व शंभूराजे यांच्यातील पितापुत्र संघर्षाची उंची खुजी वाटली. संहिता ते प्रयोग या नाटकाच्या अवस्थांतरात काय भर पडू शकते आणि काय गमावले जाऊ शकते यासंधाने परस्परविरोधी निरीक्षणे 'रायगड'च्या संदर्भात नोंदविली गेली आहेत. या नाटकाला मिळालेले उत्तम व्यावसायिक यश, काशिनाथ घाणेकरांनी रंगविलेल्या 'संभाजी' या व्यक्तिरेखेला लाभलेली अफाट लोकप्रियता आणि 'मला या नाटकातील काशिनाथाचा अभिनय अजिबातच आवडलेला नाही....' हे खुद्द कानेटकरांचे मत–या गोष्टींची संगती कशी लावावी असा प्रश्न पडतो. कानेटकरांनी 'रायगड'नंतर 'इथे ओशाळला मृत्यू' (१९६८) आदी ऐतिहासिक नाटके लिहिली. पण त्यांना 'रायगड'च्या यशाची बरोबरी करता आली नाही. राणी लक्ष्मीबाईच्या जीवनावर 'वीज म्हणाली धरतीला' हे वि. वा. शिरवाडकर लिखित ऐतिहासिक नाटक १९७० साली मंचित झाले. याव्यतिरिक्त, पानिपतच्या तिसऱ्या लढाईचा इतिहास सांगणारे विश्वास पाटील यांचे 'रणांगण' हे नाटक उल्लेखनीय होते. दिग्दर्शक वामन केंद्रे यांनी योजिलेले

मोजके नेपथ्य आणि बिनवास्तवतावादी शैलीतील सादरीकरण ही या प्रयोगाची वैशिष्ट्ये होत. कन्नड भाषक नाटककार गिरीश कार्नाड यांच्या 'तुघलक' या ऐतिहासिक नाटकाचे विजय तेंडुलकर यांनी केलेल्या मराठी अनुवादाचे काही मोजकेच प्रयोग मुंबईस्थित 'आविष्कार' या संस्थेने केले. यातील तुघलक ही शीर्षकभूमिका अरुण सरनाईक या सिनेकलावंताने वठविली होती. कार्नाडांच्याच 'तलेदण्ड' या नाटकाच्या उमा कुलकर्णी यांनी केलेल्या मराठी अनुवादाचा प्रयोग पी. डी. ए. या संस्थेने केला होता. 'तुघलक' व 'तलेदण्ड' या दोन्ही ऐतिहासिक नाटकांतून तत्कालीन वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण कार्नाडांनी केलेले आहे. आपल्या कल्पनाशक्तीच्या व प्रतिभेच्या साहाय्याने ऐतिहासिक सत्य सौंदर्यपूर्ण करून मांडणे हे कार्नाडांचे वैशिष्ट्य आहे. वर्तमानकालीन संदर्भातही ही नाटके अर्थपूर्ण वाटतात आणि म्हणूनच आजही ही प्रस्तुत ठरतात.

१९६० ते १९७० या दशकात कानेटकरांचे 'मत्स्य-गंधा' (१९६४) आणि शिरवाडकरांचे 'ययाती आणि देवयानी' (१९६६) ही पौराणिक नाटके रंगमंचावर आली. या दोन्ही नाटकांचे वैशिष्ट्य म्हणजे ही संगीत नाटके होती. दोन्ही नाटकांचे संगीत दिग्दर्शन जितेंद्र अभिषेकी यांनी केले होते. पौराणिक नाटक म्हटले म्हणजे अद्‌भुत-रम्य कथानक, चमत्कारांची रेलचेल अशा पारंपरिक कल्पनांना पूर्ण नकार देणारी ही दोन नाटके होत. जेव्हा लेखक कालअक्षावर मागे जाऊन पौराणिक कथानकाची निवड करतो आणि चिरंतन अशा काही संकल्पनांवर भाष्य करतो तेव्हा त्यातून एक श्रेष्ठ कलाकृती निर्माण होऊ शकते – या विचाराचे साक्षात प्रमाण म्हणजे ही उपरोक्त दोन नाटके. 'मत्स्यगंधे'तील भीष्म, सत्यवती आणि अंबा या अतिशय सशक्त व्यक्तिरेखा कानेटकरांनी रंगविल्या. एक स्त्रीलंपट बाप आणि त्याचा करारी मुलगा आणि पुरुषजातीबद्दल भ्रमनिरास झालेल्या दोन स्त्रिया या मूलद्रव्यातून खरे तर मेलोड्रामाशिवाय काही निष्पन्न झाले नसते. परंतु, सार्त्रचा प्रभाव असलेल्या कानेटकरांना 'आपल्या जीवन मार्गाची निवड आपण स्वतः करणे' या अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या प्रमुख विचाराचे उपयोजन उपरोक्त व्यक्तिरेखांच्या कृती व उक्तीत दिसले. 'भगवद्‌गीतेमध्ये आढळणारे तत्त्वज्ञान अनेक बाबतीत अस्तित्ववादी वैचारिकतेशी जुळणारे आढळते', ह्या निष्कर्षाप्रत कानेटकर या आधीच येऊन पोचले होते. श्रेष्ठ वाङ्‌मयमूल्य व तितकेच श्रेष्ठ प्रयोगमूल्य असलेले तिसऱ्या अंकातील भीष्म व अंबा यांच्यामधील दोन प्रवेश हे या नाटकाचे बलस्थान आहे. वस्तुतः अंबेच्या जगावेगळ्या प्रणयाची आणि सूडाची कहाणी सांगणारे आणि शरपंजरी पडलेल्या भीष्माची व्यथा आणि त्याचे वैफल्य रंगविणारे 'शिखंडी' हे नाटक लिहिण्याचा संकल्प सोडल्याचे कानेटकरांनी 'मत्स्यगंधा'च्या प्रस्तावनेत नमूद केले आहे. 'ययाती आणि देवयानी' हे नाटक महाभारतातील ययाती राजाच्या मिथकावर आधारित आहे. वार्धक्य आणि तारुण्य यांच्या अदलाबदलीचा शिर-वाडकरांनी लावलेला सर्वस्वी वेगळा अन्वयार्थ हे या नाटकाचे वैशिष्ट्य. या दोन्ही नाटकांमुळे, विशेषतः 'मत्स्यगंधा' या नाटकामुळे रामदास कामत या नाट्यगीत गायकाचा उदय झाला. त्यांनी गायलेली 'मत्स्यगंधा'मधील गाणी अतिशय लोकप्रिय झाली. पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित 'सं. कट्यार काळजात घुसली' या नाटकास रसिक प्रेक्षक आणि समीक्षक दोहोंची पसंती लाभली. उपरोक्त तीनही नाटकांचे संगीतदिग्दर्शन जितेंद्र अभिषेकी यांनी केले होते. संगीत नाटकातील संगीताला अभिषेकी यांनी नवीन रूप दिले. वसंतराव देशपांडे यांनी केलेली 'खाँसाहेब' ही भूमिका विशेष नावाजली गेली. अभिषेकींनी स्वरबद्ध केलेली आणि वसंतराव देशपांडे व प्रसाद सावकार यांनी गायलेली 'कट्यार'मधील नाट्यगीते आजही अतिशय आवडीने ऐकली जातात.

खरे म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील संगीत नाटकांचा प्रभाव ओसरत गेला होता. परंतु छोटा गंधर्व, जयराम आणि जयमाला शिलेदार, वसंतराव देशपांडे, भार्गवराम आचरेकर, प्रसाद सावकार, कीर्ती शिलेदार आदी संगीत आणि अभिनय या दोन्ही कलांमध्ये निपुण असणाऱ्या कलावंतांमुळे संगीत नाटके सुरू राहिली. सं. सौभद्र, सं. मानापमान, सं. संशयकल्लोळ आणि सं. स्वयंवर या नाटकांचे प्रयोग निदान पुण्यात होताना आढळतात. मात्र संगीत नाटकांचे प्रयोग महाराष्ट्रातील अन्य शहरात अभावानेच होत असतात.

गेल्या पन्नास वर्षात सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक व संगीत आदी विविध प्रवाहांमधील आणि कौटुंबिक, समस्याप्रधान, राजकीय, विनोदी व समकालीन घडामोडींवर आधारित आदी भिन्न प्रकृतीच्या आशयांशी संबद्ध नाटके महाराष्ट्रातील रंगभूमीवर आली हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. गेल्या पन्नास वर्षात महाराष्ट्रात जे काही घडले त्याचा आणि महाराष्ट्रातील रंगभूमीवरील घटितांचा काही संबंध लावता येईल का असा प्रश्न उपस्थित होतो. नाटक हे प्रथम संहिता आणि मग प्रयोग या अनुक्रमाने घडते. त्यामुळे नाटकाचा उगम म्हणजे लेखकाची लेखणी हा असतो. 'साक्षीपुरम'सारख्या नाटकाचे मूळ मीनाक्षीपुरम येथील धर्मांतराच्या घटनेमध्ये आहे. हे नाटक आणि तत्कालीन सामाजिक वास्तव यात थेट संबंध दिसून येतो. या नाटकाची संहिता कारक घटनेनंतरच्या नजीकच्या भविष्यकालात प्रकाशित झाली आणि तिचे प्रयोगही झाले यामुळे हा संबंध अधोरेखित होण्यास मदत झाली. परंतु, शोषित आणि पीडितांवरील अन्याय हे सार्वकालिक असे घटित आहे. या आशयावर आधारित 'लोककथा ७८' १९७८ सालीच का आले याचे संयुक्तिक उत्तर देता येत नाही. नजीकच्या भूतकालात घडलेली दलितांवरील अन्यायाची घटना हे त्यामागील तात्कालिक कारण असू शकेल. शोषितांवरील अन्यायाबद्दल लेखकाच्या मनात असलेली चीड ही नाटकं लिहिण्यामागील प्रेरणा आहे असे म्हणणे योग्य होईल. मग गेल्या पन्नास वर्षात महाराष्ट्रात जे घडले त्याचा आणि महाराष्ट्रातील रंगभूमीवर जे घडले त्याचा संबंध कसा लावायचा? या प्रश्नाचे उत्तर नाट्यलेखनाच्या प्रक्रियेत शोधता येते. भरतमुनीने नाट्यशास्त्रात नाटकाचे वर्णन 'भावानुकीर्तनम्' म्हणजेच भावांचे अनुकरण असे केले आहे. एखादा अनुभव व्यक्त करण्यासाठी नाटककार एक 'उपकरण (apparatus)' घडवितो. म्हणजेच एखादा प्रसंग निर्माण करून त्यात तो काही पात्रे आणतो. त्यांना सुयोग्य असे उत्तेजन किंवा प्रोत्साहन (stimulus) देतो. त्यामुळे ती पात्रे त्या उत्तेजनाला स्वाभाविक अशा शारीरिक व मानसिक अशा प्रतिक्रिया देऊ लागतात. या समुच्चयातील घटकांना भरतमुनीने विभाव, अनुभाव आणि व्यभिचारिभाव असे संबोधले आहे. एखाद्या पात्राला (म्हणजेच नाट्यगत वास्तवातील व्यक्तीला) काही प्रतिक्रिया देण्यासाठी जी गोष्ट प्रवृत्त करते किंवा कारणीभूत होते ती 'विभाव' आणि विभावामुळे पडलेला मानसिक प्रभाव आणि घडलेली शारीरिक प्रतिक्रिया म्हणजे 'अनुभाव' होय. याच प्रक्रियेचा पुढील भाग म्हणजे प्रभावित व्यक्तीला वैविध्यपूर्ण अशा मानसिक अवस्थांची अनुभूती येते. यांना भरत 'व्यभिचारि भाव' असे संबोधतो. जेव्हा एखादा अनुभव कलामाध्यमाद्वारे सादर केला जातो तेव्हा तो एक आनंददायक आणि आस्वाद्य असा अनुभव असतो. अशा अनुभवाला आणि त्याच्या आस्वादाला भरताने 'रस' अशी संज्ञा दिलेली असून उपरोक्त घटकांच्या आंतरप्रक्रियेची त्याने केलेली मीमांसा म्हणजेच 'रससूत्र' किंवा 'रससिद्धांत' होय. वास्तविक आयुष्यातील प्रत्येक अनुभव आनंददायक आणि सुखकर असतो असे नाही, परंतु कलामाध्यम तो तसा करते. वाङ्मय व नाट्यकलेतील आशयद्रव्य आणि त्याची वाचकांवर/प्रेक्षकांवर होणारी भावनिक प्रतिक्रिया हा एक आस्वाद्य अनुभव असतो ही भरताची 'रस' विषयक धारणा आहे.

रस ही एक वादग्रस्त संकल्पना आहे हे स्वीकारूनही नाटक लिहिले जाण्याच्या प्रक्रियेवर भरतमुनीच्या सिद्धंतनाने प्रकाश पडतो हे मान्य करावे लागते. या सिद्धंतनातून 'अनुभव' (आशय) आणि 'उपकरण' यांची भरताने केलेली फोड स्पष्ट होते. जर अनुभव तात्काल भूतकालातील (किंवा वर्तमानातील) असेल तर सद्यःसामाजिक स्थिती आणि नाटक यांतील संबंध लगेच ओळखू येतो. उदा. या आधी उल्लेखिलेली स्त्री समस्यांवर आधारित 'माझं घर' आदी नाटके. या नाटकांतील 'उपकरण' (म्हणजे पात्रे, सामाजिक संदर्भ) सुद्धा समकालीन आहे. परंतु, 'तुघलक'सारख्या नाटकातील उपकरण बाह्यात्कारी मध्ययुगीन कालातील असले तरी त्यातील अनुभवाचे वर्तमानाशी आश्चर्यकारक साधर्म्य दिसून येते. पण अनुभव आणि उपकरण यांची निवड नाटककाराने हेतुपुरस्सर केलेली असते का? - तर याचे उत्तर शंभर टक्के होकारार्थी संभवत नाही. (नाट्यलेखनाची प्रक्रिया सुरू करताना कदाचित लेखकाच्या मनात काही एक आराखडा तयार असला तरी लेखनाच्या प्रक्रियेचा प्रवास लेखकाच्या हातात रहात नसल्याचे गिरीश कार्नाडांसारख्या नाटकाराने

नमूद केले आहे.) सद्यकालीन सामाजिक वास्तवाशी नाते सांगणारे आणि चिरंतन सत्याचे प्रकटीकरण करणारा असे अनुभवाचे तर वर्तमानातील आणि भूतकालातील असे उपकरणाचे प्रत्येकी दोन प्रकार संभवतात. यांच्या एकत्रीकरण आणि अदलाबदल (permutation and combination) यातून उदभवणाऱ्या चार शक्यता आणि त्यांची उदाहरणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

उपकरण	**अनुभव**	**नाटकाचे नाव**
वर्तमान	चिरंतन सत्य	सखाराम बाईंडर
भूत	वास्तव	तुघलक, घाशीराम कोतवाल
वर्तमान	वास्तव	अधांतर, चाहूल
भूत	चिरंतन सत्य	ययाती (ले. गिरीश कार्नाड)

उपरोक्त नाटकांच्या लेखनाच्या/प्रयोगाच्या काळात फार जास्त फरक नाही हे स्पष्ट आहे.

नाट्यकृतीच्या निर्मितीस विशिष्ट सामाजिक स्थिती कारणीभूत होणे हा जसा नाटक आणि सामाजिक स्थिती यांच्यामधील परस्परसंबंधाचा एक भाग आहे तसाच एखाद्या नाट्यकृतीमुळे समाजात काही प्रतिक्रिया उमटणे हा दुसरा भाग म्हणता येईल. या आधी सांगितलेल्या आणि व्यक्तीच्या बाबतीत संभवणाऱ्या विभाव, अनुभाव या क्रिया–प्रतिक्रिया समाजाच्या बाबतीतही संभवतात. जीवनशैली, पेहराव, फॅशन अशा गोष्टींमध्ये चित्रपटांमुळे जसे बदल घडून येताना दिसतात तसे नाटकांमुळे घडून आलेले दिसत नाहीत. हिंदी किंवा इंग्रजी चित्रपटांना राष्ट्रीय पातळीवरील आणि सर्व थरातील प्रेक्षकवर्ग लाभतो. मराठी नाटक तुलनेने फारच कमी लोकसंख्येपर्यंत पोचते हे त्या मागील प्रमुख कारण म्हणून सांगता येईल. काही नाटकांमुळे समाजात क्षोभ निर्माण होण्याचे प्रसंग घडले. ज्या नाटकांमुळे वादंग निर्माण झाले त्यामागील कारणेही विविध आहेत. अनुभवाबद्दल तीव्र आणि पराकोटीची नापसंती हे त्यामागील प्रमुख कारण होते. माणसाच्या मनात जाग्या होणाऱ्या अशिव अशा भावांचे दर्शन घडविण्यास काही लोकांचा विरोध होता. उपकरणाच्या केंद्रस्थानी 'सखाराम'सारखे काल्पनिक पात्र असलेल्या किंवा नाना फडणीसांसारखे ऐतिहासिक पात्र असलेल्या अशा दोन्ही नाटकांना लोकक्षोभास सामोरे जावे लागले. यासंबंधाने यापूर्वी विवेचन केले आहे.

रंगकर्मी, अभिनय, काल आणि अवकाश हे नाट्यप्रयोगाचे घटक असतात असे म्हणता येते. या घटकांच्या संदर्भात गेल्या काही वर्षात काय घडले याचे विवेचन करणे योग्य राहील. स्वातंत्र्यपूर्व काळात व्यावसायिक रंगकर्मी हे नाटककंपनीचे पगारी नोकर असत. नंतरच्या काळात ही पद्धत मागे पडली आणि 'नाईट'च्या पद्धतीने रंगकर्मी काम करू लागले. 'नाटक' याविषयाचे पद्धतशीर प्रशिक्षण घेण्याची सुविधा दिल्लीस्थित नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा या व्यतिरिक्त नव्हतीच. त्यामुळे मराठी रंगभूमीवर प्रशिक्षित रंगकर्मी असण्याचे प्रमाण अत्यल्प होते. प्रामुख्याने राज्यनाट्य स्पर्धा आणि कामगार कल्याण मंडळाच्या स्पर्धा ही रंगकर्मींची गंगोत्री होती. व्यावसायिक रंगभूमीवर पूर्णवेळ काम करणे हा निर्णय तसा धाडसीच समजला जात असे. सत्तरच्या दशकात सुरू झालेला टी. व्ही. कित्येक वर्षे मुंबई व पुणे या शहरांपुरताच आणि तोही संध्याकाळी सहा ते दहा एवढ्याच काळापुरता मर्यादित होता. त्यामुळे टी. व्ही. वरील संधींचे प्रमाण मर्यादित होते. १९८४ सालच्या ऑलिंपिक स्पर्धांच्या निमित्ताने काळापांढरा टी. व्ही. रंगीत झाला आणि प्रक्षेपणही राष्ट्रीय स्तरावर सुरू झाले. प्रक्षेपणाचा कालावधीही वाढला. यामुळे ज्यांना कलाप्रांतातच, विशेषतः अभिनय या क्षेत्रात करीयर करायचे होते त्यांच्यासाठी मोठीच संधी उपलब्ध झाली. कालांतराने या क्षेत्राचे खासगीकरण झाल्यानंतर खूप मोठ्या संख्येने वाहिन्या सुरू झाल्या आणि मग तर संधीची उपलब्धी खूपच मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे नाट्यक्षेत्रात काही कामगिरी करण्यासाठी ज्यांनी आपला वेळ दिला असता, त्यांनी टी. व्ही. ला अग्रक्रम दिला आणि जेव्हा व जमेल तसे नाटक सुरू ठेवले. असे असले तरीही आपले 'फर्स्ट लव्ह' नाटक हेच असते असे ही टी. व्ही. वर 'बिझी' असलेली कलावंत मंडळी आवर्जून सांगताना आढळून येतात. सुमारे गेल्या पंधरा वर्षांपासून पुणे विद्यापीठातील 'ललित कला केंद्र' या विभागातून 'नाटक' या विषयाचे पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. यातून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेले तरुण रंगकर्मी

मुंबईत आपला जम बसवताना दिसून येतात. मात्र केवळ नाटकं करून चरितार्थ चालवणे हे शक्य नसल्याने त्यांना टी. व्ही., चित्रपट आणि जाहिरात अशा अन्य क्षेत्रात पैसे मिळविण्यासाठी काम करावे लागते. त्यांना (किमान काही जणांना) या कामातून उत्तम अर्थप्राप्ती होते असे आढळते. पण मग नाटकाला दुय्यम स्थान मिळणे अपरिहार्य होते. पण असे असूनही प्रशिक्षित रंगकर्मींमुळे नाट्यप्रयोगाकडे बघण्याची नजर खूपच बदलते आहे. आजच्या रंगकर्मींमध्ये एकूणच रंगभाषेविषयीची चांगली जाण दिसून येते.

नाट्यप्रयोगाच्या (परफॉर्मन्स या अर्थाने) 'अभिनय' या घटकात सतत काही ना काही प्रयोग (एक्सपरिमेंट्स अशा अर्थाने) होताना आढळून येतात. 'अभिनय' या संज्ञेचा अर्थच 'कडे नेणे' असा आहे. आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्त्विक या अभिनयाच्या चार प्रकारांच्या उपयोजनाने अभिनेता स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला नाटकातील व्यक्तिरेखें'कडे नेतो'. अभिनयशैलीचे वास्तवतावादी आणि बिनवास्तवतावादी अशा दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण करता येते. १९५० पर्यंत बहुतांश नाटकांची कथानके ऐतिहासिक किंवा पौराणिक असत. अशा नाटकांमधून बिनवास्तवतावादी शैलीचा अभिनय दिसून येत असे. परंतु, या आधी स्पष्ट केल्याप्रमाणे १९५० नंतरच्या काळातील नाटकांचा आशय माणूस आणि माणसाचे मन यावर केंद्रित होऊ लागला. त्यामुळे अशा नाटकांमधून वास्तवतावादी शैलीच्या अभिनयाचे दर्शन घडू लागले. परंतु, नव्यानेच मूळ धरू पाहणाऱ्या वास्तवतावादाला प्रतिक्रिया म्हणून की काय, चिंतनगर्भ आशयांची मांडणी बिनवास्तवतावादी शैलीतून चपखलपणे झाल्याचीही उदाहरणे दिसून येतात. उदा. सतीश आळेकर, श्याम मनोहर यांची नाटके.

काल आणि अवकाश हे प्रयोगाचे घटक आहेत असे याआधी म्हटले आहे. याचे थोडे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल. काल आणि अवकाश या दोन मूलभूत संकल्पना आहेत. या दोन संकल्पनांशिवाय सृष्टीतील व्यापारांचे आकलन करणे शक्य होत नाही. नाट्यगत वास्तवालाही या दोन परिमिती लागू पडतात. नाट्यगत वास्तवातील काल आणि अवकाश यांची अनुकृती विविध मार्गांनी रंगमंचावर केली जाते. कालाची अनुकृती प्रकाशयोजनेच्या तर अवकाशची अनुकृती नेपथ्याच्या मदतीने केली जाते. सुमारे १९६० च्या सुमारास 'डिमर' हे यंत्र उपलब्ध झाले. त्यामुळे प्रकाशयोजनेच्या तंत्रामध्ये लक्षणीय बदल घडून आला. यापूर्वी दिव्याची उघडझाप खटक्यांच्या मदतीने केली जात असे. त्यामुळे दिवे चालू करणे किंवा बंद करणे हे खटकन होत असे. तसेच उजेडाची तीव्रता बदलणे शक्य नसे. परंतु, डिमरमुळे मंद गतीने अंधार किंवा प्रकाश घडवून आणणे शक्य झाले. यामुळे एका दृश्यातून दुसऱ्या दृश्याची सुरुवात विनाविक्षेप करता येऊ लागली. साहजिकच प्रयोगाचा बंध प्रवाही आणि लवचिक होण्यास मदत झाली. तसेच प्रसंगातील भावावस्थेनुसार प्रकाशाची तीव्रता नियंत्रित करणे शक्य झाले. आता डिमर ऐवजी 'पल्सर' ही यंत्रणा उपलबध झाली आहे. पल्सर आटोपशीर आकाराचा असतो. त्यावर आठ, सोळा किंवा जास्त सरकत्या कळींची योजना असते. प्रत्येक कळीने एका दिव्याचे किंवा दिव्यांच्या एका संचाचे नियंत्रण करता येते. पल्सरमुळे प्रकाशयोजनाकार एकाचवेळी अनेक दिवे सहजगत्या नियंत्रित करू शकतो. त्यामुळे प्रकाशयोजनेच्या नाना परी शक्य झाल्या. (परदेशातील नाट्यगृहांमध्ये आता संगणकाच्या मदतीने प्रकाशयोजना केली जाते.) प्रकाशाची रंगछटा बदलण्यासाठी आता चांगल्या दर्जाचे रंगीत कागद (फिल्टर्स) उपलब्ध आहेत. ते जास्त तपमानातही टिकाव धरू शकतात.

काल या परिमितीच्या संदर्भात 'नाट्यकाल' म्हणजे प्रयोगाचा अवधी यासंबंधाने काही निरीक्षणे नोंदविता येतील. संगीत नाटकांच्या काळात नाट्यप्रयोगाचा अवधी पाच ते साडेपाच तास एवढा असे. त्यातील अंकांची संख्याही पाच किंवा जास्त असे. मात्र १९६० च्या सुमारास तीन अंकी नाटके लिहिली जाऊ लागली. प्रयोगाचा अवधी सुमारे तीन ते साडेतीन तास इतका कमी झाला. हा कल सुमारे १९८० पर्यंत सुरू राहिला. यानंतर दोन अंकी नाटके आणि प्रयोगाचा अवधी सुमारे सव्वादोन ते अडीच तास (दहा ते पंधरा मिनिटांचे मध्यंतर धरून) असा कल प्रस्थापित झाला. नाट्यगृहे दुपारी बारा ते चार, संध्याकाळी चार ते आठ आणि रात्री आठ ते बारा अशा चार चार तासांच्या तुकड्यांत दिली जातात. जी

नाटके मुळात तीन अंकी या स्वरूपात लिहिली होती आणि ज्यांचा प्रयोगाचा कालावधी तीन ते साडेतीन तास असे त्या नाटकांच्या संहिता संकलित करून दोन अंकी केल्या जातात आणि प्रयोगाचा अवधीही दोन ते अडीच तास असा नियंत्रित केला जातो. उदा. नटसम्राट, रायगडाला जेव्हा जाग येते इ. खरे म्हणजे असे केल्याने मूळ नाटकातील जो भाग संकलित केला तो मुळातच आवश्यक होता का? – असा प्रश्न उपस्थित होतो. पण एक कथावस्तु दोन प्रकारे मांडता येऊ शकते असेही या प्रश्नाचे उत्तर देता येते.

एकांकिका या नाट्यप्रकाराने तर १९६० पासूनच मूळ धरले होते. महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये एकांकिका स्पर्धांचे आयोजन केले जाते. आंतरमहाविद्यालयीन, आंतरबँक अशा स्तरांवरील स्पर्धांमध्ये स्पर्धक अत्यंत उत्साहाने आणि मोठ्या संख्येने सहभागी होतात. एकांकिकाचे पूर्ण लांबीचे नाटक करून ते व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी झाल्याची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतात. उदा. ऑल द बेस्ट.

सुमारे सव्वा तास ते पावणेदोन तास सलग प्रयोगावधी असलेला 'दीर्घांक' हा नाट्यप्रकार सध्या समांतर धारेमध्ये लोकप्रिय होतो आहे. व्यावसायिक स्तरावर हा नाट्यप्रकार आढळून येत नाही. लहान नाट्यगृहांमध्ये आणि कमी संख्येच्या प्रेक्षकांसमोर प्रयोग होत असल्याने यातून तीव्र अनुभूती देण्याची क्षमता या प्रकारात आहे.

मानवी संस्कृतीमध्ये विविध कारणांसाठी अवकाश उत्क्रांत होतात. उदा. घर, बाग, शाळा, इस्पितळ, बाजारपेठ, रेल्वेस्थानक इ. सद्यकालीन नाट्यगृह हा अवकाशही नाटक सादर करणे यासाठी उत्क्रांत झालेला अवकाश आहे. नाट्यप्रयोगाशी निगडित अवकाशाचे स्वरूप दुपेडी असते. नटांचा नाटक करण्याचा (रंगमंच, रंगपट इ.) आणि प्रेक्षकांचा नाटक बघण्याचा अवकाश (प्रेक्षागृह बाहेरील मोकळी जागा इ.) असे नाट्यावकाशाचे दोन भिन्न घटक असतात. कमानीमंचाच्या नाटकघरांमध्ये या दोन अवकाशांचे पडद्याने विभाजन होते. पडदा उघडल्यावर नटांचा अवकाश प्रकाशमान होऊन आणि प्रेक्षकांचा अवकाश अंधारात जाऊन हे विभाजन अधोरेखित होते. नाट्यगत अवकाशाची अनुकृती करण्यासाठी नाट्यप्रयोगात 'नेपथ्या'चा वापर केला जातो. १९६० सालापूर्वीच्या नाटकांत रुळांच्या पडद्यांचा वापर होत असे. मंदिर, राजदरबार अशा विविध स्थळांची दृश्ये रंगविलेले हे पडदे रंगमंचाच्या अगदी वरच्या भागात झालरींच्या आड लटकावून ठेवलेले असतात. पाहिजे तेव्हा हवे ते दृश्य रंगविलेला पडदा वरून खाली सोडला जाऊन त्यासमोर दृश्य सादर होत असे. दर्शनी पडद्यापासून सुमारे तीन ते चार फूट अंतरावर एक रस्त्याचे दृश्य असलेला पडदा असे. या पडद्यासमोर दृश्य सुरू असताना मागील बाजूस पुढील दृश्यातील मंचवस्तूंची मांडामांड चाले. १९६० नंतर रुळांचे पडदे मागे पडून फ्लॅटसीन्सचा उपयोग सुरू झाला. बिनवास्तवतावादी शैलीच्या प्रयोगात संकेतांच्या मदतीने स्थलनिर्मिती होऊ शकते. मात्र वास्तवतावादी शैलीतील प्रयोगात स्थलनिर्मितीसाठी रंगविलेले पडले, फ्लॅटसीन्स आणि मंचवस्तू यांचा वापर केला जातो. बहुतेक सामाजिक नाटके ही अजूनही 'स्थळ : घरातील दिवाणखाना' – येथेच घडत असतात. त्यामुळे दिवाणखाना शक्य तितक्या वेगळ्या आणि तपशीलवार पद्धतीने सजविला जातो. 'तो मी नव्हेच'च्या नेपथ्यात फिरत्या रंगमंचाचा वापर केलेला होता. रंगमंचाच्या एका खंडावर एका स्थलावरील दृश्य घडत असताना मागील बाजूवरील खंडावर दुसऱ्या स्थलावर घडणाऱ्या पुढील दृश्याची उभारणी होत असे. पहिले दृश्य संपल्यावर रंगमंच फिरवून अत्यल्प अवधीत पुढील दृश्य सुरू होत असे. 'विविध स्थले वास्तवतावादी पद्धतीने दाखविणे शक्य न होणे' या नाटकाच्या अंगभूत मर्यादेवर मात करण्याचा हा एक प्रयत्न होता. परंतु, फिरत्या रंगमंचाचा वापर आज फारसा होताना आढळत नाही. काही नाटकांमध्ये सरकत्या रंगमंचाचा वापर केल्याचे आढळून येते. पण, दोन दृश्यांमध्ये अंधार करून शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने फ्लॅटसीन्सच्या वेगवेगळ्या बाजू प्रेक्षकांच्या बाजूला करून पूर्णपणे वेगळे दृश्य उभारणे हा नेपथ्याचा प्रकार सध्या प्रचलित आहे. काही नाटकांमध्ये व्हीडीओ तंत्रज्ञानाचा उपयोग करून पडद्यावर दाखविल्या जाणाऱ्या दृश्यांच्या मदतीने कथानकाचा विकास घडवून आणला जातो.

नटांच्या नाटक खेळण्याच्या अवकाशातही फारसे

काही बदल झाल्याचे आढळून येत नाही. बहुतांश जागी कमानी रंगमंचावर नाटक खेळले जाते. काही रंगमंचावर दर्शनी पडदा काढून टाकलेला असतो. शाळेचा वर्ग, मंदिर अशा अन्य उपयोगांसाठी असलेल्या अवकाशांमध्ये अनेकदा नाटक खेळले जाते. परंतु, नाटकाची अपरिहार्य गरज म्हणून त्या अवकाशाची निवड केलेली नसते तर पारंपरिक नाट्यगृहाची अनुपलब्धी, आर्थिक अडचण अशी कारणे त्यामागे असतात. मुंबई येथील 'छबिलदास शाळे'तील एका वर्गात होणारे नाटके किंवा पुण्यातील नारायण पेठेतील 'स्नेहसदन' येथील हॉलमध्ये होणारे नाट्यप्रयोग अशी या अवकाशांची मोजकीच उदाहरणे आढळतात. प्रेक्षकांच्या नाटक बघण्याच्या अवकाशाचे रूप गेल्या पन्नास वर्षात फारसे बदललेले नाही. वातानुकूलन यंत्रणा, आरामशीर आसने, खानपानसेवा, अशा काही सोयी उपलब्ध झाल्या आहेत. छोटी (शंभर ते दोनशे एवढ्या आसनक्षमतेची) नाट्यगृहे असावीत असे अनेकदा सांगितले जाते. परंतु मुंबईचे पृथ्वी थिएटर, पुण्याचे सुदर्शन रंगमंच अशी उदाहरणे वगळता अशी नाट्यगृहे अजूनही आढळून येत नाहीत. खरे म्हणजे नाटक बघणे हा व्यापार जास्तीतजास्त पंधरा फूट एवढ्याच अंतरावरून व्हायला हवा. तिसाव्या रांगेत बसलेल्या प्रेक्षकाला नाटक काय दिसणार? तो नाटक 'ऐकतो', पाहात नाही. पण तरीही मोठीच नाट्यगृहे बांधली जातात. यावर प्रतिवाद म्हणून दहा किंवा पंधरा हजार प्रेक्षकांसमोर सादर झालेल्या नाट्यप्रयोगाचे दाखले देण्यात येतात. परंतु, त्या दहा किंवा पंधरा हजार प्रेक्षकांपैकी किती प्रेक्षकांना नाटक पाहता आले हे कोणीच सांगत नाही.

रंगभूषा आणि वेशभूषा ही प्रयोगाची पूरक पण महत्त्वाची तंत्रे होत. रंगभूषेच्या साधनसामुग्रीमध्ये खूपच प्रगती झालेली आहे. एकेकाळी पिवडी आणि हिंगुळ या सारख्या पदार्थांनी रंगभूषा केली जात असे. आता मात्र रसायनशास्त्रातील प्रगतीमुळे फाउंडेशन्स, पावडरी, लिपस्टिक्स, रूज अशी विविध साधने सहज उपलब्ध होतात. लॅटेक्स रबरांसारख्या पदार्थांमुळे चेहऱ्याला हवा तसा आकार देणे शक्य झाले आहे. नकली दात, नकली नाक अशा गोष्टींमुळे एकच नट खूपच कमी वेळात आपले बाह्यरूप पूर्णपणे बदलून रंगभूमीवर प्रवेश करू शकतो. अगदी खऱ्यासारखे दिसणारे आणि पुनःपुनः लावून आणि काढून खराब न होणारे दाढी, मिशा आणि केसांचे टोपही आता उपलब्ध आहेत. एखाद्या व्यक्तिरेखेसाठी वैशिष्ट्यपूर्ण रंगभूषा ('कॅरॅक्टर मेकअप') केल्याचेही दिसून येते. उदा. व्यक्तिरेखेसाठी रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांनी केलेल्या रंगभूषेमुळे 'सूर्य पाहिलेला माणूस' मधील 'सॉक्रेटिस' या व्यक्तिरेखेस उठाव आला होता.

वेशभूषेच्या तंत्रामध्ये काही लक्षणीय बदल झाला असे दिसून येत नाही. नाटकातील वेशभूषेमध्ये वस्त्र-प्रावरणे, अलंकार आणि व्यक्तिगत वापरातील वस्तू यांचा समावेश होतो. सामाजिक नाटकांमध्ये वेशभूषा तुलनेने सोपी असते. परंतु, ऐतिहासिक आणि पौराणिक नाटकांमधील वेशभूषा हे एक आव्हान ठरू शकते. विविध पोतांचे आणि रंगाचे कापड आता स्वस्त दरात उपलब्ध होऊ शकते. मात्र त्यासाठी कल्पक डिझायनर हवा. कथानकातील कालाला अनुसरून वेशभूषेची परिकल्पना करण्यासाठी आवश्यक ते संशोधन करणे आवश्यक असते. त्यासाठी संदर्भग्रंथ अभ्यासावे लागतात. इंटरनेटमुळे संशोधनाचे काम सुकर झाले आहे. प्रशिक्षित रंगकर्मींमध्ये वेशभूषेबद्दल विशेष जाणीव असल्याचे दिसून येते. कारण प्रशिक्षणादरम्यान त्यांनी अशा प्रकारचे स्वाध्याय केलेले असतात.

रंगभूमीच्या वाटचालीच्या संदर्भात 'प्रेक्षक' हा एक महत्त्वाचा घटक आहे. खरे तर नाटक ही गोष्ट घडण्यासाठी जे दोन अत्यावश्यक घटक असतात त्यापैकी एक प्रेक्षक हा असतो. दुसरा अर्थातच नट होय. मात्र नाट्यप्रयोगाच्या संकेतांनी प्रेक्षकाला तुलनेने निष्क्रिय (passive) भूमिका दिली आहे. तो प्रयोग पाहू शकतो, त्यात खऱ्या अर्थाने सहभागी होऊ शकत नाही. नटाच्या नाटक खेळण्याच्या अवकाशात त्याला जाता येत नाही. (पण नट मात्र प्रेक्षकांच्या अवकाशात गेलेले आढळून येतात.) प्रेक्षक आपली पसंती अथवा नापसंती अनुक्रमे प्रयोगांना गर्दी करणे किंवा न येणे या मार्गाने व्यक्त करतो. काही प्रेक्षक दिग्दर्शक/नट यांना प्रत्यक्ष भेटून आपले मत त्यांच्या कानावर घालतात. प्रेक्षकांच्या प्रतिसादाची रंगकर्मी पुरेपुर जाणीव ठेवतात. गेल्या काही वर्षांमध्ये नाटकाच्या

नमूद केले आहे.) सद्यकालीन सामाजिक वास्तवाशी नाते सांगणारे आणि चिरंतन सत्याचे प्रकटीकरण करणारा असे अनुभवाचे तर वर्तमानातील आणि भूतकालातील असे उपकरणाचे प्रत्येकी दोन प्रकार संभवतात. यांच्या एकत्रीकरण आणि अदलाबदल (permutation and combination) यातून उदभवणाऱ्या चार शक्यता आणि त्यांची उदाहरणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

उपकरण	अनुभव	नाटकाचे नाव
वर्तमान	चिरंतन सत्य	सखाराम बाईंडर
भूत	वास्तव	तुघलक, घाशीराम कोतवाल
वर्तमान	वास्तव	अधांतर, चाहूल
भूत	चिरंतन सत्य	ययाती (ले. गिरीश कार्नाड)

उपरोक्त नाटकांच्या लेखनाच्या/प्रयोगाच्या काळात फार जास्त फरक नाही हे स्पष्ट आहे.

नाट्यकृतीच्या निर्मितीस विशिष्ट सामाजिक स्थिती कारणीभूत होणे हा जसा नाटक आणि सामाजिक स्थिती यांच्यामधील परस्परसंबंधाचा एक भाग आहे तसाच एखाद्या नाट्यकृतीमुळे समाजात काही प्रतिक्रिया उमटणे हा दुसरा भाग म्हणता येईल. या आधी सांगितलेल्या आणि व्यक्तीच्या बाबतीत संभवणाऱ्या विभाव, अनुभाव या क्रिया-प्रतिक्रिया समाजाच्या बाबतीतही संभवतात. जीवनशैली, पेहराव, फॅशन अशा गोष्टींमध्ये चित्रपटांमुळे जसे बदल घडून येताना दिसतात तसे नाटकांमुळे घडून आलेले दिसत नाहीत. हिंदी किंवा इंग्रजी चित्रपटांना राष्ट्रीय पातळीवरील आणि सर्व थरातील प्रेक्षकवर्ग लाभतो. मराठी नाटक तुलनेने फारच कमी लोकसंख्येपर्यंत पोचते हे त्या मागील प्रमुख कारण म्हणून सांगता येईल. काही नाटकांमुळे समाजात क्षोभ निर्माण होण्याचे प्रसंग घडले. ज्या नाटकांमुळे वादंग निर्माण झाले त्यामागील कारणेही विविध आहेत. अनुभवाबद्दल तीव्र आणि पराकोटीची नापसंती हे त्यामागील प्रमुख कारण होते. माणसाच्या मनात जाग्या होणाऱ्या अशिव अशा भावांचे दर्शन घडविण्यास काही लोकांचा विरोध होता. उपकरणाच्या केंद्रस्थानी 'सखाराम'सारखे काल्पनिक पात्र असलेल्या किंवा नाना फडणीसांसारखे ऐतिहासिक पात्र असलेल्या अशा दोन्ही नाटकांना लोकक्षोभास सामोरे जावे लागले. यासंबंधाने यापूर्वी विवेचन केले आहे.

रंगकर्मी, अभिनय, काल आणि अवकाश हे नाट्यप्रयोगाचे घटक असतात असे म्हणता येते. या घटकांच्या संदर्भात गेल्या काही वर्षात काय घडले याचे विवेचन करणे योग्य राहील. स्वातंत्र्यपूर्व काळात व्यावसायिक रंगकर्मी हे नाटककंपनीचे पगारी नोकर असत. नंतरच्या काळात ही पद्धत मागे पडली आणि 'नाईट'च्या पद्धतीने रंगकर्मी काम करू लागले. 'नाटक' याविषयाचे पद्धतशीर प्रशिक्षण घेण्याची सुविधा दिल्लीस्थित नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा या व्यतिरिक्त नव्हतीच. त्यामुळे मराठी रंगभूमीवर प्रशिक्षित रंगकर्मी असण्याचे प्रमाण अत्यल्प होते. प्रामुख्याने राज्यनाट्य स्पर्धा आणि कामगार कल्याण मंडळाच्या स्पर्धा ही रंगकर्मींची गंगोत्री होती. व्यावसायिक रंगभूमीवर पूर्णवेळ काम करणे हा निर्णय तसा धाडसीच समजला जात असे. सत्तरच्या दशकात सुरू झालेला टी. व्ही. कित्येक वर्षे मुंबई व पुणे या शहरांपुरताच आणि तोही संध्याकाळी सहा ते दहा एवढ्याच काळापुरता मर्यादित होता. त्यामुळे टी. व्ही. वरील संधींचे प्रमाण मर्यादित होते. १९८४ सालच्या ऑलिंपिक स्पर्धांच्या निमित्ताने काळापांढरा टी. व्ही. रंगीत झाला आणि प्रक्षेपणही राष्ट्रीय स्तरावर सुरू झाले. प्रक्षेपणाचा कालावधीही वाढला. यामुळे ज्यांना कलाप्रांतातच, विशेषतः अभिनय या क्षेत्रात करीयर करायचे होते त्यांच्यासाठी मोठीच संधी उपलब्ध झाली. कालांतराने या क्षेत्राचे खासगीकरण झाल्यानंतर खूप मोठ्या संख्येने वाहिन्या सुरू झाल्या आणि मग तर संधीची उपलब्धी खूपच मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे नाट्यक्षेत्रात काही कामगिरी करण्यासाठी ज्यांनी आपला वेळ दिला असता, त्यांनी टी. व्ही. ला अग्रक्रम दिला आणि जेव्हा व जमेल तसे नाटक सुरू ठेवले. असे असले तरीही आपले 'फर्स्ट लव्ह' नाटक हेच असते असे ही टी. व्ही. वर 'बिझी' असलेली कलावंत मंडळी आवर्जून सांगताना आढळून येतात. सुमारे गेल्या पंधरा वर्षांपासून पुणे विद्यापीठातील 'ललित कला केंद्र' या विभागातून 'नाटक' या विषयाचे पदवीपूर्व व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. यातून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेले तरुण रंगकर्मी

अनुक्रमणिका

मुंबईत आपला जम बसवताना दिसून येतात. मात्र केवळ नाटकं करून चरितार्थ चालवणे हे शक्य नसल्याने त्यांना टी. व्ही., चित्रपट आणि जाहिरात अशा अन्य क्षेत्रात पैसे मिळविण्यासाठी काम करावे लागते. त्यांना (किमान काही जणांना) या कामातून उत्तम अर्थप्राप्ती होते असे आढळते. पण मग नाटकाला दुय्यम स्थान मिळणे अपरिहार्य होते. पण असे असूनही प्रशिक्षित रंगकर्मींमुळे नाट्यप्रयोगाकडे बघण्याची नजर खूपच बदलते आहे. आजच्या रंगकर्मींमध्ये एकूणच रंगभाषेविषयीची चांगली जाण दिसून येते.

नाट्यप्रयोगाच्या (परफॉर्मन्स या अर्थाने) 'अभिनय' या घटकात सतत काही ना काही प्रयोग (एक्सपरिमेंट्स अशा अर्थाने) होताना आढळून येतात. 'अभिनय' या संज्ञेचा अर्थच 'कडे नेणे' असा आहे. आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्त्विक या अभिनयाच्या चार प्रकारांच्या उपयोजनाने अभिनेता स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला नाटकातील व्यक्तिरेखें'कडे नेतो'. अभिनयशैलीचे वास्तवतावादी आणि बिनवास्तवतावादी अशा दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण करता येते. १९५० पर्यंत बहुतांश नाटकांची कथानके ऐतिहासिक किंवा पौराणिक असत. अशा नाटकांमधून बिनवास्तवतावादी शैलीचा अभिनय दिसून येत असे. परंतु, या आधी स्पष्ट केल्याप्रमाणे १९५० नंतरच्या काळातील नाटकांचा आशय माणूस आणि माणसाचे मन यावर केंद्रित होऊ लागला. त्यामुळे अशा नाटकांमधून वास्तवतावादी शैलीच्या अभिनयाचे दर्शन घडू लागले. परंतु, नव्यानेच मूळ धरू पाहणाऱ्या वास्तवतावादाला प्रतिक्रिया म्हणून की काय, चिंतनगर्भ आशयांची मांडणी बिनवास्तवतावादी शैलीतून चपखलपणे झाल्याचीही उदाहरणे दिसून येतात. उदा. सतीश आळेकर, श्याम मनोहर यांची नाटके.

काल आणि अवकाश हे प्रयोगाचे घटक आहेत असे याआधी म्हटले आहे. याचे थोडे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल. काल आणि अवकाश या दोन मूलभूत संकल्पना आहेत. या दोन संकल्पनांशिवाय सृष्टीतील व्यापारांचे आकलन करणे शक्य होत नाही. नाट्यगत वास्तवालाही या दोन परिमिती लागू पडतात. नाट्यगत वास्तवातील काल आणि अवकाश यांची अनुकृती विविध मार्गांनी रंगमंचावर केली जाते. कालाची अनुकृती प्रकाशयोजनेच्या तर अवकाशची अनुकृती नेपथ्याच्या मदतीने केली जाते. सुमारे १९६० च्या सुमारास 'डिमर' हे यंत्र उपलब्ध झाले. त्यामुळे प्रकाशयोजनेच्या तंत्रामध्ये लक्षणीय बदल घडून आला. यापूर्वी दिव्याची उघडझाप खटक्यांच्या मदतीने केली जात असे. त्यामुळे दिवे चालू करणे किंवा बंद करणे हे खटकन होत असे. तसेच उजेडाची तीव्रता बदलणे शक्य नसे. परंतु, डिमरमुळे मंद गतीने अंधार किंवा प्रकाश घडवून आणणे शक्य झाले. यामुळे एका दृश्यातून दुसऱ्या दृश्याची सुरुवात विनाविक्षेप करता येऊ लागली. साहजिकच प्रयोगाचा बंध प्रवाही आणि लवचिक होण्यास मदत झाली. तसेच प्रसंगातील भावावस्थेनुसार प्रकाशाची तीव्रता नियंत्रित करणे शक्य झाले. आता डिमर ऐवजी 'पल्सर' ही यंत्रणा उपलबध झाली आहे. पल्सर आटोपशीर आकाराचा असतो. त्यावर आठ, सोळा किंवा जास्त सरकत्या कळींची योजना असते. प्रत्येक कळीने एका दिव्याचे किंवा दिव्यांच्या एका संचाचे नियंत्रण करता येते. पल्सरमुळे प्रकाशयोजनाकार एकाचवेळी अनेक दिवे सहजगत्या नियंत्रित करू शकतो. त्यामुळे प्रकाशयोजनेच्या नाना परी शक्य झाल्या. (परदेशातील नाट्यगृहांमध्ये आता संगणकाच्या मदतीने प्रकाशयोजना केली जाते.) प्रकाशाची रंगछटा बदलण्यासाठी आता चांगल्या दर्जाचे रंगीत कागद (फिल्टर्स) उपलब्ध आहेत. ते जास्त तपमानातही टिकाव धरू शकतात.

काल या परिमितीच्या संदर्भात 'नाट्यकाल' म्हणजे प्रयोगाचा अवधी यासंबंधाने काही निरीक्षणे नोंदविता येतील. संगीत नाटकांच्या काळात नाट्यप्रयोगाचा अवधी पाच ते साडेपाच तास एवढा असे. त्यातील अंकांची संख्याही पाच किंवा जास्त असे. मात्र १९६० च्या सुमारास तीन अंकी नाटके लिहिली जाऊ लागली. प्रयोगाचा अवधी सुमारे तीन ते साडेतीन तास इतका कमी झाला. हा कल सुमारे १९८० पर्यंत सुरू राहिला. यानंतर दोन अंकी नाटके आणि प्रयोगाचा अवधी सुमारे सव्वादोन ते अडीच तास (दहा ते पंधरा मिनिटांचे मध्यंतर धरून) असा कल प्रस्थापित झाला. नाट्यगृहे दुपारी बारा ते चार, संध्याकाळी चार ते आठ आणि रात्री आठ ते बारा अशा चार चार तासांच्या तुकड्यांत दिली जातात. जी

नाटके मुळात तीन अंकी या स्वरूपात लिहिली होती आणि ज्यांचा प्रयोगाचा कालावधी तीन ते साडेतीन तास असे त्या नाटकांच्या संहिता संकलित करून दोन अंकी केल्या जातात आणि प्रयोगाचा अवधीही दोन ते अडीच तास असा नियंत्रित केला जातो. उदा. नटसम्राट, राय-गडाला जेव्हा जाग येते इ. खरे म्हणजे असे केल्याने मूळ नाटकातील जो भाग संकलित केला तो मुळातच आवश्यक होता का? – असा प्रश्न उपस्थित होतो. पण एक कथावस्तु दोन प्रकारे मांडता येऊ शकते असेही या प्रश्नाचे उत्तर देता येते.

एकांकिका या नाट्यप्रकाराने तर १९६० पासूनच मूळ धरले होते. महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये एकांकिका स्पर्धांचे आयोजन केले जाते. आंतरमहाविद्या-लयीन, आंतरबँक अशा स्तरांवरील स्पर्धांमध्ये स्पर्धक अत्यंत उत्साहाने आणि मोठ्या संख्येने सहभागी होतात. एकांकिकाचे पूर्ण लांबीचे नाटक करून ते व्यावसायिक रंगभूमीवर यशस्वी झाल्याची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतात. उदा. ऑल द बेस्ट.

सुमारे सव्वा तास ते पावणेदोन तास सलग प्रयोगा-वधी असलेला 'दीर्घांक' हा नाट्यप्रकार सध्या समांतर धारेमध्ये लोकप्रिय होतो आहे. व्यावसायिक स्तरावर हा नाट्यप्रकार आढळून येत नाही. लहान नाट्यगृहांमध्ये आणि कमी संख्येच्या प्रेक्षकांसमोर प्रयोग होत असल्याने यातून तीव्र अनुभूती देण्याची क्षमता या प्रकारात आहे.

मानवी संस्कृतीमध्ये विविध कारणांसाठी अवकाश उत्क्रांत होतात. उदा. घर, बाग, शाळा, इस्पितळ, बाजार-पेठ, रेल्वेस्थानक इ. सद्यकालीन नाट्यगृह हा अवकाशही नाटक सादर करणे यासाठी उत्क्रांत झालेला अवकाश आहे. नाट्यप्रयोगाशी निगडित अवकाशाचे स्वरूप दुपेडी असते. नटांचा नाटक करण्याचा (रंगमंच, रंगपट इ.) आणि प्रेक्षकांचा नाटक बघण्याचा अवकाश (प्रेक्षागृह बाहेरील मोकळी जागा इ.) असे नाट्यावकाशाचे दोन भिन्न घटक असतात. कमानीमंचाच्या नाटकघरांमध्ये या दोन अवकाशांचे पडद्याने विभाजन होते. पडदा उघडल्यावर नटांचा अवकाश प्रकाशमान होऊन आणि प्रेक्षकांचा अवकाश अंधारात जाऊन हे विभाजन अधोरेखित होते. नाट्यगत अवकाशाची अनुकृती करण्यासाठी नाट्यप्रयोगात 'नेपथ्या'चा वापर केला जातो. १९६० सालापूर्वीच्या नाटकांत रुळांच्या पडद्यांचा वापर होत असे. मंदिर, राजदरबार अशा विविध स्थळांची दृश्ये रंगविलेले हे पडदे रंगमंचाच्या अगदी वरच्या भागात झालरींच्या आड लटकावून ठेवलेले असतात. पाहिजे तेव्हा हवे ते दृश्य रंगविलेला पडदा वरून खाली सोडला जाऊन त्यासमोर दृश्य सादर होत असे. दर्शनी पडद्यापासून सुमारे तीन ते चार फूट अंतरावर एक रस्त्याचे दृश्य असलेला पडदा असे. या पडद्यासमोर दृश्य सुरू असताना मागील बाजूस पुढील दृश्यातील मंचवस्तूंची मांडामांड चाले. १९६० नंतर रुळांचे पडदे मागे पडून फ्लॅटसीन्सचा उपयोग सुरू झाला. बिनवास्तववादी शैलीच्या प्रयोगात संकेतांच्या मदतीने स्थलनिर्मिती होऊ शकते. मात्र वास्तववादी शैलीतील प्रयोगात स्थलनिर्मितीसाठी रंगविलेले पडले, फ्लॅटसीन्स आणि मंचवस्तू यांचा वापर केला जातो. बहुतेक सामाजिक नाटके ही अजूनही 'स्थळ : घरातील दिवाणखाना' – येथेच घडत असतात. त्यामुळे दिवाणखाना शक्य तितक्या वेगळ्या आणि तपशीलवार पद्धतीने सजविला जातो. 'तो मी नव्हेच'च्या नेपथ्यात फिरत्या रंगमंचाचा वापर केलेला होता. रंगमंचाच्या एका खंडावर एका स्थलावरील दृश्य घडत असताना मागील बाजूवरील खंडावर दुसऱ्या स्थलावर घडणाऱ्या पुढील दृश्याची उभारणी होत असे. पहिले दृश्य संपल्यावर रंगमंच फिरवून अत्यल्प अवधीत पुढील दृश्य सुरू होत असे. 'विविध स्थले वास्तववादी पद्धतीने दाखविणे शक्य न होणे' या नाटकाच्या अंगभूत मर्यादेवर मात करण्याचा हा एक प्रयत्न होता. परंतु, फिरत्या रंगमंचाचा वापर आज फारसा होताना आढळत नाही. काही नाटकांमध्ये सरकत्या रंगमंचाचा वापर केल्याचे आढळून येते. पण, दोन दृश्यांमध्ये अंधार करून शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने फ्लॅटसीन्सच्या वेगवेगळ्या बाजू प्रेक्षकांच्या बाजूला करून पूर्णपणे वेगळे दृश्य उभारणे हा नेपथ्याचा प्रकार सध्या प्रचलित आहे. काही नाटकांमध्ये व्हीडीओ तंत्रज्ञानाचा उपयोग करून पडद्यावर दाखविल्या जाणाऱ्या दृश्यांच्या मदतीने कथानकाचा विकास घडवून आणला जातो.

नटांच्या नाटक खेळण्याच्या अवकाशातही फारसे

काही बदल झाल्याचे आढळून येत नाही. बहुतांश जागी कमानी रंगमंचावर नाटक खेळले जाते. काही रंगमंचावर दर्शनी पडदा काढून टाकलेला असतो. शाळेचा वर्ग, मंदिर अशा अन्य उपयोगांसाठी असलेल्या अवकाशांमध्ये अनेकदा नाटक खेळले जाते. परंतु, नाटकाची अपरिहार्य गरज म्हणून त्या अवकाशाची निवड केलेली नसते तर पारंपरिक नाट्यगृहाची अनुपलब्धी, आर्थिक अडचण अशी कारणे त्यामागे असतात. मुंबई येथील 'छबिलदास शाळे'तील एका वर्गात होणारे नाटके किंवा पुण्यातील नारायण पेठेतील 'स्नेहसदन' येथील हॉलमध्ये होणारे नाट्यप्रयोग अशी या अवकाशांची मोजकीच उदाहरणे आढळतात. प्रेक्षकांच्या नाटक बघण्याच्या अवकाशाचे रूप गेल्या पन्नास वर्षात फारसे बदललेले नाही. वातानुकूलन यंत्रणा, आरामशीर आसने, खानपानसेवा, अशा काही सोयी उपलब्ध झाल्या आहेत. छोटी (शंभर ते दोनशे एवढ्या आसनक्षमतेची) नाट्यगृहे असावीत असे अनेकदा सांगितले जाते. परंतु मुंबईचे पृथ्वी थिएटर, पुण्याचे सुदर्शन रंगमंच अशी उदाहरणे वगळता अशी नाट्यगृहे अजूनही आढळून येत नाहीत. खरे म्हणजे नाटक बघणे हा व्यापार जास्तीतजास्त पंधरा फूट एवढ्याच अंतरावरून व्हायला हवा. तिसाव्या रांगेत बसलेल्या प्रेक्षकाला नाटक काय दिसणार? तो नाटक 'ऐकतो', पाहात नाही. पण तरीही मोठीच नाट्यगृहे बांधली जातात. यावर प्रतिवाद म्हणून दहा किंवा पंधरा हजार प्रेक्षकांसमोर सादर झालेल्या नाट्यप्रयोगाचे दाखले देण्यात येतात. परंतु, त्या दहा किंवा पंधरा हजार प्रेक्षकांपैकी किती प्रेक्षकांना नाटक पाहता आले हे कोणीच सांगत नाही.

रंगभूषा आणि वेशभूषा ही प्रयोगाची पूरक पण महत्त्वाची तंत्रे होत. रंगभूषेच्या साधनसामुग्रीमध्ये खूपच प्रगती झालेली आहे. एकेकाळी पिवडी आणि हिंगुळ या सारख्या पदार्थांनी रंगभूषा केली जात असे. आता मात्र रसायनशास्त्रातील प्रगतीमुळे फाउंडेशन्स, पावडरी, लिपस्टिक्स, रूज अशी विविध साधने सहज उपलब्ध होतात. लॅटेक्स रबरांसारख्या पदार्थांमुळे चेहऱ्याला हवा तसा आकार देणे शक्य झाले आहे. नकली दात, नकली नाक अशा गोष्टींमुळे एकच नट खूपच कमी वेळात आपले बाह्यरूप पूर्णपणे बदलून रंगभूमीवर प्रवेश करू शकतो. अगदी खऱ्यासारखे दिसणारे आणि पुनःपुनः लावून आणि काढून खराब न होणारे दाढी, मिशा आणि केसांचे टोपही आता उपलब्ध आहेत. एखाद्या व्यक्तिरेखेसाठी वैशिष्ट्यपूर्ण रंगभूषा ('कॅरॅक्टर मेकअप') केल्याचेही दिसून येते. उदा. व्यक्तिरेखेसाठी रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांनी केलेल्या रंगभूषेमुळे 'सूर्य पाहिलेला माणूस' मधील 'सॉक्रेटिस' या व्यक्तिरेखेस उठाव आला होता.

वेशभूषेच्या तंत्रामध्ये काही लक्षणीय बदल झाला असे दिसून येत नाही. नाटकातील वेशभूषेमध्ये वस्त्रप्रावरणे, अलंकार आणि व्यक्तिगत वापरातील वस्तू यांचा समावेश होतो. सामाजिक नाटकांमध्ये वेशभूषा तुलनेने सोपी असते. परंतु, ऐतिहासिक आणि पौराणिक नाटकांमधील वेशभूषा हे एक आव्हान ठरू शकते. विविध पोतांचे आणि रंगाचे कापड आता स्वस्त दरात उपलब्ध होऊ शकते. मात्र त्यासाठी कल्पक डिझायनर हवा. कथानकातील कालाला अनुसरून वेशभूषेची परिकल्पना करण्यासाठी आवश्यक ते संशोधन करणे आवश्यक असते. त्यासाठी संदर्भग्रंथ अभ्यासावे लागतात. इंटरनेटमुळे संशोधनाचे काम सुकर झाले आहे. प्रशिक्षित रंगकर्मींमध्ये वेशभूषेबद्दल विशेष जाणीव असल्याचे दिसून येते. कारण प्रशिक्षणादरम्यान त्यांनी अशा प्रकारचे स्वाध्याय केलेले असतात.

रंगभूमीच्या वाटचालीच्या संदर्भात 'प्रेक्षक' हा एक महत्त्वाचा घटक आहे. खरे तर नाटक ही गोष्ट घडण्यासाठी जे दोन अत्यावश्यक घटक असतात त्यापैकी एक प्रेक्षक हा असतो. दुसरा अर्थातच नट होय. मात्र नाट्यप्रयोगाच्या संकेतांनी प्रेक्षकाला तुलनेने निष्क्रिय (passive) भूमिका दिली आहे. तो प्रयोग पाहू शकतो, त्यात खऱ्या अर्थाने सहभागी होऊ शकत नाही. नटाच्या नाटक खेळण्याच्या अवकाशात त्याला जाता येत नाही. (पण नट मात्र प्रेक्षकांच्या अवकाशात गेलेले आढळून येतात.) प्रेक्षक आपली पसंती अथवा नापसंती अनुक्रमे प्रयोगांना गर्दी करणे किंवा न येणे या मार्गाने व्यक्त करतो. काही प्रेक्षक दिग्दर्शक/नट यांना प्रत्यक्ष भेटून आपले मत त्यांच्या कानावर घालतात. प्रेक्षकांच्या प्रतिसादाची रंगकर्मी पुरेपुर जाणीव ठेवतात. गेल्या काही वर्षांमध्ये नाटकाच्या

प्रेक्षकाला टी. व्ही. हा एक पर्याय उपलब्ध झाला आहे. टी. व्ही. वर दिसणारी चमकदमक नाटकातूनही दिसावी अशी त्याची अपेक्षा झाली आहे. विनोदी नाटकांना होणाऱ्या गर्दीतून त्याचा मनोरंजनाकडे असणारा ओढा स्पष्ट दिसतो. 'सही रे सही' सारख्या विनोदी नाटकाने तिकीटखिडकीवर मिळविलेले अभूतपूर्व यश याचे द्योतक आहे. 'सही रे सही' नाटकामुळे प्रेक्षागृहातील गेली कित्येक वर्षे बंद ठेवलेल्या बाल्कनीसुद्धा भरून जाऊ लागल्या. पण याचा अर्थ प्रेक्षकांना मनोरंजनाव्यतिरिक्त दुसरे काही चालतच नाही असे नाही. 'आत्मकथा'सारख्या गंभीर नाटकाचे पहिले चोवीस प्रयोग 'एन. सी. पी. ए.'च्या रंगमंचावर केले गेले. प्रेक्षकांना ते नाटक आवडले. प्रायोगिक रंगमंचावर नाटक 'हॅमर करणे' संभवत नाही. परंतु, आत्मकथाचे प्रयोग 'हाऊसफुल' होऊ लागले. नाटकावर छापून आलेली जवळजवळ सर्व परीक्षणे स्तुतीने भरलेली असत. पण सर्वांची एकमुखाने मागणी होती की एन. सी. पी. ए.सारख्या दूरच्या नाट्यगृहात हे नाटक करत राहाणे हा मराठी प्रेक्षकांवर अन्याय आहे. 'या नाटकाचे प्रयोग गिरगाव, प्रभादेवी, दादर अशा जागच्या नाट्यगृहात लावून हे नाटक मराठी प्रेक्षकांच्या आवाक्यात आणावे' अशी मागणी होऊ लागली. त्यामुळे 'आत्मकथा'चा रौप्यमहोत्सवी प्रयोग पार्ल्याच्या 'दीनानाथ नाट्यगृहा'त लावला. आणि हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत झालेला हा प्रयोग विलक्षण रंगला असे श्रीराम लागू यांनी नमूद करून ठेवले आहे. 'सही रे सही' आणि 'आत्मकथा' ही दोन टोकाची उदाहरणे आढळून येणे हे प्रेक्षकांच्या बहुविध अभिरुचीचे द्योतक आहे. प्रेक्षकांची अभिरुची गृहित ठरणे कधीच योग्य ठरणार नाही. अमुक एक आशय त्याला आवडणार नाही किंवा त्याला समजणार नाही (किंवा उलटपक्षी – आवडेल किंवा समजेल) अशा गृहीत तत्त्वांवर नाट्यकृतीची निर्मिती करण्याचा प्रयत्न केलेल्या लेखकांना/निर्मात्यांना/नटांना/प्रेक्षकांनी खोटे ठरविले आहे. ज्याप्रमाणे कलानिर्मितीची प्रक्रिया अतर्क्य असते तशीच प्रेक्षकाची प्रतिक्रियाही अतर्क्य असते. पण ज्याप्रमाणे कलानिर्मितीही अतार्किक नसते तशीच प्रेक्षकांची दादही अतार्किक नसते. महाराष्ट्रातील प्रेक्षकाने आशयगर्भ अशा संहितांचे आणि कल्पक व नाविन्यपूर्ण नाट्यप्रयोगांचे नेहमीच स्वागत केले आहे. परंतु, प्रेक्षकांची अभिरुची एकसारखी किंवा एकजिनसी नसते. त्यामुळे प्रेक्षकांच्या अभिरुचीचे प्रतिरूप पिरॅमिडच्या आकाराचे कल्पिता येईल. या पिरॅमिडच्या अगदी खालच्या भागातले प्रेक्षक काही एका अभिरुचीचे आणि जास्त संख्येने आढळून येतील. तर अगदी वरच्या भागातले प्रेक्षक ही वेगळ्या अभिरुचीचे पण तुलनेने कमी संख्येने आढळून येतील. यात 'खालचा भाग' आणि 'वरचा भाग' हे निर्देश केवळ वर्णनात्मक असून त्यात वरचे म्हणजे चांगले किंवा खालचे म्हणजे उलट असा मूल्यमापनात्मक अर्थ अभिप्रेत नाही. अगदी प्रेक्षकांसाठी म्हणून आलेली 'हिट आणि हॉट' नाटके प्रेक्षकांनीच पाठ फिरविल्यामुळे बंदही झाली. नाटक हे प्रेक्षकांसाठीच असते आणि ते तसेच असायला हवे हे सूत्र गेल्या पन्नास वर्षातील इतिहास बघता स्पष्ट झाले आहे.

नाट्यक्षेत्राच्या वाटचालीतील 'समीक्षक' हा एक महत्त्वाचा सदस्य होय. वाचक/प्रेक्षक किंवा आस्वादक ही पातळी पार करून मूल्यामापनात्मक दृष्टिकोण तयार झालेला समीक्षक हा नाटकाची गुणवत्ता जोपासण्याच्या कामात साहाय्यभूत होतो. मात्र, ही भूमिका बजावणारे प्राय: नाट्यलेखन किंवा नाट्यप्रयोगांशी संबंधित असतात असे आढळून येते. (अर्थात, समीक्षा करणाऱ्यांनी पूर्वी नाटके लिहिलेली असतात किंवा नाटकांतून कामेही केलेली असतात. परंतु, त्यांचा आजमितीला नाट्यलेखन/नाट्यप्रयोग या क्षेत्रात प्रत्यक्ष सहभाग नसतो असा याचा अर्थ. असे असणे गरजेचे आहे किंवा नाही हा स्वतंत्र विषय आहे.) नाटकाच्या विविध अंगाचे प्रशिक्षण मिळण्याची सुविधा सध्या उपलब्ध असून त्याचे दृश्य परिणाम आज नाट्यप्रयोगात दिसून येत आहेत हे या आधी स्पष्ट केले आहे. या प्रशिक्षणात 'नाट्यसमीक्षा' या विषयाचाही अंतर्भाव आहे. परंतु लेखन, दिग्दर्शन, अभिनय, प्रकाश-योजना, वेशभूषा अशा नाट्यकलेच्या विविध अंगांमध्ये रस असणाऱ्यांपेक्षा समीक्षेत रस असणाऱ्यांची संख्या अभावानेच दिसून येते. साहित्यकृती या अंगाने झालेली नाट्यसमीक्षा विपुल प्रमाणात आढळते. नाटकाच्या प्रयोग-सौंदर्याचा विचार अभावानेच झालेला आढळतो. या संदर्भात श्यामला वनारसे लिखित 'घाशीराम कोतवाल–एक

अभ्यास' आणि राजीव नाईक लिखित 'खेळ नाटकाचा' या ग्रंथांचा निर्देश करता येईल. १९६० नंतरच्या काळात माधव मनोहर, ज्ञानेश्वर नाडकर्णी, पुष्पा भावे, माधव वझे, वि. भा. देशपांडे, सुरेशचंद्र पाध्ये इ. नाट्यसमीक्षकांनी नाट्यप्रयोगाची समीक्षा लिहिली. या समीक्षेचे स्वरूप प्रामुख्याने वृत्तपत्रीय/पाक्षिकीय स्तंभलेखन असे होते. नाटकाच्या पहिल्या काही प्रयोगानंतर हे लेखन प्रसिद्ध होत असे. मात्र त्यानंतर या नाटकांचे प्रयोग होत राहिले तर त्यांची समीक्षा झाल्याचे आढळून येत नाही. वि. भा. देशपांडे आणि सुरेशचंद्र पाध्ये यांच्या लेखांची पुस्तकेही प्रसिद्ध झालेली आहेत. या पुस्तकांमुळे अभ्यासकांची मोठीच सोय झालेली आहे. १९८४ साली 'ॲक्टिव्ह थिएटर्स' या निम्नव्यावसायिक नाट्यसंस्थेने नाट्यसमीक्षकांचा मेळावा आयोजित केला होता. यात झालेल्या व्याख्यानांचे, वाचलेल्या निबंधांचे आणि उपस्थित श्रोत्यांनी व्यक्त केलेल्या मतांचे व प्रतिक्रियांचे संकलन 'नाट्यसमीक्षा – काही दृष्टिकोण' या ग्रंथात ग्रंथित केलेले आहे. नाट्यसमीक्षेच्या क्षेत्रात जाणीवपूर्वक उचललेले एक पाऊल म्हणून या घटनेची नोंद करता येईल. मात्र असे अन्य प्रयत्न झालेले दिसत नाहीत.

सद्यकालीन नाट्यप्रयोगसमीक्षेच्या बलस्थानांची आणि मर्यादांची चर्चा उपरोक्त ग्रंथांमधून केलेली आढळते. रंगकर्मींच्या ग्रुप्समधून या विषयावर अनौपचारिक वाद-विवाद सतत होत असतात. पण समीक्षक आणि रंगकर्मी हातात हात घालून वावरताना क्वचितच आढळतात. आणि आढळलेच तर समीक्षकाने रंगकर्मीच्या कामगिरी-बद्दल पसंती दर्शविली असेल तर, अन्यथा नाही. ज्याला सर्जनशील असे काही जमत नाही तो समीक्षक होतो असे रंगकर्मी म्हणतात आणि रंगकर्मींना बोलायला सांगितले तर त्यांचे पितळ उघडे पडते असे समीक्षक म्हणतात. असे का घडते याची अनेक कारणे आहेत. समीक्षक आणि रंगकर्मी यांना एकमेकांची परिभाषा अवगत नसते हे या मागील प्रमुख कारण आहे. परिभाषा अवगत असण्यासाठी मुळात ती अस्तित्वात असावी लागते. अनेकदा योग्य परिभाषेचाच अभाव दिसून येतो. तसेच रंगकर्मी आणि समीक्षक यांची परिभाषा सारखी असली पाहिजे. या खेरीज प्रत्येक नाट्यसंघात एक समीक्षक असायला हवा. तो ही बाह्यघटक म्हणून नव्हे तर संघाचा सदस्य म्हणून. वस्तुतः, रंगकर्मी, अभिनय, काल आणि अवकाश या चार घटकांच्या जोडीला 'समीक्षक' हा प्रयोगप्रक्रियेतील पाचवा घटक असावा असे प्रस्तुत अभ्यासकाचे मत आहे. चांगल्या नाटकांना प्रेक्षक नसतो अशी रंगकर्मींची व्यथा असते तर आम्हाला चांगली नाटके पाहायला मिळत नाहीत अशी प्रेक्षकांची तक्रार असते. अशा परिस्थितीत या दोघांच्या मानसिकतेचे भान असणारा समीक्षक हा दोहोंमधील सांधा होऊ शकतो. नाट्यलेखन, अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना आदी रंगभूमीच्या विविध घटकांशी संबंधित रंगकर्मींची आपापल्या कामाबद्दल विचार करण्याची आपली अशी पद्धत असते. आणि ते योग्यच आहे. परंतु, नाट्यप्रयोगात या सर्व घटकांचे मिलन होऊन इच्छित परिणाम साधला जाणे यासाठी अतर्क्य योगायोगावर अवलंबून न राहता त्याचा जाणीवपूर्वक विचार होणे आवश्यक आहे. असा विचार समीक्षकच करू शकतो. आज नाट्यप्रयोगाची सूत्रे दिग्दर्शकाच्या हाती एकवटलेली असतात. दिग्दर्शकानेच हा विचार का करू नये? – त्यासाठी अजून वेगळा कोणी कशाला हवा असाही विचार मांडला जाऊ शकतो. पण पूर्वी दिग्दर्शक नसे, केवळ तालीममास्तरच असे आणि दिग्दर्शक हे स्थान अस्तित्वात आल्यापासून नाट्य-प्रयोगाचे सौंदर्य कसे वृद्धिंगत झाले हे आपण जाणतो. 'समीक्षक' हे स्थान निर्माण झाल्यास सततच्या सरावाने व व्यासंगाने अन्य रंगकर्मींप्रमाणे त्याच्या ज्ञानात आणि क्षमतेत भरच पडत जाईल. अन्य समीक्षकांशी तटस्थ बुद्धीने वैचारिक आदानप्रदान करण्यासाठी नाट्यसंघाचा प्रतिनिधी म्हणूनही तो भूमिका बजावू शकेल.

वरील विवेचनांतर्गत विषयाचा कालावधी पन्नास वर्षे इतका मोठा आहे. या कालावधीतील सर्वच नाटके वाचणे, त्यांचे प्रयोग पाहणे किंवा त्या सर्व नाटकांचे संदर्भ उपलब्ध होणे ही व्यावहारिक दृष्ट्या अवघड होते. तसेच काही वाचायला हवीतच अशा नाटकांच्या संहिता वाचलेल्या नसणे किंवा पाहायला हवेतच असे नाट्यप्रयोग पाहिलेले नसणे ही प्रस्तुत अभ्यासकाची आणि म्हणूनच या निबंधाचीही मर्यादा आहे. त्यामुळे या निबंधात अशा काही नाटकांचा उल्लेख झालेला नसल्यास

त्यामागे दुसरे कुठलेही कारण नसून या अभ्यासकाची मर्यादा हे एकमेव कारण आहे हे नम्रपणे नमूद करतो.

❖❖❖

Form IV

रूल नं. ८ रजिस्ट्रेशन ऑफ न्यूजपेपर्स सेंट्रल रूल्स १९५६ अन्वये प्रकाशित

प्रकाशक	:	प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)
प्रकाशन दिनांक	:	दरमहा ५ तारीख
मुद्रक	:	घनश्याम वासुदेव जोशी, व्यवस्थापक, *नवभारत* मासिक
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	द्वारा-प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)
प्रकाशक	:	यशवंत शंकर कळमकर, चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	द्वारा-प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)
संपादक	:	श्रीकृष्ण माधव भावे
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	३३/२०, ४ थी गल्ली, प्रभात रस्ता, पुणे - ४११ ००४
मालक	:	प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)

मी यशवंत शंकर कळमकर जाहीर करतो, की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.

यशवंत कळमकर

प्रकाशक

५० वर्षातील मराठी चित्रपट

– श्री. सुधीर नांदगांवकर

महाराष्ट्रातील ५० वर्षांच्या वाटचालीत चित्रपटाचे योगदान निश्चित करताना एक मोठी अडचण येते ती भाषेची. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य स्थापन झाले. पण महाराष्ट्रात फक्त मराठी चित्रपट एवढाच चित्रपट व्यवहार नाही. तर हिंदी चित्रपट हे प्रथम पासूनच मुंबईत निर्माण होत आलेले आहेत. हिंदी चित्रपटांची निर्मिती नंतर कलकत्ता, मद्रास येथेही झाली. पण हिंदी सिनेमाचे केंद्र म्हणजे महाराष्ट्राची राजधानी मुंबई! आजही कोणत्याही हिंदी भाषिक राज्यात हिंदी चित्रपट निर्मिती होत नाही, तर हिंदी चित्रपट मुंबईत निर्माण होतात. कलावंत, निर्माते, तंत्रज्ञ यांचे वास्तव्य मुंबईतच आहे. हिंदी सिनेमाचा पसारा एवढा मोठा आहे की त्यापुढे मराठी सिनेमाचे मुंबईत अस्तित्व जाणवत नाही. हिंदी सिनेमाला मुंबई व महाराष्ट्रात प्रचंड प्रेक्षक मिळतो. तेवढा हिंदी भाषिक राज्यातही मिळत नाही. आकडेवारीत बोलायचे तर हिंदी सिनेमाचे ३५ ते ४० टक्के उत्पन्न मुंबई व महाराष्ट्रातून होते. व उर्वरीत ६० टक्के अन्य राज्यातून आणि विदेशातून येते.

गेल्या ५० वर्षांतील सिनेमाची वाटचाल नोंदवितांना या लेखात हिंदी सिनेमासृष्टीचा विचार केलेला नाही. फक्त मराठी सिनेमाचा लेखाजोखा मांडलेला आहे.

२

१९६० नंतरची मराठी सिनेमाची वाटचाल नोंदविण्यापूर्वी २५/३० वर्षे काय घडले हे नोंदविणे अगत्याचे ठरते. त्यातूनच ६० नंतरची जडणघडण स्पष्ट होईल. १९३१ साली हिंदीत 'बोल'पट युग सुरू झाले. मराठीत 'प्रभात'च्या 'अयोध्येचा राजा' ने १९३२ साली ध्वनी आला. १९३२ ते १९४२ दहा वर्षांत प्रभात (पुणे), हंस पिक्चर्स, कोल्हापूरसिनेटोन (कोल्हापूर), शालीनी सिनेटोन (कोल्हापूर) नवयुग, सरस्वती सिनेटोन (पुणे), बलवंत पिक्चर्स (सांगली) या स्टुडिओतून मराठी चित्रपट निर्मिती होत होती.

'बोल'पट युगाच्या पहिल्या १० वर्षांत 'ध्वनि' पाठोपाठ सिनेमात कॅमेरा, पार्श्वगायन, संकलन इ. तंत्रात प्रगती होत होती. मुख्य म्हणजे 'ध्वनि' आल्याने सिनेमा हा परिपूर्ण कलामाध्यम ठरायला समर्थ झाला. तोपर्यंत 'मूकपट' हे केवळ प्रतिमा माध्यम होते. त्यातही चॅप्लीन सारख्या प्रतिभावंतानी सिनेमाला 'कले'चे परिमाण आहे हे दाखवून दिले. पण त्यालाही मर्यादा होत्या.

मराठी बोलपट युगाच्या पहिल्या दशकात ज्या दिग्दर्शकांनी आपला ठसा उमटविला ते दिग्दर्शक म्हणजे व्ही. शांताराम, मा. विनायक आणि भालजी पेंढारकर.

व्ही. शांताराम यांनी सिनेमाचे तंत्र मूकपट जमान्यात बाबूराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीत परिश्रमपूर्वक शिकून घेतले होते. त्याचा त्यांनी 'ध्वनि' आल्यानंतर अभ्यासपूर्ण विकास केला. भालजी पेंढारकर मूलतः लेखक. त्यांनीही पटकथा लेखन मूकपट काळापासून सुरू केले. तर विनायक हा साहित्याचा अभ्यासू वाचक. विनायकाचा चित्रपटातला प्रवेश 'अयोध्येचा राजा'मधे नारदाच्या भूमिकेत नट म्हणून झाला. त्याचबरोबर व्ही. शांतारामना सहाय्यक म्हणूनही 'प्रभात' कोल्हापूरात असेपर्यंत विनायक दिग्दर्शनाचे धडे घेत होता. विनायक मधला मनस्वी कलावंत हेरला. बाबूराव पेंढारकरांनी आणि त्याला 'विलासी ईश्वर' (१९३५) कोल्हापूर सिनेटोनमध्ये दिग्दर्शित करायला दिला. मराठीतला हा पहिला सामाजिक 'बोल'पट. तो पर्यंत व्ही. शांतारामही पौराणिक किंवा फॅण्टसी चित्रपट 'प्रभात'मध्ये दिग्दर्शित करत होते.

मा. विनायक जेव्हा 'विलासी ईश्वर' हा पहिला सामाजिक चित्रपट कोल्हापूरात निर्माण करत होता तेव्हा सांगलीच्या स्टुडिओत विश्राम बेडेकर 'सत्याचे शोध' व 'ठकीचे लग्न' या अनुक्रमे चि. वि. जोशी व राम गणेश गडकरी यांच्या विनोदी कथावर चित्रपट निर्माण करत होते. ध्वनिलेखन नीट न झाल्याने बेडेकरांचा प्रयोग

फसला पण पौराणिक ऐतिहासिक कथांच्या जंजाळात अडकलेल्या मराठी सिनेमाची सुटका करण्याचा बेडेकरांचा प्रयोग मराठी सिनेमाच्या प्रगतीच्या इतिहासात नोंदवला पाहिजे.

शांताराम, भालजी व विनायक यांनी मराठी बोलपटांचा आपल्या प्रतिभेने पाया घालता या तिघात चित्रपट ही यंत्राधिष्ठित 'कला' आहे हे या माध्यमाचे मर्म फक्त शांतारामनी जाणले होते. भालजींचा भर पटकथेवर होता तर विनायक तांत्रिक अंगासाठी छायालेखक पांडुरंगराव नाईक यांच्यावर अवलंबून होता.

शांतारामनी 'प्रभात'मधे कुंकू, माणूस व शेजारी हे सर्वार्थाने उत्कृष्ट सामाजिक चित्रपट देऊन युद्धोत्तर मराठी सिनेमाची जणू पायाभरणी केली.

सिनेमा हा दृश्याच्या पलीकडचेहि अव्यक्त व्यक्त करू शकतो. असा यशस्वी प्रयोग 'कुंकू' मधे होता. 'कुंकू' ही देवेलांच्या 'शारदा' नाटकाप्रमाणे जरठ–बाल विवाहाची समस्या मांडणारा चित्रपट होता. पण जे नाटकात व्यक्त करता येत नाही ते सिनेमात शांताराम बापूंनी करून दाखविले. 'कुंकू'ची नायिका नीरा (शांता आपटे) हिचा विवाह फसवून म्हाताऱ्या वकिलाशी (केशवराव दाते) केला जातो. पण नीराच्या मनातील कोवळे भाव लोपत नाहीत. नवऱ्याची छोटी मुलगी (वासंती) हिच्याशी तिची या नव्या घरात मैत्री होते. ही व्यक्तीरेखा आणि त्यांतून नायिकेच्या मनाचे भावदर्शन हा प्रयोग कुंकूत होता.

सिनेमा माध्यमाचे सामर्थ्य त्यांतून व्यक्त होत होते. बोलपट युगाच्या आरंभ काळीच ही काळाच्या पुढे घेतलेली झेप अभूतपूर्व होती.

शांतारामचा दुसरा सामाजिक चित्रपट 'माणूस' (१९३९) हा त्या काळात गाजलेल्या सैगलच्या 'देवदास'ला उत्तर होता. प्रेमात असफलता म्हणजे जीवनात असफलता हा देवदासचा संदेश होता. तर जीवन हे जगण्यासाठी आहे. प्रेम व्यक्तीपेक्षाही जीवनावर करावे हा 'माणूस'चा संदेश होता.

दिग्दर्शकाची विषयाशी तादात्मता 'माणूस'मधे विलक्षण रंग भरते.

याच काळात विनायकाचे प्रेमवीर (१९३७), ब्रह्मचारी (१९३८), 'ब्रँडीची बाटली' (१९३९) हे तीन विनोदी चित्रपट प्रकाशित झाले. हे तीनही चित्रपट आचार्य अत्रे यांनी लिहलेले होते. मराठी साहित्यातील विनोदाची परंपरा विनायकांनी रूपेरी पडद्यावर खुलवून मांडली. या तीन चित्रपटात 'ब्रह्मचारी' खूपच गाजला. आणि त्या चित्रपटाने मराठीत विनोदी चित्रपटांची विशुद्ध परंपरा प्रस्थापित केली.

भालजी पेंढारकरांनी या काळात प्रायः पौराणिक चित्रपट दिग्दर्शित केले. 'श्यामसुंदर' (१९३३) हा राधा-कृष्णाच्या जीवनावरचा चित्रपट भारतातला पहिला रौप्य महोत्सवी बोलपट ठरला. राधा, शांता आपटे व कृष्ण, शाहू मोडक. पण भालजी सिनेमा इतिहासात नोंदवले जातात व त्याच्या शिवशाहीवरील चित्रपटांमुळे. 'नेताजी पालकर' (१९४०), 'थोरातांची कमळा' (१९४१) व 'बहिर्जी नाईक' (१९४३), 'नेताजी पालकर' ने भालजींनी ऐतिहासिक चित्रपट परंपरेचा पाया घातला.

१९४२ साली युद्धाचे चटके चित्रपट व्यवसायाला जाणवू लागले. त्याचबरोबर 'कलहा'चे बीज ही रूजू लागले. १९४२ साली 'शेजारी'नंतर व्ही. शांताराम 'प्रभात' सोडून गेले. 'नवयुग'मधून आचार्य अत्रे आधी बाहेर पडले. पाठोपाठ 'अमृत' (१९४१) नंतर बाबूराव पेंढारकर बाहेर पडले. सरतेशेवटी विनायक 'सरकारी पाहुणे' (१९४२) नंतर 'नवयुग' सोडून गेले.

शांतारामनी मुंबईत 'राजकमल', आचार्य अत्रे यांनी 'अत्रे पिक्चर्स', बाबूराव पेंढारकरांनी 'न्यूहंस' आणि विनायकनी 'प्रफुल्ल पिक्चर्स' स्थापन केली. भालजींनीही स्वतःची कंपनी स्थापन केली. दोन चित्रसंस्थांच्या ४ चित्रसंस्था झाल्या.

युद्धामुळे चित्रपटांचा खर्च वाढला, आणि मराठी प्रेक्षकांच्या बळावर तो वसूल होणे अशक्य ठरले. त्यामुळे मराठी चित्रपटनिर्मिती घटली. १९४३ अवघे ५ चित्रपट, १९४४ फक्त ५ चित्रपट आणि १९४५ साली एकही मराठी चित्रपट निर्माण झाला नाही.

स्वातंत्र्य मिळेपर्यंत सिनेमाचा प्रेक्षक फक्त मध्यमवर्ग होता. पण नंतर कामगार वर्गही सिनेमाचा प्रेक्षक बनला. या नव्या वर्गाला कोणतीही सांस्कृतिक परंपरा नव्हती. यामुळे हिंदी चित्रपटांची चलती सुरू झाली. स्टुडिओ

सिस्टीम म्हणजे पगारपद्धती बंद पडून फ्रिलान्सिंग सुरू झाले. चित्रपट निर्मितीचा अवघा साचा बदलून गेला.

मराठी सिनेमाला हिंदी सिनेमाची जबरदस्त स्पर्धा निर्माण झाली. स्पर्धा इतकी तीव्र झाली की चित्रपटगृहे मिळणे मराठी चित्रपटांना अशक्य झाले.

१९४७ ते १९६० या तेरा वर्षात महाराष्ट्रातच हिंदीच्या स्पर्धेने मराठी सिनेमा वनवासात गेल्या सारखा झाला. या प्रतिकूल परिस्थितीत वर्षाला १३/१४ चित्रपट निर्माण व्हायचे. युद्धापूर्वी मराठी चित्रपटांचा जो तोंडवळा ठरला होता तोच पुढे चालू राहिला. राजा परांजपे, अनंत माने व दत्ता धर्माधिकारी या दिग्दर्शकांनी या प्रतिकूल परिस्थितीशी झगडत चित्र निर्मिती व मराठी चित्रपटांची परंपरा कायम राखली.

युद्धोत्तर मराठी सिनेमात राजा परांजपे हे अव्वल दिग्दर्शक ठरले. राजा परांजपेंचे 'पुढचे पाऊल' (१९५०), 'लाखाची गोष्ट' (१९५२), 'पेडगांवचे शहाणे' (१९५२), 'जगाच्या पाठीवर' (१९६०) हे चित्रपट यशस्वी ठरले. 'बाळा जो जो रे' (१९५०), 'स्त्री जन्माही तुझी कहाणी' (१९५२), 'पतिव्रता' (१९५९) या नायिका प्रधान चित्रपटांनी धर्माधिकारींनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. धर्माधिकारींचे गाजलेले चित्रपट संकलित करणारे अनंत माने. यांचे 'प्रीती संगम' (१९५७), 'दोन घडीचा डाव' (१९५८), 'अवघाची संसार' (१९५९), 'सांगत्ये ऐका' (१९५९) चित्रपटांना उदंड प्रेक्षक लाभला. मानेनी मराठीत विनोदी, कौटुंबिक व ग्रामीण तीनही प्रकारचे चित्रपट दिले.

मराठी सिनेमाला एक समर्थ लेखक या काळात ग. दि. माडगूळकरांच्या रूपाने लाभला. माडगूळकर १९३८ साली विनायकांच्या हंस पिक्चर्समधे हरहुन्नरी नट म्हणून 'ब्रह्मचारी' चित्रपटाचे वेळी दाखल झाले. १९४७ साली शांतारामचा 'रामजोशी' व बाबूराव पेंढारकरांचा 'जय मल्हार' हे दोन्ही चित्रपट माडगूळकरांनीच लिहिले. दोन्ही चित्रपटांची गीतेही त्यांचीच होती. दोन्ही चित्रपट यशस्वी झाले आणि माडगूळकर मराठी सिनेमात प्रस्थापित लेखक झाले.

राजा परांजपे, धर्माधिकारी व माने यांच्या गाजलेल्या चित्रपटांच्या पटकथा गीते माडगूळकरांचीच होती. परांजपे, माडगूळकर व संगीतकार सुधीर फडके हे कलावंत त्रिकूट 'पुढचे पाऊल'मधे एकत्र आले. ते 'जगाच्या पाठीवर' (१९६०) पर्यंत एकत्र होते. मराठी मनावर त्यांनी अधिराज्य गाजविले.

१९५० नंतर सिनेमाचा बदललेला प्रेक्षक व प्रतिकूल आर्थिक परिस्थिती याला कंटाळून आचार्य अत्रे व पु. ल. देशपांडे यांनी मराठी चित्रसृष्टीला रामराम ठोकला. 'गुळाचा गणपति' (१९५२) हा उत्कृष्ट विनोदी चित्रपट दिग्दर्शित केल्यानंतर पु. ल. नाटकाकडे वळले. १९५७ साली त्यांचे 'तुझे आहे तुजपाशी' हे नाटक रंगभूमीवर आले. 'श्यामची आई' (१९५३) चित्रपटाला पहिल्या राष्ट्रपती सुवर्णपदकाचा मान मिळूनही १९५४ मधे 'महात्मा फुले' स्वतः दिग्दर्शित करून आचार्य अत्रे यांनी स्वतःची अत्रे पिक्चर्स संस्था बंद करून संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात उडी घेतली.

महाराष्ट्र राज्य स्थापन होईपर्यंत मराठी चित्रपट कमीत कमी खर्चात काढायचे तंत्र निर्मात्यांनी अवलंबिले आणि चित्रपटांचा तोंडवळा ही ठरून गेला होता. कौटुंबिक, विनोदी आणि ग्रामीण वा तमाशा प्रधान 'सांगत्ये ऐका'च्या अभूतपूर्व यशामुळे तमाशा चित्रपटांची नंतर लाटच आली. मध्यमवर्ग आणि ग्रामीण असा दोन प्रकारचा तुटपुंजा प्रेक्षकवर्ग लाभला.

३

युद्धानंतर सिनेमात जगभर प्रयोग झाले. इटालीत 'निओ रिॲलीझम' व फ्रान्समध्ये 'न्यू वेव्ह' या प्रयोगांनी सिनेमा माध्यम समृद्ध झाले. असे काहीही प्रयोग मराठी चित्रपटात घडले नाहीत. याचे कारण सिनेमा हे आंतरराष्ट्रीय 'कला' माध्यम आहे याची जाणीव मराठी चित्रपट निर्मितीत गुंतलेल्यांना नव्हती. त्यामुळे आंतरराष्ट्रीय चित्रपटांशी हॉलिवूड वगळता संपर्कच नव्हता. आपण केवळ मराठी भाषिकांचा चित्रपट बनवायचा हीच दिग्दर्शकांची भूमिका होती. युद्धापूर्वी किमान मराठी बरोबरच हिंदी आवृत्तीही निघायची. पण स्वातंत्र्यानंतर ही पद्धतही थांबली.

पेशवाई संपल्यानंतर जशी मराठी शाहिरी मूक झाली व शेठ सावकारांचे गुणगान करण्यात धन्यता मानू लागली तसाच कांहीसा प्रकार मराठी चित्रपटात झाला. प्रेक्षक तुटपुंजा, राजाश्रय नाही. अशा दैन्यावस्थेत

अनुक्रमणिका

मराठी चित्रपट केवळ जिद्दीच्या बळावर टिकून राहिला. काही उत्तम चित्रपट निर्माण झाले. पण व्यावसायिक भरभराटीला ओहोटी लागलेली होती.

४

१ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्याचवर्षी राजा परांजपेंचा 'जगाच्या पाठीवर' प्रकाशित झाला. युद्धोत्तर मराठी चित्रपटात अव्वल दिग्दर्शक हे आपले स्थान राजाभाऊंनी टिकवून धरले. पण प्रेक्षक फक्त मुंबई-पुण्यात लाभला.

महाराष्ट्र सरकारचे लक्ष मराठी सिनेमाकडे लगेचच गेले व मराठी चित्रपटांना केंद्र सरकारच्या धर्तीवर पारितोषिके द्यायला १९६२ साली प्रारंभ झाला. मराठी नाटकांना १९५५ पासून राज्य पारितोषिके दिली जात होती. नाटकावरचा करमणूक कर तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी १९६० मधेच रद्द केला. स्वाभाविकच मराठी नाटक पुन्हा जोमाने उभे राहिले.

मराठी चित्रपटांना पारितोषिके सुरू होऊनही व्यावसायिक दृष्ट्या कांही फरक पडला नाही. वर्षाला १३/१४ चित्रपटच निर्माण व्हायचे. पहिल्या वर्षी 'प्रपंच' (दिग्द. मधुकर पाठक), 'सुवासिनी' (दिग्द. राजा परांजपे) आणि 'शाहीर परशुराम' (दिग्द. अनंत माने) अशी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिक मिळाली.

विशेष म्हणजे या तीनही चित्रपटांचे कथा-पटकथा संवाद, गीते ग. दि. माडगूळकरांचे होते. यात राजा परांजपे व अनंत माने हे पारितोषिकाआधीच यशस्वी दिग्दर्शक झालेले होते. मधुकर पाठक हा राजा परांजपेंचा सहाय्यक होता. महाराष्ट्र राज्य स्थापने नंतरच मधुकर पाठकांना 'प्रपंच' दिग्दर्शित करायला संधी मिळाली. राज्य पारितोषिकांनी नव्या दिग्दर्शकाच्या कर्तृत्वाची नोंद केली. 'प्रपंच'चा कथाविषय संततिनियमन हा होता. पण जुन्या पद्धतीच्या मांडणीमुळे वर्तमान सामाजिक विषय फार उशिरा चित्रपटात येतो. चित्रपट प्रचारी न होऊ देण्याच्या भरात हे घडले असावे.

'प्रपंच' मधले गरीबीचे दशावतार अत्यंत वास्तवपणे रेखाटलेले होते. शाहीर अमरशेखची गरीबीचे हाल सोसणाऱ्या शेतकऱ्याची भूमिका उत्तम होती. युनेस्कोने 'प्रपंच' विकत घेऊन ४२ भाषात 'डब' केला व अनेक देशात दाखविला.

राजा परांजपे दिग्दर्शित 'सुवासिनी' त्यातील काव्यात्म दिग्दर्शन; माडगूळकरांची आशय संपन्न गीते आणि सुधीर फडकेंचे अनोखे संगीत या गुणत्रयीने नटलेला होता. पण कथानक कांही नव्या ढंगाचे नव्हते. युद्धावर गेलेला पती निश्चित परत येईल म्हणून वाट पहाणारी मनस्वी पत्नी. 'सुवासिनी' राजा भाऊंच्याच 'जगाच्या पाठीवर' नंतर प्रकाशित झाला. दोन्हीला सुधीर फडकेंचे संगीत होते. 'जगाच्या पाठीवर'ची गाणी लोकांच्या तोंडी बसली लोकप्रिय झाली तशी 'सुवासिनी'ची झाली नाहीत. तरीही खुद्द सुधीर फडकेंना मात्र 'सुवासिनी'चे संगीत अधिक महत्त्वाचे वाटायचे.

'शाहीर परशुराम' हा ऐतिहासिक दृष्ट्याही शेवटचा शाहीर; साधारणतः १८५० हा त्याचा काळ. मराठीत रामजोशी, होनाजी बाळा (अमर भूपाळी) पठ्ठे बापूराव, अनंत फंदी हे उत्तर पेशवाईतले शाहीर पडद्यावर आले. तर 'शाहीर प्रभाकर' हा चित्रपट शांतारामबापूंनी थोडेसे चित्रीकरण थांबवून तो हिंदीत 'नवरंग' नावाने टेक्नीकलर चित्रपट निर्माण केला. कोल्हापूरच्या मंगल पिक्चर्सने शेवटचा शाहीर 'शाहीर परशुराम' पडद्यावर आणला. लेखक माडगूळकर, दिग्दर्शक अनंत माने आणि गजानन जागीरदार व जयश्री गडकर नायक-नायिका. संच उत्तम होता. चित्रपट उत्तम जमला होता. पण प्रेक्षकांना तो मुळीच पसंत पडला नाही. आणि 'शाहीर परशुराम' मंगल पिक्चर्सचा अखेरचा चित्रपट ठरला.

राज्य पारितोषिकांमुळे मराठीचा आर्थिक व्यवहार सुधारला नाही पण एक गोष्ट झाली ती म्हणजे मराठी चित्रपटांना राजाश्रय मिळाल्याने हिंदी चित्रपटाकडे गेलेले मराठी दिग्दर्शक पुन्हा मराठी चित्रपटांकडे वळले. वसंतराव जोगळेकर ('जानकी' व 'शेवटचा मालुसरा') गजानन जागिरदार ('वैजयंता' व 'दोन्ही घरचा पाहुणा') व्ही. शांताराम ('इये मराठीचिये नगरी' व 'पिंजरा').

हिंदी चित्रपटांची जीवघेणी स्पर्धा मराठी सिनेमाला सतावू लागली. राजा परांजपेंचा 'पाठलाग' (१९६४) हा यशस्वी चित्रपट मुंबईतल्या 'प्लाझा' थिएटर मधून पुढच्या हिंदी चित्रपटाचा करार असल्यामुळे हाऊसफुल्लचे बोर्ड झळकत असतांना काढून घ्यावा लागला. दादा कोंडकेच्या

'सोंगाड्या' (१९७१) या पहिल्याच चित्रपटाला थिएटरच मिळत नव्हते. शेवटी शिवसेनेने मुंबईच्या कोहिनूर चित्रगृहावर निदर्शने करून हिंदी सिनेमाचे प्रदर्शन बंद पाडून 'सोंगाड्या'ला चित्रगृह मिळवावे लागले.

हिंदीची ही स्पर्धा सर्व महाराष्ट्रभर होती. मराठवाडा व विदर्भात मराठी चित्रपट लावण्याचे निर्माते धाडसच करत नसत. म्हणजे प्रेक्षक उरला, फक्त पश्चिम महाराष्ट्रातला. महाराष्ट्रातील एकूण १,३०० चित्रगृहातील फक्त २०० थिएटर्स मराठी चित्रपट दाखवायची. शासनाने मराठी चित्रपटाला सहाय्य करावे यासाठी 'मराठी चित्रपट महामंडळ'ची स्थापना झाली. त्यांच्या विनंतीवरून शासनाने प्रत्येक चित्रगृहाने ४ आठवडे मराठी चित्रपट दाखवले पाहिजेत असा आदेश जारी केला पण तो कोणीच पाळत नसे. मुंबईतील स्टुडिओचे भाडे परवडत नाही. म्हणून बहुसंख्य मराठी चित्रपट कोल्हापूरच्या जुन्या पुराण्या मशीनरी असलेल्या स्टुडिओत चित्रित व्हायचे.

अशा एक ना दोन मराठी चित्रपट व्यवसायासमोर अनेक अडचणी उभ्या होत्या आणि तरीही व्यावसायिक दृष्ट्या तेलगू किंवा तामीळ चित्रपटांप्रमाणे सक्षम व्हावे असे निर्मात्यांना वाटत नव्हते.

या अडचणींशी सामना करत जुने दिग्दर्शक राजा परांजपे, अनंत माने, दत्ता धर्माधिकारी, माधव शिंदे, दिनकर द. पाटील, राजा ठाकूर चित्रपट दिग्दर्शित करत होते.

स्टुडिओ सिस्टीम कोसळल्यामुळे नव्या दिग्दर्शकाना प्रशिक्षण कोठे मिळणार? स्वाभाविकच नवे दिग्दर्शक फारसे येत नव्हते या काळात कोणीही सुशिक्षित माणूस मराठी चित्रपट सृष्टीत येत नव्हता. स्टुडिओपद्धत असतांना व्यवसायात आलेले कांही दिग्दर्शक आले. भालजी पेंढारकरांना 'मीठ भाकर' (१९४८) चित्रपटांत कमलाकर तोरणे सहाय्यक होता. भालजींचा हा चित्रपट गांधी वधोत्तर जाळपोळीत आगीच्या भक्ष्यस्थानी पडला तेव्हा भालजींनी तो पुन्हा चित्रित करायचे ठरविले. पण पटकथेची संहिताही जळून गेली होती. सहाय्यक कमलाकर तोरणे यांना मूळ संहिता पाठ होती. त्यांनी ती लिहून काढली. त्यावरून 'मीठ भाकर' पुन्हा चित्रित करण्यात आला. तोरणेंनी नंतर यशवंत पेठकरना सहाय्यक म्हणून काम केल्यावर महादेव शास्त्रींच्या कथेवरून 'गरीबाघरची लेक' (१९६२) स्वतंत्रपणे दिग्दर्शित केला.

मधुकर पाठक यांच्या नंतर राजा परांजपेंचे 'जगाच्या पाठीवर' (१९६०) पासून सहाय्यक असलेले राजदत्त यांना 'मधुचंद्र' (१९६७) मधे स्वतंत्र दिग्दर्शनाची संधी मिळाली.

याखेरीज प्रभाकर नायक 'संगत जडली तुझी न माझी' (१९६७) अनंत मानेंचे सहाय्यक दत्ता माने 'पंचारती' (१९६०) राम गबालेंचे सहाय्यक राजा बारगीर 'बोलकी बाहुली' (१९६०) माधव शिंदेचे सहाय्यक माधव भोईटे हे नवे दिग्दर्शक आले.

साठच्या दशकांत वरचष्मा राहिला तो प्रामुख्याने जुन्या दिग्दर्शकांचाच.

राज परांजपेंनी 'आधी कळस मग पाया' (१९६१) हा विनोदी चित्रपट दिल्यानंतर 'पाठलाग' (१९६४) द्वारा त्यांनी मराठीत रहस्यपट आणला. पण हिंदी प्रमाणे रहस्यपटाला भयाची जोड न देता कौटुंबिक जिव्हाळ्याची डूब दिली. 'पाठलाग' कमालीचा यशस्वी झाला.

राजा ठाकूर यांचा 'मुंबईचा जावई' हा व पु. काळेच्या कथेवरील नर्मविनोदी चित्रपट. टाइम्स ऑफ इंडियाने त्यातील चाळीच्या वास्तव चित्रणाचे कौतुक केले होते. तसाच रणजित देसाईंच्या कथेवरील 'रंगल्या रात्री अश्या' या चित्राने राजा ठाकूरांनी आपले वेगळेपण जपले. तमाशा चित्रपटांची चलती असूनही त्या मोहाकडे ते वळले नाहीत.

दिनकर द. पाटील विनायकांच्या तालमीत तयार झालेले. त्यांनी 'पाटलाचा पोर' वगैरे चांगले चित्रपट ५० च्या दशकात दिले होते. पाटील मूलतः लेखक. दिग्दर्शकाबरोबरच त्यांनी पटकथा लेखनही केले. 'जय मल्हार' या गाजलेल्या ग्रामीण चित्रपटाची त्यांची कथा किर्लोस्कर मधे प्रकाशित झाली होती. माधव शिंदेच्या 'शिकलेली बायको' (१९५९) ची पटकथा त्यांनी नाथ माधवांच्या 'डॉक्टर' कादंबरीवरून लिहली होती. साठच्या दशकात त्यांनी 'मल्हारी मार्तंड' (१९६५) व 'वरदक्षिणा' (१९६२) हे दोन उत्कृष्ट चित्रपट दिले. 'मल्हारी मार्तंड' नावाप्रमाणेच तमाशापट होता. पण त्यातले भाव दर्शन हृदयस्पर्शी होते. 'वरदक्षिणा' हा हुंडाविरोधी होता. लेखक

ग. दि. माडगूळकर होते. दिग्दर्शन दिनकर द. पाटलांचे होते. सामाजिक समस्याही त्यांनी समर्थपणे मांडली.

महाराष्ट्र राज्य निर्मिती नंतरच्या पहिल्या दशकांत नाटक पुन्हा नव्या जोमाने उभे राहिले. 'तो मी नव्हेच' (आचार्य अत्रे) 'रायगडाला जेव्हा जाग येते' (वसंत कानेटकर) 'नटसम्राट' (वि. वा. शिरवाडकर) अशी उत्तमोत्तम नाटके रंगमंचावर येत होती. स्वाभाविकच एका बाजूला हिंदी सिनेमाची जीवघेणी व्यावसायिक स्पर्धा तर दुसऱ्या बाजूला घरच्या मैदानावरच नाटकांची स्पर्धा अशा दुहेरी स्पर्धेला मराठी चित्रपटांना तोंड द्यावे लागले. नाटकांमुळे मध्यमवर्गीय प्रेक्षक दुरावला. उरला फक्त ग्रामीण प्रेक्षक.

५

पहिल्या दहा वर्षात मराठी सिनेमाची आर्थिक कोंडी इतकी झाली होती की नवी कथानके येत नव्हती. १९५५ ते १९६० संयुक्त महाराष्ट्राचा अभूतपूर्व लढा लढला गेला त्याचे प्रतिबिंब मराठी चित्रपटात उमटले नाही. सामाजिक प्रश्नापासून मराठी सिनेमा दूरच राहिला.

या पार्श्वभूमीवर १९७१ साली दादा कोंडकेचा 'सोंगाड्या' अवतरला. 'विच्छा माझी पुरी करा' या विलक्षण गाजलेल्या वगनाट्यानें दादा कोंडके मधला हरहुन्नरी नट शहरी व ग्रामीण प्रेक्षकांना परिचित होता.

'सोंगाड्या'ची कथा कल्पना भालजी पेंढारकरांची. दादा कोंडकेची प्रतिमा लक्षात घेऊन भालजींनी कथा सूत्र तयार केले. दादांची 'विच्छा'चे लेखक वसंत सबनिस यांच्यावर विलक्षण भक्ती. दादांनी पटकथा सबनिसांना लिहायला सांगितली. सबनिसांनी तो पर्यंत चित्रपट लिहिलेला नव्हता. भालजींनी त्यांना प्रोत्साहन दिले. सबनिसांनी संवाद प्रचुर पटकथा लिहून भालजींना दाखवली. भालजी म्हणाले ६ चित्रपट निर्माण करता येतील एवढी मोठी पटकथा तुम्ही लिहिलेय. पण मी ती छोटी करून घेतो.

दादांची विनोदी भूमिका राम कदम यांचे उत्तम संगीत, तमाशाची पार्श्वभूमी या वैशिष्ट्यांमुळे प्रेक्षकांनी 'सोंगाड्या'ला प्रचंड प्रतिसाद दिला. कितीतरी वर्षांनी मुंबईतल्या चित्रपटगृहात 'सोंगाड्या' रौप्यमहोत्सवी ठरला. महाराष्ट्रभर 'सोंगाड्या'ने उत्पन्नाचे उच्चांक गाठले. ग्रामीण प्रेक्षक दादांच्या विनोदावर जाम खूष होता. पुढे दादांचे ओळीने ९ चित्रपट रौप्यमहोत्सवी ठरले. पण दादांनी चित्रपट हे माध्यम तमाशा म्हणूनच स्वीकारले. हे त्यांचे सर्व चित्रपट पहाणाराच्या सहज लक्षात यावे. मराठी सिनेमात कांही प्रगती करण्याऐवजी दादांनी या नव्या माध्यमाला 'तमाशा' स्तरावर उतरविले. द्व्यर्थी संवाद हे दादांचे आणखी एक वैशिष्ट्य. हाफपँट, पुढे लोंबणारी नाडी, मुद्रा बावळी असा सामान्य माणूस ही दादांची ठरलेली व्यक्तीरेखा या 'इमेज'मधून त्यांना बाहेरच पडता आले नाही.

याचवर्षी विजय तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकावरून नाटकातलेच सारे कलावंत घेऊन सत्यदेव दुबे यांनी त्याच नावाचा चित्रपट दिग्दर्शित केला. चित्रपटाची पटकथा विजय तेंडुलकरांनीच तयार केली होती. 'सोंगाड्या'त ९ गाणी होती. तर 'शांतता'मधे गाणेच नव्हते. सिनेमाचा खरा बाज 'शांतता'मधे होता. पण त्याला यश मिळणे शक्यच नव्हते. खरा सिनेमा स्वीकारायला मराठी प्रेक्षक प्रगल्भ झालेलाच नव्हता. पण 'शांतता'ने मराठी प्रेक्षकांना खऱ्या सिनेमाची जाणीव करून दिली. हे मराठी सिनेमाच्या इतिहासात नोंदले गेलेच पाहिजे.

सत्तरच्या दशकात व्यावसायिक सिनेमाच्या समोर हा दुसरा समांतर प्रयोग उभा राहिला. पण हा काळाच्या पुढचा प्रयोग होता. शांताराम बापूंनी मराठीत पुन्हा चित्रपट निर्मिती करायचे ठरवून 'पिंजरा' (१९७२) रंगीत चित्रपट निर्माण केला. ग्रामीण प्रेक्षक नजरे समोर असल्याने तमाशाची पार्श्वभूमी 'पिंजरा'च्या कथेला आहे. पण एका सत्शील पापभीरू शाळा मास्तराचे अधःपतन हा 'पिंजरा'चा कथा विषय आहे. मूळ परकीय चित्रपटावरून कथा उचललेली असूनही शांतारामबापूंनी 'पिंजरा'ला अस्सल आणि वास्तव ग्रामीण साज चढविला. गीत-नृत्य हाच फॉर्म्युला वापरून त्याला रंगाची जोड दिली. तंत्रदृष्ट्या 'पिंजरा' एक सर्वांग सुंदर चित्रपट. ग्रामीण व शहरी प्रेक्षकांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. दादा कोंडके पेक्षाही अधिक आर्थिक यश 'पिंजरा'ने मिळविले. मराठी चित्रपटात नंतर रंगीत छायालेखनाचे युग अवतरले ते 'पिंजरा'च्या यशामुळेच.

'सामना' (१९७५) चित्रपटाने मराठी सिनेमाला वेगळी दिशा दिली. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर जी

सहकार चळवळ महाराष्ट्रात उभी राहिली व विशेषतः साखर कारखानदारांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव टाकला त्याचे चित्रण 'सामना'त आहे. महाराष्ट्रातील वर्तमान काळचे चित्रण बऱ्याच वर्षांनी चित्रपटात आले. विशेष म्हणजे तो पर्यंत मराठी साहित्यातही साखर सम्राटांचे चित्रण झालेले नव्हते. डॉ. जब्बार पटेल 'सामना'ने रंगभूमीकडून चित्रपटाकडे आले. 'सामना' बर्लीन आंतर-राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात स्पर्धा विभागात गेलेला पहिला मराठी चित्रपट. प्रारंभी प्रसिद्धीचा पाठींबा न मिळाल्याने 'सामना' चालला नाही. पण नंतर 'सामना'ने प्रेक्षकही मिळविला आणि खळबळही उडवून दिली.

'प्रभात'चे एक भागीदार फत्तेलाल यांचे चिरंजीव बाबासाहेब फत्तेलाल दिग्दर्शित 'चोरीचा मामला' (१९७६) नचिकेत व जय पटवर्धन दिग्दर्शित '२२ जून १८९७' डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'सिंहासन' (१९७९) डॉ. लागू दिग्दर्शित 'झाकोळ' (१९८०) असे कांही वेगळ्या वाटेने जाणारे चित्रपट हे ७० च्या दशकाचे वैशिष्ट्य आणि त्याचबरोबर रंगीत चित्रपट निर्माण केल्या शिवाय पर्याय नाही. याची निर्मात्यांना झालेली जाणीव.

मराठी निर्मात्यांच्या मागणीनुसार महाराष्ट्र सरकारने करपरतीची योजना १९७६ मध्ये लागू केली. निर्मात्यांच्या पहिल्या चित्रपटाने जेवढा करमणूक कर गोळा केला असेल त्यातील ८ लाख रुपये दुसरा चित्रपट पूर्ण झाल्यावर त्याला परत मिळणार ! करपरतीच्या या योजनेमुळे काही प्रमाणात मराठी चित्रपट व्यवसायाला स्थैर्य प्राप्त झाले. वर्षाला १२/१३ ऐवजी २३/२४ चित्रपट निघू लागले. रंगीत चित्रपटांना हाच परतावा १२ लाख रुपयापर्यंत मिळू लागला.

याच काळात म्हणजे १९७२ ला मुंबई दूरदर्शन सुरू झाले. पण दूरदर्शनचे प्रक्षेपण फक्त काही तासच होते. त्यामुळे मराठी चित्रपटांना स्पर्धा जाणवली नाही. उलट दर रविवारी मराठी चित्रपट दाखवायला दूरदर्शनने सुरुवात केल्याने उत्पन्नाचा आणखी एक स्त्रोत उपलब्ध झाला.

थोडक्यांत ७० चे दशक हे जुन्याची वर्दळ आणि नवतेची चाहूल अशा संमिश्र वातावरण संपले.

६

ऐंशीच्या दशकात आरंभ व्यावसायिक सिनेमात 'गोंधळात गोंधळ' (१९८१) या व्ही. के. नाईक दिग्दर्शित विनोदी चित्रपटाने झाला. विनोदी चित्रपटांचे दशक असे या ऐंशीच्या दशकाचे वर्णन करता येईल.

पण याचवर्षी डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'उंबरठा' आणि अमोल पालेकर दिग्दर्शित पहिला चित्रपट 'आक्रीत' प्रकाशित झाले. दोन्ही चित्रपट राष्ट्रीय स्तरावर पोचले. दोन्ही चित्रपटांचे लेखक विजय तेंडुलकरच होते. दोन्ही चित्रपटांनी वर्तमानाचे भान मराठीत जागवले. दोन्ही चित्र-पटांना विशेष प्रेक्षक लाभला नाही.

'उंबरठा' शांता निसळ यांच्या 'बेघर' या आत्मकथान-कावर आधारित होता. समाजात तेव्हा स्त्री मुक्ती चळवळ बऱ्यापैकी स्थिरावत होती. सुशिक्षित स्त्री स्वतःचे सत्व शोधू लागली होती. 'उंबरठा'तील सुलभा महाजन या स्त्रीवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्तीरेखा होती. स्मिता पाटीलने या सुलभा महाजन व्यक्तिरेखेचे सारे भावविभोर प्रसंग उत्कटतेने साकारले. स्मिता पाटीलची ही तिच्या अभिनय कारकिर्दीतली सर्वोत्कृष्ट भूमिका. 'उंबरठा'नें मास्को चित्रपट महोत्सवात मराठीचे प्रतिनिधित्व केले.

'आक्रीत'ची पटकथा तेंडुलकरांनी नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या पटकथा स्पर्धेसाठी पाठविली होती. तेथे या पटकथेला उत्कृष्ट पटकथेचे पारितोषिकही मिळाले. पालेकरांनी कार्पोरेशन कडून हक्क घेऊन 'आक्रीत' निर्माण केला. मानवत खून खटला हा अंध-श्रद्धेतून निर्माण झाला होता. त्या कोर्ट खटल्यावर आधारित 'आक्रीत' होता. सत्यजित रायनी कलकत्ता महोत्सवातील पॅनोरमा विभागात 'आक्रीत' पाहिला तेव्हा त्यांनी आपल्या पसंतीचे शिक्का मोर्तब करतांना एकच सूचना केली ती म्हणजे या सत्य घटनेचा उल्लेख चित्रपटाच्या आरंभी करायला हवा.

'आक्रीत' फ्रान्स मधल्या नान्टस आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पारितोषिक विजेता ठरला. दोन्ही चित्रपटांना व्यावसायिक अपयशाला सामोरे जावे लागले याचे कारण मराठी प्रेक्षकांची सिनेमा बद्दलची प्रगल्भता कमी पडली. त्यामुळे मळलेली वाट सोडण्याचे धाडस करणे मराठी चित्रपटांना झेपणार नाही. असाच संदेश चित्रपट निर्मितीत

गुंतलेल्यांना गेला.

अमोल पालेकर, जब्बार पटेल यांच्या नंतर विजया मेहता 'स्मृति चित्रे' (१९८४) व अरविंद देशपांडे 'शापित' (१९८२) या चित्रपटांमध्ये रंगमंचाकडून चित्रपटात आले. पण त्यांचा फारसा प्रभाव जाणवला नाही. तिसरा रंगभूमी-वरचा दिग्दर्शक दामू केंकरे 'तुझ्यावाचून करमेना' (१९८६) या विनोदी चित्रातून पडद्यावर आला. त्याचे लेखन श्रीनिवास भणगे यांचे होते. चित्रपट यशस्वी झाला. पण केंकरे सिनेमात रमले नाहीत.

व्यावसायिक सिनेमा विनोदी चित्रपटांकडे वळला. सचिन व महेश कोठारे हे हिंदी सिनेमात बाल कलाकर म्हणून यशस्वी झाले होते. दोघेही दिग्दर्शनाकडे वळले. सचिनचा 'नवरी मिळे नवऱ्याला' (१९८४) व महेश कोठारेंचा 'धूमधडाका' (१९८५) दोन्ही चित्रपट नर्मविनोदी होते. दोन्हीत नायकाची भूमिका सचिन व महेश यांचीच होती. 'नवरी मिळे नवऱ्याला' वसंत सबनिसांनी लिहला तर 'धूमधडाका' अण्णासाहेब देऊळगांवकरांनी. दाक्षिणात्य दिग्दर्शक श्रीधर यांच्या 'प्यार किये जा' या हिंदी चित्रपटावरून नक्कल करून 'धूमधडाका' बनला होता.

सचिन आणि महेश यांनी हिंदी चित्रपटांचे अनुकरण मराठीत आणले. सचिनचे नंतर 'गंमत जंमत' (१९८५) 'अशी ही बनवाबनवी' (१९८६) हे विनोदी चित्रपट तुफान यशस्वी झाले. महेशचे 'दे दणादण' (१९८५) 'थरथराट' (१९८६) ही विनोदी चित्रे लोकप्रिय झाली.

विनोदी चित्रपटांच्या या लाटेत राजदत्त दिग्दर्शित 'पुढचं पाऊल' (१९८६) हा हुंड्याचे दुष्परिणाम दाखविणारा जयवंत दळवींच्या 'पर्याय' नाटकावर बेतलेला चित्रपट कांहीसा दुर्लक्षिला गेला.

१९८५ ते १९९० या पाच वर्षात करपरतीने आलेले स्थैर्य व हिंदी सिनेमाची आणि नाटकांची कमी झालेली स्पर्धा याबरोबरच १९८४ साली रंगीत दूरदर्शनने सारा महाराष्ट्र जोडला गेला आणि व्हिडीओ क्रेझ कळसाला पोचली. त्यामुळे हिंदी सिनेमा जर्जर झाला. याचा फायदा मराठी चित्रपटांना अधिक प्रेक्षक मिळण्यात झाला. नाटकांना अनेक नाट्यगृहे उपलब्ध झाली पण श्रेष्ठ नाटकेच नव्हती.

या परिस्थितीमुळे मध्यमवर्गीय प्रेक्षक पुन्हा मराठी चित्रपटांकडे वळला. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शहरीकरणाची प्रक्रिया ८० च्या आधीच सुरू झाली होती. शिवाय सचिन व महेश हे हिंदीचे ग्लॅमर असलेले नट होते. स्वाभाविकच त्यांचे चित्रपट शहरी वातावरणातले असूनही ग्रामीण प्रेक्षकांना रुचले.

विनोदी चित्रपटांच्या या माहोलमध्ये कोल्हापूरच्या सतीश रणदिवेचा 'बहुरूपी' (१९८४) हा वेगळा पण गंभीर चित्रपट प्रेक्षकांनी दृष्टीआड केला. या नव्या दिग्दर्शकाचा हा पहिला चित्रपट त्याच्याविषयीच्या अपेक्षा वाढविणारा होता. पण त्यानंतर परिस्थितीशरण बनून सतीश रणदिवे कोल्हापूर ढंगाच्या जुनाट वळणाचे चित्रपट दिग्दर्शित करू लागला.

कांचन नायक हा डॉ. जब्बार पटेल यांचा सहाय्यक 'कळत नकळत' (१९८९) चित्रपटाने दिग्दर्शक बनला. त्याच्या दिग्दर्शनातील ताजेपणाने व शं. ना. नवरेंच्या कौटुंबिक कथेमुळे हा चित्रपट बऱ्यापैकी यशस्वी झाला. स्मिता तळवलकर या चित्रपटाची निर्माती होती.

रंगमंचावर यश मिळविल्यानंतर पुरुषोत्तम बेर्डे चित्रपटाकडे वळले 'हमाल दे धमाल' (१९८९) विनोदाची पाखरण करत बेर्डेनी प्रेक्षक पसंती मिळवली. हा चित्रपट म्हणजे माय फेअर लेडी चित्रपटाचीच कथावस्तु मराठीत आणलेली होती. पण बेर्डेचा पुढचा प्रवास अन्य व्यावसायिक दिग्दर्शकांपेक्षा वेगळा नव्हता.

७

विसाव्या शतकाचे अखेरचे दशक मराठी सिनेमाला आरंभी क्लेशकारक ठरले. या दशकाचा आरंभ 'माहेरची साडी' या कौटुंबिक जिव्हाळ्याच्या पण पूर्णतः मेलोड्रामा धरतीच्या चित्रपटाने झाला. मागचे दशक विनोदाचे होते. ते संपत आले होते. 'माहेरची साडी' हा दादा कोंडकेचा पुतण्या विजय कोंडके याने दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट. दादांचा विनोदाचा बाज त्याच्याकडे नव्हता. त्याने आपल्या स्वभावानुसार कौटुंबिक वळणाचा गंभीर चित्रपट सादर केला. ही कौटुंबिक कथा ब्राह्मण कुटुंबाची नव्हती तर बहुजन समाजातील कौटुंबिक भावना जोपासणारी होती. स्वाभाविकच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातला अगदी तळागाळातला क्वचितच सिनेमाला जाणारा प्रेक्षक 'माहेरची साडी'ला लाभला. शहरातही मोलकरणी, गिरणी कामगार, झाडू कामगार अश्या तळागाळातील प्रेक्षकांनी

चित्रपटाला गर्दी केली.

'माहेरची साडी'ला अभूतपूर्व यश मिळाले इतके की दादा कोंडकेनी 'साडी'चे विडंबन करण्यासाठी 'सासरचे धोतर' (१९९६) हा विनोदी चित्रपट काढला.

एका बाजूला 'सामना', 'उंबरठा', 'आक्रीत', 'पुढचं पाऊल', 'कळत नकळत' इ. चित्रपटांनी मराठी चित्रपटांचा चेहरा मोहरा बदलण्याचा जो प्रामाणिक प्रयत्न केला. तो 'माहेरची साडी'ने पुसून टाकला. मराठी सिनेमा पुन्हा जुन्या फॉर्म्युलात अडकणार अशी भीती निर्माण होत असतानाच मनोरंजन व्यवसायात पुन्हा जोरदार परिवर्तन आले. त्याचा दणका मराठी चित्रपटांना बसला.

व्हिडीओ चोरीच्या बेकायदेशीरपणावर हिंदी सिनेमाने १९९० साली मात केली. व्हिडिओ वितरकांना चित्रपट विकत घ्यायला भाग पाडले. त्यामुळे हिंदी चित्रपटांना हक्क विकण्यासाठी आणखी एक 'टेरीटरी' उपलब्ध झाली. अमिताभ बच्चनच्या 'तुफान' चित्रपटाचे व्हिडीओ हक्क समुद्रा व्हिडीओने ५२ लाखांना विकत घेतले. मराठी सिनेमाचे हक्क अगदीच अल्प किमतीत विकले जायचे.

या बरोबरच १९९१ साली केंद्र सरकारने आर्थिक धोरण उदारीकरण व जागतिकीकरणात बदलले. यामुळे मनोरंजन व्यवसायात बदल झाले. मुख्य म्हणजे नवी नवी चॅनल्स आली. झी, सोनी, स्टार इ. चॅनेल्स पाठोपाठ केबल टीव्ही आला. त्यामुळे घर बसल्या असंख्य चित्रपट प्रेक्षकांना पहायला मिळू लागले. त्यापाठोपाठ १९९५ च्या आसपास चित्रपट निर्मितीत डिजिटल तंत्रज्ञान आले. व्हिडीओ कालबाह्य होऊन 'डिव्हीडी' आली.

या साऱ्याचा परिणाम म्हणजे मराठी सिनेमाचा प्रेक्षक घटला. जब्बार पटेल दिग्दर्शित 'एक होता विदूषक' (१९९२) आणि पुरुषोत्तम बेर्डेचा 'भस्म' (१९९४) चित्रपटगृहात प्रकाशित झालेच नाहीत. निर्माती स्मिता तळवळकर 'सवत माझी लाडकी' (१९९२) नंतर 'राऊ' या दूरदर्शन मालिकेकडे वळली. साताऱ्याचे निर्माते अरुण गोडबोले यांनी चित्रपट निर्मिती थांबवली.

मराठी चित्रपटांना प्रेक्षकच येत नाही तर करमणूक कर गोळा कसा होणार तेव्हा करमणूक कर परतावा योजना रद्द करून मराठी चित्रपटांना १५ लाखांचे अनुदान द्यावे असा लकडा मराठी चित्रपट महामंडळाने महाराष्ट्र शासनाकडे लावला. शेवटी १९९७ साली तेव्हाच्या सेना-भाजपा सरकारने १५ लाखांचे सानुग्रह अनुदान आणि मराठी चित्रपटांना करमणूक करमाफी जाहीर केली. हे १५ लाखांचे अनुदान नंतर २०/२५ लाखांपर्यंत वाढत गेले. याचा परिणाम म्हणजे अमराठी निर्माते मराठी चित्रपटात भांडवल ओतू लागले. येथेही हे सानुग्रह अनुदान दुसऱ्या चित्रपटासाठी आहे. करमाफी मुळेही मराठी चित्रपटांचे तिकीटदर कमी झाले. याचाही फायदा झाला.

२००२ साली देशातले पहिले मल्टीफ्लेक्स आयमॅक्स ॲडलॅब मुंबईत सुरू झाले. तेथे आठवड्याचे भाडे सिंगल स्क्रीन थिएटर प्रमाणे ठराविक नसून ६०-४० असे प्रमाण निश्चित करण्यात आले. यामुळेही मराठी चित्रपटांना लाभ झाला. आणि मराठी चित्रपटांची संख्या २०/२५ वरून वाढू लागली. २००८ साली ११० चित्रपट सेन्सॉर झाले.

२१ व्या शतकात मराठी सिनेमा कोणते वळण घेणार याची झलक 'श्वास' (२००३) या चित्रपटाने दाखवली संदीप सावंत या तरुण दिग्दर्शकाचा हा पहिला चित्रपट. मराठी सिनेमातले कौटुंबिक, विनोदी, ग्रामीण, तमाशा प्रधान हे विसाव्या शतकातले सारे फॉर्म्युले त्याने बाजूला ठेवले. गाणी, नृत्यही काढून टाकली. आणि कथन पद्धतीने कथा उलगडत गेली. 'श्यामची आई' नंतर ५० वर्षांनी 'श्वास'ला पुन्हा राष्ट्रीय स्तरावर सर्वोच्च चित्रपटाचा सन्मान मिळाला. यामुळे 'श्वास' पहायला प्रेक्षकांनी गर्दी केली. त्यानंतर भारतातर्फे ऑस्करलाही 'श्वास' पाठविण्यात आला. जगभरच्या अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही तो पोचला.

चित्रपटांची गर्दी झाल्याने नवी नवी कथानके मराठी चित्रपटात येऊ लागली आहेत. 'वळू', 'हरिश्चंद्राची फॅक्टरी', 'गाभ्रीचा पाऊस', 'जोगवा' असे फॉर्म्युला व नृत्य गीतांची बांडगुळे संपूर्णतः फेकून देऊन नवीन जाणिवा प्रकट करणारे चित्रपट प्रसिद्ध झाले. २१ व्या शतकातील पहिल्या दशकातला सिनेमा आंतरराष्ट्रीय चित्रपटांच्या मालिकेत जाऊन बसण्याला सिद्ध झाला आहे. १९७१ साली 'शांतता कोर्टने' जी नव्या मराठी सिनेमाची पाऊलवाट दृग्गोचर झाली ती आज पाऊलवाट राहिलेली नसून

राजमार्ग बनली आहे. तरुण दिग्दर्शकांच्या या प्रयत्नांना प्रेक्षकांचा प्रतिसादही उत्तम नसला तरी बऱ्यापैकी मिळत आहे ही समाधानाची बाब आहे. केरळ बंगालमधे आधी फिल्म सोसायटी चळवळ आली आणि मग त्या भाषातील सिनेमा बदलला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचला. महाराष्ट्रात शासकीय अनुदानामुळे चित्रपटांची संख्या वाढली. आणि कथानकाचे नवे प्रयोग सुरू झाले आहेत. मराठी सिनेमा आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचण्यासाठी सुजाण प्रेक्षक निर्माण करणारी फिल्म सोसायटी चळवळही सुदृढ बनविण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. अनेक जिल्हा शहरात ही चळवळ पोचली आहे. उत्तम चित्रपट निर्मिती ही केवळ शासकीय अनुदानातून होत नाही, तर प्रतिभावंत दिग्दर्शक आले तरच होते. उमेश कुलकर्णी (वळू) सचिन कुंडलकर (गंध) हे दिग्दर्शक फिल्म इन्स्टिट्यूटमधून आलेले आहेत. तर मंगेश हाडवळे (टिंग्या) सतीश मन्वर (गाभ्रीचा पाऊस) हे तरुण पुणे विद्यापीठाच्या ललीत कला केंद्रातून शिक्षण घेऊन आलेले आहेत. त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत. गजेंद्र अहिरे हा तरुण दूरदर्शन मालिका दिग्दर्शित करून मराठी चित्रपट दिग्दर्शनाकडे वळला आणि अवघ्या ५ वर्षात त्याने २५ चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. मूलतः गजेन्द्र हा लेखक आहे. त्यामुळे त्याच्या प्रत्येक चित्रपटाचा कथा विषय वेगळा असतो. 'नॉट ओन्ली मिसेस राऊत'मधे एक स्त्रीने घेतलेला सूड हा कथाविषय असला तरी तिच्या मदतीला वकील स्त्री धावून जाते यामुळे चित्रपट वर्तमानाच्या जवळ येतो. गजेंद्रने नृत्यगीत हा फॉर्म्युला टाकून दिला नाही.

प्रतिभावंत दिग्दर्शकाची चित्रकृती समजून घेऊन त्याला दाद देणारा रसिक प्रेक्षकही निर्माण व्हायला हवा हे कार्य फिल्म सोसायटी चळवळ शासकीय सहाय्या शिवाय स्वयंसेवी वृत्तीतून करत आहे. या दोहोंचा मेळ बसायला आणखी थोडा काळ जावा लागेल.

मराठी सिनेमात आज निराशेचे वातावरण नाही. तक्रारीचा सूर नाही. हे तरुण दिग्दर्शक अडचणींचा पाढा वाचत बसत नाहीत. ही घटना नोंदवायला हवी. यातूनच उद्याचा मराठी सिनेमा आकार घेणार आहे.

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतरचा पन्नास वर्षाचा आलेख मांडताना या लेखात केवळ चित्रपट आणि दिग्दर्शक यांचा वेध घेतलेला आहे. संगीतकार, तारे-तारका, यांचा इतिहास मांडणे टाळलेले आहे. कारण चित्रपट हे दिग्दर्शकाचे माध्यम आहे तोच या माध्यमाला दिशा देऊ शकतो. माध्यमाची प्रगती करू शकतो. माध्यमाची शक्यता वाढवू शकतो.

सिनेमा ही आधुनिक 'कला' मानली जाते कारण ती यंत्राधिष्ठित आहे. त्यामुळे तांत्रिक प्रगती जशी होत जाईल तसतशी चित्रपटाची निवेदन शैली बदलत जाईल. मराठी सिनेमा गेल्या ५० वर्षात शब्द माध्यमाकडून प्रतिमा माध्यमाला महत्त्व देऊ लागला आहे ही अत्यंत समाधानाची घटना आहे.

❖❖❖

अनुक्रमणिका

महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीचा मागोवा (१९६०-२०१०)

– श्रीमती करुणा गोखले

कृषिसंस्कृतीने जम बसवल्यापासून पृथ्वीतलावर एक महासत्ता अहर्निश नांदते आहे. ती म्हणजे पुरुषसत्ता. स्त्रीमुक्ती चळवळ म्हणजे या महासत्तेला संघटितपणे दिलेले आव्हान आहे. स्त्रियांच्या न्याय्य हक्कांसाठी केलेला संघर्ष हे झाले स्त्रीमुक्ती चळवळीचे दृश्य रूप. परंतु मूलतः ही चळवळ म्हणजे विशिष्ट मूल्यव्यवस्थेविरुद्ध उठवलेला आवाज आहे. या मूल्यव्यवस्थेने स्त्रीचे एक माणूस म्हणून सर्व निसर्गदत्त हक्क हिरावून घेतले म्हणून तिला मूलभूत मानवी अधिकारांसाठी लढणे क्रमप्राप्त झाले. या अर्थाने स्त्रीमुक्तीवाद ही स्वयंभू तत्त्वप्रणाली नाही. आचार, विचार, संचार, व्यवसाय आणि अभिव्यक्ती यांसाठीचे बहुआयामी स्वातंत्र्य स्त्रीकडून हिरावून घेतले गेले नसते, तर स्त्रीमुक्तीवादाची वेगळी राहुटी बांधण्याची गरज पडली नसती. कृषिसंस्कृतीमुळे शक्य झालेली खासगी मालमत्तेची निर्मिती व तिच्या संरक्षणार्थ विकसित झालेली कुटुंबसंस्था यांमुळे जी पितृकेंद्री, पुरुषहितवादी मूल्यव्यवस्था बळकट झाली त्याला प्रतिक्रिया म्हणून स्त्रीमुक्तीवाद विकसित झाला.

शोषणमुक्त, वर्गविरहित व्यवस्थेसाठी झालेल्या लढ्यांमधून 'स्वातंत्र्य, समता, बंधुता ' ही लोकशाहीची त्रिसूत्री तयार झाली. 'Rights of Man' म्हणजेच मानवी हक्कांची सनद लिहली गेली. वास्तवात ती फक्त पुरुषांच्या हक्कांची सनद होती. म्हणजेच "मानव" या संकल्पनेत स्त्रीचा समावेश केला नव्हता. तिला असे वगळले नसते, तर स्त्रीमुक्ती चळवळ जन्माला येण्याचे काही प्रयोजन नव्हते. तिच्या प्रवासाचे यथातथ्य आकलन व्हायचे असेल, तर समाज प्रस्थापनाच्या ओघात स्त्रीच्या माणूसपणाचा कसा संकोच झाला, तिचे सारे अस्तित्व पुरुषशासित कुटुंबव्यवस्थेला आणि अर्थकारणाला कसे जुपले गेले याविषयीचे ऐतिहासिक भान असणे गरजेचे आहे. अन्यथा, स्त्रिया सतत काहीतरी मागत असतात आणि सतत कशालातरी विरोध करत असतात अशा शेऱ्यांद्वारे स्त्रीमुक्ती चळवळीची कुचेष्टा सुरू राहते.

स्त्रीमुक्ती चळवळीने केलेल्या प्रत्येक मागणीला तिच्या कुठल्या ना कुठल्या हिरावलेल्या अधिकाराचा पूर्वेतिहास असतो व त्यातून तिच्याभोवती पुरुषसत्तेची आणखी एक वीट चढवलेली असते. उदाहरणार्थ, मुलाच्या नावात आईचेही नाव उद्धृत करण्याची आणि राहत्या घरावर पती–पत्नी यांची संयुक्त मालकी असावी ही स्त्रीसंघटनेची मागणी! नऊ महिने गर्भाचा भार स्त्री वाहते. प्रसंगी जीव धोक्यात घालून मुलाला जन्म ती देते. त्या पुढची १४-१५ वर्षे बालकाच्या संगोपनासाठी तिला जबाबदार धरले जाते. तरीही तिच्या मुलांवर 'नैसर्गिक' हक्क पित्याचा मानला जातो पितृकेंद्री व्यवस्था स्थिरावण्यापूर्वी बालके जन्मदात्रीच्या नावाने ओळखली जात. म्हणून तर राधेय, कौंतेय, अंजनिसूत! आता मात्र गोविंदग्रज, केशवसूत, शिवपुत्र!! स्त्री व बालके जेथे राहत त्या जागेचा ताबा स्त्रीकडे असे. पितृकेंद्री व्यवस्थेत बालके आणि जागा या दोन्हींचा ताबा पुरुषाकडे गेला. परिणामी स्त्रीच्या नशिबी पूर्णपणे पुरुषावलंबी जीणे आले. 'तिने' जन्माला घातलेली आणि 'तिने' खस्ता खाऊन वाढवलेली मुले तो स्वतःकडे, स्वतःची म्हणून ठेवून घेऊन तिला घरातून हाकलून देऊ शकतो. या अन्यायाला विरोध म्हणून स्त्रीने जन्माला घातलेल्या मुलांवर आणि त्यांना घेऊन ती ज्या जागेत राहते त्या घरावर 'तिचा पण' हक्क असावा अशी मागणी पुढे आली.

स्त्रीवरचा प्रत्येक अन्याय हा तिच्या निसर्गसुलभ प्रवृत्तींना दडपून, पुरुषसत्तेला बळकटी देणाऱ्या अनैसर्गिक वर्तनाची तिच्यावर सक्ती करण्यातून निर्माण होतो. खुल्या हवेत श्वास घेणे, स्वतःची शक्ती आजमवण्यासाठी आणि सांघिक जीवनाच्या आनंदासाठी मैदानी खेळ खेळणे, कुतूहल शमवण्यासाठी ज्ञानार्जन करणे व मुक्त संचार करणे, कामभावना व्यक्त करणे, आवडीचा जोडीदार

अनुक्रमणिका

मिळवून त्याच्याबरोबर लैंगिक आनंदाची देवाण-घेवाण करणे, स्वतःच्या सृजनशील ऊर्मींना वाट करून देण्यासाठी निर्मितीशील उपक्रम हाती घेणे या सर्व प्रकृतिसुलभ इच्छा आहेत. परंतु शतकानुशतके, स्त्रीला त्यांची पूर्तता करण्याचा हक्क डावलला गेला. तिच्यावर पडदा नाहीतर बुरखा लादला. तिला घरात डांबून तिच्या सामाजिक जीवनाचा संकोच केला. तिला शिक्षणाची दारे बंद केली. तिच्यावर बालविवाह लादून आणि पुनर्विवाहास बंदी करून तिच्या लैंगिक भावनांचा कोंडमारा केला. तिची सर्व सृजनशीलता घरकाम आणि बालसंगोपनाच्या ओझ्याखाली चिणून टाकली. मातृत्व ही एक प्रकृतिसुलभ प्रक्रिया आणि मातृभाव ही नैसर्गिक भावना आहे. परंतु मानवाचे आयुष्य जसजसे पुरुषी सत्ताकारणाला जखडले गेले, तसतशी मातृत्वावर पुरुषसत्तेस हितकारक अशी अनैसर्गिक बंधने पडत गेली. त्यावर सामाजिक मान्य–अमान्यतेची अट लादण्यात आली. विवाहाच्या चौकटीतील गर्भधारणाच ग्राह्य मानली जाऊ लागली. विवाहापूर्वीचे, विवाहबाह्य संबधातून निर्माण झालेले, किंवा पतीनिधनानंतरचे मातृत्व आणि बालक बेकायदेशीर आणि बहिष्कृत झाले. मुलाची आई कोण हे निसर्ग उघडच करत असतो. जोवर मुलाचे नैसर्गिक पालकत्व; म्हणजेच आईचा मुलावर हक्क समाज ग्राह्य मानत होता; तोवर कुठल्याच बालकावर अनौरस, बेवारस हा कलंक लागला नाही. परंतु पितृकेंद्री व्यवस्थेत नैसर्गिक प्रक्रियेतून जन्माला येणाऱ्या अश्राप बालकावर मानवनिर्मित कायद्याची फुटपट्टी चालवण्याचा अनैसर्गिक प्रघात मान्य झाला.

निसर्गाला स्त्री व पुरुषापैकी कुणा एकाची सत्ता मान्य नाही. परंतु मानवी समाजाला स्त्री–पुरुष विषमताच नैसर्गिक वाटू लागली आहे.

स्त्रीच्या प्रकृतिसुलभ ऊर्मी दडपून टाकण्यासाठी तिच्यावर लादलेले निर्बंध ही स्त्रीच्या दुय्यमकिरणाची दृग्गोचर लक्षणे आहेत. त्याविरुद्धचा लढा ही स्त्रीमुक्ती चळवळीच्या उद्दिष्टांची दृश्य अभिव्यक्ती आहे. पण त्यामागे, नर-मादी या नैसर्गिक फरकावर स्त्री-पुरुष भेदभावाचे रोपण करून पुरुषकेंद्री सत्ताकारण करण्यास विरोध ही प्रेरणा आहे.

महाराष्ट्रातील पन्नास वर्षांतील स्त्रीमुक्ती चळवळीचा आढावा घेताना स्त्रीच्या हक्कांसाठी झालेले लढे, स्थापन झालेल्या संघटना, त्यांनी घडवून आणलेले कायदे, शासन यंत्रणेचा सहभाग, स्त्रीवादी प्रकाशने यांचा निर्देश तर होईलच. परंतु स्त्रीमुक्ती चळवळीची सैद्धांतिक मांडणी कशी उत्क्रांत होत गेली यावर अधिक भर देण्यात येईल. चळवळीची भूमिका काही मूठभर अभ्यासक वा चळवळीचे नेते मांडत असतात. अगदी शेवटच्या फळीतील कार्यकर्त्यांपर्यंत ती स्पष्टपणे झिरपलेली असतेच असे नाही. अनेकदा वारंवार मांडणी करूनही जनसामान्यांमधील चळवळीविषयीचे समज-अपसमज स्पष्ट होतीलच असेही नसते. त्यातूनच कुठल्याही चळवळीविषयी पूर्वग्रह तयार होतात. स्त्रीमुक्ती चळवळही त्याला अपवाद नाही.

महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळ हे पाश्चात्त्य स्त्रीमुक्ती चळवळीचे अंधानुकरण आहे या नेहमीच्या टीकेचाही येथे थोडा परामर्श घेणे गरजेचे आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही त्रिसूत्री पश्चिमेकडूनच आपल्याकडे आली व आपण ती लोकशाही राष्ट्राचे पायाभूत मूल्य म्हणून स्वाकारली. या त्रिसूत्रीतून स्त्रियांना वगळल्यामुळे युरोपमधील स्त्रीमुक्ती चळवळीस संघटित स्वरूप आले. म्हणजेच हा लोकशाही चळवळीचाच एक प्रवाह आहे. भारतातही परिस्थिती निराळी नव्हती. त्यामुळे आपल्या देशातील स्त्रीमुक्ती चळवळीने किमान काही बाबतीत पाश्चात्त्य चळवळीचे अनुयायित्व स्वीकारणे स्वाभाविक होते. एकोणिसाव्या शतकात महराष्ट्रात पंडिता रमाबाई, गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी यांनी स्त्रीसुधारणेचे जे प्रयत्न केले त्यांचाही पाश्चिमात्त्य सुधारणावादी विचारांशी परिचय होता. १९६० आणि ७० च्या दशकांमध्ये डाव्या विचारसणीशी बांधिलकी सांगणाऱ्यांचाही मार्क्स, एंगल्सच्या स्त्रीविषयक मतांचा आणि पश्चिमी जगतातील स्त्रीकामगारांच्या लढ्यांचा सखोल अभ्यास होता.

विसाव्या शतकाच्या मध्यकालात युरोप व अमेरिकेत स्त्रीमुक्ती चळवळीची दुसरी लाट सुरू झाली. त्यात स्त्रीच्या नगण्यीकरणाचे विविध अंगांनी फार सखोल विश्लेषण झाले. भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीच्या बहुतांश नेत्यांचा युरोप–अमेरिकेतील स्त्रीवादी साहित्याशी उत्तम परिचय होता. त्याचा प्रभाव तर महाराष्ट्रातील

स्त्रीवादी चळवळींची दिशा ठरवताना झालाच; पण फायदाही खूप झाला. पाश्चात्त्य चळवळ ज्या ज्या मुद्द्यांवर ठेच-काळली, ज्या धोरणात्मक चुका तिने केल्या त्या टाळण्याचा अवसर येथील चळवळींना मिळाला. उदा. पश्चिमेकडील स्त्रीमुक्ती चळवळीने पुरुषांना सहभागी करून घेणे टाळले, कुटुंबसंस्थेवर घणाघाती हल्ले चढवले, लैंगिक स्वातंत्र्यावर अवाजवी भर दिला, जहाल पंथीयांनी स्त्रीमुक्तीवादावरील निष्ठेचा संबंध स्त्रियांमधील समलिंगी संबंधाशी जोडला. सुरुवातीच्या काळात मातृत्वभावनेची पुरेशी दखल घेतली नाही. इ. इ. (अर्थात कालांतराने पश्चिमेकडील स्त्रीमुक्ती चळवळीचा पण चेहरामोहरा बदललाच.) स्थानिक महिला संघटनांनी स्त्रीमुक्तीवादाची मांडणी करताना भारतीय स्त्रीजीवनाचा पोत समोर ठेवला. पाश्चात्त्य स्त्रीची जीवन-वैशिष्ट्ये निराळी असल्याने तिकडील चळवळीचे मुद्दे येथील लढ्याला लागू करता येणार नाहीत याचे पुरेसे भान त्यांना होते. उदा. पाश्चात्त्य समाजातील स्त्री-पुरुषांचा दैनंदिन जीवनातील व्यक्तिवाद आधुनिक भारतातील वाढत्या व्यक्तिवादापेक्षा कितीतरी पटींनी अधिक प्रखर असतो. भारतातील अगदी महानगरातील विभक्त कुटुंब-सुद्धा पाश्चात्त्य चौकोनी कुटुंबाइतके चौकोनी नसते शहरी असो, वा ग्रामीण, भारतीय समाजातील आई-मुलगी हे नाते पश्चिमेकडील आई-मुलगी नात्याइतके संघर्षमय नसते. पश्चिमी समाजातील पूर्णवेळ गृहिणीला इतर कुटुंबियांची सोबत नसल्याने ती एकटेपणाची बळी होते. भारतीय गृहिणीसुद्धा चूल-मूल या परिघातच अडकलेली असते. पण तिला सासर-माहेरच्या इतर व्यक्तींची सोबत असते. काही प्रमाणात या व्यक्ती तिच्या आधारयंत्रणा असतात. याच नाण्याची दुसरी बाजू म्हणजे नातलगांचा प्रचंड दबाव तिच्यावर असतो. अनेकदा त्यांच्याकडून तिचे शोषण व मानसिक छळही होतो. पाश्चात्त्य स्त्रीवर नवरा वा प्रियकर सोडल्यास सासरघरच्या इतरांची मर्जी चालत नाही. भारतीय स्त्रीला दारिद्र्य, निरक्षरता, अंधश्रद्धा आणि जातिव्यवस्था यांमुळे विशेष समस्यांना तोंड द्यावे लागते. घटस्फोटांमुळे होणारे दरिद्रीकरण व कौटुंबिक हिंसाचार मात्र दोन्ही स्त्रियांना सारख्याच प्रमाणात भोगावा लागतो.

पाश्चिमात्त्य स्त्रीवादींनी स्त्रीदास्याचा सखोल ऐतिहासिक मागोवा घेतला तो भारतीय स्त्रीसकट जगभरच्या बहुतांश स्त्रियांना लागू पडतो. त्यामुळेच भारतातील स्त्रीमुक्तिवादींचा स्त्रीप्रश्नांकडे बघण्याचा दृष्टिकोण अधिक चांगल्याप्रकारे विकसित झाला व त्या भारतातील स्त्री-पुरुष समतेची अधिक परिपक्व मांडणी करू शकल्या. केवळ स्त्रीदास्यविमोचनाचे प्रयत्न न करता समाज्य व्यवस्था आणि स्त्रीप्रती दृष्टिकोण समतावादी बनवणे अगत्याचे आहे हे भान चळवळीला आले त्यासाठी आवश्यक असा जगभरच्या स्त्रीमुक्ती चळवळींचा तौलनिक अभ्यास शहरी, उच्चशिक्षित, सुस्थित म्हणजेच विरोधकांच्या भाषेत 'बॉबकट'वाल्या बायकांनी केला. महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळ बॉबकटवाल्या बायकांचे खूळ आहे अशी टीका अनेक वर्षे झाली. आता ती होत नाही, कारण गावोगावी जसा बॉबकट पोचला आहे तशीच, कुठल्या ना कुठल्या स्वरूपात स्त्रीमुक्ती चळवळ पण सर्व स्तरातील स्त्रियांपर्यंत पोचली आहे.

महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीचा वैचारिक पाया मजबूत करण्याचे श्रेय वर उल्लेखिलेल्या शिक्षित अभ्यासकांना जाते. केवळ स्त्रीमुक्ती चळवळच नाही, तर जगभरच्या कामगार चळवळी, शांतता चळवळी आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाची त्यांना उत्तम जाण होती. चळवळ सर्वसमावेशक होण्यात त्यांची मोलाची मदत झाली. गमतीची बाब म्हणजे १९७० च्या दशकात महाराष्ट्रातील महिलांच्या लढ्यांच्या बाबतीत राजकीय पक्षांना संवेदनशील बनवण्याचे, ग्रामीण, कष्टकरी स्त्रीचे प्रश्न अधोरेखित करण्याचे महत्त्वाचे काम गेल ओमवेट या अमेरिकन विदुषीने केले. सर्व राजकीय पक्षांचे दरवाजे ठोठावून तिने "तुम्ही स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी काय करणार आहात?" असा प्रश्न विचारण्यास प्रारंभ केला. महाराष्ट्रातील स्वायत्त महिला संघटनांनी कालांतराने जे पक्षनिरक्षेप स्त्रीवादी राजकारण करण्यास प्रारंभ केला, त्याचा ओनामा गेल ओमवेटने लिहला आहे.

पूर्वसंचित : –

१ मे १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्याआधीपासून या राज्याकडे स्त्रीमुक्ती चळवळीचे

मोठे संचित होते. १९ व्या शतकापासून महाराष्ट्रात स्त्रीदास्यविमोचनाचे प्रयत्न सुरू आहेत. स्त्रीच्या दैन्यावस्थेविषयी वाटलेल्या करुणेमधून मुख्यतः पुरुषांनी जे कार्य सुरू केले, त्यातून राज्यातील स्त्रीसुधारणांना चालना मिळाली. त्यात स्त्रीशिक्षण, स्त्रीविरोधी रूढींवर हल्ला, कायदेबदलासाठी कंपनी सरकारकडे निवेदने, वृत्तपत्रांमधून प्रबोधनपर लेखन आदि मार्गांचा अवलंब केला जात होता. ताराबाई शिंदे, महात्मा फुले, पंडिता रमाबाई, गो. ग. आगरकर, लोकहितवादी आदिंच्या लेखनाने किमान शहरांमध्ये तरी स्त्रीशिक्षण, बालविवाह, संमतिवय, बालवैधव्य, केशवपन यांविषयी समाजमन ढवळून निघत होते. हरी नारायण आपटे, वामन मल्हार जोशी यांसारख्यांच्या साहित्यकृतींमधून पुरुषाला झुकते माप देणाऱ्या मूल्यव्यवस्थेमुळे स्त्रीपुढे कोणत्या समस्या उभ्या ठाकतात याचे चित्र उभे केले जात होते.

या राज्याने, महात्मा फुल्यांनी केशवपनाविरुद्ध नाभिकांना संघटित करून घडवून आणलेला संप बघितला होता. विधवा पुनर्विवाह चळवळ पाहिली होती. आनंदीबाई जोशींचे डॉक्टर होऊन परतणे, डॉ. आनंदीबाईंनी अल्पवयात लादलेले विवाहबंधन झुगारण्यासाठी न्यायालयात दाद मागणे, र. धो. कर्व्यांनी संततिनियमनाची चळवळ चालवणे या पुरोगामी बदलांच्या वाटा चोखाळल्या होत्या. महात्मा फुले, महर्षी कर्वे, पं. रमाबाई, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या संस्थांमधून मुलींनी शिक्षण घेणे महाराष्ट्राच्या अंगवळणी पडले होते. कमलाबाई होस्पेट, ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांसारख्या समाजकार्याला वाहून घेतलेल्या स्त्रियांची उदाहरणे राज्यापुढे होती. आचार्य विनोबा भावे, आचार्य दादा धर्माधिकारी यांनी स्त्रीमुक्ती व स्त्रीशक्ती यांवर केलेले लेखन मराठी माणसाला परिचित होते. चित्रपट आणि संगीत क्षेत्रांचे महाराष्ट्र हे माहेरघर होते. त्यात केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डीकर, शोभना समर्थ, दुर्गा खोटे, यांसारख्या महाराष्ट्र कन्या अग्रेसर होत्या. स्वनिश्चित जीवितकार्यासाठी स्त्रीजीवनाची प्रचलित चौकट मोडणाऱ्या कमला सोहनी, दुर्गा भागवत यांसारख्या स्त्रिया महाराष्ट्राने निर्माण केल्या होत्या. महात्मा गांधींनी दिलेल्या हाकेला ओ देऊन अनेक मराठी मुलींनी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली होती. संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि गोवा मुक्तीसंग्राम यांत मराठी स्त्रियांनी भरीव कामगिरी केली होती. थोडक्यात, राजकीय, सामजिक, शैक्षणिक आणि कलाक्षेत्रांत कर्तृत्ववान स्त्रियांचा वावर या राज्याला नवा नव्हता.

महाराष्ट्रातील आद्य उद्योजक समूह "किर्लोस्कर"ने १९२६ सालापासून त्यांच्या 'किर्लोस्कर खबर' या मासिकातून स्त्रियांचे पान सुरू केले होते. १९३० पासून संपूर्णपणे स्त्रीजीवनाला वाहिलेले 'स्त्री' मासिक सुरू झाले. स्त्रियांच्या पारंपारिक भूमिका त्यांना जास्त समंजसपणे निभावता याव्यात, तसेच समाजाचा एक घटक म्हणून स्त्रियांनी वैचारिक विकास साधावा हे 'स्त्री'चे उद्दिष्ट होते. स्त्री मासिकाचा वाचकवर्ग जरी मुख्यत्वे शहरी, शिक्षित, सवर्ण असला तरी किमान या स्त्रीला वाचते आणि लिहते करण्याचे आणि तिच्या विचारकक्षा विस्तृत करण्याचे काम 'स्त्री' ने नक्कीच पार पाडले.

महाराष्ट्र ही डॉ. बाबासाहेबांची कर्मभूमी राहिली, त्याचा थेट परिणाम राज्यातील स्त्रीजागृतीवर झालेला दिसून येतो. स्त्रीवर्गात जागृती झाली, तर त्या अस्पृश्य समाजात फार मोठी प्रगती घडवून आणतील असा बाबासाहेबांचा विश्वास होता. दलित समाजाच्या प्रगतीचे मोजमाप त्यातील स्त्रियांच्या प्रगतीवरून केले पाहिजे असे त्यांचे मत होते. स्वतःच्या प्रत्येक उपक्रमात दलित स्त्रियांना सहभागी करून घेण्याकडे त्यांचा कटाक्ष असे. १९२७ च्या चवदारतळ्याच्या सत्याग्रहापासून ते १९५६ च्या दीक्षा समारंभापर्यंत ज्या अगणित परिषदा, मेळावे झाले त्यात दलित स्त्रिया मोठ्या संख्येने उपस्थित असत. स्त्रीजागृतीची मोठी ठिणगी बाबासाहेबांनी महाराष्ट्रात चेतवली.

अखिल भारतीय महिला परिषद, समाजवादी महिला सभा, राष्ट्र सेविका समिती, दलित महिला परिषद, विमेन्स इंडिया असोशिएशन यांसारख्या संघटना स्वातंत्र्यप्राप्तीच्या किमान दोन दशके आधीपासून महाराष्ट्रात कार्यरत होत्या. स्त्रीवरील अन्यायाला वाचा फोडणे आणि त्याचवेळी देशाच्या राजकारणाविषयी एक ठोस भूमिका घेणे या दोन्ही पातळ्यांवर या संघटना कार्य करत होत्या. स्त्रीचा वावर आणि विचारांचा परीघ चूल-मूल याही

पलिकडे विस्तृत करण्यात वर दिलेल्या सर्व वातावरणाचा सहभाग होता. सारडा कायदा (१९२९), मुस्लिम विवाह कायदा (१९३१) आणि हिंदू कोडबिल (१९५५) यांच्या घडणीमध्ये अखिल भारतीय महिला परिषद्नेे दबाव गट म्हणून २० वर्षे अविरत काम केले होते.

मुळात स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने लिंगनिरपेक्ष समानता हे राष्ट्र उभारणीचे तत्त्व म्हणून स्वीकारले हेच स्त्रीमुक्तीच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल होते. १९५१-५६ या कालावधीत स्वतंत्र भारताची पहिली पंच-वार्षिक योजना कार्यान्वित झाली. त्यानुसार १९५३ साली केंद्रीय समाज कल्याण खात्याची स्थापना करण्यात आली. त्याद्वारे स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने स्त्रिया व बालकां-साठी कल्याणकारी योजना राबवण्याचे उद्दिष्ट नक्की करण्यात आले. १९५६-६१ हा दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी होता. त्यात समाज कल्याण खात्यामार्फत तळागाळातील महिलांना महिला मंडळांच्या माध्यमातून एकत्र आणून स्त्रीसुधारणेचे प्रयत्न केले गेले. परंतु हे प्रयत्न जुजबी, तकलुपी होते.त्यात स्त्रीचे सक्षमीकरण हा हेतूच व्यक्त होत नव्हता. तिचा विकास आणि राष्ट्राच्या विकास प्रक्रियेत स्त्रीचा सहभाग हा दृष्टिकोण अद्यापि विकसित झालेला नव्हता.

स्वतंत्र भारतातील स्त्रीला भारतीय नागरिक म्हणून सर्व मूलभूत हक्क कागदोपत्री मिळालेच होते. १९६० च्या आधी अनेक जाचक रूढींपासून कायद्याचेही संरक्षण मिळाले होते. (१९६० च्या आधीचे, व नंतर स्त्रीचळ-वळीच्या रेट्यामुळे अस्तित्वात आलेले नवे कायदे स्वतंत्र-पणे दिले आहेत.) तरीसुद्धा स्त्रीभोवतीच्या भौतिक परिसरात विशेष सुधारणा झाली नाही. कारण स्त्री-पुरुषांचे मनो-व्यवहार कायद्यानुसार नाही, तर रूढी-परंपरांच्या प्रभावा-बरहुकूम चालतात.

१९६०-७० चे दशक महाराष्ट्रासाठी असंतोषाचे दशक होते असे म्हटल्यावर अतिशयोक्ती होणार नाही. याच दशकात भारत दोनदा युद्धात ओढला गेला. भाववाढ, बेकारी, गरीबी, भूमिहीनता, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई हे प्रश्न या कालखंडात अधिक तीव्र झाले.

१९६० साली मुंबईच्या कापडगिरण्यांमध्ये ४५,००० स्त्रिया काम करत होत्या. ६५च्या सुमारास मुंबईमध्ये औषधी कंपन्यामध्ये १० टक्क्यांहून अधिक कामगार या स्त्रिया होत्या. ग्रामीण महाराष्ट्रात ८३ टक्के स्त्रिया मजुरी करत होत्या. साहजिकच कामगांराची आणि शेत-मजुरांची आंदोलने हा महाराष्ट्राच्या समाजकारणाचा आणि राजकारणाचाही अविभाज्य भाग होता. समान कामाला समान वेतन, बाळंतपणाची पगारी रजा, कामाच्या जागी पाळणाघरे, महानगरपालिकांमध्ये निवृत्त होणाऱ्या पुरुषाच्या स्त्री वारसाला नोकरी हे कोणतेही अधिकार स्त्रीकामगारांना मिळत नव्हते तसेच, औषध कंपन्यांमधून आणि विमान कंपनीतून स्त्रीला विवाह केल्यानंतर नोकरी-तून काढून टाकत असत. या सगळ्या विरुद्ध श्रमिकांनी जे जे लढे त्यात स्त्री कामगारांच्या बाजूने डाव्या पक्षांच्या कार्याकर्त्या हिरीरीने सहभागी होत असत. १९६०-७० च्या कालखंडात मुंबई, इचलकरंजी यांसारख्या कापड उद्योगांत अग्रेसर असणाऱ्या शहरांत, तसेच धुळे, शहादा, नगर यांसारख्या दुष्काळी भागात स्त्री कामगारांच्या न्याय्य-हक्कांसाठी व ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेचा लाभ स्त्रीमजुरांना मिळवून देण्यासाठी अगणित लढे झाले. त्यात मुंबईमध्ये अहिल्या रांगणेकर, मालिनी तुळ-पुळे, रोझा देशपांडे, मंजू गांधी, तारा रेड्डी, मृणाल गोरे, प्रेमा पुरव यांसारख्या नेत्यांनी आणि ग्रामीण भागात श्रमिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी फार मोठ्या प्रमाणात स्त्रियांना आंदोलनात खेचले. राज्याच्या स्थापनेनंतरची सुमारे १० वर्षे विविध श्रमिक चळवळी, केंद्रीय कर्म-चाऱ्यांचा देशव्यापी संप (१९६०) मुंबईच्या विधानसभेवर गेलेला १५,००० महिलांचा (ग्रामीण, तसेच शहरी) मोर्चा अशा घटनांनी गाजली आणि त्यात स्त्रियांनी फार निर्णायक भूमिका बजावली.

श्रमिक चळवळींचे नेतृत्व करणाऱ्या स्त्रिया शिक्षित आणि राजकीय दृष्ट्या प्रगल्भ होत्या. स्वातंत्र्य लढ्यातही त्या सक्रिय होत्या. जनआंदोलन कसे उभारावे, स्त्रीशक्ती कशी संघटित करावी याचा त्यांना प्रदीर्घ अनुभव होता. १९७० नंतर मुंबईमधील कापडगिरण्यांमध्ये यांत्रिकी-करणाच्या नावाखाली जी कामगार कपात करण्यात आली, त्याचा जबरदस्त फटका स्त्रियांना बसला. १९७५ मध्ये मुंबईमधील स्त्री गिरणीकामगारांची संख्या ५००० वर घसरली.या कालखंडात (१९७४) समाजवादी,

कम्युनिस्ट पक्षांच्या समर्थक महिला नेत्यांनी महागाई प्रतिकार समिती स्थापन करून सरकार विरोधी मोठ्या प्रमाणात आंदोलने केली. मृणाल गोरे यांचा लाटणे मोर्चा आणि पाणी प्रश्नावर छेडलेले आंदोलन तर कायमचे महाराष्ट्र राज्याच्या इतिहासात नोंदले गेले.

स्वातंत्र्य लढ्याची पार्श्वभूमी असलेल्या परंतु श्रमिक चळवळीशी जोडल्या न गेलेल्या कितीतरी स्त्रियांनी आपला मोहरा शिक्षण क्षेत्राकडे वळवला. स्त्रीजीवनाचा पोत शिक्षणाने सुधारेल असा त्यांना विश्वास होता.

१९६०-७५ या पंधरावर्षात महिलांनी दिलेल्या विविध लढयांच्या केंद्रस्थानी मुख्यत्वेकरून स्त्रीचे आर्थिक शोषण, कामाच्या जागी होणारे अत्याचार, सहन कराव्या लागणाऱ्या गैरसोयी हे मुद्दे होते. व यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. युरोप अमेरिकेतही स्त्रियांचे सुरुवातीचे लढे हे वेतनवाढ, कामाच्या जागी आवश्यक सुविधा, कामाच्या तासांत कपात याच मुद्द्यांवरून झाले. हे मुद्दे वादातीत असतात. त्यांची पूर्तता दृग्गोचर असते. अशा मुद्द्यांवर संघर्ष करताना रूढी, परंपरा, धर्मभावना, नीतिमूल्ये या कशालाही धक्का पोचत नाही. तसेच, स्त्रीचे वेतनमान सुधारले, की त्याचा प्रत्यक्ष फायदा तिच्या कुटुंबियांना होतो. त्यामुळे या मुद्द्यांवर लढताना स्त्रीला घरातूनही पाठिंबा मिळतो. परंतु आर्थिक सक्षमीकरण हे स्त्रीमुक्तीसाठी अत्यावश्यक असले, तरी ते साधन आहे, साध्य नाही. जसे शिक्षणासाठी साक्षरता ही एक साधन म्हणून अत्यावश्यक असली, तरी साक्षरता म्हणजे शिक्षण नाही व ते अंतिम साध्यही असू शकत नाही. या अर्थाने ६० व ७० च्या दशकातील स्त्रियांची आंदोलने म्हणजे मुख्यत्वे श्रमिक चळवळी होत्या असेच म्हणायला हवे. अर्थात म्हणून त्यांचे महत्त्व कमी होत नाही.

१९७० च्या दशकात स्त्रियांनी नोकरी करणे समाजाच्या पचनी पडले होते. कष्टकरी स्त्रीचा तर तो नाईलाजच होता. परंतु अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीच्या उरावरील घरकामाचे ओझे कमी करण्याचा प्रयत्न घरात वा घराबाहेरही होत नव्हता. स्त्रीच्या नोकरीपुरता स्त्रीसकट सर्व समाजाचा एक पाय विसाव्या शतकात, आणि तिच्या पारंपारिक जबाबदाऱ्यांच्या बाबतीत दुसरा पाय १८ व्या शतकात अशा दुभंगलेल्या भूमिकेपायी शिक्षित, नोकरदार स्त्रीचा पण प्रचंड कोंडमारा होत होता. घराच्या चौकटीत होणारा त्रास व्यक्त करण्यासाठी, स्वतःच्या समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी आणि त्याचा संबंध व्यापक अशा समाजमूल्यांशी जोडण्यासाठी आवश्यक असे व्यासपीठही सर्वसामान्य स्त्रीला उपलब्ध नव्हते. या कालखंडाचे एक वैशिष्ट्य म्हणजे प्रसारमाध्यमांची मर्यादित व्याप्ती. आकाशवाणी व वृत्तपत्रे हीच प्रचारमाध्यमे सर्वसामान्यांपर्यंत पोचत होती. स्त्री मासिकाचा सन्मान्य अपवाद वगळता स्त्रियांच्या प्रश्नांना वाहिलेले नियमित स्वरूपातील साहित्य प्रकाशित होत नव्हते. शिवाय ६१ साली महाराष्ट्रात फक्त २० टक्के स्त्रिया साक्षर होत्या. ७१ साली ते प्रमाण जेमतेम ३० टक्के पर्यंत पोचले. स्त्री वाचकवर्ग हा वृत्तपत्रांसाठी आकर्षक असे लक्ष्य ग्राहक नव्हता. स्त्रीपुरवण्यांमधून स्त्रीप्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि समाजाला संवेदनशील बनवण्याचे माध्यम जन्माला यायचे होते. वृत्तपत्रांमध्ये महिलांसाठी नियमितपणे थोडी जागा राखीव ठेवण्याचा प्रघात साधारणपणे ७१-७२ साली सुरू झाला. स्त्री मासिकाने मात्र ७४-७५ या वर्षात शांताबाई किर्लोस्कर लिखित सिमोन द बोव्हुआरच्या द सेकंड सेक्स या ग्रंथाचे संक्षिप्त रूपांतर क्रमशः प्रकाशित करून स्त्रीसमस्यांचा वैचारिक मागोवा घेण्याची वाट मोकळी करून दिली होती. परंतु एकंदरीत कामगार चळवळी थंडावू लागल्या होत्या. हुंडा, पोटगी, द्विभार्या प्रतिबंध यांसारखे कायदे निष्प्रभ ठरत आहेत हे उमजू लागले होते. स्त्री शिकून कमवू लागली, तरी स्त्रीविषयक मानसिकता बदलली नाही, तर केवळ मलमपट्टीच होते, मूळ व्याधी दूर होत नाही हे भान येऊ लागले होते. याच काळात देशात इतरत्र 'व्यवस्था' बदलण्यासाठी लढे सुरू होते. बिहार मध्ये 'युवा छात्र सघंर्ष वाहिनी', आसाममध्ये गण परिषद यांचे लढे, गुजरातमध्ये नवनिर्माण आंदोलन, गढवालमध्ये चिपको आंदोलन आणि खुद्द महाराष्ट्रात युवक क्रांतीदल दलित पँथर हे गट मूलभूत बदलाचा आग्रह धरत होते. त्याचा परिणाम महिला संघटनांच्या वैचारिक नेतृत्वावर होत होताच.

त्यातच १९७२ साली केंद्र सरकारने भारतीय स्त्रीच्या दर्जाचा अभ्यास करण्यासाठी फूलमणी गुहा यांच्या

अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. १९७४ साली समितीने Toward Equality (समतेकडे वाटचाल) हा अहवाल सादर केला. त्यातून जे स्त्रीविषयक वास्तव बाहेर आले, ते दारुण होते. त्याने सरकार व महिला संघटना खडबडून जाग्या झाल्या. अहवालातील आकडेवारीमुळे आलेल्या अस्वस्थतेतून पुरेसे सावरण्याआधीच संयुक्त राष्ट्रांनी १९७५ हे महिला वर्ष, आणि ७५-८५ हे महिला दशक जाहीर केले. आणि स्थानिक पातळीवर, महिला अत्याचार, दारुबंदी, समान वेतन, हुंडा, यांसारख्या विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या स्त्रीसंघटनांना एकत्र येण्याचे प्रयोजन मिळाले. त्याच वेळी केंद्रसरकारनेही पाचव्या पंचवार्षिक योजनेत (१९७४-७८) धोरणात्मक बदल करून कल्याणकारी योजनांऐवजी स्त्रीच्या विकासासाठी लांब पल्ल्यांचे उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला. स्त्रियांसाठी राष्ट्रीय कृती योजना आखण्यात आली. स्त्रीला शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगार याचबरोबर शेती, दुग्धव्यवसाय, तंत्रज्ञान यातील ज्ञान मिळावे, निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग असावा या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले.

१९७५ सालीच राज्य सरकारने स्त्रीच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. माविमने शासकीय पुरवठा योजना महिलांच्या संस्थांना देण्याचे धोरण अवलंबले. परंतु त्यास विशेष प्रतिसाद मिळाला नाही. १९९० पर्यंत माविम फारसा प्रभाव पाडू शकली नाही. १९९४ साली माविमची पुनःरचना झाल्यानंतर मात्र तिने लक्षणीय कामगिरी केली

१९७५ ला विस्थापित स्त्री गिरणीकामगारांसाठी प्रेमा पुरव आणि नरेंद्र पुरव या दांपत्याने सुरू केलेला 'अन्नपूर्णा' हा उपक्रम मात्र अजूनही जोमाने कार्यरत आहे. स्त्रियांमधील पारंपारिक पाककौशल्याचा वापर करून त्यांना स्वयंरोजगार मिळवून देणे हे अन्नपूर्णाचे उद्दिष्ट होते. खाद्यसेवा पुरवण्याने सुरू केलेली ही संस्था अल्पदरात कर्जपुरवठा, बचतगट, तंत्रनिकेतनामधून महिलांना लघुउद्योग प्रशिक्षण, समूपदेशन केंद्र, आधारगृहे इ. अनेक उपक्रम स्त्रियांसाठी चालवते.

'अन्नपूर्णा' व त्याचबरोबर १९५९ साली मुंबईतील गुजराती भगिनींनी सुरू केलेली 'श्री महिला गृहउद्योग लिज्जत पापड' या दोन संस्थांनी महाराष्ट्रातील लाखो गरीब स्त्रियांचे संसार मार्गी लावले. अल्पशिक्षण, अल्पभांडवल या अडचणी असतानाही सहकारी तत्वावर, पारंपारिक कौशल्यांचा वापर करून स्त्रिया फार मोठे कार्य उभे करू शकतात याचा वस्तुपाठच या दोन संस्थांनी घालून दिला. त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून त्यानंतर दुर्बल आर्थिक स्तरातील कितीतरी महिलांनी आपले व इतरही भगिनींचे जीवन सावरले. त्यामुळे स्त्रीसबलीकरणाच्या प्रक्रियेत या दोन संस्थांचे योगदान नमूद करणे अनिवार्यच आहे.

आंतरराष्ट्रीय महिला वर्ष - एक नवे वळण

आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या घोषणेने महाराष्ट्रात विविध ठिकाणी काम करणाऱ्या संघटनांचे एक प्रकारे स्फटिकीकरणच झाले. सर्व महिला संघटनांमध्ये 'किमान सामायिक कृतिकार्यक्रमाद्वारे' सुसूत्रता आणावी हा विचार महिला वर्षाच्या घोषणेमुळे बळावला. त्याची परिणिती १९७५ साली पुण्यामध्ये 'स्त्रीमुक्ती संघर्ष परिषद' भरवण्यात झाली. यात आदिवासी, शेतमजूर स्त्रियांपासून, ते डाव्या चळवळीत सक्रिय अशा शहरी स्त्रियांपर्यंत एकूण २५० भगिनी सहभागी झाल्या होत्या. महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीच्या दृष्टीने ही परिषद फार फलदायी मानली जाते, कारण तेथून प्रेरित होऊन मुंबईमध्ये 'स्त्री मुक्ती संघटना' आणि पुण्यामध्ये 'पुरोगामी महिला संघटना' अशा दोन संस्था स्थापन झाल्या. त्या पाठोपाठ पुरोगामी महिला संघटनेच्या पुढाकाराने 'बायजा' हे द्वैमासिक सुरू झाले. (स्त्रीमुक्ती संघटनेने मात्र 'प्रेरक ललकारी' हे आपले मुखपत्र १९८६ साली सुरू केले.) 'पुरुषप्रधानता हा एकमेव शत्रू' ही भूमिका टाळणे आणि कष्टकरी, ग्रामीण, दलित जनतेच्या चळवळींशी नाते जोडणे हे बायजाचे धोरण होते. 'स्त्रीमुक्ती हवी पण केवळ स्त्रीवादी नाही' असे साधारणपणे बायजाच्या भूमिकेचे वर्णन केले जाते. स्त्रियांचे प्रश्न हे समाजपरिवर्तनाच्या लढ्याचे एक अंग होय हा दृष्टिकोण बायजाने ठेवला. (प्रेरक ललकारीची भूमिका पण काहीशी अशीच होती. पण संस्थेच्या नावांतचं 'स्त्रीमुक्ती' असल्याने स्त्रीवादाविषयीची संघटनेची भूमिका निःसंदिग्ध होती.) बायजाच्या प्रकाशनापासून महाराष्ट्रात स्त्रीमुक्तीवादातील विविध उपांगांच्या चर्चेचा

पायंडा पडला.

१९७९ साली सर्व डाव्या पक्षांच्या स्त्री संघटना आणि इतर स्वायत्त संघटनांनी एकत्र येऊन पुण्यामध्ये महाराष्ट्रव्यापी परिषद भरवली. त्यातूनच 'स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समिती' ही संस्था स्थापन झाली. महिला संघटनांमध्ये समन्वय आणि किमान सामायिक उपक्रम राबवण्याकरिता आवश्यक एवढा संपर्क राहावा हा समिती स्थापण्या मागचा उद्देश होता. विविध नोकरी व्यवसायातील स्त्रियांनी आपापल्या क्षेत्रांत स्त्रियांचे प्रश्न पुढे रेटावेत असेही समितीमार्फत ठरेल. येथे समितीने केलेल्या मागण्या उद्धृत करणे संयुक्तिक ठरले, कारण सर्व सदस्य संघटनांनी परस्पर संवादातून त्या नक्की केल्या होत्या. या मागण्या म्हणजे महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीने तयार केलेली स्त्री हक्कांची सनद होती असे म्हणण्यास हरकत नाही.

१. स्त्रियांसाठी रोजगार हमी योजना.
२. नोकरी, व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या सोयीसाठी पाळणाघरे, बालवाड्या शिशु-सांभाळगृहे.
३. स्त्रियांवरील अत्याचारांच्या प्रकरणांची चौकशी करून बळी ठरलेल्या स्त्रियांना न्याय देण्यासाठी खास न्यायाधिकरणे.
४. शासन संचलित संस्थांमध्ये तांत्रिक शिक्षणात विद्यार्थिनींसाठी २५ टक्के आरक्षण.
५. नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी शासनपुरस्कृत वसतिगृहे.
६. ग्रामीण भागात अत्यंत अवघड परिस्थितीत काम करणाऱ्या शिक्षिका आणि समाजकार्यकर्त्यांसाठी सहकारी निवासस्थाने.

या ही मागण्यांमध्ये स्त्रीच्या आर्थिक सक्षमीकरणास आवश्यक अशा बाबींवर भर दिलेला दिसतो. सुरुवातीच्या स्त्रीसंघटनांमध्ये डाव्या चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्राबल्य होते. समाजवादी राष्ट्रांमध्ये कामगार स्त्रीला मिळणाऱ्या सोयी-सुविधांची त्यांना माहिती होती. त्याचा प्रभाव वरील मागण्यांमधून जाणवतो. या टप्प्यावर, स्त्रीजीवनामध्ये आमूलाग्र बदल होण्यासाठी आवश्यक असा 'भौतिक परिसर' उपलब्ध करून देण्याचा स्त्रीसंघटनांचा प्रयत्न होता. कुठल्याही स्त्रीचळवळीमध्ये हा अपरिहार्यपणे सुरुवातीस येणारा टप्पा आहे.

मात्र त्याचबरोबर समितीत सहभागी झालेल्या कार्यकर्त्या 'समान नागरी कायदा,' मुस्लिम व ख्रिश्चन स्त्रीचा व्यक्तिगत कायदा, दलित स्त्रीवरील अत्याचार, असंघटित क्षेत्रातील स्त्रियांचे प्रश्न, आदिवासी/ ग्रामीण स्त्रीचे आरोग्य, जमीनविषयक हक्क यांचा अभ्यास करू लागल्या. त्या त्या घटकांना संघटितही करू लागल्या. सर्वस्तरीय स्त्रीजीवनाचा अभ्यास हे त्या कालखंडातील स्त्रीसंघटनांचे व्यवच्छेदक लक्षण होते.

आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या घोषणे आधीच महाराष्ट्रात 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' या क्रांतिकारी संघटनेची बांधणी झाली होती. रूढार्थाने ती केवळ महिला संघटना नसली, तरी मुस्लिम समाज सुधारायचा असेल, तर मुस्लिम स्त्री सुधारली पाहिजे अशी मंडळाचे संस्थापक श्री. हमीद दलवाई यांची भूमिका होती. संस्थेची स्थापना जरी १९७० ला झाली असली तरी, मुस्लिमांसाठी समान नागरी कायदा, जुबानी तलाकवर बंदी, द्विभार्या प्रतिबंध, पोटगी, मदरसा शिक्षणाचे आधुनिकीकरण, मुस्लिमांसाठी माध्यमिक पातळीपर्यंतचे शिक्षण मोफत. वक्फ संस्थेचा ताबा धर्मनिरक्षेप संस्थेकडे या अनेक प्रश्नांवर मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि व्यक्तिशः हमीद दलवाई आणि मेहेरुन्निसा दलवाई यांनी महाराष्ट्र दणाणून सोडला.

१९७५ ते जवळपास १९९० पर्यंतचा कालखंड हा महाराष्ट्रातील स्त्रीसंघटनांसाठी अभ्यासपर्व व प्रचारपर्व होते. याच काळात स्त्रीचे दुय्यमत्व स्त्री-पुरुषांच्या दैनंदिन व्यवहारात, रूढी-परंपरांमध्ये, व शासकीय धोरणांमध्ये कसे प्रतिबिंबित होते याविषयी लेखन होऊ लागले. स्त्रीच्या नगण्यीकरणाची व दरिद्रीकरणाची पाळेमुळे असंतुलित विकास, पर्यावरण ऱ्हास, अंधश्रद्धा, पुरुषहितकारी नीतिमूल्ये, स्त्रीदेहाचे बाजारीकरण, राजकीय अस्थिरता, धार्मिक मूलतत्ववाद यांत दडलेली असतात हा विचार विविध मार्गांनी लोकांपुढे मांडण्याचे प्रयत्न होऊ लागले. मुख्य म्हणजे स्त्रीमुक्तीची संकल्पना लोकांपुढे सुस्पष्ट करण्यासाठी स्त्रीसंघटना स्वतःची प्रकाशने काढू लागल्या. मुंबईस्थित 'स्त्री मुक्ती संघटने'ची त्याविषयीची भूमिका पुढील प्रमाणे होती :

"स्त्री-मुक्ती चळवळ ही पुरुषांविरुद्ध नाही. ती मानव-

मुक्तीच्या चळवळीचे एक अंग आहे. कारण आपला पुरुष कष्टकरी सुद्धा प्रचलित समाजव्यवस्थेत मुक्त नाही. तो शेतमजूर असो, नाहीतर कामगार, हातगाडीवाला असो, वा कारकून, तो सध्याच्या भांडवली व्यवस्थेत अडकला आहे, जखडला आहे, या व्यवस्थेतील पुरुषी प्रवृत्तीच्या जाळ्यातही तो सापडला आहे. तेव्हा आपला संघर्ष सर्वंकष आहे. आणि पुरुषांच्या बरोबरीने तो करायचा आहे." (स्त्री-मुक्ती चळवळ, विचार, भूमिका आणि मागण्या.पृ. क्र.४ ज्योति म्हापसेकर, मंगल पाध्ये)

वरील भूमिकेत डाव्या विचारसरणीशी बांधिलकी तर दिसतेच, परंतु त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळ फक्त स्त्रियांची नसून पुरुषांसाठीपण आहे, कारण पुरुषही याच व्यवस्थेचे बळी आहेत; व ही चळवळ पुरुषांविरोधात ठेवून करायची नसून त्यांना बरोबर घेऊन करायची आहे हे अधोरेखित केलेले आहे. स्त्रीमुक्ती संघटनेच्या स्थापनेपासून पुरुष त्यात आहेत व संघटनेच्या पुरुष कार्यकर्त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतेच आहे.

याच पुस्तकात कुटुंबव्यवस्थेविषयी संघटनेची भूमिका खालील प्रकारे विशद केली आहे. "आज या क्षणाला मात्र कुटुंबव्यवस्था मोडणे हेच जणू स्त्रीमुक्ती चळवळीचे उद्दिष्ट आहे असे म्हणणे अतिरेकीपणाचे ठरेल. सध्या तरी माणसाला भावनेचा आधार म्हणून, मानसिक स्वास्थ्य म्हणून, बालसंगोपनाची निकड म्हणून आणि संपत्ती, स्थावरजंगमाची गरज म्हणूनही तसेच वारसा-हक्कासाठी अशा विविध कारणांमुळे कुटुंबाखेरीज दुसरा पर्याय दिसत नाही. तो पर्याय इतिहासक्रमात निर्माण होणार आहे. घिसाडघाईने कुटुंबव्यवस्थेवर हल्ला करून चालणार नाही–तसा तो टिकणार वा यशस्वीही होणार नाही. पूर्ण जीवन जगण्यासाठी, नव्हे पूर्ण माणूस होण्यासाठी स्त्री-पुरुष एकत्र राहणे हे नैसर्गिक आणि आवश्यकच आहे." (पृ. क्र. ६)

वरील परिच्छेदात उद्धृत केलेला "इतिहासक्रमात निर्माण होणारा कुटुंबसंस्थेस पर्याय' कसा असावा याविषयीची अपेक्षा ही 'स्त्री-मुक्ती आणि कुटुंबसंस्था' या आपल्या प्रकाशनात स्त्रीमुक्ती संघटनेने विशद केली आहे." खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित व्हायची असेल तर कुटुंबांतर्गत स्त्री-पुरुष संबंधांची समानतेच्या पायावर नव्याने पुनर्रचना होणे आवश्यक आहे. या समानतेचे दृश्य पातळीवर दोन महत्त्वाचे भाग आहेत. एक म्हणजे स्त्रियांचा सार्वजनिक, सामाजिक उत्पादनातला सहभाग वाढला पाहिजे आणि दुसरा म्हणजे पुरुषांनी घरातील कामामध्ये स्त्रियांना बरोबरीने सहकार्य दिले पाहिजे. स्त्रियांनी कुटुंबांतर्गत इतर घटकांची खासगी आणि वैयक्तिक सेवा करावी अशी सर्वांची अपेक्षा असते. एक म्हणजे वैयक्तिक कामे स्वतःच प्रत्येकाने केली पाहिजेत. आणि दैनंदिन सर्वसाधारण सेवा सामुदायिकरीत्या उपलब्ध झाल्या पाहिजेत. उदा. इस्पितळे धुलाई-केंद्रे, स्वच्छ व स्वस्त जेवणघरे, पाळणाघरे इ. (पृ. क्र. १५, मृणाल साठे, अमोल केरकर, १९)

सर्व स्त्रीसंघटनांमध्ये स्त्रीमुक्ती संघटना ही अधिक कडवी व त्याचबरोबर कार्यकर्त्यांची मोठी फौज असलेली संघटना मानली जाते. या तथाकथित "जहाल" संस्थेची सुद्धा स्त्रीमुक्ती आणि कुटुंबसंस्था यांविषयीची भूमिका पुरुषविरोधी वा विध्वंसक नव्हती. यावरून एक स्पष्ट होते, की स्त्रीमुक्ती चळवळीविषयीचे खूपसे गैरसमज हे पूर्वग्रहातून व त्यावर परंपराप्रिय व्यक्तींनी चालवलेल्या कुचेष्टेच्या अस्त्रामुळे निर्माण होत असतात.

स्वतःच्या प्रकाशनांबरोबरच वृत्तपत्रातील स्त्री-पुरवण्या, मासिके, कलापथके, पथनाट्ये, दूरदर्शन मालिका यातून स्त्रीदास्याचे विविध पदर उलगडून दाखवण्याची व त्याविरोधात जनमत तयार करण्याची मोहीमच स्त्रीसंघटनांनी हाती घेतली. १९८५ साली मुंबईच्या स्त्री-मुक्ती संघटनेने, 'मैत्रिणी' या गटास सोबत घेऊन महाराष्ट्रातील अनेक गावात स्त्री-पुरुष समानता यात्रा घेऊन जाण्याचा अभिनव उपक्रम केला. ज्योति म्हापसेकर लिखित 'मुलगी झाली हो' या मुक्तनाट्याद्वारे स्त्रीमुक्ती चळवळीचा विचार सोप्या मराठीत खेडोपाडी पोचवण्याचे काम 'मुलगी झाली हो' ने केले. स्त्री प्रश्नांवर गावोगावच्या जनतेला विचारप्रवण आणि कृतिशील करणे, युवक-युवतींचे मेळावे भरवून त्यांना स्त्री-पुरूष समानतेच्या कार्यासाठी प्रेरणा देणे हा यात्रेमागचा हेतू होता. १९८५-२००० या कालखंडात स्त्रीमुक्ती संघटनेने उत्तर प्रदेशात १ आणि महाराष्ट्रात ५ यात्रा काढून संपूर्ण राज्य पिंजून

काढले. त्यातून मिळालेल्या नव्या विचारांनी प्रभावित होऊन अनेक तरुण-तरुणींनी स्त्रीमुक्ती संघटनेचे सदस्यत्व घेतले. (त्यात माधुरी दीक्षितचाही समावेश आहे.) छोट्या छोट्या गावांमधूनही महिलांनी एकत्र येऊन स्त्री-प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न सुरू केले. इतरही सामाजिक संस्थांनी परिवर्तनाचा विचार मांडण्यासाठी स्वतःची कलापथके उभारली. एकूणच या कालखंडात, स्त्रीवर झालेल्या अत्याचारांची, स्त्री सुधारणांसाठी होणाऱ्या प्रयत्नांची व समाजात होणाऱ्या सर्व भल्याबुऱ्या घटनांची तत्काळ दखल स्त्रीसंघटना घेऊ लागल्या. चर्चा, परिसंवाद, पत्रके, घोषणा, निषेध, मोर्चे, मागण्या, आवाहने, निवेदने, सह्यांच्या मोहिमा, पोस्टरप्रदर्शने असे सर्व मार्ग वापरून शासन, सत्ताधारी, प्रसारमाध्यमे आणि सर्वसामान्य जनता यांना हलवून सोडण्याचे धोरण त्यांनी अवलंबले, मथुरा बलात्कार, मंजुश्री सारडाचा संशयास्पद मृत्यू, जळगाव वासनाकांड, रुपकँवर सती प्रकरण, शहाबानो पोटगी खटला, रिंकू पाटील, अमृता देशपांडे हत्या अशा सर्व संवेदनशील घटनांबाबत महिला संघटनांनी परस्पर संवाद, लेखन आणि आवश्यक तेथे कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. त्याचीच परिणिती म्हणून स्त्रीस आत्महत्येस प्रवृत्त करणे हा गुन्हा मानला जाऊ लागला आणि ४९८(अ) हे कलम कार्यान्वित झाले.

अशा प्रकारच्या कामात प्रमिला दंडवते यांच्या पुढाकाराने १९७६ साली दिल्लीत स्थापना झालेल्या 'महिला दक्षता समितीने' ठाशीव कामगिरी केली. केंद्रशासनाकडून मान्यता मिळवून देशातील महत्त्वाच्या शहरांमधून कुटुंब सल्ला केंद्रे, कायदा केंद्रे आणि अल्पकालीन निवारा केंद्रे सुरू केली. १९८० च्या दशकात जवळजवळ सर्वच स्त्रीसंघटनांनी समस्या निवारण केंद्रे चालवण्याचा उपक्रम सुरू केला. त्यातून त्यांचे विविध सामाजिक स्तरातील स्त्रियांच्या समस्यांविषयीचे भान आणि कायद्यांची जाण वाढली. याच वेळी स्त्रियांनी स्त्रीवरील वाढत्या अत्याचारांच्या विरोधात अत्याचार विरोधी मंचाची स्थापना केली. आणि लेखन, सभा, निवेदने यांनी जनक्षोभाचा डोंब उसळवला. ८० ते २००० या वीस वर्षात जे स्त्री-समस्याभिमुखी कायदे तयार झाले त्याची मुळे ८० च्या दशकातील स्त्रीमुक्तीचळवळीत दडलेली आहेत. या कालखंडात संपूर्ण सत्ताकारण, अर्थकारण, समाजकारण धर्मचिकित्सा, साहित्य यांचे स्त्रीवादी दृष्टिकोणातून विश्लेषण करण्याची मोठी लाट महाराष्ट्रात आली. गॅट कराराचा अभ्यास, श्रमशक्ती अहवालाचा अभ्यास, देशाच्या अंदाजपत्रकांची समीक्षा, शासकीय योजनांच्या व्यवहार्यतेचा अभ्यास, ग्रामीण आदिवासी, कष्टकरी स्त्रीच्या आरोग्याचे वास्तव, या सर्वांचे अभ्यास हे या दशकाचे फलित आहे. याच दशकात उपेक्षित, पददलित आणि वंचितांच्या समस्यांना वाचा फोडण्यास बांधील अशा अनेकविध स्वयंसेवी संस्था उदयास आल्या. त्यातील काही वेचक संघटनांची नावे उद्धृत करत आहोत. नारी समता मंच (पुणे), महिला दक्षता समिती (कोल्हापूर), भारतीय स्त्रीशक्ती (मुंबई), शेतकरी महिला आघाडी, मोलकरीण संघटना (पुणे), स्त्री आधार केंद्र (पुणे), महिला संसद (पुणे), स्वाधार (मुंबई), प्रेरणा (मुंबई), अंधश्रद्धा निर्मूलन समिती (सातारा), मजालीस, आलोचना, (पुणे), मासूम (पुणे) समग्र महिला आघाडी (पुणे) क्रांतिकारी महिला संघटना (पुणे).

याच कालखंडा भोवताली सुरू असलेल्या वाढत्या अराजकाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी नियतकालिके निघाली. त्यातील महत्त्वाचे म्हणजे 'स्त्री उवाच' हे 'मैत्रिणी' या गटाद्वारे ८७ साली सुरू झालेले वार्षिक (ते पुढे ८ वर्षे चालले.) 'स्त्री उवाच' ची भूमिका त्यांच्याच शब्दांत खालील प्रमाणे होती "स्त्रीमुक्ती दशक उलटूनही वर्ष लोटले आहे. स्त्रियांच्या आशा आकांक्षांना नवीन धुमारे फुटत असतानाच वातावरणातली कोंडी वाढत चालली आहे. लैंगिक अत्याचारांचे वाढते प्रमाण, गर्भजलपरीक्षेचा वाढता दुरुपयोग, लोकसंख्या नियंत्रणाच्या नावे स्त्रियांसाठी अपायकारक इंजेक्शन्सचा पुरस्कार, रोजगाराच्या कमी होणाऱ्या संधी, कायद्यांमधील त्रुटी व पळवाटा या सर्व प्रकारांनी होणारी कोंडी फोडण्यासाठी केलेले प्रयत्न या साऱ्यांकडे डोळसपणे पाहण्यासाठी केलेली ही एक धडपड."

याचाच अर्थ स्त्रीविषयक प्रबोधन, परिवर्तनशील कृती आणि कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी आग्रह अशा उपक्रमांनी संपृक्त असा हा कालखंड होता. त्याचे पर्या-

वसान विविध कायद्यांमध्ये आणि पंचवार्षिक योजनेत महिलांप्रती बदललेल्या दृष्टिकोणात झालेले दिसून येते. सोबत दिलेल्या कायद्यांच्या यादीवरून एक नजर जरी फिरवली, तरी स्त्रीमुक्ती चळवळीचा रेटा किती जबरदस्त होता हे स्पष्ट होते.

मात्र त्याचवेळी शिकून, अर्थार्जन करून, कायद्याचे संरक्षण मिळूनही स्त्री सुरक्षित नाही, निर्भयपणे जगू शकत नाही हे वास्तवही कार्यकर्त्यांना डाचत होते. स्त्रीच्या सामाजिक दर्जाचा प्रवास ग्यानबा तुकाराम करत दोन पावले पुढे, तर एक पाऊल मागे याच पद्धतीने सुरू आहे याची जाण चळवळीला होती. १९८६ साली शहाबानो पोटगी खटल्यातून चर्चेला आलेले मुस्लिम महिला हक्क संरक्षण विधेयक संमत होऊन मुस्लिम स्त्रीला १२५ व्या कलमातून वगळण्यात आले हा जबरदस्त आघात स्त्रीचळवळीला सोसावा लागला. आणि मुस्लिम स्त्रीच्या मनात आपण कायद्याने उघडे पडलो ही भावना रुजू लागली. मात्र याच वेळी महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळ कष्टकरी स्त्रीपर्यंत पोचण्याच्या दृष्टीने एक मोठे पाऊल पुढे पडले. शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांच्या पुढाकाराने चांदवड येथे २ दिवसांचे महिला शिबिर भरवण्यात आले. त्यास शेतीशी निगडित कामे करणाऱ्या सुमारे ४०,००० स्त्रिया उपस्थित होत्या. त्यात मुख्यत्वे ग्रामीण स्त्रीच्या असुरक्षिततेचे प्रश्न राजकीय सत्ताग्रहणाच्या मार्गाने कसे सोडवता येतील यावर विचार-मंथन झाले. त्यातूनच समग्र महिला आघाडीची स्थापना झाली. ग्रामीण स्त्रीभोवती असुरक्षिततेचे वातावरण तयार होण्यात पुरुषांनी कब्जा केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा मोठा वाटा असतो. म्हणून स्त्रियांनी ग्रामपंचायतीत सत्तासंपादनाचा मार्ग चोखाळावा अशी भूमिका मान्य झाली. त्यानुसार १९८९ साली झालेल्या निवडणुकांत ५ ग्रामपंचायतींमध्ये संपूर्ण स्त्रियांची पॅनेल निवडून आणण्यात आघाडीला यश आले ही एकप्रकारे १९९० साली घोषित झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांसाठी ३० टक्के आरक्षणाची पूर्वतयारीच म्हणायला हवी.

८७-८९ मध्ये असंघटित क्षेत्रातील कष्टकरी स्त्रियांच्या योगदानाचे मोजमाप व्हावे म्हणून राष्ट्रव्यापी सर्वेक्षण करून श्रमशक्ती अहवाल तयार करण्यात आला. ग्रामीण, कष्टकरी स्त्रियांसाठी शासकीय योजना आखताना याच अहवालातून पुढे आलेल्या माहितीचा आधार घेण्यात आला.

१९८० चे दशक *सरता सरता* पुनश्च अभिनव स्वरूपाच्या संस्था उदयास येऊ लागल्या. १९८७ साली पुणे येथे स्त्री–पुरुष समानतेसाठी पूरक काम करणारा 'पुरुष उवाच' हा गट स्थापन झाला. पुरुषप्रधान व्यवस्थेत पुरुषांची मानसिक जडणघडण कशी होते याचा वेध घेण्याचा प्रयत्न या गटाद्वारे होतो. हाच गट 'पुरुष स्पंदन' या नियतकालिकाद्वारे फक्त पुरुषांच्या लेखनातून स्त्री-पुरुष समतेचे विचार जाणून घ्यायचा प्रयत्न करतो. १९८९ साली जेष्ठ पत्रकार व स्त्रीमुक्तीचळवळीच्या प्रणेत्या विद्या बाळ यांनी 'मिळून साऱ्याजणी' हे एक सामाजिक मासिक सुरू केले. स्त्री-पुरुषांनी पारंपारिक मानसिकतेतून बाहेर पडून एकामेकांशी संवाद साधावा हा या मासिकामागचा उद्देश आहे. येथे संपादकांच्या निवृत्तीच्या वेळच्या मनोगतातील काही विधाने बघणे उपयुक्त ठरेल. विद्या बाळ २००९ मध्ये म्हणतात "'सुधारक'कार गोपाळराव आगरकर म्हणत असत, कुटुंब हा सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा घटक आहे, आणि कुटुंबांतर्गत स्त्रीपुरुष नातं हे त्यासाठी तितकंच महत्त्वाचं आहे. एका पत्रकार विचारवंताचा हा विचार कधीही दृष्टिआड होणार नाही याची या मासिकाने सतत काळजी वाहिली आहे."

१९८० च्या सुमारास ज्योति म्हापसेकर, अमोल केरकर आणि मृणाल साठे यांनी "स्त्रीमुक्ती" या संकल्पनेबाबतची जी भूमिका मांडली त्यातही कुटुंब संस्था मोडून न टाकता ती समताधिष्ठित करण्यावर भर दिला होता. २००९ मध्ये सुद्धा विद्या बाळ कुटुंबसंस्थेच्या (सुधारित आवृत्तीच्या) कल्याणाचीच काळजी वाहताना दिसतात. असे असूनही स्त्रीमुक्ती चळवळ ही "घरफोडी" चळवळ आहे या अपसमजाला समान चिकटून राहिला.

गमतीची बाब म्हणजे ८० चे दशक सरता सरता भारतीय स्त्री शक्ती या संघटनेची स्थापना झाली; ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा एक प्रवाह म्हणूनच. त्याआधी

८५ साली भारतीय स्त्री शक्ती जागरण या तिच्या आद्य संस्थेने ७००० स्त्रियांकडून "स्त्रीमुक्ती" विषयी काही माहिती गोळा केली. त्यातून या संकल्पनेबाबत स्त्रियांना भीती, आकस, अप्रीती व अनेक "गैरसमज" आहेत असे संघटनेच्या संस्थापक व स्त्री अभ्यासक डॉ. मेधा नानिवडेकर यांच्या लक्षात आले. त्यामुळे स्त्री प्रश्नांची मांडणी आणि सोडवणूक करताना गैरसमजास वाव राहणार नाही. भूमिका टोकाची राहणार नाही असा भारतीय स्त्री शक्तीचा प्रयत्न राहिला. आजही स्त्रीमुक्ती आणि स्त्री शक्ती या केवळ संघटनांमध्येच नाही, तर संकल्पनांमध्येही काहीसे अंतर ठेवण्याचा आग्रह दोन्ही बाजूंनी दिसतो. प्रत्यक्षात मात्र राजकीय (व म्हणून धार्मिकसुद्धा) भूमिका वगळता दोन्ही संघटनांच्या व्यावहारिक पातळीवरील कार्यपद्धतीत किमान स्त्रीविषयक प्रश्नांच्या बाबतीत फारसा फरक दिसत नाही.

१९९० नंतर

९० च्या दशकात महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीचा जोर ओसरला असे मानले जाते. वास्तव मात्र निराळेच दिसते. एखादी उंच लाट फुटून दूरवर पसरावी तसे काहीसे स्त्रीचळवळीचे झाले. ७०-८५ या १५ वर्षांत महिला संघटनांनी स्त्रीविषयक प्रश्नांवर समाजप्रबोधनाचा आणि आंदोलनांचा जो धडाका लावला होता त्याची फळे ९० च्या दशकात दृग्गोचार होऊ लागली. कायद्यांमध्ये सुधारणा झाल्या, कौटुंबिक न्यायालयांची विशेष महिला दक्षता समित्यांची स्थापना इ. तर घडलेच. पण सर्व प्रसारमाध्यमांमध्ये स्त्रियांनी स्वतःचा असा अवकाश मिळवला. वृत्तपत्रांच्या महिला पुरवण्या निघू लागल्या. दूरदर्शनवर स्त्रीविषयक प्रश्नांना वाहिलेले कार्यक्रम सादर होऊ लागले. विविध व्यवसायातील स्त्रिया स्वतःच्या क्षेत्रात स्त्रीला लागू पडणाऱ्या मुद्द्यांवर लेखन करू लागल्या. वैद्यकीय व्यवसायातील स्त्रियांनी स्त्री आरोग्यावर विपुल साहित्य प्रकाशित केले. आरोग्य शिबिरे ही नित्याची बाब झाली. स्त्रिया व कायदा या विषयांवरही मौलिक माहितीपर लेखन होऊ लागले. मानसशास्त्रज्ञ स्त्रिया स्त्रीच्या वर्तणूक वैशिष्ट्यांची चिकित्सा आणि स्त्रीच्या मानसिक आरोग्याविषयी लिहून प्रबोधनाची चळवळ चालवू लागल्या. स्त्रीभृणहत्या विरोधी मोहिमेला तर जवळजवळ सर्वच क्षेत्रातील स्त्रियांनी हातभार लावण्यास सुरुवात केली. परित्यक्तांचे प्रश्न समाजापुढे यावेत यासाठी विजया चौक, इंदुमती पाटणकर, निशा शिवूरकर यांसारख्या कार्यकर्त्यांनी धुळे, औरंगाबादपासून ते सातारा-सांगली पर्यंत परित्यक्तांच्या परिषदा घेतल्या. स्त्रीवादी विचारांच्या स्त्रियांनी कलेच्या माध्यमातून स्त्रियांचे प्रश्न ऐरणीवर आणले. सुमित्रा भावे, ज्योति सुभाष यांसारख्या रंगकर्मींनी स्त्रीच्या समस्यांवर अनेक लघुपट तयार केले व्यावसायिक रंगभूमीवर निर्मात्या लता नार्वेकर यांनी स्त्रीसमस्या प्रधान नाटके रंगभूमीवर आणली. स्त्रीवादी साहित्य समीक्षेला बहर आला. मुळांत स्त्रीवादी ललित लेखन विपुल होऊ लागले. गावोगावच्या महिला मंडळांचे कार्यक्रम हळदीकुंकू, कांदे नवमी या चौकटीतून बाहेर पडून स्त्रियांसाठी जागृतीपर कार्यक्रम आखू लागले. गावोगावी महाविद्यालये उघडली. तेथील स्त्री प्राध्यापिकांना स्त्री-पुरुष समतेला पूरक असे उपक्रम राबवण्यास व्यासपीठ उपलब्ध झाले. अंगणवाडी शिक्षिकांच्या रूपाने खेडोपाडी शिक्षणाचे वारे पोचले. त्यांच्या प्रशिक्षणाच्या निमित्ताने स्त्रीशिक्षण, स्त्री आरोग्य, शिशु आहार, शासकीय योजना हे विषय कानाकोपऱ्यात पोचू लागले. महिलांच्या बचतगट बांधणीची मोहीम कानाकोपऱ्यात पोचली. वडूज पासून चंद्रपूर पर्यंत आणि अलिबाग पासून औरादशहाजानी पर्यंत स्थानिक महिला "मुलगी झाली हो" हे मुक्तनाट्य आजूबाजूच्या पाड्यांमध्ये करू लागल्या. स्वतःला पटेल त्या विचारधारांमध्ये सामील होण्याचे बळ अनेकींना आले. परिणामतः विविध जनआंदोलनांमधील स्त्रियांचा उस्फूर्त सहभाग वाढू लागला. नर्मदा बचाव आंदोलनांपासून, ते दळीच्या जमिनींसाठी चळवळ, आणि अंधश्रद्धा निर्मूलन मोहिमेपासून, ते सेझविरोधी आंदोलन अशा विविध चळवळींत स्त्रियांचा सहभाग ठळकपणे जाणवू लागला. स्त्रियांच्या सामाजिक वावराच्या कक्षा रुंदावल्या दारुबंदीसाठी कृतिकार्यक्रम हा तर महिला संघटनांच्या कार्याचा अविभाज्य भाग झाला. गडचिरोलीपासून ते दौंड पर्यंत अनेक दारुमुक्ती आंदोलने स्त्रियांनी घडवून आणली. दबावगट म्हणून स्त्रिया सक्षम होत आहेत हे चित्र सर्वत्र दिसू लागले.

१९८९ साली विद्यापीठ आयोगाने स्त्री अभ्यास

केंद्रांच्या स्थापनेसाठी निधी उपलब्ध करून दिला. आजमितीस देशात ५६ स्त्री अभ्यास केंद्रे असून दिवसागणिक त्यांची संख्या वाढतेच आहे. (एस.एन.डी. टी. विद्यापीठात असे केंद्र १९७४ सालीच सुरू झाले होते.) लिंगाधिष्ठित समाजरचनेच्या सर्वांगीण अभ्यासासाठी ही केंद्रे मोलाची मदत करतात.

स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व तरुण पिढीत रुजावे व कामाच्या जागी स्त्रीचे लैंगिक शोषण होऊ नये यासाठी महाराष्ट्रातील महाविद्यालयांमधून 'स्त्री विकास मंच' Women Development Well स्थापन करणे सक्तीचे झाले. या मंचाद्वारे वर्षातून किमान ४ कार्यक्रम करून विद्यार्थ्यांचा लिंगनिरपेक्ष समानतेच्या विचारांशी परिचय करून देणे आवश्यक केले आहे. १९९३ साली मावा (Men Against Voilence & Abuse) हा पुरुषांचा गट मुंबईमध्ये सुरू झाला. स्त्रीवरील अत्याचारांच्या विरोधात पुरुषांचे संगठन करणारा हा एकमेव गट असावा. याही गटाद्वारे पुरुष उवाच हे नियतकालिक चालवले जाते.

दलित स्त्रीला व्यक्त होण्यासाठी राजकीय आणि साहित्यिक व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने 'दलित महिला फेडरेशन', 'आकार' यासारख्या संस्थाही कार्यरत झाल्या. नामांतराच्या चळवळीत दलित स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. त्यानंतर मोठ्या प्रमाणात दलित स्त्रिया लिहत्या झाल्या. एवढेच नाही, तर दलित मुक्ती चळवळीत स्त्रियांनी दिलेल्या योगदानाचा लेखाजोखाही त्या मांडू लागल्या. त्यातूनच "आम्हीही इतिहास घडवला" या सारखा अभ्यासपूर्ण दस्तऐवज प्रकाशित होऊ शकला.

१९९० नंतर मुस्लिम महिलांच्या समस्या जशा प्रखर झाल्या, तशा त्यांच्या संघटनांमध्येही वाढ झाली. भारतीय मुस्लिम आंदोलन, Muslim Womens'Rights Network या संघटनांद्वारा मुस्लिम स्त्रियांमध्ये जनजागरण मोहिमा सुरू झाल्या. त्यानंतर आवाज ए निस्वाँ, Women's Action Research Group या संस्थांनी स्त्रीचा न्याय्य हक्कांसाठीचा लढा अधिक संघटित केला.

७२ व ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर १९९३ साली स्थानिक स्वराज्य संस्थांमधून महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळाले. स्त्रीचा सत्तेतील सहभाग अर्थपूर्ण व्हायचा असेल, तर तिची राजकीय समज वाढवणे अगत्याचे होते. २००० पासून Resource & Support Center For Development या संस्थेने महिला राजसत्ता आंदोलन सरू करून त्याद्वारे गावपातळीपर्यंत महिलांमध्ये जनजागरण आणि सत्तासंपादनासाठी प्रशिक्षण सुरू केले.

९४ साली माविमची पुन:रचना झाली. राज्यभर महिलांचे बचतगट बांधून त्यांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी त्यांचे प्रशिक्षण, त्यांना कर्जपुरवठा, त्यांचा ग्रामसुधार उपक्रमात सहभाग अशा विविध उपक्रमांचा माविमने धडाका लावला. आजमितीस महाराष्ट्रात सुमारे सात लाख महिला माविमशी जोडलेल्या आहेत. परंतु हे पण लक्षात घेतले पाहिजे, की चळवळीच्या तळमळीने काम करणारी ही संस्था उत्तम नेतृत्व, कर्तव्यदक्ष पदाधिकारी लाभल्यानंतर ठाशीव कामगिरी करू शकली.

जे माविमचे तेच इतरही शासकीय संस्थांबाबत खरे आहे. भारतीय प्रजासत्ताकाला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने केंद्र सरकारने दारिद्र्य रेषेखालील जनतेला लाभार्थी लक्ष्य करून सुवर्णजयंती ग्रामीण व शहरी रोजगार योजना सुरू केल्या. मात्र येथेही दक्ष, सचोटीचा अधिकारी असेल, तरच खऱ्या लाभार्थीपर्यंत काही पोचू शकते. अन्यथा ती अधिकाराच्या प्रभावळीतील व्यक्तींसाठी वाटप योजना ठरते. अनास्था, अकार्यक्षमता यापायी त्यांना शासनाने उपलब्ध करून दिलेला निधी पडून राहतो, वा घिसाडघाईने तो 'संपवण्यात' येतो.

महिला संघटनांच्या रेट्यामुळे १९९० साली महिला आयोगाच्या स्थापनेविषयीचे विधेयक मंजूर होऊन १९९२ साली केंद्रीय महिला आयोग, व त्या पाठोपाठ ९३ मध्ये महाराष्ट्रात राज्य महिला आयोग स्थापन झाले. स्त्री प्रश्नांच्या बाबतीत आयोगाने 'जागल्या' ची भूमिका बजावणे अपेक्षित होते. परंतु ही अपेक्षापूर्ती आयोगाच्या अध्यक्षांच्या इच्छाशक्तीवर अवलंबून राहू लागली, कारण महिला आयोग हे सत्ताधारी पक्षाच्या हातचे साधन झाले. अखेरीस "जागल्या" बनण्याचे कर्तव्य स्त्रीसंघटनावरच येऊन पडले.

विविध महिला संघटना व इतरही सामाजिक संस्थांनी स्त्री प्रश्नांचा अभ्यास करून महिला विकासाचे

एक व्यवहार्य धोरण असावे यासाठी चिकाटीने महाराष्ट्र सरकारकडे निवेदने दिली. त्याच्या परिणामी १९९४ साली विशेष महिला धोरण जाहीर झाले तसे करणारे महाराष्ट्र हे १ ले राज्य आहे. त्याची काटेकोर अंमलबजावणी झाली असती, तर राज्यातील महिलांच्या जीवनात आमूलाग्र विकास घडून आला असता. परंतु सत्तापालट झाल्याने नवनिर्वाचित सरकारने हे धोरण बासनात गुंडाळले. कालांतराने स्त्रीचळवळ सोडल्यास सर्वांनाच या धोरणाचा विसर पडला. 'स्वायत्त' संघटनांचे प्रयत्न राजकीय पक्षांच्या सत्ताधोरणांमध्ये 'निरश्रित' होतात हा विदारक अनुभव पुनश्च एकदा आला.

म्हणूनच राजकीय पक्षांच्या महिला आघाड्या विशेष काही ठाशीव काम घडवून आणू शकत नाहीत. डॉ. नीलम गोऱ्हे यांच्यासारखी उच्चशिक्षित, अभ्यासू आणि चळवळीचा प्रदीर्घ अनुभव असलेली एखादीच व्यक्ती पक्षाच्या महिला आघाडीपुढे काही विधायक कृतिकार्यक्रम ठेवू शकते. अन्यथा पक्षातील पुरुषांच्या महिलांनी आघाडीच्या माध्यमातून पक्षाच्या उपक्रमांना स्त्री स्वयंसेवक पुरवणे, व त्यातून वेळ मिळेल तेव्हा महिलांसाठी स्पर्धा, योगवर्ग, रक्त तपासणी शिबिरे आयोजित करणे असे वरवरचे उपक्रम चालवण्यापुरते त्यांचे अस्तित्व मर्यादित राहते. या आघाड्यांभोवती त्यांच्या त्यांच्या पक्षांच्या धोरणांची लक्ष्मणरेषा असते. शिवाय निधी पुरवठ्याचीही समस्या असते. व त्याहूनही गंभीर बाब म्हणजे, तुरळक अपवाद सोडता त्यातील स्त्रियांचा "स्त्रीमुक्तीवाद" या विचारधारेशी परिचयच नसतो. त्यामुळे एखाद्या स्त्रीची समस्या सोडवताना त्यामागे विचार कमी आणि भावना किंवा दांडगाई जास्त असेच बहुतेक वेळा आढळून येते. त्याचबरोबर हे सुद्धा खरे, की स्वायत्त महिला संघटनांनी राजकीय पक्षांच्या महिला आघाड्यांपासून दूर राहण्याचे धोरण अवलंबले. गेल्या पाच-सहा वर्षांपासून मात्र त्यांच्याशी माहिती आणि विचारांची देवाण-घेवाण करण्याची गरज चळवळीला वाटू लागली आहे ही स्वागतार्ह बाब आहे.

स्त्री समस्यांची पाळेमुळे इतर प्रश्नांत पसरलेली असतात. साहजिकच स्त्रीमुक्ती चळवळीला इतर सामाजिक चळवळींशी जोडून घेऊन काम करावे लागते. शिवाय आरोग्यापासून कायद्यापर्यंत आणि अंधश्रद्धा निर्मूलनापासून पर्यावरण रक्षणापर्यंत विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या व्यक्ती आपापल्या क्षेत्रांत स्त्रीविषयक मुद्दे रेटत असतातच. या अर्थाने स्त्रीसंघटनांचे संपर्क जाळे विशाल असते. जागतिकीकरण, प्रसारमाध्यमांची व्याप्ती आणि प्रगत संपर्क यंत्रणा यांमुळे जग जवळ आले आहे. स्त्रीमुक्ती चळवळी त्याला अपवाद नाही. राष्ट्रीय महिला आयोग, मानवी हक्क आयोग, तसेच सीडॉ CEDAW-Convention on the Elimination of all forms & Descrimination against Womens यांसारख्या आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत संस्थांमुळे स्त्रीविषयक कुठलाही मुद्दा राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आणणे शक्य झाले आहे. संयुक्त राष्ट्रांनी आयोजित केलेल्या चारही जागतिक महिला परिषदांना भारतातून अनेक प्रतिनिधी उपस्थित होते. साहजिकच या परिषदांमधून जगभरच्या स्त्री चळवळींची जी उद्दिष्टे नक्की केली जातात त्यांचा पाठपुरावा करण्यास भारतातील स्त्रीसंघटना बांधील असतात. तसेच आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक परिषदांमध्ये भारतीय स्त्रीसंघटनांनी कोणती भूमिका मांडायची हे पूर्वनिश्चित केले जाते. त्यासाठी भारतातील महत्त्वाच्या स्त्रीसंस्था वेळोवेळी एकत्र येऊन विचारविनिमय करतात. त्यासाठी National Advisory Committee स्थापन करण्यात आली आहे. १९९५ च्या बिजिंग येथे भरलेल्या जागतिक महिला परिषदेची पूर्वतयारी म्हणून दिल्ली येथे एक मोठी परिषद भरवण्यात आली. (Conference of commitment) त्यात भारत सरकार स्त्रियांच्या विकासासाठी काय योजना आखणार याबद्दल स्वयंसेवी संस्था आणि शासनाचे प्रतिनिधी यांमध्ये चर्चा आयोजित करण्यात आली. सरकारने मान्य केलेल्या धोरणांची अंमलबजावणी होते की नाही याचा मागोवा घेण्याचे स्त्रीसंघटनेने निश्चित केले व त्यासाठी नावो (National Alliance oF women) ही अखिल भारतीय पातळीवर काम करणारी संस्था स्थापन झाली. स्त्रीहक्क संरक्षणासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, संयुक्त राष्ट्रांची विविध कनन्व्हेंशन्स्, सिडॉ,

मानवी हक्क आयोग (Conference of commitment) इत्यादींमध्ये निश्चित केलेला कृतिकार्यक्रम भारताचे शासन वास्तवात उतरवण्यासाठी प्रयत्न करते की नाही याचा पाठपुरावा करणे इ. महत्त्वाची कामे 'नावो' करते.

अशाप्रकारे राष्ट्रीय पातळीवर संघटित होण्याचे फायदेपण मिळतात. नियोजन आयोगाशी सतत चर्चा केल्यामुळेच स्त्रियांसाठी किमान ३० टक्के निधी प्रत्येक खात्याला उपलब्ध करून देणे भारत सरकारने कबूल केले आहे. स्त्रियांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच १९९१ च्या जनगणनेतील प्रश्नावलीचे स्वरूप बदलले. त्यात स्त्रिया घरात राहून अर्धवेळ कंत्रांटी काम घेऊन जे अर्थार्जन करतात त्याची नोंद सरकार दप्तरी होऊ शकली. अशा प्रकाराच्या 'वरच्या पातळीवर' होणाऱ्या प्रयत्नांमुळेच राज्ययंत्रणा आणि कालांतराने प्रशासन या दोघांनाही स्त्रीचे प्रश्न आणि स्त्रीचे योगदान या दोन्हीची दखल घेण्याची सवय लागते.

समारोप :

हा होता महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीचा संक्षिप्त आढावा. त्यावरून एक निष्कर्ष आपण काढू शकतो की, एक दबावगट म्हणून स्त्रियांची ताकद नक्की वाढली आहे. स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण, आरोग्य, सत्तासहभाग, अन्यायनिवारण, शिक्षण यासाठी स्त्रीसंघटनांनी कंबर कसली आहे. कधी शासनाला सहकार्य करून कधी त्यावर दबाव आणून तर कधी त्याच्याशी टक्कर घेऊन स्त्रीला तिचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी व्यवस्था संवेदनशील करण्याचा त्यांनी चंग बांधला आहे

असे असूनही राज्यातील स्त्रियांची सद्यस्थितीचे वर्णन करायचे, तर पेला अर्धा भरला आहे, आणि अर्धा रिकामा आहे असेच करावे लागते. कारण समाजाचे दैनंदिन व्यवहार राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांनुसार नाही तर रूढी–परंपरांनुसार चालत असतात. स्त्रीचा जन्म पुरुषाच्या सेवार्थ असतो असा संस्कार हाडांमासी मुरलेला समाज, केवळ घटना सांगते म्हणून तिला समान तर सोडाच, पण किमान मानवसुद्धा मानायला सहजी तयार होत नाही हा अनुभव वारंवार येतो. ज्या संस्कृतीने स्त्रीच्या देहाची सुद्धा मालकी पुरुषाकडे सुपूर्त केली होती ती संस्कृती स्त्रीला सत्ता, संपत्ती आणि समान वाटा देण्यास तत्काळ तयार होईल हे असंभव आहे. पिढ्यांपिढ्याच्या चूकबरोबरच्या कल्पना कायदे करून ताबडतोब बदलता येणे शक्य नसते. मात्र स्वतंत्र भारताचे कायदे होऊन ५० वर्षे उलटून गेली तरीसुद्धा कायदेभंगाची वृत्ती ओसरलेली नाही. याचे मूळ कारण म्हणजे 'शिक्षण' या समाज परिवर्तनाच्या मुख्य आयुधाला पुरेशी धार लावली गेली नाही. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या काळात (१९६१ ची जनगणना) महाराष्ट्रातील स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण २० टक्के होते. २००८ च्या DLHS (district level Household Surve) नुसार महाराष्ट्रात १२ वी उत्तीर्ण स्त्रियांचे प्रमाण फक्त २२ टक्के आहे. २००१ च्या जनगनणेनुसार राज्यातील स्त्रीसाक्षरतेचे प्रमाण जरी ६७.५ टक्के झाले असले, तरी ते फसवे आहे, कारण राज्यातील मुलींचे ७ वीनंतर शाळागळतीचे आजमितीस प्रमाण ७० टक्के आहे. याचाच अर्थ ६७.५ टक्के बहुसंख्य स्त्रियांना फक्त अक्षर ओळख आहे. त्यांना शिक्षित म्हणता येणार नाही. मुलींसाठी पहिली शाळा ज्या राज्यात निघते त्यासाठी ही आकडेवारी काळजी करण्याची बाब आहे. DLHS-3 च्याच सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील मुलींच्या लग्नाचे सरासरी वय ग्रामीण भागात १८.९ आणि शहरी भागात २०.७ टक्के आहे. यावरून सुद्धा स्त्रिया पदवीधर होण्याआधीच आणि ग्रामीण भागात जेमतेम कायदेशीर वयोमर्यादेचा भोज्जा गाठून विवाहबद्ध होतात हे उघड दिसते. राज्याच्या शहरी भागात २० टक्के मुलींचे आणि शहरी भागात ११.४ टक्के मुलींचे विवाह १५-१७ वर्षे वयात झाले.म्हणजे बालमुलींचे विवाहच. ग्रामीण भागात ११.३ टक्के मुलींना आणि शहरी भागात ५.४ टक्के मुलींना वयाच्या १५ ते १९ वर्षात पहिले मूल झाले. ग्रामीण भागात स्त्रियांनी घरी बाळंत होण्याचे प्रमाण ४४ टक्के आहे.

प्रसृतिपूर्व गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.परंतु २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील स्त्रियांचे प्रमाण दरहजार पुरुषांमागे ९२२ इतके खाली आले आहे. (१९६१ साली ते९३६

होते.) १९६१ साली हुंडाबंदी कायदा होऊनही हुंडाबळी आणि वारेमाप लग्नखर्च वधुपक्षावर टाकण्याची प्रथा अजिबातच कमी झालेली नाही.

स्त्रीदेहाचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा, शरीर विक्रयास प्रतिबंध हे कायदे होऊनही स्त्रीदेहाचे बाजारीकरण, वेश्या व्यवसाय, अश्लीलपटांची निर्मिती यांत स्त्रिया खूप मोठ्या प्रमाणात ओढल्या जात आहेत कौटुंबिक अत्याचार विरोधी कायदा कौटुंबिक अत्याचारांच्या तक्रारींनी समस्या निवारण केंद्रे दुथडी भरून वाहत आहेत. विशाखा जजमेंट येवून जुने झाले, पण लैंगिक शोषणाची टांगती तलवार नोकरदार, तसेच कष्टकरी स्त्रीच्या डोक्यावर सतत असते. स्त्रीच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पुरुषाच्या बरोबरीने शिक्षण आणि अर्थार्जन करणाऱ्या तरूण स्त्रियांची सहकाऱ्याकडूनच हत्या होण्याच्या घटना नित्याच्या झाल्या आहेत. स्त्रीचे शिक्षण, अर्थार्जन, समान कामास वेतन हे बदल पचवलेला समाज स्त्रीस नकार देण्याचा अधिकार आहे हे मात्र पचवू शकत नाही हे दुर्दैवी सत्य आहे. वाढत्या मूलतत्त्ववादात सर्वत्रच स्त्रिया होरपळून निघतात. महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. राज्यातील मुस्लिम भगिनींवर कधी छुपी, तर कधी उघड, अशी दहशतवादी कारवायांची पकड जाणवते आहे. राज्यातील ख्रिश्चन स्त्रियांच्या संघटना तुरळक अपवाद सोडल्यास फारशी प्रभावी कामगिरी करू शकलेल्या नाहीत. दलित राजकारण्यांनी अंतर्गत कलहापायी दलित स्त्रीला तिच्या समतेच्या लढाईत मुळीचच साथ दिलेली नाही. हे कटू सत्य आहे.

जागतिकीकरणाच्या रेट्यात ग्रामीण, अल्पशिक्षित स्त्रीची उपजीविकेची पारंपारिक साधने हिरावून घेतली जात आहेत. जीवनाच्या सर्वच अंगांचे अतिरेकी बाजारीकरण होत असताना त्याची थेट वा अप्रत्यक्ष झळ स्त्री सौंदर्याचा, स्त्री देहाचा बाजार आणि आधुनिकतेच्या नावाखाली त्याबाबत शिक्षित स्त्रीचा बुद्धिभेद हे स्त्रीमुक्ती चळवळीपुढचे मोठे आव्हान आहे.

एकीकडे उच्चशिक्षित, उच्चपदस्थ स्त्रियांची संख्या वाढते आहे; ग्रामीण भागात पंचायतराज व्यवस्थेमधून स्त्रियांचा राजसत्तेशी परिचय होऊ लागला आहे. पण त्याचवेळी संसदीय राजकारणातून मात्र स्त्रिया काढता पाय घेताना दिसतायत. राजकारणात पैसा, आणि गुंडप्रवृत्तीचं प्राबल्य वाढल्याने स्त्रिया त्यापासून दूर राहू लागल्या व त्याऐवजी स्त्रीसंघटनांमार्फत स्वतःचा दबावगट निर्माण करू लागल्या असे सर्वसाधारण चित्र दिसते. उदा : महाराष्ट्रच्या विधानसभेत १९५७-६२ या कालावधीत २४ महिला सदस्य होत्या, ७२-७७ या कालावधीत २८सदस्य होत्या, तर ७८-८२ या काळ-खंडात फक्त ८ महिला आमदार होत्या, २००४-२००९ या कालावधीत १२ महिला विधानसभेवर निवडून गेल्या, तर ऑक्टोबर २००९ च्या निवडणुकात १२ स्त्रिया विधानसभेत पोचल्या.

एकीकडे स्त्रीसाठी विकासाच्या संधींची नवनवीन दालने खुली होत आहेत. परंतु तिच्यावरच्या पारंपारिक जबाबदाऱ्यांचे ओझे कमी करण्यास समाज तयार नाही. समान कामास समान वेतन हा कायदा अस्तित्वात आणण्यात यशस्वी झालेली चळवळ घरकामाचे सुसंगत व समान वाटप कसे करावे हा प्रश्न प्रभावीपणे सोडवू शकलेली नाही.

चळवळीचे फायदे घेत घेत मोठी झालेली, आणि चळवळीनेच उपलब्ध करून दिलेल्या संधींचा वापर करून एक विकसित आयुष्य जगणारी शहरी शिक्षित स्त्री स्त्रीमुक्ती चळवळीस वाजवी श्रेय देण्यास वा ती बळकट करण्यास पुरेशी उत्सुक नाही हा अनुभव पण हतोत्साह करणारा आहे. त्याचवेळी सामाजिक व्यवस्थेचा पोत समजून न घेता व्यक्तिगत पातळीवर स्त्रियांकडून दुखावलेले पुरुष 'पुरुष अत्याचार विरोधी संघटना' स्थापन करून दिशाभूल करत आहेत.

धर्मांधता, युद्धखोरी, राजकीय अराजक पर्यावरणाचा ऱ्हास करून विकास आणि अतिरेकी भोगवाद यांत स्त्रीचा बळी जातो. हे जगभरच्या स्त्रीमुक्ती चळवळींनी ओळखले आहे. त्यामुळे स्वायत्त स्त्रीसंघटना धर्मनिरपेक्षता, विश्वशांती आणि पर्यावरण रक्षण यांची कास धरून विकासाचा आग्रह धरत आहेत. तरीसुद्धा अधिकाधिक स्त्रिया धार्मिक विद्वेष, आणि सशस्त्र संघर्षांना बळी पडत आहेत. कारण अजूनही जग आक्रमकता, स्पर्धा आणि सत्ता या मुख्यत्वे पुरुषाने शिरोधार्य मानलेल्या तत्त्वांनुसारच जगत आहे. ही परिस्थिती बदलायची असेल, तर परस्पर सहकार्य, सत्तेची उतरंड गृहीत न धरता

सर्वसमावेशक असे सत्ता वर्तुळ, स्त्री-पुरुषांच्या नैसर्गिक प्रवृत्तींना अनैसर्गिक अवरोध न होता समाजधारणेस आवश्यक अशी अहिंसा, समन्याय यावर आधारित लवचिक मूल्यव्यवस्था यांना (पुन्हा) प्रतिष्ठा मिळायला हवी. त्यासाठी आधुनिक स्त्रीवाद पुनश्च स्त्रीकेंद्री, अनौपचारिक अशा कुटुंबव्यवस्थेकडेच वळतो. नानाविध कायदे करून, सवलती देऊन, योजना राबवूनही समाजात स्त्रिया छळमुक्त, निर्भय जीवन जगू शकत नाहीत याचाच अर्थ सद्य व्यवस्था आमूलाग्र बदलायला हवी असे स्त्रीमुक्तिवादी म्हणू लागल्या आहेत. प्रसिद्ध स्त्रीवादी लेखिका आणि कार्यकर्त्या मंगला सामंत त्यांच्या 'स्त्री पर्व' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत स्त्रीमुक्ती चळवळींच्या प्रयत्नांविषयी म्हणतात "जसं रस्त्यांवरच्या खड्ड्यांमुळे अपघात झाला की, अपघातग्रस्तासाठी हॉस्पिटल हवेच आहे, पण तरीसुद्धा खड्डा बुजवावाच लागतो आणि खड्डे पडतच रहाणार असतील, तर रस्त्याच्या नव्या बांधकाम पद्धतीचा विचारही पुढे आणावा लागतो. त्याचप्रमाणे सामाजिक प्रश्नांचे खड्डेही बुजवावे लागतील. ते पुन्हा पुन्हा निर्माण होत असल्यास समाजव्यवस्था तपासून तिची पुनर्बांधणी करावी लागेल."

स्त्रीमुक्ती चळवळ ही समाजव्यवस्था तपासून बघण्याची प्रक्रिया आणि पुनर्बांधणीचा प्रयत्न होय. त्यातील तपासून बघण्याची प्रक्रिया खूपच पुढे गेली आहे. पुनर्बांधणीचे सुद्धा नवनवीन उपाय पुढे येत आहेत. १९३० साली "स्त्रियांना त्यांच्या पारंपारिक भूमिका अधिक विचारीपणे पार पाडता याव्यात" या हेतूने सुरू केलेले स्त्रीवादी लेखन "सध्यातरी विविध कारणांमुळे कुटुंबाखेरीज दुसरा पर्याय दिसत नाही पण तो इतिहासक्रमात निर्माण होणार आहे" असा टप्पा घेत आता तथाकथित पारंपारिक भूमिका स्त्रीवर लादणारी पितृकेंद्री विवाह संस्थाच किती दुरितांना जन्माला घालते याचा लेखाजोखा मांडू लागले आहे - "विवाहसंस्थेने जे दिले नाही, त्यापेक्षा जे काय दिले ते जास्त भयावह आहे. विवाहसंस्थेने औरस, अनौरस, बेवारशी असे संततीचे प्रकार निर्माण केले. विवाहातून 'वैधव्य' ही नवी स्थिती उदयास आली. विवाहित, अविवाहित, परित्यक्ता, घटस्फोटिता अशा पद्धतीने स्त्रियांचे अनैसर्गिक प्रकार निर्माण केले. कुमारीमातृत्व, बलात्कारित मातृत्व, विवाहित मातृत्व अशा प्रकारे वर्गवारी करून, विवाहाने अस्सल मातृत्व कलंकित केले. स्त्रियांवर शरीरविक्रय करण्याची वेळ आणली. त्यांची मुले समाजाने अव्हेरल्यामुळे गुन्हेगारी जगात प्रचंड वाढ झाली. गुन्हेगारीतून पुन्हा अत्याचार, बलात्काराच्या चक्राने वेग घेतला. विवाहामुळे बलात्कारास स्त्रीजीवन अडचणीत आणण्याचा एक हेतू प्राप्त झाला. त्यातून भ्रूणहत्येला चालना मिळाली. एका पितृत्वाच्या अट्टाहासापायी, स्त्री-पुरुष संबंधांबाबत खोट्या नैतिक कल्पना उभ्या करून जी व्यवस्था आणली गेली. तिने बाकीची सर्व नैतिक व्यवस्था आणि समतेची मूल्ये अक्षरशः धुळीस मिळवली. (स्त्री पर्व, मंगल सामन, पृ. क्र. ६७, २००८).

विवाह संस्था आणि पर्यायाने कुटुंबसंस्था हा पुरषप्रधानतेचा बालेकिल्ला होय हे सर्वज्ञात आणि सर्वमान्य असे सत्य आहे. त्यामुळे स्त्रीमुक्ती चळवळीने फिरून फिरून कुटुंबसंस्थेच्या पुन:रचनेचा आग्रह धरणे यात अस्वाभाविक असे काही नाही. अगदी अठराव्या शतकात महाराष्ट्रात ताराबाई शिंदे म्हणाल्या होत्या, की 'स्त्रिया या गृहबंदिशाळेतील बंदिवान आहेत'. त्याच कालखंडात तिकडे अमेरिकेत सूसन बी अँथनी म्हणाली होती, की विवाहसंस्थेने स्त्रीचे अगदी पोतेरे करून टाकले आहे" जॉन स्टुअर्ट मिल पासून लेनिनपर्यंत आणि मामा वरेरकरांपासून ते आधुनिक स्त्रीमुक्तिवादींपर्यंत सर्वच पितृकेंद्री कुटुंबसंस्थेस स्त्रीदास्याची वाहक मानतात.

शिक्षण, अर्थार्जन, आरोग्यसेवा, समन्याय हे सर्व एक उन्नत आयुष्य जगण्यासाठी आवश्यक असते व प्रत्येक नागरिकास ते उपलब्ध झालेच पाहिजे. मात्र, स्त्री असो, वा पुरुष, व्यक्तीचे मनस्वास्थ्य, तिला स्वतःच्या विकासासाठी पुरेसा वेळ, शक्ती, संधी मिळणार की नाही, तिच्या दैनंदिन व्यवहारात तिला आधारयंत्रणा उपलब्ध असेल की नाही हे मुख्यत्वे कुटुंबावर अवलंबून असते. पितृकेंद्री कुटुंबसंस्थेत स्त्रीला विवाहानंतर तिच्या आप्तस्वकीयांच्या मातृकुळातून उपटून पुरुषाच्या आप्तांमध्ये कायमस्वरूपी आणले जाते. त्यामुळे तिच्या नैसर्गिक आधारयंत्रणा तुटतात व बहुसंख्यवेळा तिच्या (व तिच्या बालकांनाही) निष्प्रेम आयुष्य जगावे लागते. म्हणूनच

आधुनिक कुटुंब-संस्थेने स्त्रीची तिच्या मातृकुळापासून नाळ तोडू नये, पित्याचे अस्तित्व शाबूत राखूनही संस्था म्हणून कुटुंब बालककेंद्री करावे, स्त्रीवर निसर्गानेच वंशसातत्याची जास्तीची जबाबदारी टाकली आहे, त्यामुळे मानवनिर्मित समाजव्यवस्थेने स्त्रीला अधिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मांडणी मराठीतील स्त्रीवादी लेखनात होऊ लागली आहे. (८०च्या दशकात Equal rights are not special rights असे अमेरिकन स्त्री-मुक्तीवादींनी म्हणून ठेवले आहेच.) कोणत्याही कारणास्तव जेव्हा स्त्रीला घराबाहेर काढले जाते, तेव्हा तिचे जीवन उध्वस्त होतेच, पण त्याचबरोबर तिच्या अपत्यांचेही मन-स्वास्थ्य आणि भवितव्य धोक्यात येते. जेव्हा स्त्री विका-सापासून लांब ठेवली जाते, तेव्हा तिच्यावर अवलंबून असणारी तिची मुलेपण वंचित जीवन जगू लागतात. त्यातूनच गुन्हेगारीची असंख्य रूपे उद्‌भवतात. म्हणूनच केवळ स्त्री नाही, तर स्त्री-पुरुष व त्यांची मुले यांना स्वस्थ आयुष्य लाभायचे असेल तर, स्त्रीचे आद्य पालकत्व मान्य करून अपत्यकेंद्री कुटुंबसंस्था रुजवण्याचे प्रयत्न व्हावेत असा सूर स्त्रीमुक्ती चळवळीत निघू लागला आहे. मात्र हे करताना स्त्रीच्या उरावर त्यागाचे ओझे, आणि पुरुषाच्या पदरात हक्कांचा व मुभांचा मलिदा हे त्यांना मान्य नाही.

महाराष्ट्रातील स्त्रीमुक्ती चळवळीचे वर्तुळ "स्त्रीचे प्रश्न आणि हक्क" या केंद्रबिंदूपासून सुरू होऊन हळुहळु विस्तारत, स्त्री-पुरुष-लहानमुले यांच्यातील स्वास्थ्यकारक सहजीवनाचा, व सर्वच वंचित समूहांच्या उन्नतीचा प्रश्न कवेत आणू बघत आहे. म्हणूनच स्त्री चळवळीतील अनेक समर्थक या चळवळीस मानवमुक्तीची चळवळ म्हणणे पसंत करतात.

स्त्रीविषयक कायदे

१९२९ बालविवाह प्रतिबंध कायदा–सारडा कायदा.
१९५५ हिंदू विवाह कायदा.
१९५६ हिंदू दत्तक व पोटगीविषयक कायदा.
१९५६ द्विभार्या प्रतिबंध कायदा.
१९६१ हुंडा प्रतिबंध कायदा.
१९६१ प्रसुतिलाभाविषयीचा कायदा.
१९७१ गर्भपात कायदेसंमत.
१९७४ स्त्रियांना समान कामास समान वेतन.
१९७६ सहसंमतीने घटस्फोटाचा कायदा.
१९८२ देवदासी प्रथा विरोधी कायदा.
१९८३ बलात्काराविषयी सुधारित कायदा.
१९८४ कौटुंबिक न्यायालयाच्या स्थापनेविषयीचा कायदा.
१९८४ हुंडाविषयक सुधारित कायदा.
१९८६ विवाहानंतर ७ वर्षाच्या आत स्त्रीचा मृत्यू झाल्यास हुंडाबळीची शक्यता घेऊन स्त्रीच्या मृत्यूची चौकशी.
१९८६ स्त्री देहाचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा.
१९८६ स्त्री देहाची वेश्या व्यवसायासाठी खरेदी व विक्री विरोधी कायदा.
१९८५ सतिबंदी विषयक सुधारित कायदा.
१९८८ प्रसुतिपूर्व गर्भलिंग चिकित्सा करून स्त्रीगर्भ हत्या विरोधी कायदा.
१९९२ घटना दुरुस्ती– स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांना ३३ टक्के आरक्षण.
१९९४ विशेष महिला धोरण–महाराष्ट्र हे पहिले राज्य.
१९९७ विशाखा जजमेंट– कामाच्या जागी स्त्रीचे लैंगिक शोषण प्रतिबंध.
२००७ कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा.

❖❖❖

काल, आज आणि उद्या

आता इतक्या वर्षानंतर

– साक्षी

खरे सांगायचे तर माझ्यासारखी जी मुले संयुक्त महाराष्ट्रासाठी मुंबईत झालेल्या चळवळीच्या उन्मादक वातावरणात शाळकरी वयातून तारुण्यात आली त्यांचा संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्याने काहीसा विरसच झाला. पंचावन्न सालच्या ऑक्टोबर (?) महिन्यात 'राज्य पुनर्रचना मंडळा'चा (तेव्हा 'आयोग' हा शब्द नव्हता.) अहवाल प्रसिद्ध झाला तेव्हापासून मुंबईतील मराठी समाजात चीड, चेव व चैतन्य निर्माण झाले होते. सभा, परिषदा, मोर्चे, हरताळ, निदर्शने, सत्याग्रह, घोषणा यांची झिम्मड उडाली होती. सुरुवातीला 'नवयुगा'मधून व नंतर 'मराठ्या'तून आचार्य अत्र्यांनी घणाघाती अग्रलेखांचा धडाका लावला होता. अत्र्यांची श्रोत्यांना हसविणारी, हलवून सोडणारी व संतापाची सणक आणवून देणारी तुफानी व्याख्याने; मोरारजी देसाई, सदोबा पाटील, 'फलटणची फितुरी' करणारे यशवंतराव चव्हाण व मालोजी नाईक निंबाळकरांसारखे अत्र्यांच्या भाषेत 'सूर्याजी पिसाळ' अशा 'हरामखोरां' विषयीची तिडीक यांच्यामुळे मुंबईतील मराठी माणूस पुरता 'बिघडून' गेला होता. चळवळीची एक झिंग चढते व तिच्यातून बाहेर पडणे जिवावर येते. स्वातंत्र्याचा लढा आम्ही पाहिला नव्हता पण संयुक्त महाराष्ट्राचा लढा आम्हाला झिणझिण्या आणणारा अनुभव देवून गेला. जमिनीवरचा पाचोळा वाऱ्याच्या भोवऱ्यात सापडून गरगरत उंचावर जावा आणि वावटळ थांबल्यावर आपण जमिनीवर उतरणार आहोत, याचे त्याला भानच नसावे तसे काहीसे आम्हा मुलांचे झाले होते. वाटत होते की, मुंबई महाराष्ट्राला न देण्याचा आपला हट्ट नेहरु काही सोडणार नाहीत, चळवळ आणखी उग्र रूप घेऊन चालतच राहील, विरोधकांचे भुसकट करून टाकणारी आचार्य अत्र्यांची व्याख्याने आपण ऐकतच राहू, या उन्मादात भेलकंडत राहू, ही मजा संपणारच नाही.

पंचावन्न सालच्या अखेरीला पंतप्रधान नेहरुंनी मुंबई शहर केंद्रशासित प्रदेश करण्याचा 'अपरिवर्तनीय' (इर्रिव्होकेबल) निर्णय जाहीर केला. लगोलग मुंबईसरकारने 'संयुक्त महाराष्ट्र समिती'च्या जहाल नेत्यांना (म्हणजे मुख्यतः कम्युनिस्टांना व अत्र्यांना) कैद केले. मुंबईत प्रचंड दंगली उसळल्या. गिरण्यातून संप झाला. चिडलेल्या मराठी लोकांच्या झुंबडीच्या झुंबडी गिरगाव-गिरणगावातून बाहेर पडल्या व दगडफेक करू लागल्या. पोलिसांनी बेछूट गोळीबार करून सत्तर-पंचाहत्तर लोकांना ठार केले. यावेळी अत्र्यांनी 'नवयुग'चा काळा अंक काढला होता. त्यातील सुरुवातीचेच वाक्य होते की, 'कुणाच्या राज्यात राहातो आहोत आपण? हिटलरच्या, मुसोलिनीच्या की टोजोच्या?' या अनिर्बंध गोळीबाराच्या चौकशीची मागणी सरकारने मान्य केली नाही. याबाबत मांडण्यात आलेला ठराव मुंबई विधानसभेत, महाराष्ट्रातील काँग्रेस आमदारांनी पाठिंबा न दिल्यामुळे, फेटाळला गेला. मुंबई खेरीजच्या महाराष्ट्राला मुंबईतील मराठी माणसांच्या भावनांची पत्रास नाही याची चटका लावणारी प्रचीती तेव्हा आली.

१९५७ सालच्या निवडणुका हाही रोमांचकारी अनुभव होता. काँग्रेस पक्षाच्या विरोधात शेतकरी कामगार पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष (प्रस), कम्युनिस्ट व इतर डझनावारी चिल्लर पक्ष 'संयुक्त महाराष्ट्र समिती'च्या झेंड्याखाली गोळा झाले होते. (त्यात 'रामराज्यपरिषद' ह्या नावाचा पक्ष होता. तो समितीतून बाहेर पडला तेव्हा अत्र्यांनी लिहिले होते 'रामराज्य परिषद समितीतून बाहेर पडल्याची बातमी आली त्यानंतरच लोकांना कळले की रामराज्य परिषद समितीत होती!')

त्यावेळी काँग्रेसची प्रचारयंत्रणा फारच प्रबळ होती व स. का. पाटलांनी त्या यंत्रणेसाठी चित्रपट तारे व तारकांची कुमक आणवली होती, पंतप्रधान नेहरुंसारखा लोकांचा लाडका पुढारी काँग्रेसच्या प्रचारासाठी झंझावाती दौरे करत होता व त्यांच्या 'दर्शना'साठी हजारो लोक

गोळा होत होते, या सामर्थ्यशाली फौजफाट्यापुढे समितीचे फुटकळ उमेदवार काय टिकाव धरणार अशीच सर्वत्र भावना होती. समितीच्या पुढाऱ्यांचे राजकारण-कौशल्य समितीतील अठरापगड पक्षांना एकत्र राखण्यातच खर्च होत होते. प्र. स. पक्ष व कम्युनिस्ट यांची घटके-घटकेला भांडणे होत होती. जागांच्या वाटपावरून, कामगार-चळवळीतील स्पर्धेवरून, कृष्ण मेनन सारख्या डाव्या काँग्रेस पुढाऱ्यांबद्दल काय भूमिका घ्यावी याबद्दल, अशी भांडणासाठी नाना निमित्ते दोघांना मिळत होती. त्यातच १९५६ साली हंगेरीत कम्युनिस्ट-विरोधी उठाव झाला व तो सोव्हिएट यूनियनने आपले लष्कर पाठवून दडपून टाकला तेव्हा तर दोन्ही पक्षातील वादाला ऊत आला. अशा नाना भानगडी झाल्या. समितीची प्रत्येक बैठक म्हणजे संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना एक निकराची परीक्षाच वाटत असे. मग सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, वालचंद कोठारी आणि माधवराव बागल अशी अपक्ष व वडिलधारी मंडळी दादाबाबा करून किंवा दटावणी देवून सारे शांत-शांत करीत. महाराष्ट्रवादी जनतेचा रेटाच असा जबरदस्त होता आणि 'मुंबईसकट संयुक्त महाराष्ट्र' हे ईप्सितच इतके ओढ लावणारे होते की, या पक्षांना परस्परांना लाथा देत व लाथा खात एकत्र राहाणे भागच होते.

या निवडणुकीतील काही लढती फारच अटीतटीच्या होत्या. बाबुराव सणस विरुद्ध एस्. एम्. जोशी ही निवडणूक, आचार्य अत्रे व सुलोचना मोदी यांच्यात गिरगावात झालेला सामना आणि यशवंतराव चव्हाण व केशवराव पवार याच्यातील कराड मधील झुंज यांना निकराचे स्वरूप आले होते. त्यावेळी कुसुम रानडे नावाच्या बाई आकाशवाणीवरून प्रादेशिक बातम्या देत. भाबड्या लोकांचा समज होता की, रानडेबाई बातम्या देत तेव्हा समितीच्या विजयाच्या बातम्या असत! समितीचा उमेदवार विजयी झाला की, हर्षाचा कल्लोळ उसळे. कराडच्या मतदार संघातून यशवंतराव चव्हाण पंधराशे मतांनी विजयी झाले तेव्हा जी खिन्नता पसरली ती अंगावर काटा आणणारी होती. असो. निवडणुका तर झाल्या. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात समितीला घवघवीत यश मिळाले. एस्. एम्., अत्रे, नरवणे, विष्णुपंत चितळे वगैरे नेते निवडून आले. पण त्या वेळच्या 'महा-द्विभाषिक' राज्यात काँग्रेसचेच बहुमत झाल्याने यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचेच मंत्रिमंडळ सत्तेवर आले.

यानंतर तीन वर्षे यशवंतराव चव्हाण यांनी फार प्रगल्भपणे आणि धूर्ततेने कारभार चालविला. 'संयुक्त महाराष्ट्राचे सारे फायदे मी तुम्हाला द्विभाषिकातच मिळवून देतो', असे त्यांचे आश्वासन होते. (त्यावर अत्र्यांचे उत्तर होते, 'हा आडमार्ग कशाला? त्यापेक्षा संयुक्त महाराष्ट्रच द्या ना!') "बेरजेचे राजकारण" हा परवलीचा शब्द झाला होता. सत्तेचे गाजर त्यांच्या हाती होते. समितीतील मतभेद, समितीत असणारे ब्राह्मण-नेतृत्व, शेतकरी-कामगार पक्षातील काही मातबर पुढाऱ्यांना प्रथमपासूनच असलेली सत्तेची ओढ, सत्तावन्नच्या निवडणुकीत काँग्रेस-मधील ब्राह्मण पुढाऱ्यांचा झालेला पराभव अशा अनेक घटकांचा कौशल्याने उपयोग करून घेत चव्हाणांनी आपली पक्षावरची, महाराष्ट्रावरची आणि सत्तेवरची पकड घट्ट करीत नेली. असे वाटू लागले की, मुंबई बाहेरची मराठी जनता द्विभाषिकाचा स्वीकार करण्याच्या मनस्थितीत आली आहे.

पण सार्वत्रिक निवडणुकीनंतर ज्या पोटनिवडणुका मराठी प्रदेशात झाल्या त्यात समितीचीच सरशी होत गेली. मराठवाड्यातील जालन्यात पोटनिवडणूक झाली. सार्वत्रिक निवडणुकीत तेथे काँग्रेसचा विजय झाला होता. आता मात्र समितीचा उमेदवार निवडून आला. तेव्हा अत्र्यांच्या अग्रलेखाचा मथळा होता "जालना! आता तरी जाल ना!" या पराभवांचा उपयोग चव्हाणांनी त्या-वेळच्या काँग्रेस-अध्यक्ष इंदिरा गांधी यांना हे पटवून देण्यासाठी केला की, कितीही उत्तम व कल्याणकारी कारभार केला तरी मराठी समाजाचा काँग्रेसवरील राग संपणार नाही. मुंबईसकट संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करणे हा मराठी लोकांना काँग्रेसकडे ओढून आणण्याचा एकमेव उपाय आहे.

त्यानंतर चाके भराभर फिरली; पण तीही या कानाचे त्या कानाला कळू न देता. प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष मामा देवगिरीकर हे राज्यसभेचे सदस्य होते. दिल्लीत होते. पण महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी हालचाली चालू

असल्याची त्यांना अजिबात कल्पना नव्हती. एकदा नेहरुच प्रसन्न झाल्यावर काय, साऱ्या औपचारिकता–कायदा करणे, घटना–दुरुस्ती करणे, महाराष्ट्र व गुजरात यांच्यातील आर्थिक वाद मिटवणे इ. – मागण्या पुऱ्या करण्यात आल्या, ज्या जवाहरलाल नेहरुंनी मुळात भाषिक राज्यांना, नंतर महाराष्ट्राला व अखेर–पर्यंत मुंबईसकट संयुक्त महाराष्ट्राला हट्टाने विरोध केला होता त्यांच्याच हस्ते यशवंतराव चव्हाणांनी मुंबईसकट संयुक्त महाराष्ट्राची स्थापना मुंबईत घडवून आणली.

(१)

महाराष्ट्रासाठी झालेल्या लढ्याची मुख्य रणभूमी मुंबई होती. लढ्याचा खरा त्वेष मुंबईतच अनुभवाला येत होता. चळवळीतील संताप शिगेला पोचला तो नेहरुंनी मुंबई केंद्रशासित करण्याचा निर्णय जाहीर केला तेव्हा. त्यानंतर काय झाले ते आपण वर पाहिलेच आहे. त्या काळ्याकुट्ट दिवसापासून मुंबईतील मराठी जनतेला एक प्रकारची असुरक्षितता वाटू लागली. आपल्याला महाराष्ट्रापासून केव्हाही तोडले जाईल, इथले परप्रांतीय आपला चेंदामेंदा करतील, मुंबईसारख्या वैभवशाली नगरीत फरशीपुश्या रामा गडी आणि खर्डेघाश्या कारकून यापेक्षा वरची यत्ता आपल्याला गाठता येणार नाही, असा धसका मुंबईतील सामान्य मराठी माणसाने घेतला व त्या भावनेतूनच गेल्या चाळीस वर्षात प्रथम शिवसेना व अलीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्यासारख्या चळवळी फोफावल्या. आपण मुंबईतील स्थानिक व स्थायी नागरिक आहोत हा आत्मविश्वास मुंबईतील मराठी माणसाने गमावला व त्या उलट आपण अल्पसंख्यांक, अन्यायित व निराधार आहोत अशी समजूत प्रभावी झाली. शिवसेनेने सुरुवातीपासूनच जी दांडगाईची व आक्रमक भूमिका घेतली ती या भावनेला साजेशी व खतपाणी देणारी होती.

मुंबईतील मराठी समाजाचा गाभा म्हणजे मुंबईतील गिरणी कामगार. बहुतेक गिरणी कामगार हे गेल्या शतकाच्या पहिल्या चाळीस वर्षात कोकणातून आलेले लोक होते. नंतर देशावरचे कामगार येऊ लागले व पन्नास सालानंतर मध्ये लोकांची भरती होत गेली. गिरणी कामगारांवर १९३० च्या आधीपासून कम्युनिस्ट कामगार संघटनेची पकड होती. आपल्या ध्येयवत्तेला (आयडियॉलाजी) अनुसरून ही संघटना कामगारांच्या भाषिक भेदाकडे दुर्लक्ष करीत होती. मुंबईतील काँग्रेस पक्षाची कामगार संघटना राष्ट्रीय मिल मजदूर संघ ही मान्यताप्राप्त संघटना होती खरी पण ती कामगारांना कधीच मान्य झाली नाही. महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर मुंबई काँग्रेसने शिवसेनेचा उपयोग करून कामगारांवरील कम्युनिस्टांचे वर्चस्व कमी करावे असा घाट घातला व महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी त्या धोरणाला पाठिंबा दिला. १९६८ साली मुंबईत मोठा दंगा झाला. त्याला निमित्त होते मोरारजी देसाई यांची गाडी अडविण्याचा शिवसैनिकांनी प्रयत्न केला, हे. सरकारने दंगेखोरांना दंगा करायला मोकळीक दिली, हे खरे होतेच; पण सरकारने दंगा बंद करण्याचे नेहमीचे पोलिसी प्रयत्न बाजूला ठेवून बाळासाहेब ठाकरे यांची उघड्या मोटारीतून 'शोभायात्रा' काढली व दंगलग्रस्त भागातून त्यांच्या करवी शांतता स्थापण्याचे आवाहनही करवले! ठाकरे यांचे माहात्म्य वाढविण्याचा तो प्रयत्न होता. त्यानंतर शिवसेनेने कम्युनिस्टांविरुद्ध चवताळून हालचाली केल्या. कृष्णा देसाई या कम्युनिस्ट कार्यकर्त्याचा खून झाला. ऐन गिरणगावात कृष्णा देसाई यांच्या विधवा पत्नीचा शिवसेनेचे वामनराव महाडिक यांनी पोटनिवडणुकीत कृष्णा देसाईंच्याच मतदार संघात पराभव केला. यानंतर कम्युनिस्टांचा प्रभाव ओहोटीला लागला. आता कामगार वर्गच मुंबईतून संपला!

मुंबईतील मराठी माणसाला आश्वस्त करणे, त्याला त्याच्या आत्मसन्मानाची ग्वाही देणे, मुंबईतील राजकीय व आर्थिक व्यवहारात त्याच्या हिताची जपणूक होते आहे याची खात्री त्याला देणे, हे महाराष्ट्र सरकारचे कर्तव्य होते. पण सरकारने या दृष्टीने कधीच हालचाली केल्या नाहीत. यशवंतराव चव्हाणांच्या काळात, मुंबई महाराष्ट्रात जाण्याला परप्रांतीय भांडवलदारांचा विरोध होता याची जाणीव ठेवून, अशा भांडवलदारांना गोंजारण्याचे धोरण सरकारने अवलंबिले. त्यानंतरच्या वसंतराव नाईकांपासूनच्या सरकारांचा 'मुंबईला ओरबडून खाणे' हा एक कलमी कार्यक्रम होता की काय, अशी बळकट शंका येते. बरे, मुंबईतील अर्थकारण परप्रांतीयांच्या मुठीत राहिले

तरच हा कार्यक्रम राबवणे सोपे जाणार होते. वसंतराव नाईकांनी 'बॅक बे रेक्लमेशन'च्या प्रकल्पातून काँग्रेसपक्षासाठी (व बहुधा स्वतःसाठीही) बक्कळ पैसा केला अशी बोलवा होती. तेव्हापासून सुरुवात होऊन शरद पवारांच्या काळात 'भूखंडाचे श्रीखंड' ओरपण्यापर्यंत मृणाल गोऱ्यांच्या शब्दात सांगायचे तर 'मुंबई ओरबाडून खाणे' अव्याहत चालू आहे. मुंबईतील मराठी माणूस या सगळ्या दुष्टचक्रात उपेक्षितच राहिला.

मुंबईतील इंग्रजी वृत्तपत्रे व अभिजनप्रिय मराठी वर्तमानपत्रे यांनी शिवसेनेला सुरुवातीपासून विरोध केला व शिवसेनेने राजकारणात आणलेल्या झुंड-शाहीचा निषेध केला. पण मुंबईतील मराठी माणसाच्या मनातली अस्वस्थता, निराधारतेची भावना व त्याला वाटणारी असुरक्षितता यांच्यामुळे शिवसेना वाढते आहे, याची गंभीर दखल या वृत्तपत्रांनी कधी घेतली नाही. या असुरक्षिततेतून एक प्रकारचा भाबडेपणा मुंबईतील मराठी लोकांच्या आचार-विचारात आलेला दिसतो, त्याचाच उपहास करण्यात विचारवंतांनी धन्यता मानली. मराठी लोकांचा मानभंग करण्याची कोणतीही संधी इंग्रजी वर्तमानपत्रे सोडत नसत. पण मराठी विचारवंतांनी याचा काहीच प्रतिकार केला नाही. याचे साधे उदाहरण म्हणजे शहराचे 'बॉम्बे' हे अधिकृत नाव बदलून 'मुंबई' हे पारंपरिक देशी नाव देण्याची मागणी झाली तेव्हाच्या विवादाचे, टाईम्स, इंडियन एक्स्प्रेस या इंग्रजी वर्तमानपत्रांनी या मागणीला जबरदस्त विरोध केला. 'बॉम्बे' हे नाव बदलून 'मुंबई' हे नाव दिले तर जगाच्या अर्थकारणात असलेले शहराचे महत्त्व लयाला जाईल असा लेख नानी पालखीवाला यांच्या सारख्या एरवी सुजाण असणाऱ्या मनुष्याने लिहिला! कोण्याही काँग्रेसपक्षीय राज्यसरकारांची ही हिम्मत झाली नव्हती की, 'बॉम्बे' हे नाव बदलून 'मुंबई' हे नाव करून घेण्याचा ठराव विधानसभेपुढे मांडावा. हे काम युतीच्या कार्यकाळात झाले व त्यावेळी केंद्रात काँग्रेसचे सरकार असूनही त्याला मान्यता मिळाली.

महाराष्ट्राच्या स्थापनेपासूनच शहरे विरुद्ध ग्रामीण भाग अशी स्पर्धा राज्यकर्ते खेळवीत आले आहेत. शेतीला पाणी पुरवायचे की शहरांना पाणीपुरवठा करावयाचा असा प्रश्न आला की, शहरातील लोकांनी दोनदा स्नान करण्याची सवय सोडावी असा कुत्सित उपदेश करावयाचा; नगरातील झोपडपट्ट्या हटवायचा प्रश्न आला व खर्चाची तरतूद करायची ठरली की संपूर्ण ग्रामीण भाग हीच एक झोपडपट्टी आहे असा मुद्दा मांडावयाचा; मतदारसंघांची पुनर्रचना करताना शहरी मतदार-संघांची संख्या वाढते आहे, असे दिसले की, दर डोई एक मत ही व्यवस्था बरोबर नाही, ग्रामीण मतदाराच्या मताला जास्त वजन (?) दिले पाहिजे, अशी मागणी करायची अशा नाना खेळ्यातून हे द्वंद्व लोकांपुढे येत असते. महाराष्ट्राचे तिसरे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची भूमिका होती की, आमचे सरकार हे ग्रामीण जनतेच्या मतांवर निवडून आलेले सरकार आहे. शहरी वृत्तपत्रे आणि पांढरपेशे विरोधक आमच्याविषयी काय बोलतात याची आम्हाला पर्वा नाही. विजय तेंडुलकर यांना दिलेल्या मुलाखतीत नाईकांनी आपले विचार विशद केले होते. तेंडुलकरांनी लिहिले आहे की, रात्री उशीरापर्यंत नाईकांच्या भोवती मुंबईतील (परप्रांतीय) व्यापाऱ्यांचा व उद्योगपतींचा गराडा पडला होता. त्या सर्वांचे 'समाधान' केल्यानंतर रात्री फार उशिरा त्यांनी तेंडुलकरांना मुलाखत दिली. तेंडुलकरांनी लिहिले आहे त्यावरून नाईकांची अशी धारणा होती की, राजकारणाची प्रचलित मानके (नॉर्म्स) शहरी पत्रकार व अभिजनवर्ग यांनी घालून दिलेली आहेत व आमच्यासारख्या, ग्रामीण नेतृत्वाने त्या मर्यादा पाळल्याच पाहिजेत असे नाही. गेल्या दहा वर्षात नागरीकरणामुळे परिस्थितीत खूप बदल झाला आहे. बहुतेक ग्रामीण नेत्यांनी शहरात हातपाय पसरले आहेत. त्यांच्या परिवारातील माणसे शहरात बांधकाम-उद्योग घालून बसली आहेत, चित्रपटाच्या झगमगाटी फंदात पडण्याची हौस ती माणसे भागवून घेतात, वाहतूक-उद्योग किंवा शिक्षण-संस्था यांच्या सारखी लवकर किफायत देणारी क्षेत्रे त्यांना हाकारीत असतात. त्यामुळे शहरी विरुद्ध ग्रामीण या द्वंद्वातला विस्तार कमी झाला असला तरी गरज पडेल तेव्हा हे द्वैत पुढे करायला हे इरसाल नेते कमी करत नाहीत.

दोन हजार सालानंतर जी आघाडी सरकारे आली त्यांनी सातत्याने असे धोरण स्वीकारले की, मुंबई या महानगराची जबाबदारी केंद्र सरकारची आहे. मेट्रो रेल्वे

अनुक्रमणिका

असो, स्कायवॉक असो की, समुद्रसेतू असो त्यातील खर्चाचा सर्व (किंवा मोठा) भार केंद्र सरकारने उचलला पाहिजे. मुंबई महानगरपालिकेला त्यात नगण्य स्थान असते. सध्याची केंद्र सरकारे अनेक पक्षांची मोट बांधून तयार झालेली असल्याने ती राज्यसरकारांना काबूत ठेवू शकत नाहीत. पण जर एकपक्षीय प्रबळ सरकार केंद्रात आले, तर ते साहजिकच असा मुद्दा काढील की, शहरावर केंद्राकडून इतकी मोठी रक्कम खर्च होत असेल, तर त्या विकास-प्रकल्पांवर केंद्र-सरकारचे नियंत्रण असले पाहिजे. क्रमा-क्रमाने मुंबईवरचा अंमल केंद्रसरकारकडे जाईल व एक दिवस अचानक आपल्या ध्यानात येईल की, मुंबई केंद्रशासित झाली आहे. मुंबईतील मराठी माणसाने जवाहरलाल नेहरुंसारख्या अनभिषिक्त सम्राटाने घेतलेल्या, मुंबई केंद्रशासित करण्याच्या, अपरिवर्तनीय निर्णयाला कडाडून विरोध केला होता व त्यासाठी स्वतःचे रक्त अक्षरशः सांडले होते याची आठवणही कोणाला उरलेली नसेल.

(२)

महाराष्ट्राची स्थापना होऊ घातली होती त्या सुमारास ग. त्र्यं. माडखोलकरांनी 'महाराष्ट्र हे मराठा राज्य होणार की मराठी राज्य होणार !' असा प्रश्न उपस्थित केला. गांधी-हत्येनंतर झालेल्या जाळपोळीची आठवण ब्राह्मण विसरले नव्हते. खुद्द माडखोलकरही त्यात होरपळून निघाले होते. (हाडाचे लेखक असल्याने त्यांनी त्यानंतर लगेचच 'एका निर्वासिताची कहाणी' हे पुस्तक लिहून आपली व्यथा मांडली होती.) महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर लगेचच यशवंतराव चव्हाण यांनी राज्यपाल श्रीप्रकाश यांच्या अध्यक्षतेखाली 'वसंत व्याख्यानमाले'त पुण्याला व्याख्यान दिले. जाती-जातीतील तेढ ही प्रत्येकाच्याच मनात घर करून राहिली आहे, असे सांगून चव्हाणांनी आपणही या भावनेपासून मुक्त नाही, असे प्रांजळपणे मान्य केले. नंतर त्यांनी आश्वासन दिले की, 'मी असेपर्यंत महाराष्ट्र हे मराठी राज्यच राहील, मराठा राज्य होणार नाही.' (त्यानंतर दीड वर्षाने त्यांनी महाराष्ट्र सोडला व ते केंद्र-सरकारात गेले.) जाळपोळीत ज्यांची घरे जळली होती अशा ब्राह्मणांना (१९४८ साली) तेव्हाच्या मुंबई सरकारने पुनर्वसनासाठी कर्जे दिली होती. 'सरकारची कर्जे फेडायची नसतात' असा विचार तेव्हा रुजला नव्हता. त्यामुळे बऱ्याच जळितग्रस्त ब्राह्मणांनी कर्जे फेडली होती. जे ब्राह्मण अजूनही कर्जात होते त्यांची कर्जे यशवंतरावांनी माफ केली व एक कडवट भाग संपविला.

मराठी भाषिकांचे राज्य निर्माण झाले, तर तीमध्ये मराठा ही जात फार मोठ्या संख्येने असणार याची भीती अनेकांना वाटत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध होता व मराठी भाषिकांची तीन राज्ये व्हावीत असे त्यांचे मत होते याचे एक कारण होऊ घातलेल्या महाराष्ट्रात संख्येच्या बळावर मराठा जात राज्यावर येईल हेही होते. आंध्रात रेड्डी ही जात मोठ्या संख्येने होती; पण तेलंगणासकट आंध्र निर्माण झाला तेव्हा रेड्डींची टक्केवारी कमी झाली. कर्नाटकात लिंगायत संख्येने सर्वाधिक होते; पण म्हैसूरसकट कन्नडिगांचे एक राज्य झाले तेव्हा लिंगायतांची टक्केवारी कमीच झाली. महाराष्ट्रातील तीन विभाग एकत्र आल्यावर मात्र एकूण संख्येत मराठ्यांची टक्केवारी काही प्रमाणात वाढलीच. होऊ घातलेल्या महाराष्ट्राची लोकसंख्या तीन कोटी दहा लाख होती व तीमध्ये मराठ्यांची संख्या एक कोटी, एक लाख, पन्नास हजार असणार होती. साहजिकच ब्राह्मण, माळी, धनगर अशा अल्पसंख्यांक जातींना मराठ्यांपासून धास्ती वाटावी अशी स्थिती होती.

महाराष्ट्रातील एक पुरोगामी परंतु डावे नसलेले विचारवंत प्रा. अ. भि. शहा यांनी मे १९६० च्या 'नवभारता'त 'नवीन महाराष्ट्राचे राजकारण' या शीर्षकाचा लेख लिहून 'ब्राह्मणांचे काय होणार !' हा प्रश्न विचारासाठी घेतला. त्यानंतर या विषयावर आणखी लेखही आले. पण आपण येथे शहांच्या लेखाचाच विचार करू. शहांचे निरीक्षण असे होते की, ब्राह्मणी वर्चस्वाचा अभिमान बाळगणारे ब्राह्मण व ब्राह्मणी वर्चस्वांची खंत बाळगणारे ब्राह्मण अशा ब्राह्मणातील दोन्ही गटांना ब्राह्मणांचे वर्चस्व आता संपणार व मराठ्यांची चढती कमान राहणार हे पटले आहे. 'ब्राह्मण म्हणजे नवीन महाराष्ट्राचे ज्यू अशी खात्री दोन्ही प्रकारच्या लोकांना वाटत आहे.'

नव्या परिस्थितीत ब्राह्मण व मराठा या जाती कशा वागतील याबद्दलची दोन-तीन कल्पनाचित्रे (सिनारियोज्)

शहांनी रंगविली होती. एक, मराठा समाज काँग्रेसबरोबर राहील. काँग्रेसने समाजवादाचा स्वीकार केला असला, तरी काँग्रेसचा समाजवाद मवाळच राहील. अशा वेळी जहाल समाजवादाचा आग्रह धरून ब्राह्मण वंचित जातींना बरोबर घेतील व काँग्रेसविरोधी (म्हणजेच मराठ्यांच्या विरोधात) आघाडी तयार करतील. दुसरे कल्पनाचित्र हे पहिल्या अंदाजाचेच अधिक गडद रूप होते. मराठा समाजाला आपल्या वर्चस्वाची नशा चढून ब्राह्मण-द्वेषाला ऊत येईल व ब्राह्मण लोकशाही-समाजवादाच्या पलीकडे जाऊन कम्युनिस्ट होतील. लोकशाही व वर्गसंघर्ष यांच्या आवरणाखाली जाती-जातीतील संघर्ष आणखी तीव्र होईल. अधिक समजुतदारपणाचा तिसरा पर्याय हा की, ब्राह्मणांवर सूड घेण्याची इच्छा बाजूला ठेवून मराठा समाज मागास-वर्गीय व अल्पसंख्यांक जातींना नाना प्रकारच्या सवलती देईल. या सवलती देतानाच अशी काळजी घेतली जाईल की, या सवलती देण्यामागील हेतू ब्राह्मणांचे उच्चाटन करण्याचा नाही तर मागास जातींना पुढारलेल्या जातींच्या बरोबर आणण्यासाठी या सवलती दिल्या आहेत अशी ब्राह्मणांची खात्री पटावी. शहांनी अशी आशा व्यक्त केली होती की, 'मुंबईच्या बहुरंगी व सामर्थ्यवान संस्कृतीचा अंकुश महाराष्ट्रावर वर्चस्व गाजविणाऱ्या जातीच्या जाती-यतेवर राहील'; व त्यामुळे हा तिसरा पर्यायच प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे.

या तीन कल्पनाचित्रांपैकी एकही थोड्याश्या अंशाने देखील प्रत्यक्षात उतरले नाही, हे स्पष्टच आहे. असे असतानाही मी शहांचा हा लेख विचारात घेण्याचे कारण असे की, तेथून सुरुवात करून आपल्याला महाराष्ट्रातील राजकारणाचे सूत्रबद्ध विश्लेषण करता येते. येथे सुरुवाती-लाच एक नोंद घेतलेली बरी की, शहांच्या पहिल्या कल्पनाचित्रातील 'ब्राह्मण जहाल समाजवादाचा आग्रह धरून वंचित जातींना बरोबर घेतील' हा भाग प्रत्यक्षात आणण्याचा क्षीणसा प्रयत्न 'युवक क्रांतिदला'च्या रूपाने साठीच्या दशकाच्या उत्तरार्धात झाला. काही ब्राह्मण तरु-णांनी 'दलित पँथर्स' या मागासवर्गीयांच्या संघटनेशी सहकार्य करून 'मूलगामी क्रांती'ची भाषा चालविली होती. पण ती कथा अगदीच दुर्लक्षणीय ठरली.

शहांची कल्पनाचित्रे कल्पनेतच राहिली याचे पहिले कारण असे. त्यांनी हे गृहीत धरले की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला महाराष्ट्रातील राजकारणापुरती स्वायत्तता अखिल भारतीय (अ. भा.) काँग्रेसकडून मिळेल. पंतप्रधान नेहरुंचे धोरण तशी स्वायत्तता देण्यास अनुकूल होतेही. (उत्तर प्रदेशात मात्र नेहरु आपल्या हस्तकांकरवी वारंवार ढवळाढवळ करीत.) पण इंदिरा गांधींना कोणत्याही राज्यात कुणाचे नेतृत्व स्थिरावू द्यायचेच नव्हते. त्यामुळे 'बहुजनसमाज' व 'बेरजेचे राजकारण' या परवलीच्या शब्दांचा उपयोग करून व मराठा समाजाची एकसंध फळी काँग्रेसमध्ये उभी करून यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्र काँग्रेसची जी चिरेबंद बांधणी केली होती ती श्रीमती गांधींनी १९७२-७३ सालापर्यंत उखडून टाकली. (ती इथपर्यंत की, कोल्हापूर जिल्हा काँग्रेस समितीच्या अध्यक्षपदी त्यांनी 'भिडे' नावाच्या एका ब्राह्मणाला बस-वले.) यशवंतराव चव्हाणांनंतर वसंतदादा पाटील, शरद पवार यांच्यासारखे खंदे मराठा नेते झाले, पण कोणाच्याच मागे मराठा समाज एकवट गेला नाही. १९९९ च्या निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे ३५ मराठा आमदार निवडून आले खरे, पण त्याच निवडणुकीत शिवसेनेकडून ३१ मराठा आमदार निवडून आले होते यावरून मराठा जातीतील राजकीय फाटाफूट दिसून येते.

शहांचे दुसरे गृहीतक असे असावे की, ब्राह्मण जात राजकारणातील आपले स्थान टिकवून धरण्याचे शर्थीने प्रयत्न करील. पण तसेही झाले नाही. याचे पहिले कारण असे की, राजकारणाचे स्वरूपच फार बदलले. कोणाही मनुष्यास राजकारणात स्थिर राहावयाचे असेल व उंचीवर पोचायचे असेल तर मोठी जमीयत (अनुयायांचा मेळावा) बाळगावी लागते व त्यासाठी पाण्या-सारखा पैसा खर्च करावा लागतो. यासाठी त्या राजकीय नेत्याला घसघशीत पाठबळ कुटुंबाकडून मिळावे लागते. ब्राह्मणातील एकत्र कुटुंब-पद्धती स्वातंत्र्यानंतर संपलीच. कुळकायद्याने जमिनी गेल्याने ग्रामीण भागातील त्यांचा आधार गेला. ७० सालानंतर कुटुंबनियोजनांचा अवलंब केल्याने दर पिढीला एक किंवा जास्तीत जास्त दोनच मुले जन्माला येऊ लागली व राजकारणातील हालचालींना उपयोगी पडेल अशी कौटुंबिक स्थिती राहिली नाही.

ब्राह्मणांना इतर जातींनी राजकारणातून बाहेर काढले हे सर्वस्वी खरे नाही; त्याप्रमाणे ब्राह्मणांनी स्वतःला राजकारणापासून ठरवून दूर ठेवले हेही पूर्ण सत्य नाही. ब्राह्मणांची जीवनशैली व राजकारणाने धारण केलेले नवे रूप यांची सांगड बसत नाही हाही ब्राह्मण राजकारणात दिसत नाहीत यामागील एक घटक आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात तृणमूल स्तरावर काम सुरू करून माणसे राजकारणात आघाडीवर पोचू शकत. न. वि. (काका) गाडगीळ, शंकरराव देव, एस्. एम्. जोशी इ. ब्राह्मण पुढारी याप्रमाणे केंद्रीय स्तरावर पोचले. पण ७० सालच्या आसपास अशी स्थिती आली की, उच्चपदस्थ नेता कोणालाही राजकारणात उचलून वर नेऊ लागला. बर्वे, मोहन धारिया, जनरल थोरात, विठ्ठलराव गाडगीळ यांचा केंद्रीय राजकारणात आपल्याला उपयोग होईल या अपेक्षेने यशवंतराव चव्हाणांनी त्यांना ६२ व ६७ सालच्या निवडणुकात उमेदवारी दिली. (धारिया हे राज्यसभेवर पाठविले गेले.) इंदिरा गांधींचा आश्रय धरून जयंतराव टिळक, वसंत साठे, अंतुले अशी माणसे राजकारणात तग धरून राहिली. ग्रामीण किंवा शहरी भागात लोक–कल्याणकारी कामे करून नेतृत्वाच्या पायऱ्या चढत जाण्याचा राजमार्ग वर सांगितल्याप्रमाणे ब्राह्मणांना आता उपलब्ध राहिलेला नाही.

मुंबईतील सामर्थ्यशील विविधरंगी संस्कृती (कॉस्मॉपॉलिटन कल्चर) महाराष्ट्रातील जातिद्वेषावर अंकुश ठेवील, हा शहांचा विचार हे केवळ स्वप्नरंजनच होते. एक तर मुंबईचे महाराष्ट्राशी एकरूपत्व मराठी राज्यकर्त्यांनी कधी होऊच दिले नाही. परप्रांतीय भांडवलदारांचा अनुनय करायचा व मुंबईतील मराठी माणसाची उपेक्षा करायची असाच राज्यकर्त्यांचा खाक्या होता. दुसरे, मुंबईत विविधरंगी–म्हणजे कॉस्मॉपॉलिटन-संस्कृती होती अथवा आहे, ही स्वतःची फसवणूक करणारी समजूत आहे. मुंबईत मराठी, गुजराती, पारशी, सिंधी, उत्तर हिंदुस्थानी समाज परस्परांच्या शेजारी वस्ती करून स्वतंत्रपणे राहातात ही वस्तुस्थिती आहे. तिसरे असे की, जरी मुंबईत विविधरंगी बलवान संस्कृती आहे असे मानले तरी तिचा प्रभाव महाराष्ट्रासारख्या विस्तारलेल्या राज्यात सर्वदूर पसरणे शक्य नाही. महाराष्ट्रात जाति–जातीतील संघर्षाचा मोठा उद्रेक मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्ताराच्या निमित्ताने १९७८ साली मराठवाड्यात झाला. त्या वेळी मुंबईच्या संस्कृतीचा अंकुश काही उपयोगाला आला, असे दिसले नाही. खुद्द मुंबईत बाबरी–मशिदीच्या प्रकरणानंतर आणि १९९३ सालच्या बॉम्बस्फोटानंतर मोठ्या प्रमाणावर हिंदु-मुसलमानांचे दंगे झाले. त्या वेळीही बहुरंगी संस्कृतीने काही मदत केली असा अनुभव नाही.

गोष्ट अशी आहे की, महाराष्ट्रात जाती–जातीत दुरावा व द्वेषही आहे. पण त्याच बरोबर आर्थिक विकासाच्या संधी–इतर राज्यांच्या मानाने–मुबलक असल्याने हा दुरावा व द्वेष यांचे वैरात रूपांतर झाले नाही. १९९० सालानंतर खासगीकरण व औद्योगिकरण (यातील कित्येक बाबी टीकेचा विषय झाल्या असल्या तरी) यांच्या मुळे महत्त्वाकांक्षी मनुष्याला आपला पराक्रम दाखविण्यास अनेक क्षेत्रे मोकळी झाली आहेत. त्यामुळे कुणाला हुसकावून लावून मगच आपण पुढे जाऊ शकतो, अशी स्थिती उरली नाही. साहजिकच जातिद्वेषाचा रोग संपुष्टात येणार असे दिसते. काही राजकीय पक्ष स्वतःच्या पदरी सेना व ब्रिगेड्स् बाळगून काही मर्यादेपर्यंत जातीय भावनांना चेतावत असतात; पण ती तात्कालिक गोष्ट झाली.

(३)

महाराष्ट्रातील शिक्षण हा खरे तर सर्वात काळजीचा विषय झाला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, शाळा आहेत, शिक्षक आहेत, त्यांच्यावर सरकारी व खासगी पैसाही खर्च होतो आहे. पण शिक्षण मात्र नाही. पुण्यात 'महाराष्ट्र गुणवत्ता शोध' नावाची संस्था दर वर्षी ८ वी व ९ वीतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी परीक्षा घेते. या परीक्षेत ज्यांना वरच्या दर्जाचे गुण मिळतात अशा विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन त्यातून ज्यांना बक्षिसे/शिष्यवृत्त्या द्यावयाच्या अशा विद्यार्थ्यांची निवड होते. गेली सोळा वर्षे मी या मुलाखती घेण्यासाठी ग्रामीण भागात जातो व दरवेळी शंभराहून अधिक विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतो. त्यातून माझ्या ध्यानात आले आहे की, बहुतेक मुले अभ्यासाच्या मूलभूत शिस्तीलाही पारखी झालेली असतात. त्यांना अनोळखी कविता वाचायला दिली तर ती त्यांना सुस्पष्टपणे वाचताही येत नाही;

अर्थ सांगणे दूरच राहिले. गणित या विषयाची त्यांनी धास्ती घेतलेली असते; त्यातही बीजगणित या भागाशी त्यांची थोडी-फार ओळख असते, पण भूमिती त्यांना अजिबात येत नाही. अभ्यासेतर वाचन-त्यातही कविता, नाटके, वैचारिक पुस्तके यांचे वाचन-बंद पडले आहे. बहुतेक मुले 'मृत्युंजय' व 'श्यामची आई' ही पुस्तके वाचल्याचे सांगतात पण त्या पुस्तकांवर तपशिलात जाऊन प्रश्न विचारले तर ध्यानात येते की, त्यांनी ही पुस्तके संपूर्ण वाचलेली नाहीत तर क्रमिक पुस्तकातून जे उतारे घेतलेले आहेत, तेवढेच वाचले आहेत. त्यांच्या दिनक्रमाविषयी चौकशी केल्यावर कळते की, शिकवणीवर्ग (क्लास), शाळा व गृहपाठ यांच्या चक्रात ही मुले अशी पिचून निघत असतात की, अवांतर वाचन करण्यासाठीची स्वस्थताच त्यांना मिळत नाही. अर्थात्, दरवर्षी जी शंभर मुले भेटतात त्यात चार-पाच मुले अशी नक्कीच असतात की, त्यांना गणिते व कोडी सोडविण्याची ईर्षा असते, त्यांनी कविता वाचलेल्या असतात, 'श्यामची आई' किंवा 'मृत्युंजय' यांच्या पलिकडे जाऊन त्यांनी जयंत नारळीकर यांच्या विज्ञानकथा किंवा कुसुमाग्रजांच्या कविता वाचलेल्या असतात. मग एकदम अंधाऱ्या खोलीची खिडकी उघडावी तसे वाटते.

'उच्च माध्यमिक शाळा' किंवा 'कनिष्ठ महाविद्यालये – म्हणजे अनौपचारिक भाषेत ११ वी ते १२ वीचे वर्ग-ही तर शिक्षण व्यवस्थेवर वाढलेली बांडगुळे आहेत. या अभ्यासक्रमांसाठी मुले नावे नोंदवितात ती 'या शाळेत (किंवा महाविद्यालयात) गैरहजर राहून मी दोन वर्षे काढली' असे सांगता यावे, इतक्यासाठीच. 'शिक्षण-आयोगा'ने ज्याला नेहमीच्या 'मराठी'त 'कोठारी कमिशन' म्हणतात – 'उच्च माध्यमिक शाळा' स्थापन झाल्या पाहिजेत ही महत्त्वाची सूचना केली होती. ती करण्यात दोन उद्देश होते. एक, विद्यार्थ्यांनी पुरेशा मोठ्या वयात महाविद्यालयात प्रवेश घ्यावा; कारण महाविद्यालयात त्यांना स्वेच्छेने व स्वतंत्रपणे अभ्यास करावयाचा असतो. दोन, उच्च माध्यमिक शाळात व्यावसायिक शिक्षणावर भर देण्यात यावा. म्हणजे, 'उच्च माध्यमिक परीक्षा' झाल्यावर बहुतेक मुले व्यवसायाला लागतील व उच्च अभ्यासाची ज्यांना खरीखुरी आकांक्षा आहे अशीच मुले महाविद्यालयात प्रवेश घेतील. 'शिक्षण आयोगा'चे असे निरीक्षण होते की, शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्यापैकी फार मोठ्या हिश्श्याने विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेतात व निरुपयोगी पदवीच्या मागे लागतात.

महाराष्ट्रात १० + २ + ३ हा आकृतिबंध – म्हणजे उच्च माध्यमिक विद्यालये (उमवि) वा कनिष्ठ महाविद्यालये (क. म.) – १९७५ साली अंमलात आला. पण शिक्षण-आयोगाच्या सूचनेत जी महत्त्वाची तरतूद होती की 'उमवि' किंवा 'कम' ही स्वतंत्र असावीत, ती मात्र शिक्षण खात्याने स्वीकारली नाही. परिणामतः उमवि हा वेगळा टप्पा काढण्यामागील दोन्ही उद्दिष्टे गाभटून गेली. ना व्यावसायिक अभ्यासक्रमांचा विकास झाला; ना विद्यार्थ्यांचा योग्य तो शालीन प्रतिपाळ घडून आला. अभियांत्रिकी अगर वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळविण्याची स्पर्धा परीक्षा म्हणून उच्च माध्यमिक (विज्ञान) परीक्षेकडे पाहिले जाऊ लागले; तर कला व वाणिज्य शाखातील विद्यार्थ्यांची वैफल्यग्रस्त मानसिकता त्यांना झटून अभ्यास करण्यापासून परावृत्त करू लागली. बारावी (विज्ञान) परीक्षेत चांगले गुण मिळवायचे असतील तर शिकवणी-वर्गात गेलेच पाहिजे, मग त्यासाठी 'उमावि'-तील औपचारिक वर्ग बुडवावेत अशी प्रवृत्ती झाली. त्यावर उपाय म्हणून काही 'उमावि'नी औपचारिक वर्गांचेच शिकवणी-वर्गात परिवर्तन केले! मी लातूरच्या एका प्रसिद्ध 'उमावि'च्या मुख्याध्यापकांशी बोलत होतो. ते सांगत होते, "आमच्याकडील रीतसर नेमलेल्या 'उमावि' शिक्षकांना आम्ही वर्गाकडे फिरकूच देत नाही. त्यांना सांगतो की, 'तुमचा पगार खात्यावर जमा होईल.' आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी ठिक-ठिकाणाहून नामांकित शिक्षक आणवतो. भौतिकीतील 'ध्वनी' हा भाग शिकवायला हैद्राबादहून शिक्षक येतो व चार दिवसात आपला विषय शिकवून जातो. तीच गोष्ट 'विद्युत्-चुंबकीय' या भागाची. त्यासाठी चेन्नईहून शिक्षक येतो. सहा दिवस शिकवतो व जातो." मी म्हणालो की, "या शिक्षकांना भरपूर पैसे द्यावे लागत असणार. ते तुम्ही कोठून आणता?" "त्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांकडून वेगळे शुल्क घेतो", मुख्याध्यापक म्हणाले.

अनेक जाणकारांनी वेगळा उपदेश केलेला असूनही

महाराष्ट्रीय पालक व होतकरू विद्यार्थी अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणासाठी जीव का टाकत असतात व थक्क करून सोडणाऱ्या रकमा का खर्चीत असतात? याला कारण असे आहे की, इतिहास, संगीत, गणित, मूलभूत शास्त्रे किंवा भाषाविषय अगर विधि-विद्या यात तुम्ही असाधारण उत्कृष्टता (एक्सलन्स) मिळविली तरच तुम्हाला पैसा व समाधान मिळू शकते. क्रिकेटपटूंना चांगला पैसा व प्रसिद्धी मिळते हे खरे; पण ती आंतर-राष्ट्रीय सामन्यात उतरण्या इतकी गुणवत्ता क्रिकेटपटूंच्या ठिकाणी असेल तरच. रणजी-ट्रॉफी-पर्यंतच पोचणाऱ्या खेळाडूची काय स्थिती असते? तो कुणाच्या खिजगणतीतही नसतो. याउलट अभियांत्रिकीतील काही शाखा व वैद्यक-शास्त्र यात तुम्ही सर्वसाधारण प्राविण्य प्राप्त केले तरी तुम्हाला चांगले पैसे व व्यावसायिक समाधान लाभते. इतिहास, तत्त्वज्ञान किंवा मूलभूत विज्ञाने यांच्यात विद्या-शाखा म्हणून काही कमतरता आहेत आणि अभियांत्रिकी व वैद्यकशास्त्र यांच्या ठिकाणी विद्याशाखा या दृष्टीने काही महत्ता आहे, अशातला भाग नाही. निरनिराळ्या विद्याशाखातील उच्च-नीचता ही अर्थकारणातील त्या त्या काळच्या वातावरणावर अवलंबून असते. जर अर्थ-व्यवस्था सक्षम, समृद्ध व विस्तार पावणारी असेल तर कोणत्याही विषयाचा सर्व-साधारण अभ्यास झालेल्या मनुष्याला चांगले काम मिळू शकते. आपण नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून अर्थव्यवस्था विस्तार पावू लागली आहे व त्याचे परिणाम शिक्षणक्षेत्रात व प्राप्त विद्येच्या उपयोगावरही झालेले दिसत आहेत. माझ्या एका मित्राने स्वतःचा रसायन-निर्मितीचा किफायतशीर व्यवसाय सोडून इतिहासाचे अध्ययन सुरू केले. इतिहासात विद्यावाचस्पती ही पदवी मिळविली. मग त्याने उद्योग-व्यापार-क्षेत्रातील नामांकित कुलांचे इतिहास लिहिण्याची कामे घेण्यास सुरुवात केली. आता तो त्याच्या मूळ रसायननिर्मितीच्या व्यवसायात मिळत असे तितका पैसा मिळवीत आहे!

स्वातंत्र्यापासून इंदिरा गांधींच्या मृत्यूपर्यंत आर्थिक व्यवहारावर सरकारचे कडक नियंत्रण होते. त्यामुळे शैक्षणिक क्षेत्रातही नव्या वाटा चोखाळल्या जात नव्हत्या. अभियांत्रिकी व वैद्यक या विषयात खासगी विनाअनुदानित महाविद्यालये नव्हती. महाराष्ट्र सरकारचा भर पारंपरिक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये तालुका पातळीवर पोचावीत यावर होता. १९५८ साली त्या वेळच्या द्विभाषिक राज्याच्या सरकारने आर्थिक-मागास (इकॉनॉमिकली बॅकवर्ड) कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत द्यायला सुरुवात केली. परिणाम असा झाला की, १९६५ साली हे आर्थिक-मागास विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षणाची मागणी करू लागले. त्या वर्षी महाराष्ट्रात अनुदान-तत्त्वावर नवी ५९ महाविद्यालये निर्माण झाली. या महाविद्यालयात शिकविण्यासाठी प्राध्यापक कोठून मिळ-वायचे, हा प्रश्न निर्माण झाला. पदव्युत्तर शिक्षण घेतलेले नवथर तरुण, ज्येष्ठ गुरूंकडे कोणतीही शागिर्दी (अॅप्रें-टिसशिप) न करता, नवीन महाविद्यालयात एकदम विभाग-प्रमुख झाले! हे विभाग-प्रमुख विद्यापीठांच्या अभ्यास मंडळावर आले, प्रश्नपत्रिका काढू लागले, उत्तर-पत्रिका तपासू लागले, आपले विद्यार्थी, उत्तीर्ण व्हावेत यासाठी आडमार्गांचा अवलंब करू लागले. त्यानंत-रही नवीन महाविद्यालयांची उपज वाढतच गेली व अर्धे-कच्चे प्राध्यापक त्या त्या पंचक्रोशीत आपल्या विष-याचे प्रकांड पंडित म्हणून वावरू लागले. परिणाम व्हायचा तोच झाला. तो असा की, कागदोपत्री अभ्यासक्रम परदेशातील उत्तमोत्तम विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांशी तुल-नीय दिसे; पण विद्यार्थ्यांपर्यंत त्यातील अगदीच थोडा भाग पोचे.

सरकार स्वतः नवी अभियांत्रिकी व वैद्यकीय महा-विद्यालये काढत नव्हते व समाजात तर हे शिक्षण आपल्या मुलांना मिळाले पाहिजे अशी जबरदस्त मागणी होती. या अडचणीला उत्तर म्हणून 'ज्ञानेश्वर विद्यापीठ' व 'कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट' या संस्थांनी आपले अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू केले. त्या अभ्यासक्रमांना अधिकृत विद्यापीठांची वा (काही अभ्यासक्रम वगळता) सरकारचीही मान्यता नव्हती. तरी अनेक विद्यार्थी हे अभ्यासक्रम शिकून खासगी कारखान्यात नोकरीला लागत होते. श्रीमंत कुटुंबातील मुले कर्नाटकातील खासगी अभि-यांत्रिकी महाविद्यालयात जादा शुल्क देऊन जात होती. या अनुभवामुळे १९८३ साली महाराष्ट्र सरकारने महा-राष्ट्रातही खासगी संस्थांना विना-अनुदान तत्त्वावर अभि-यांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यास परवा-

नगी दिली. अनेक राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःची महाविद्यालये सुरू केली. १९८७-८८ साली या महाविद्यालयांची अगदीच दयनीय अवस्था होती. त्या वर्षी अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पुणे विद्यापीठात धरणे धरून मागणी केली होती की, "सर्व विषयात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना देखील वरच्या वर्गात जाऊ द्यावे." यातील काही विद्यार्थी त्यांच्या मागणीपत्रावर माझी सही घ्यावयास आले, तेव्हा मी त्यांना म्हटले, "शिक्षणाची दिवाळखोरी जाहीर करणाऱ्या या पत्रावर मी सही करणार नाही." विद्यार्थी म्हणाले, "आमच्या कॉलेजात तुम्ही या आणि एका विषयात तरी पास होऊन दाखवा. आम्ही सर्व मागण्या मागे घेतो." मग ते सांगू लागले की, त्यांच्या वसतिगृहात फेब्रुवारीपासून नळाला पाणीच येत नाही. आठ-आठ दिवसात अंघोळ करता येत नाही. मार्चपासून खानदेशी उन्हाळा भाजून काढू लागतो. महाविद्यालयात अनेक विषयांना शिक्षक नाहीत. एखादा शिक्षक आलाच तर ८-१५ दिवस राहातो व निघून जातो. महाविद्यालय अशा कुग्रामात आहे की, तेथे ड्रॉइंग-पेपरही मिळत नाही.

मी मागणीपत्रावर सही केली नाही, पण त्यावेळचे कुलगुरु यांना ही हकीकत सांगितली. त्यावर त्यांनी विना-अनुदान-तत्त्वावरील महाविद्यालयांची पाहणी करण्यासाठी एक समिती नेमली; तिचा मी सदस्य होतो. आम्ही चार महिने निरनिराळ्या महाविद्यालयांना भेटी देत होतो. सर्व मिळून ६५ महाविद्यालये तपासली. अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षकांच्या अनेक जागा भरल्या नव्हत्या. एक महाविद्यालयात निवृत्त कार्यकारी अभियंत्यालाच (एक्झिक्युटिव्ह एंजिनियर), शिकविण्याचा कोणताही अनुभव नसताना, प्राचार्य म्हणून नेमले होते. कार्यशाळेत यंत्रसामग्री नव्हती. ग्रंथालयाचा पत्ता नव्हता. या महाविद्यालयांनी उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, केरळ अशा दूरदूरच्या राज्यातून आपले हस्तक पाठवून व इच्छुक विद्यार्थ्यांना भूलथापा देऊन गोळा करून आणले होते. या विद्यार्थ्यांनी राज्यवारीने ढाबे टाकून आपल्या पोटा-पाण्याची व्यवस्था केली होती. वैद्यकीय महाविद्यालयांची दुरवस्था याच प्रकारची होती. शिक्षक नव्हते, शरीर-रचना शिकण्यासाठी अतिशय जरुरीची अशी प्रेते मिळविण्याची व्यवस्था नव्हती, रुग्णालयात रुग्ण नव्हते. पारंपरिक विषयांच्या महाविद्यालयातून-म्हणजे विज्ञान-कला-वाणिज्य महाविद्यालयातून शिक्षकांची रीतसर भरती झाली नव्हती, त्यांना वेतन मिळत नव्हते, प्रयोगशाळात साधने नव्हती, ग्रंथालय असावे लागते याची माहितीच महाविद्यालयाच्या चालकांना नव्हती. विशेष म्हणजे या ठळक त्रुटी दिसत असतानाही विद्यापीठाने या महाविद्यालयांना संलग्न करून घेतले होते.

या गोष्टीला आता विसापेक्षा जास्त वर्षे होऊन गेली. शहरातील अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयात खूपच सुधारणा झाली असली तरी विद्यापीठ, सरकार व अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण मंडळाच्या (ए. आय्. सी. टी. ई) नियमांची सर्रास पायमल्ली अद्याप होते आहे. शिक्षकांना वेतन बहुतेक ठिकाणी व्यवस्थित मिळते; काही महाविद्यालयातून तर शिक्षक टिकावेत यासाठी नियत पगाराव्यतिरिक्त जादा भत्तेही दिले जातात. कारण या महाविद्यालयांना शुल्कवाढ करण्याची सवलत मिळाली आहे. मात्र विज्ञान-कला-वाणिज्य महाविद्यालयात अद्यापही शिक्षकांना पूर्णवेळ काम असतानाही तासावारीने पगार देणे, मान्यताप्राप्त शिक्षकांच्या वेतनातून खंडणी वसूल करणे, विद्यार्थ्यांकडून नाना सबबींवर पैसे उकळणे इत्यादी गैरप्रकार होतच असतात. त्यात आता तर जुन्या प्रतिष्ठित महाविद्यालयात अनेक विना-अनुदानित विभाग चालू करण्यात आले आहेत व त्या विभागातून शिक्षक व विद्यार्थ्यांची पिळवणूक होतच असते.

अर्थात शासनाचे अनुदान जिथे मिळते अशा महाविद्यालयातही स्थिती चांगली आहे, असे नाही. पगारापोटी अनुदान देणे सरकारला परवडेनासे झाले आहे. १९९८ पासून सुमारे १० वर्षे सरकारने खुल्या जागांवर शिक्षक नेमावयास बंदीच घातली होती! कोणी शिक्षक निवृत्त झाला अगर नोकरी सोडून गेला तर त्याच्या जागी तासावारीने (क्लॉक-अवर-बेसिस) शिक्षक नेमून काम चालवावे लागत होते. आता सरकारने ही नव्या भरतीवरची बंदी शिथिल करून खुल्या रिक्त जागांपैकी निम्म्या जागा भरण्यास परवानगी दिली आहे. परिणाम असा झाला आहे की, राज्यातील जुन्या नाणावलेल्या महाविद्यालयातून-व विद्यापीठातूनही-चाळीस टक्के शिक्षक तात्पुरते किंवा

अनुक्रमणिका

तासावारीने आहेत. बरे, महाविद्यालयांचे चालकही अनुदानित विभागांबाबत उदासीन झाले आहेत; विना अनुदानित विभाग हे किफायतशीर ठरत असल्याने अनुदानित विभागांची डोकेदुखी नकोच, असे त्यांना वाटते.

केंद्र शासनाच्या धोरणातही सुसंगती नाही. आपण पाहिले की, कोठारी आयोगाचा आग्रह होता की, शालेय शिक्षण संपविलेले विद्यार्थी फार मोठ्या संख्येने उच्च शिक्षण घेतात हे थांबविले पाहिजे. म्हणून + २ हा नवा टप्पा सुरू केला. व इथे विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण देऊन उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात येण्यापासून रोखावे अशी त्यांची सूचना होती. १९८६ साली केंद्र सरकारने 'नवी शिक्षण योजना' तयार केली. या योजनेचा असा रोख होता की इयत्ता ८ वी पासूनच व्यावसायिक शिक्षण (उदा. पर्यटन, सौंदर्य प्रसाधन, परिचर्या इ.) विद्यार्थ्यांना द्यावे. त्यामुळे १० वी उत्तीर्ण होताच विद्यार्थी निवडलेल्या व्यवसायात शिकाऊ उमेदवारी करू लागतील व + २ च्या टप्प्यातही येणार नाहीत. + २ च्या टप्प्यातून बाहेर पडलेले विद्यार्थी स्वतंत्र व्यवसाय करतील व फारच थोडे विद्यार्थी पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाकडे वळतील. खरी गोष्ट अशी होती की, या सर्व काळात महाविद्यालये वाढली, दर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या वाढली तरी संबंधित वयोगटातील एकूण तरुणांपैकी फक्त चार टक्के तरुण पदवीधर होत होते! आता अगदी अलिकडे (२००७ साली) सरकार सॅम पित्रोदा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यास-गटाला साक्षात्कार झाला की, फारच थोडे तरुण पदवीधर होत आहेत. पदवीधरांची संख्या दुप्पटीने वाढली पाहिजे. म्हणून, घाई-घाईने, २०१२ पर्यंत नवीन १६ केंद्रीय विद्यापीठे सुरू करावीत, स्वायत्त संस्थांची संख्या वाढवावी अशा सूचना करण्यात आल्या. या सगळ्या संस्थांना शिक्षक कोठून मिळणार हा प्रश्नच आहे.

सारांश, प्राथमिक शिक्षणापासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर महाराष्ट्रापुढे असंख्य प्रश्न आहेत. खरा प्रश्न चांगले शिक्षक कोठून आणावयाचे, त्यांना टिकवून कसे धरायचे व त्यांना अधिक प्रगल्भ कसे करत न्यायचे हा आहे. केवळ पगारवाढ करून किंवा सुविधा पुरवून चांगले शिक्षक निर्माण होतातच असे नाही. त्यासाठी शिक्षकांमध्ये त्यांच्या व्यवसायासंबंधी आत्मीयता निर्माण होईल व व्यवसाय-संतोष (जॉब सॅटिस्फॅक्शन) त्यांना मिळेल अशी व्यवस्था व्हावयास हवी. शैक्षणिक व्यवस्थापन हे अधिक संवादी व कल्पनासमृद्ध हवे. असे व्यवस्थापन खासगी संस्थांकडून मिळण्याची शक्यता जास्त आहे. सरकारी व्यवस्थापन हे नेहमीच केंद्रवर्ती व ताठर असते. इंग्रजांच्या काळापासून आजवर आपण नोकरशाहीने अंकित करून ठेवलेल्या शिक्षणाचा अनुभव घेतला आहे व तो फारसा उत्साहदायी नाही. खासगी विना अनुदानित शिक्षण संस्थांवर पालक संघाने चोख अंकुश ठेवला तर त्यातून काही चांगले घडण्याची शक्यता आहे.

(४)

भारताच्या स्वातंत्र्याला पन्नास वर्षे झाली तेव्हा 'भडाग्नी' नावाची कविता सुरेश भट यांनी लिहिली होती. त्यात हृदयाला घरे पाडणाऱ्या काही ओळी अशा होत्या.

"जन्मताच ह्या देशाचा माणूस निघे मेलेला!
चर्चाच कशाला त्याची? जो येण्या आधी गेला!
....
एकेक हरामी बनला देशाचा भाग्य-विधाता!
ह्या स्वातंत्र्याचा मुडदा मागतो भडाग्नी आता!"

अशीच ऊरबडवी कविता अशोक नायगावकर यांनी लिहिली होती.

"हे स्वातंत्र्या,
तुझा रक्तदाब,
तुझा मधुमेह,
अतिदक्षता विभाग,
पुनः पारतंत्र्य आल्याशिवाय
काही खरं नाही तुझं"

महाराष्ट्राच्या सुवर्ण-महोत्सवानिमित्तानेही अशाच आशयाच्या आक्रोशी कविता लिहिल्या जातील व गेल्या पन्नास वर्षांचा आढावा घेतला तर तशा प्रकारच्या आत्म-ताडनाला पुरेशी कारणे आहेत असेही ध्यानात येईल.

वरकरणी पाहिले तर असे म्हणावे लागते की, संयुक्त महाराष्ट्र झाल्याने मराठी समाजाचा काही फायदा झाला आहे किंवा त्याचे समाधान वाढले आहे, असे

नाही. तसे असते तर स्वतंत्र विदर्भाची मागणी वारंवार पुढे येत राहिली नसती. गुजरातेपासून वेगळे होण्याची भाषा सौराष्ट्र कधी काढत नाही. उत्तर कर्नाटक व दक्षिण कर्नाटक यांच्यात दुफळी असल्याचे ऐकिवात नाही. विदर्भ मात्र महाराष्ट्राशी एकरूप झाल्याचे दिसत नाही. गोवा महाराष्ट्रात यावा अशी आपली इच्छा होती. 'महाराष्ट्रातील गोमंतक पक्ष' गोव्यात सत्ताधारी होता. 'गोव्याने महाराष्ट्रात विलीन व्हावे की केंद्रशासित राहावे?' या प्रश्नावर सार्वमत घेण्यात आले व ते महाराष्ट्राच्या विरोधात गेले. या घडामोडी पाहता असे वाटणे साहजिक आहे की, महाराष्ट्रात यावे व महाराष्ट्रात राहावे याचे आकर्षण मराठी भाषिकांना वाटावे अशी स्थिती नाही. बरे, महाराष्ट्रातील जनतेलाही सर्व मराठी भाषिकांनी एकत्र नांदावे याची ओढ लागलेली दिसत नाही. मुंबईतील मराठी भाषिकांची बूज महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी राखली नाही, हे आपण पाहिलेच. बेळगाव, कारवार, निपाणी, डांग, भैसदेही इत्यादी सीमावर्ती भागातील मराठी भाषिकांच्या दुर्दशेचाही महाराष्ट्रातील राजकीय पक्ष व राज्यकर्ते आत्मीयतेने विचार करताना दिसत नाहीत.

मराठी जनतेची भौतिक स्थिती पाहिली तर तीही सुखाची तर राहोच पण सहन करण्याजोगीही नाही. ज्या शेतकऱ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून आपण राज्यकारभार चालवतो असा टेंभा राज्यकर्त्यांनी सतत मिरवला त्यांच्या आत्महत्या गेली पाच वर्षे होताना आपण पाहातो आहोत. पाण्यासाठी ग्रामीण जनता वर्षातून ६ महिने वणवणा फिरत असते. गुन्हेगारी, महिला व आदिवासी आणि दलित यांच्यावरील अत्याचार, सरकारी नोकरांचा भ्रष्टाचार, कायदा व सुव्यवस्था यांच्या रक्षणासाठी पोलिसांनी घडविलेल्या चकमकी यांच्या बातम्या वृत्तपत्रांतून व चित्रवाणीवरील वाहिन्यातून दुथडी वाहात असतात. विजेची टंचाई, भारनियमन, विजेची भाववाढ, दुरुस्तीच्या नावाखाली तासन् तास बंद ठेवलेली वीज या सर्वांना आपण आता सरावलो आहोत. नक्षलवाद्यांचे समांतर सरकारी-आणि दहशतवाद्यांचे हल्ले यांचा संताप आपल्याला येत नाही. एक प्रकारचा कोडगेपणा आपल्या अंगी बाणला आहे.

माझ्या समोर 'बदलता महाराष्ट्र' नावाचे डॉ. एन्. डी. पाटील यांच्या गौरवार्थ काढलेले पुस्तक आहे त्यात ख्यातनाम पुरोगामी विचारवंतांनी लिहिलेले लेख आहेत. अरुण साधू यांनी या पुस्तकात 'संयुक्त महाराष्ट्र : अपेक्षापूर्ती की अपेक्षा भंग' या नावाचा लेख लिहिला आहे. संयुक्त महाराष्ट्र झाल्यापासून मराठी समाजाची अधोगतीच झाली आहे, असा त्यांच्या लेखाचा रोख आहे. ते लिहितात, "महाराष्ट्राच्या जन्मापासून मराठी भाषेची एकंदर परिस्थिती खालावत चालली असून स्वभाषेचे प्रेम महाराष्ट्रातून कमीच होत चालले आहे... विकासाच्या प्रचंड दबावातून अनेक भांडणे निर्माण होतात... पण त्यासाठी महाराष्ट्राची शकले झाली तरी बेहेत्तर असे पवित्रे ... मोठे समजले जाणारे पुढारी घेऊ लागतात तेव्हा धक्का बसतो... सध्याची प्रवृत्ती संपूर्ण घसरणीची आहे. एक संगीत व दुसरे क्रिकेट सोडले तर कोणत्याही क्षेत्रात मराठी प्रतिभेचा भारतीय स्तरावर फार उजेड पडत असल्याचे दिसत नाही.... हे सारे बोल अनेकांना कडू वाटतील ... आजचे वास्तव पाहिले तर ही कडू गोळी मराठी माणसाने पचवायलाच हवी."

हे सर्व विचारवंत पुरोगामी व परिवर्तनवादी असल्याने चळवळी, चळवळीतून समाज-शिक्षण, पर्यायी विकासनीती आदी मुद्द्यांवर त्यांचा भर आहे. महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतरच्या १०-१५ वर्षात तरुणांच्या चळवळींचा मोठा बोलबाला होता. 'तरुणाई' हा लाडका शब्दप्रयोग बाबा आमटे यांनी त्या काळात प्रचारात आणला. मराठवाड्यातील तरुणांनी भ्रष्टाचाराच्या विरोधात काही काळ आंदोलन चालवले होते. ऐंशीच्या दशकात शेतकरी संघटनेने राज्यव्यापी धामधूम घडवून आणली. आता मात्र, नियंत्रणमुक्ती व जागतिकीकरण यांचा शासनकर्त्यांनी अवलंब केल्यानंतर, कोणतीच चळवळ या प्रतिगामी अर्थकारणाच्या विरोधात उभी राहात नाही याचे वैषम्य अनेक थोर विचारवंताना वाटत असते.

माझे इतिहास-संशोधक मित्र पांडुरंग बलकवडे हे कायम डोंगर-दऱ्यातून भटकत असतात. त्यांनी एक गोष्ट सांगितली. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यात, सह्याद्रीच्या उतरणीवर मस्की धनगर म्हणून बारकीशी जमात राहाते. गायी-गुरे बाळगून व डोंगराच्या उतारावरील

खाचरात नाचणीची शेती करून ही मंडळी कशीबशी उपजीविका करतात. कोकणातील या जवळपास भाकड असणाऱ्या गायी दिवसाला अर्धा लिटर दूध देतात. या दुधाचे दही करावयाचे. ते घुसळून लोणी व ताक निराळे करायचे. लोणी कढवून आठवड्याला एका कुटुंबाला अर्धा शेर तूप मिळते. पेठेच्या बाजारात तूप विकून येणाऱ्या पैशातून मीठ-मिरची विकत आणायची. रोज नाचणीची भाकरी, ताक आणि तिखट खाऊन राहायचे, असा या जमातीचा जीवनक्रम असतो. या धनगरांशी बोलत असताना त्यानं बलकवड्यांना विचारले, "यंदा पाऊस-पाणी बरे आहे ना, तुमच्याकडे?" बलकवडे म्हणाले, "दादा, तुम्ही नाचणीची भाकरी आणि ताक यावर दिवस कंठता. आमच्याकडच्या पावसाचे तुम्हाला काय देणे घेणे?" ते धनगर म्हणाले, "अहो, तुम्हाकडे पाऊस झाला तर मिरची तेवढीच आण्या-दोन आण्याने स्वस्त मिळेल."

ही आमच्या वंचित माणसांची सोशिक आणि समाधानी वृत्ती आहे. पुरोगामित्वाच्या व परिवर्तनाच्या मोजपट्ट्या लावून महाराष्ट्राची प्रगती-अधोगती तपासणे अस्थानी होईल. कालच्यापेक्षा आजचा दिवस नक्कीच बरा आहे, असे जोपर्यंत जनसामान्यांना वाटते आहे तोपर्यंत चळवळीच्या उकळीचे बुडबुडे फक्त सभापरिषदातूनच अनुभवता येतील.

❖❖❖

लेखकांचा परिचय

❋ **प्रा. डॉ. अशोक चौसाळकर**

राजकीय उपपत्ती व राजकीय चळवळी या दोन्हीचेही मर्मज्ञ अभ्यासक.

पत्ता :– प्राध्यापक व विभाग-प्रमुख, विद्यानगरी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४. दूरध्वनी : २६३९४८५

❋ **प्रा. डॉ. किशोर महाबळ**

राज्यशास्त्र व प्रशासकीय व्यवस्था या विषयांचे गाढे अभ्यासक.

पत्ता :– प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर. दूरध्वनी : ९८२२७०३०१९.

❋ **प्रा. डॉ. मेधा दुभाषी**

सहकार चळवळीच्या अर्थ व राजकारणाचा अभ्यास.

पत्ता : वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, विद्यापीठ मार्ग, पुणे ४११ ००७ दूरध्वनी : ९०११११६५४५.

❋ **श्री. सुधीर मोघे**

प्रसिद्ध कवी व गीतकार.

पत्ता : 'मुक्तछंद', ६६/९८, भुसारी कॉलनी, पौड रस्ता, कोथरुड, पुणे ४११ ०३८ दूरध्वनी : २५२८०८०८.

❋ **श्री. सुधीर नांदगांवकर**

चित्रपटांचे रसग्राहक.

पत्ता : ५१, सनफ्लॉवर, ऑर्किड कॉम्प्लेक्स, माजिवडे, ठाणे (पश्चिम) ४०० ६०१. दूरध्वनी : ९३२३९४१८९७.

❋ **डॉ. विश्वास सहस्रबुद्धे**

अभियंता, नाट्य दिग्दर्शक व नाट्यतंत्रज्ञ.

पत्ता : 'पूर्ती', १९ गोवर्धन सोसायटी, महर्षीनगर, पुणे ४११ ०३७ दूरध्वनी : ९८२३३६९६०५.

❋ **श्रीमती करुणा गोखले**

स्त्री-वादाच्या व स्त्री-सबलीकरण चळवळीच्या अभ्यासिका आणि कार्यकर्त्या.

पत्ता :– 'पवन', एफ् – विंग, ४०१ डी एस् के विश्व, धायरी, सिंहगड रस्ता, पुणे दूरध्वनी : ९३२२७७००७३.

दिलगिरी :–

'नवभारता'चा मार्च-एप्रिल २०१० चा जोड-अंक 'समीक्षा विशेषांक' म्हणून प्रसिद्ध झाला. त्यात दोन गंभीर चुका झाल्या. त्या अशा :

१. 'आधुनिकता व उत्तर आधुनिकता' या लेखाचे प्रा. अशोक कृष्णाजी जोशी व प्रा. मिलिंद मालशे असे दोन लेखक आहेत. अनुक्रमणिकेत व लेखावरही प्रा. मिलिंद मालशे यांचे नाव घालावयाचे राहून गेले.

२. 'अलौकितावाद व नव-अलौकिकतावाद' या लेखाच्या लेखिका प्रा. सौ. श्यामला मुजुमदार या आहेत. अनुक्रमणिकेत त्यांचे नाव प्रा. सौ. उज्ज्वला मुजुमदार असे छापले गेले आहे.

या दोन्ही चुकींबद्दल आम्ही संबंधित लेखकांची माफी मागतो व दिलगिरी व्यक्त करतो. इथून पुढे या विषयी दक्ष राहू.

अनुक्रमणिका

प्राज्ञपाठशाळा मंडळाचे प्रकाशन

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

स्मृतिव्याख्यान, २००१

नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकतंत्र : भारतीय संदर्भात विवेचन

द. ना. धनागरे

नागरी समाजाचे स्वरूप, भारतासारख्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर असलेल्या व्यामिश्र समाजांमध्ये 'नागरी समाजा' ची संकल्पना स्वीकारताना निर्माण होणाऱ्या प्रश्नांची नेटकी मांडणी येथे एका ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञाने केली आहे.

मराठीत दुर्लक्षित राहिलेल्या या विषयावरील बहुधा एकमेव सुबोध विवेचन.

पृष्ठे ५४
किंमत रू. ४०/-

संपर्कासाठी पत्ता : चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ,
३१५, गंगापुरी, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)

अनुक्रमणिका

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

वैदिक संस्कृतीचा विकास

(तिसरी आवृत्ती, १९९६)

प्रा. मे. पुं. रेगे यांच्या विवेचक पुरस्कारासह

वैदिक संस्कृतीचा विकास ह्या बृहद् ग्रंथात शास्त्रीजींनी अधिकाराने आणि कौशल्याने आपल्या प्रदीर्घ सांस्कृतिक वारशाचे आत्मीयतेने पण चिकित्सकपणे परीक्षण केले आहे. त्यांच्या संस्कृत वाङ्मयाच्या व्यासंगाच्या व्याप्तीची कल्पना या ग्रंथावरून चांगली येते. वैदिक वाङ्मय, दर्शने, महाकाव्ये, शास्त्रे, पुराणे, बौद्ध व जैन साहित्य इत्यादी सर्व शाखांतील संस्कृत साहित्याचा त्यांनी आपल्या विवेचनात पुरेपूर उपयोग केला आहे. वैदिक संस्कृतीची समावेशक, उदार, विधायक बाजू त्यांनी उलगडून दाखविली आहे.

डेमी आकाराची ३६ + ५७२ पृष्ठे

किंमत रू. ३००/-

● संपर्कासाठी पत्ता ●

चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ,
३१५, गंगापुरी, वाई ४१२ ८०३ (जि. सातारा)

अनुक्रमणिका

लेखकांस आवाहन

नवभारत मासिकामध्ये दर्जेदार वैचारिक लेखनाचे आम्ही नेहमीच स्वागत करतो. पण नवभारताकडे आपले लेखन पाठविण्यापूर्वी काही काळजी घ्यावी अशी विनंती आहे.

१. आपले लेखन सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस असावे.

२. आपण लेखनासाठी जे संदर्भ वापरले असतील ते लेखाच्या शेवटी काही टीपा असल्यास त्यासह द्यावेत.

३. महत्त्वाचे म्हणजे आपण आपला लेख यापूर्वी कुठल्याही नियतकालिकात प्रसिद्धीसाठी पाठविलेला नाही याची स्पष्ट कल्पना नवभारतच्या संपादकांना द्यावी.

४. नवभारतमध्ये लेख छापण्यापूर्वी तो संपादक मंडळाच्या योग्य त्या सदस्याकडे वाचनासाठी व अभिप्रायासाठी पाठविला जातो त्यामुळे तो लेख कुठल्या महिन्यात नवभारतमध्ये येईल किंवा येणार नाही हे यथावकाश कळविले जाईल याची लेखकांनी कृपया नोंद घ्यावी.

आपल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ आपले आभारी आहे.

– संपादक मंडळ

आपल्या ग्रंथालयात अवश्य हवीत अशी

प्राज्ञपाठशाळा मंडळ ग्रंथमालेची

संग्राह्य वैचारिक मराठी प्रकाशने

	सुधारित किंमत २० नोव्हेंबर २००६ पासून लागू
■ वैदिक संस्कृतीचा विकास (तिसरी आवृत्ती) । तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	३०० रु
■ अद्वैतसिद्धीचे मराठी भाषांतर (पूर्वार्ध) । ब्र. स्वामी केवलानंद सरस्वती	२०० रु
■ पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास । डॉ. सुमंत मुरंजन	१२० रु
■ हिंदी साहित्यविचार । प्रा. प्यारेलाल गोहेल	२५ रु
■ श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ	६० रु
■ संशोधन साधना । डॉ. वसंत स. जोशी	६० रु
■ आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास । ऋग्वेदी	१५० रु
■ वागीश्वरी । डॉ. गो. के. भट	६० रु
■ प्रस्थानभेद (प्राचीन १४ विद्यांची माहिती) पुनर्मुद्रण । गं. वा. लेले	५० रु
■ गिर्यारोहण परिचय । अच्युत खोडवे	४० रु
■ इतिहासाचे तत्त्वज्ञान (दुसरी आवृत्ती) । सदाशिव आठवले	१३० रु
■ दासशूद्रांची गुलामगिरी (भाग २) । शरद पाटील	१५० रु
■ शाहीर हैबती । डॉ. शिवाजीराव चव्हाण	४० रु
■ गीताचिकित्सा । भाऊ धर्माधिकारी	१४० रु
■ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) । सौ. मालती देशपांडे	२५ रु
■ बौद्ध धर्माचा अभ्युदय आणि प्रसार । प. ल. वैद्य	५० रु
■ हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन (संवर्धित दुसरी आवृत्ती) । मे. पुं. रेगे	१६० रु
■ पाच पुस्तक-परीक्षणे । वा. म. कुलकर्णी	६० रु
■ भेदविलोपन : एक आकलन । अशोक केळकर	३० रु
■ कॉलिंगवुडची कलामीमांसा - एक भाष्य । रा. भा. पाटणकर	१०० रु
■ धर्मश्रद्धा : एक पुनर्विचार । दि. के. बेडेकर	३० रु
■ आचार्य शं. द. जावडेकर : व्यक्तित्त्व आणि विचार	१०० रु
■ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कार्य आणि विचार	१५० रु
■ इहवाद आणि सर्वधर्मसमभाव । मे. पुं. रेगे	१२० रु
■ प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा	२०० रु
■ चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान (तृतीयावृत्ती) । सदाशिव आठवले	१०० रु
■ विनोबांची संस्कृत साम्यसूत्रे (रसग्रहणात्मक मराठी अनुवाद) । वसंत नारगोलकर	१२० रु
■ नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकतंत्र : भारतीय संदर्भात विवेचन । द. ना. धनागरे	४० रु
■ प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती (निवडक मौलिक लेखांचा संग्रह) । डॉ. म. अ. मेहेंदळे	५५० रु
■ हिंदुधर्माची समीक्षा आणि सर्वधर्मसमीक्षा (दुसरी आवृत्ती) : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	२२५ रु
■ पाश्चात्य नीतिशास्त्राचा इतिहास (दुसरी आवृत्ती) : प्रा. मे. पुं. रेगे	१६० रु

१) ग्रंथालये व संस्थांना किंमतीत १० टक्के सूट. पोस्टेजचा खर्च वेगळा पडेल. २) व्ही. पी. ची पद्धत नाही.
३) पैसे मनिऑर्डरने वा ड्राफ्टने पाठवावेत.

संपर्कासाठी पत्ता : चिटणीस, प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५ गंगापुरी, वाई ४१२८०३ (जि. सातारा)

हे मासिक घ. वा. जोशी यांनी के'सागर ग्राफिक्स ॲण्ड प्रिंटर्स, गणपती आळी, वाई, पिन : ४१२८०३ येथे छापून सरोजा भाटे यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांच्याकरिता तेथेच प्रसिद्ध केले.